# 'स्व' - रुपवर्धिनी कार्यवृत्त
# २०१६









कार्याची कीर्तीध्वजा सर्वदूर फडकू दे । राष्ट्रोन्नती एकमात्र ध्यान हेच चालू दे ।




वर्ष दहावे, अंक पाचवा, जानेवारी २०१७
मासिक अंकाची किंमत रु. पाच
वार्षिक वर्गणी रुपये १००/- (विशेषांक रु. २५)

## महाराष्ट्र शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार'




**सामाजिक समता – समरसता**

हा दृष्टिकोन समोर ठेवून वर्धिनीची नित्य वाटचाल चालू आहे.
याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या 'सामाजिक न्याय व विशेष सहाय्य' विभागाने
२०१५-१६ चा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार'
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते
डॉ. बाबासाहेबांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त
गुरुवार दिनांक १८ ऑगस्ट २०१६ या दिवशी 'स्व'-रूपवर्धिनीला बहाल केला.
वर्धिनीच्या स्थापनेपासून कै. किशाभाऊ पटवर्धन सर आणि त्यांचे सर्व सहकारी
तसेच गत ३७ वर्षे या कामासाठी ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता
हे काम वाढावे यासाठी अतोनात कष्ट घेणारे सर्व कार्यकर्ते
आणि समाजातील सर्व स्तरातील पाठीराखे
या साऱ्यांचाच हा एक प्रकारे बहुमान आहे.

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१६

**संपादक**
श्री. जयंत कवठेकर
**संपादकीय मंडळ**
श्री. सुनील कुलकर्णी
सौ. मंजुषाताई कुलकर्णी
श्री. निलेश धायरकर
कु. अहिल्या धायगुडे
**दूरध्वनी संपर्क**
श्री. जयंत शंकर कवठेकर
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४
(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०
भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/- (विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’-रूपवर्धिनी
या नावाने काढावा.

## अंतरंग

❖ हृदगत

❖ अध्यक्षीय मार्गदर्शन

❖ विशेष लेख

❖ विभागशः वार्षिक वृत्त

❖ आर्थिक स्थिती व आवाहन

**❖ छपाई ❖**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ :** श्री. विशाल काळे

# ‘स्व’–रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

* श्री. प्रमोद चौधरी * पद्मश्री श्री. प्रतापराव पवार

## संस्थापक सदस्य

* कै. पु. व. श्रॉफ
* कै. कृ. ल. पटवर्धन
* कै. कां. गि. शहा
* कै. दत्तोबा तांबे
* कै. अ. न. गोगावले
* कै. कृ. गो. लवळेकर
* कै. रा. प. देसाई
* श्री. श्री. शं. सामळ

## विश्वस्त मंडळ

**अध्यक्ष**
पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

**उपाध्यक्ष**
श्री. उदय गुजर (शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम)
श्री. शिरीष पटवर्धन (जनसंपर्क आणि विस्तार)

**कार्याध्यक्ष**
श्री. रामभाऊ डिंबळे

**सहकार्याध्यक्ष**
प्रा. संजय तांबट (संघटन कार्य)
श्री. विश्वास कुलकर्णी (प्रशासन आणि प्रकल्प)

**कोषाध्यक्ष**
श्री. विलास कुलकर्णी

**सहकोषाध्यक्ष**
श्री. सुमित डोळे

**कार्यवाह**
श्री. ज्ञानेश पुरंदरे

**सदस्य**
श्री. कन्हैयालाल बलदोटा
डॉ. विनेश नगरे

**सहकार्यवाह**
श्रीमती पुष्पाताई नडे (महिला विभाग)
श्री. विनोद बिबवे (शाखा आणि युवा विभाग)
श्री. अरविंद केळकर (प्रशासन आणि प्रकल्प)
श्री. अमोल उंदरे (विकास आणि विस्तार)

### विश्वस्त मंडळाचे मानद सदस्य

* पद्मश्री श्री. मिलिंद कांबळे * श्री. सुधीर दरोडे * श्री. अविनाश धर्माधिकारी * कॅ. (नि.) सनतदादा भाटे



**पंजीकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. अ‍ॅक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**
**PAN No. : AAATS 5461K**



संपर्काचा पत्ता : – ‘स्व’–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.
दूरध्वनी : – (कार्यालय) – (०२०) २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई–मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश ‘स्व’–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

देणगीसाठी आयकर सवलतीचा तपशील :

**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**
**(For the period of 2014-15 to 2016-17)**
**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**

तेऽपि यान्ति परां गतिम् । – भगवद्‌गीता

प्रत्येक व्यक्ती जन्माला येताना शूद्र म्हणूनच जन्माला येते. पण योग्य त्या संस्कारांनी ती द्विजत्वाला पोहोचते अशी आपली परंपरा सांगते. दुर्दैवाने हे संस्कार सर्वांना उपलब्ध होत नाहीत. म्हणून भगवान् श्रीकृष्णांनी स्त्रिया, व्यापारी आणि शूद्रांना देखिल परमोच्च गती प्राप्त करता येते असे आग्रहपूर्वक सांगितले.

हा शिक्षणसंस्कार प्रत्येकाला देण्याचे धर्मकार्य करण्यासाठी कै. किशाभाऊ पटवर्धन यांनी 'स्व'– रूपवर्धिनी या आपल्या सेवा संघटनेची स्थापना केली. 'पटवर्धन' हे वंचितांचे लज्जारक्षण करणाऱ्या श्रीकृष्णाचेच नाव आहे. किशाभाऊंच्या या व्रताचा वारसा आपल्याला लाभला आहे.

आज वर्धिनीच्या कार्याची जबाबदारी पूर्णपणे किशाभाऊंच्या तालमीत तयार झालेल्या त्यांच्या शिष्यांकडे आली आहे. हे काम अधिक सखोल, सर्वदूर पोहोचणारे आणि आधुनिक तरीही सहृदय असे असावे असा आपला संकल्प आहे.

डॉ. माशेलकरांसारख्या प्रज्ञाचक्षू शास्त्रवेत्याच्या अध्यक्षतेखाली आपण हे काम नव्या उंचीवर नेऊ या. नेटवर्किंग, न्यू एज् लर्निंग, इनोव्हेशन (विस्तृत संपर्क, आधुनिक अध्ययन तंत्र आणि नवनिर्माण क्षमता) या सूत्रांच्या अवलंबनाने येत्या काळात सर्वांना भेडसावणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) तंत्रबळाचा सामना करीत आपण घडवीत असलेले वंचित सामाजिक/आर्थिक गटातील विद्यार्थी निश्चितपणे यशस्वीच होतील असे आपल्याला पहायचे आहे. त्यांना नव्या युगाला पुरुन उरणारी अद्ययावत कौशल्ये (न्यू स्किल सेट्स्) द्यायची आहेत.

हे काम सोपे नाही, याची मला कल्पना आहे. पण ते शक्य होईल असा नव्या टीमला विश्वास आहे. पण अवघड आव्हान पुढेच आहे. आपल्या वैयक्तिक जीवनात सफल होणारा आपला वर्धक हा सेवाभावाने अर्पित होणारा कसा घडेल हे पहायचे आहे. आपले काम नुसते करुणेचे नाही. आपल्याला सेवेकरी घडवायचे आहेत. ज्या वंचित वस्त्या आणि जातींमधून आपला विद्यार्थी येतो, त्या वस्त्या आणि जातींचे प्रश्न सोडवण्याचा वसा त्याला आपण कसा देऊ शकू हे खरे आव्हान आहे. त्यासाठी कै. किशाभाऊंचे आशीर्वाद आपणाला हवे आहेत.


भगिनी निवेदितांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त तळटीपांमधून त्यांचे प्रेरक विचार देऊन आम्ही त्यांची आठवण जागवीत आहोत.

**– श्री. रामभाऊ डिंबळे**
कार्याध्यक्ष

❖ ❖ ❖

**निवेदिता म्हणजे समर्पिता. जी भारताला समर्पित झाली ती निवेदिता.**

## ‘स्व’–रूपवर्धिनीचे नूतन अध्यक्ष
# पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर



आयुष्यातली कमीतकमी १२ वर्षं तरी अनवाणी पायांनी चालणारा, सार्वजनिक दिव्याखाली अभ्यास करणारा एक जिद्दी माणूस. पुढे, इंग्लंडमध्ये, जिथे न्यूटनने सही केली आहे, त्या पुस्तकात स्वाक्षरी करण्याचा सन्मान मिळवणारा पहिला महाराष्ट्रीय माणूस ठरला. ती व्यक्ति म्हणजे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर.

रघुनाथ माशेलकरांचा जन्म कोकणातल्या माशेल गावाचा. बालपण मुंबईत गेलं. मुंबईतल्या पालिकेच्या शाळेतल्या शिक्षकांनी माशेलकरांचं आयुष्य घडवलं. त्यांच्या आई, हे त्यांचं प्रमुख प्रेरणास्थान! शिवणकाम किंवा मिळेल ते काम करुन माशेलकरांच्या आई काही कमाई करत असत. अल्प शिक्षणामुळे एकदा नोकरी नाकारली गेली तेव्हा त्यांनी स्वतःच्याच मनाशी निर्धार केला – आज माझं शिक्षण नाही म्हणून मला काम मिळालं नाही, पण माझ्या मुलाला मात्र मी जगातलं सर्वोच्च शिक्षण देईन. हा निर्धार पुरा करण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले.

मुंबईची युनियन हायस्कूल ही माशेलकरांची शाळा. शाळा तशी गरीब परिस्थितीतली, पण तिथले शिक्षक मात्र श्रीमंत! धनाने नव्हे बरं ज्ञानाने. तिथेच भावे सर पदार्थविज्ञान शिकवायचे. प्रयोग करुन, विद्यार्थ्यांना अनुभव देऊन शिकवण्यावर त्यांचा विश्वास होता. एकदा बहिर्गोल भिंगाविषयी शिकवतांना, त्यांनी सर्व मुलांना शाळेबाहेर उन्हात नेलं. भिंग खालीवर करुन, कागदावर एक प्रखर बिंदू मिळवला. त्यावर सूर्यकिरण एकवटले गेले होते. कागद जळू लागला. त्या क्षणी भावे सरांनी, आपल्या एका बुद्धिमान विद्यार्थ्याला हाक मारली, “माशेलकर, तूही जर या भिंगाप्रमाणे, तुझ्यातल्या सर्व शक्ती एकवटल्यास, तर जगात काहीही मिळवू शकशील.” या घटनेने, जीवनात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली माशेलकरांच्या ओंजळीत पडली आणि माशेलकरांसारखा एक प्रतिभावंत वैज्ञानिक भारताच्या ओंजळीत!

अकरावीच्या परीक्षेत रघुनाथ माशेलकर बोर्डाच्या मेरिटमध्ये आले. पण परिस्थितीमुळे त्यांनी पुढे न शिकण्याचं ठरवलं. इथेही आईच्या आग्रहामुळे त्यांनी बी. केम. ला प्रवेश घेतला आणि १९६९ साली मुंबई विद्यापीठाच्या रसायन अभियांत्रिकी विभागाच्या तत्कालीन संचालक प्रा. एम्. एम् शर्मा या अत्यंत सृजनशील संचालकाच्या मार्गदर्शनाखाली, माशेलकरांनी आपली पी.एच.डी. ची पदवी प्राप्त केली. युरोपमधील सल्फोर्ड विद्यापीठात जाऊन पोस्ट डॉक्टरल संशोधनही केलं.

सूर्यकिरणं समांतर जाऊ दिली तर त्यांच्यात प्रचंड शक्ती असूनही त्याचा वापर होत नाही. ही शक्ती एकवटली तर मात्र किमया घडवू शकते, हे तत्वज्ञान, छोटया रघुनाथच्या मनात खोलवर रुजलं. पुढे हेच रघुनाथ माशेलकर, सी. एस. आय. आर. चे प्रमुख झाले. प्रमुखपदाची सूत्रं हातात घेतली, तेव्हाही त्यांच्या मनात हीच भिंगाची घटना घुटमळत होती. त्या वेळी सी. एस. आय. आर. मध्ये २८,००० लोक कार्यरत होते. देशभर जागोजागी प्रयोगशाळा वसवल्या होत्या. परंतु त्या अपेक्षितपणे काम करत नव्हत्या. माशेलकरांनी व्हिजन नावाची योजना आखली. चाळीस प्रयोगशाळांचं समातंर चालणं थांबवून, त्यांना एका ध्येयाने आणि काम करण्याच्या एका विशिष्ट पद्धतीने बांधलं आणि मग त्यातून निर्माण झालं, भारतीय वैज्ञानिक संशोधनाचं एक अचाट पर्व! एका सृजनशील शिक्षकाने, एका विद्यार्थ्याला दिलेल्या गुरुमंत्राने, भारताच्या प्रगतीच्या इतिहासात मोलाची कामगिरी घडवली.

डॉ. माशेलकरांचा उल्लेख आला की त्याबरोबर लगेचंच आठवते ती त्यांनी जिंकलेली आगळीवेगळी हळदीघाटची लढाई! अमेरिकेने हळदीचं पेटंट घेतलं ही बातमी वाचताच माशेलकर बैचेन झाले.

आपल्याकडे अनेक पिढया चालत आलेलं हे ज्ञान, कोणीतरी स्वतःचं असल्याचा राजरोस दावा करतोय, हे योग्य नव्हे. यावर अमेरिकेशी न्यायालयीन लढाई करून आपले हक्क आपण राखले पाहिजेत, असा पक्का विचार करुन डॉक्टर कामाला लागले. जोरदार न्यायालयीन लढाई झाली. हळदीचे गुणधर्म सांगणारे अनेक संस्कृत श्लोक, पाली भाषेत हळदीबद्दल लिहिले गेलेले संदर्भ, अनेक कागदपत्रं जमा करुन, त्या सर्वांचा अभ्यास करुन, डॉक्टर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही अमेरिकेविरुद्धची हळदीघाटची लढाई जिंकली. हाच प्रकार बासमती तांदळाच्या बाबतीतही घडला. त्याचेही पेटंट माशेलकरांनी परत मिळवले.

औषधांपासून ते खतांपर्यंत, जीवनोपयोगी रसायनांपासून ते गृहिणींसाठी छोटे उद्योग वसवून देण्यापर्यंत, अनेक लहान मोठया व्यवसायात डॉ. रघुनाथ माशेलकरांनी मार्गदर्शन केलं. व्यवस्थापनापासून ते स्वतः प्रयोगशाळेत संशोधन करण्यापर्यंत जातीने काम केलं आणि आजही ते तितक्याच जोमाने कार्यरत आहेत. सकारात्मक विचारांचा प्रचंड उस्फूर्त असा प्रवाह म्हणजे डॉ. रघुनाथ माशेलकर. भारताच्या प्रगतीच्या कल्पनांविषयीचे त्यांनी लिहिलेले लेख आपण जरूर वाचावेत. जगद्विख्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे, जबरदस्त सकारात्मक विचारांच्या मुशीतून घडलेलं, काही एक वेगळंच रसायन आहे.

भारताच्या अतिप्रचंड लोकसंख्येबद्दल अत्यंत सकारात्मकतेनं ते म्हणतात, ''भारताची भव्य लोकसंख्या हाच एक मोठा खजिना आहे. भारतात वैचारिक स्वातंत्र्य असल्यामुळे जेवढी माणसं जास्त, तेवढया नवनवीन कल्पना पुढे येण्याला वाव. त्यातच भारतातली ५५ टक्क्याहून जास्त मंडळी तिशीच्या घरातली आहेत. म्हणजे हा तरुणांचा देश, अनेक नवनवीन धडाडीची कामं करु शकेल. आणि भारतातली सांस्कृतिक विविधता देशाला अधिक सृजनशील बनवेल.''

वर्धिनीच्या कार्यपद्धतीला आधुनिक पंचसूत्रीची जोड देणारे डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर, सर्व वर्धिनी परिवारासाठी स्फूर्तिस्थान आहेत.

❖ ❖ ❖

ज्या दिवशी भारतातील स्त्रिया राष्ट्रीयतेचे दीप तिच्या मंदिरात उजळतील
त्या दिवशी ते मंदिर प्रकाशमान होईल.

# अध्यक्षीय मार्गदर्शन

## ही देशविकास वर्धिनी !

**- पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर**

'बंधू-भगिनींनो, सर्वप्रथम आपणा सर्वांचे आभार मानतो की, आपण सर्वांनी मला एवढ्या मोठ्या संस्थेच्या अध्यक्षपदी आमंत्रित केलंत आणि आज प्रत्यक्ष बोलावलंत. ही प्रचंड मोठी जबाबदारी आहे. कै. किशाभाऊ यांनी उभी केलेली ही संस्था त्यांच्या प्रेरणेचे दर्शन घडविते. त्यांच्याच आशीर्वादाने पुढे जायचे आहे. कै. अप्पासाहेब पेंडसे यांनी स्थापिलेल्या ज्ञान प्रबोधिनीचाही मी अध्यक्ष आहे. या दोन्ही मोठ्या जबाबदाऱ्या आहेत असे मी मानतो. मी आपणास सांगू इच्छितो की मी अध्यक्ष म्हणून नाही तर कार्यकर्ता म्हणून आपल्यासोबत काम करणार आहे. **'स्व'-रूपवर्धिनी ही माझ्यासाठी एक समाज विकास वर्धिनी आहे, देश विकास वर्धिनी आहे.** यामुळे आपल्याला मोठे काम करायचे आहे. आपण सांगितल्याप्रमाणे आपण आज तीन तास एकत्र होतो. यात मला सर्वात आवडले की 'स्व'-रूपवर्धिनी ही केवळ विचार वर्धिनी नव्हे; तर कृती वर्धिनी आहे. केवळ विचारांपेक्षा कृती महत्त्वाची असते. जोपर्यंत आपण कृती करत नाही, तोपर्यंत आपण पुढे जाणार नाही.

राष्ट्रीय एकात्मता यावर आपण सतत बोलत असतो. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण आज देश दुभंगलेला आहे. पी.व्ही. सिंधू जेव्हा खेळत होती तेव्हा सर्व देश एकत्र आला होता. अर्थातच १२५ कोटी लोक एकत्र आले होते. असाच देश कायम एकत्र राहण्यासाठी वर्धिनीने काम केले पाहिजे. मी आधी सांगितल्याप्रमाणे मार्गदर्शक असणार नाही, तर तुमच्याबरोबर चालणार आहे. मी माझ्याकडून जेवढे शक्य आहे, जेवढी ऊर्जा आहे तेवढी तुम्हाला देईन. आपले ध्येय आहे की देशात मतभेद असले तरी मनभेद असता कामा नये. मुलांसाठी आनंददायी शिक्षण असावे, ज्ञान-मूल्य-संस्कार-बुद्धी यांची वृद्धी करावी यासाठी आपण प्रयत्न करूयात.'

(रविवार दि. २१ ऑगस्ट रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील अध्यक्षीय भाषणातून...)

◆ ◆ ◆



मला या भारतात चारित्र्य व इच्छाशक्तीचं दर्शन घडलं. इथे देवाधिकांच्या सुईत वावरतोय असेच वाटते.

**आदरणीय डॉ. बानूबाई कोयाजी या वर्धिनीच्या मार्गक्रमणाला विधायक वाट दाखवणाऱ्या दीपस्तंभच. जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे आदर्श कर्मशील जीवन मान्यवरांच्या आदरांजलीतून आपल्यासमोर ठेवीत आहोत.**



## कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती

**– श्री. शिरीष पटवर्धन**

विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कै. अच्युतराव आपटे यांनी श्री. प्रतापराव पवार यांची ओळख वर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांना करून दिली. अधुनमधुन भेटण्यासाठी, वर्धिनीच्या कामातील प्रगती कानावर घालण्यासाठी किशाभाऊ दै. सकाळच्या कार्यालयात प्रतापरावांना भेटायला जायचे. अशाच एका भेटीमध्ये त्यांनी सकाळ पेपर्सच्या संचालिका डॉ. बानु कोयाजींचा परिचय किशाभाऊंना करून दिला. कै. किशाभाऊंच्या भेटण्याच्या यादीत आणखी एक नाव वाढले आणि किशाभाऊ अधुनमधुन डॉ. बानु कोयाजींना भेटायला के.ई.एम.मध्ये जाऊ लागले.

१९८९ मध्ये होम नर्सिंग कोर्सच्या विद्यार्थिनींना प्रशस्तिपत्रक देण्याच्या एका कार्यक्रमासाठी किशाभाऊंनी डॉ. बानु कोयाजी यांना निमंत्रित केले होते. या निमित्ताने बानुबाई वर्धिनीमध्ये आल्या. वर्धिनीचे काम, मुलींचा–महिलांचा मिळणारा प्रतिसाद, परिसरातील गरीब वस्त्यांमधील मुलामुलींसाठी वर्धिनी करीत असलेले काम पाहून त्या खूप प्रभावित झाल्या. त्या किशाभाऊंना म्हणाल्या, ''तुम्ही होम नर्सिंगचा तीन महिन्याचा अभ्यासक्रम चालवित आहात. मी आमच्या के.ई.एम.हॉस्पिटलच्या नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या तुमच्या कामाला जोडून देते. हॉस्पिटलमध्ये रुग्णांना सहाय्य करण्यासाठी नर्सेसना मदतीला कोणीतरी हवे असते. आमच्या प्राचार्या श्रीमती जयवंती कलबाग वर्धिनीसाठी एक अभ्यासक्रम तयार करतील आणि स्वतः शिकवायला पण येतील.'' बानुबाईंनी म्हटल्याप्रमाणे नंतर श्रीमती कलबाग वर्धिनीत आल्या. नर्सिंग क्षेत्रातील मोठा अनुभव असलेल्या आणि या क्षेत्रात ज्यांना मोठा मान होता अशा कलबाग मॅडम वर्धिनीच्या कामात नियमितपणे येऊ लागल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवातीला सहा महिने कालावधीचा व पुढे एक वर्ष कालावधीचा असा रुग्णसहाय्यक अभ्यासक्रम सुरू झाला. या एका अभ्यासक्रमामुळे गेल्या २७–२८ वर्षांमध्ये पुणे शहराच्या गरीब वस्त्यांमधील; तसेच पुण्याजवळच्या ग्रामीण भागातील २७०० हुन अधिक गरजु मुली आणि महिला स्वावलंबी होऊ शकल्या.

अनेक लहान मोठ्या आणि ख्यातनाम रुग्णालयांमध्ये त्या नोकरी करीत आहेत. बानुबाई आणि कलबाग मॅडम यांच्यामुळे २७०० घरांत आनंद निर्माण करता आला.

रुग्ण सहाय्यक अभ्यासक्रम जसा सुरू झाला, तसा आणखी एक उपक्रम बानुबाईंनी पुढाकार घेतल्यामुळे वर्धिनीत सुरू होऊ शकला. वर्धिनीचे झोपडपट्टी परिसरातील असलेले काम, वस्त्यांमधील लोकांशी असलेला आत्मीयतेचा संपर्क पाहून बानुबाईंनी सुचवले की, आठवड्यातून दोन दिवस वर्धिनीमध्ये महिला आणि बालकांच्या आरोग्याची काळजी घेणारे आरोग्य केंद्र सुरू करावे. या केंद्रात आरोग्य तपासणीसाठी के.ई.एम.मधील डॉक्टर आणि नर्सेस यायला लागल्या. संस्थेच्या इमारतीसमोर असलेल्या वस्तीतील महिला आणि मुले नियमितपणे या आरोग्य केंद्राचा लाभ घेऊ लागले. गरजूंना तपासणी आणि औषधे दोन्हीचा लाभ मिळू लागला. हळूहळू या केंद्रात काम करणाऱ्या डॉक्टर्सवर– विशेषतः डॉ. रंगनाथन यांच्यावर येणाऱ्या महिला रुग्णांचा इतका विश्वास बसला की डॉक्टरांनी समजावून सांगितल्यावर संतती नियमनाची ऑपरेशन्स चांगल्या संख्येने होऊ लागली. एका छोट्या केंद्राचा हा प्रभाव थक्क करणारा होता. पण ही कमाल होती बानुबाई आणि त्यांच्या केईएममधील डॉक्टर्सची.

सकाळ पेपर्स, केईएम यांच्या इतकंच बानुबाई वर्धिनीच्या कामात लक्ष घालू लागल्या. १९९६ मध्ये वर्धिनीने फिरती प्रयोगशाळा प्रकल्प सुरू केला होता. पुण्याभोवतीच्या खेड्यातील शाळांमध्ये जाणाऱ्या मुलामुलींना विज्ञान संकल्पना शिकवण्यासाठी कार्यकर्ते जात होते. पुण्यातून या खेड्यांमध्ये जाण्याची व्यवस्था मात्र तितकी नीट मार्गी लागली नव्हती. या प्रकल्पाची आवश्यकता लक्षात घेऊन आणि त्याचे मोल लक्षात घेऊन बानुबाईंनी देणगीसाठीचे एक आवाहन पत्र जेआरडी टाटा आणि थेल्मा ट्रस्टला पाठवायला सांगितले. वर्धिनीने पाठवलेल्या या पत्राचा पाठपुरावा त्यांनी स्वतः केला आणि केवळ एक मोठे वाहन घेण्यासाठी नाही तर हा प्रकल्प पुढे तीन वर्षेसुरळीत चालावा यासाठी तेरा लाख रुपयांची देणगी त्यांनी वर्धिनीला मिळवून दिली. बानुबाईंच्या या एका कृतीने हा प्रकल्प खरोखरीच आणखी गतिमान झाला आणि विस्तारला.

समाजामध्ये अत्यंत मानाचे स्थान असलेल्या बानुबाई सामान्य कार्यकर्त्यांशी, सामान्य नागरिकाशी अगदी सहजपणे संवाद करायच्या. त्यांचे सामाजिक कामावर असलेले मनापासूनचे प्रेम, काम करताना असलेली निस्पृहता या गुणांमुळे त्यांच्या शब्दाला मोठे वजन प्राप्त व्हायचे. तनमनधनपूर्वक काम करायचे म्हणजे नेमके कसे याचे बानुबाई हे एक मोठे उदाहरण होते. २००४ मध्ये त्यांचे देहावसन झाले. पण समाजसेवा त्यांच्या रक्तात इतकी भिनली होती की, देहदान करून मृत्युनंतरही त्यांनी समाजाला उपयोगी पडण्याचा आपला वसा सोडला नाही. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली.

❖ ❖ ❖

## डॉ. बानूबाई कोयाजी : सळसळत्या उत्साहाचा प्रवाह....

– श्री प्रतापराव पवार

बानूबाईंचा माझा प्रत्यक्ष परिचय 'सकाळ'मुळे झाला. अर्थात त्यापूर्वीच त्यांचे नाव मी ऐकून होतोच. १९८१ मध्ये मा. यशवंतराव चव्हाणांच्या सुचनेवरून मी 'विशाल सह्याद्री'चे काम पाहत होतो. स्पर्धक म्हणून 'सकाळ' व तेथील अनेक गोष्टी तेव्हा माहीत झाल्या. नानासाहेब परूळेकरांच्या मृत्युपत्रामुळे त्यांचे शेअर्स विकायला आहेत, म्हणजे 'सकाळ' विकत घेता येऊ शकतो, अशी माहिती मिळाली होती. मी यमूताई किर्लोस्करांना भेटून 'सकाळ' किर्लोस्कर समूहाने विकत घ्यावा, असे पटवून दिले. मी आणि यमूताईंनी मा. शंतनुराव आणि मा. चंद्रकांत किर्लोस्करांपुढे 'सकाळ'चा प्रस्ताव ठेवला. दोघा बापलेकांनी (त्यांच्या स्वभावाप्रमाणे) क्षणार्धात निर्णय घेऊन, 'हा आपला विषय नाही. यामुळे यात आपण पडायचे नाही', असे सांगितले. मी आणि यमूताईंनी बानूबाईंना भेटायचे ठरविले होते ते रद्द झाले आणि बानूबाईंचा प्रत्यक्ष परिचय व एकत्र काम करण्याला १९८५ हे वर्ष उजाडले.

'सकाळ' चे शेअर्स घेताना बहुतांशी सर्व वाटाघाटी बानूबाई करीत होत्या. एक कणखर, स्पष्टवक्ते, आपल्या अटींवर तसूभरही मागे न हटणारे असे व्यक्तिमत्त्व मी त्यांच्या रूपाने पाहत होतो. व्यवहार पूर्ण झाल्यावर जसूभाईंनी राजीनामा दिला. बानूबाईंनी संभाव्य अडचणी आणि 'सकाळ'वरील स्नेह यांमुळे संचालक मंडळावर राहण्याची इच्छा व्यक्त केली. मलाही ते हवेच होते. त्यांना के.ई.एम. इतकीच 'सकाळ' संस्थेची खडान्‌खडा माहिती होती आणि मी पूर्ण अनभिज्ञ होतो.

आमच्या तारा चटकन जुळल्या. इतक्या, की अनेकदा आमच्या मनात एकच कल्पना, प्रयोग, विचार घोळत असत, याची प्रचिती सातत्याने आल्याने मला त्या त्यांचे चिरंजीव डॉ. कुरूसबरोबर स्थान देऊ लागल्या, ते त्यांच्या अखेरपर्यंत. हळूहळू त्यांची पवार कुटुंबाशी जवळीक निर्माण झाली. 'कोल्हापूर सकाळ'ला जाताना त्या मला आग्रहाने महाबळेश्वरच्या बंगल्यात राहायला नेऊ लागल्या. माझे वडील बंधू अप्पासाहेब यांच्या हृदयावर शस्त्रक्रिया झाल्यावर ते माझ्याकडे राहत होते. बानूबाईंना अप्पासाहेबांच्या कामाचे फार कौतुक होते. त्या जवळपास रोज भेटायला येत. अप्पासाहेबांनी औषध, व्यायाम यांत कुचराई केली, तर त्यांना 'नॉटी बॉय, हे योग्य नाही' म्हणून प्रेमाचा दम भरत. ते दृश्य मोठे गमतीदार दिसे. अप्पासाहेबांना कानपिचक्या देण्याची कोणाची हिंमत नसे. बानूबाई ते सहजपणे करीत.

एका लग्न समारंभात सभोवती असलेल्या घरातील पुढील पिढीतील मुलामुलींकडे पाहत मी त्यांना थट्टेने म्हटले, "बानूबाई, आमच्याकडे एक प्रश्न निर्माण झालाय. आमच्या पुढील पिढीमध्ये मुलांपेक्षा मुलीच अधिक कर्तबगार दिसताहेत." बानूबाई क्षणार्धात उतरल्या, "अरे, हा तुझ्या एकट्याचा प्रश्न नाही, हा तर जागतिक प्रश्न आहे." सर्व मुलींनी माझी हुर्यो उडवली. बानूबाईंनी क्षणार्धात त्यांची मने जिंकली होती. बानूबाई बुद्धीमान, स्पष्टवक्त्या होत्या. त्यांनी मला नेहमीच प्रामाणिकपणे सल्ला दिला. त्यासाठी वेळ दिला. त्यांना माणसांची पारख चांगली होती. एखाद्या व्यक्तीच्या तोंडावर रोखठोक बोलायला त्या कचरत नसत; मग ते भले पंतप्रधान मोरारजीभाई का असेनात!

मदत करण्याबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञताही कायमच असे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी आयुष्यभर के.ई. एम.मध्ये केलेल्या कामाचा पगार कधीही घेतला नाही. आपला चरितार्थ खासगी प्रॅक्टिसमधून चालविला.

आपल्या मिळकतीप्रमाणेच खर्च, राहणीमान ठेवायचे याबद्दल त्या आग्रही होत्या. कर्ज घेणे हे त्यांना फार काळजीत टाकणारे असे. ते फेडण्यासाठी त्या नियम करीत व काटेकोरपणे पाळत. व्यवसायवृद्धी कर्ज घेऊन वाढवायच्याबाबत त्या अतिदक्ष तर होत्याच; पण त्यापेक्षा खर्च वाढवू न देणे त्यांना पसंत असे.

लोकांना व्यक्तीश: जेवढी मदत करता येईल तेवढी त्या करीत असत. के.ई.एम.मध्ये गरीब, गरजू लोकांना परवडेल असेच दर असावेत, ही त्यांची भूमिका होती. त्यामुळे चांगले पगार देता आले नाहीत, अधिक आधुनिक साधने आणता आली नाहीत, तरी त्यांना त्याचे वैषम्य नसे. वाढत्या खर्चासाठी, वाढत्या गरजांसाठी त्या अखंड मदत गोळा करीत राहिल्या.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांचे संबंध होते. अनेक समित्यांवर त्यांनी अखेरपर्यंत काम केले. आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये भाषण करण्यासाठी त्या अनेक महिने आधी तयारीला लागत. आपल्याला आलेल्या प्रत्येक पत्राला उत्तर गेलेच पाहिजे, हा त्यांचा कटाक्ष असे. दिवसाला चौदा-पंधरा तास काम करूनही त्या थकत नसत. नेहमी पायऱ्या चढूनच वरच्या मजल्यावर जात. ''तुमचे वजन कसे वाढत नाही?'' असे विचारल्यावर त्या म्हणाल्या, ''आपण जगण्यासाठी खायचे; खाण्यासाठी जगायचे नसते.''

नानासाहेब परुळेकरांबद्दल त्यांना मनस्वी आदर होता. १९५५ पासून त्या 'सकाळ' परिवारात सामील झाल्या ते अखेरपर्यंत. नानासाहेब परूळेकर के.ई.एम.चे विश्वस्त मानद सचिव होते. त्यामुळे ते दोघेही 'सकाळ' आणि के.ई.एम. परिवाराशी एकरूप झाले होते. बानूबाईंचे दीर डॉ. कोयाजी हे नानासाहेब परुळेकरांचे स्नेही. त्यामुळे त्या दोघांची ओळख.

नानासाहेबांच्या नावे जो न्यास निर्माण केला गेला, त्यात बानूबाईंनी बारकाईने लक्ष घातले. त्यांच्या सहभागाने तो एक आदर्श सामाजिक न्यास झाला. नानासाहेबांच्या ऋणानुबंधातील तो एक स्वाभाविक भाग होता. परुळेकरांच्या अनेक आठवणी त्या सांगत. त्यांच्या पारशी बाजाच्या मराठी भाषेत म्हणत, ''ते एक लई जिद्दी मानूस होतं.'' परुळेकरांबद्दलच्या त्यांच्या शेऱ्यावर मी मिस्कीलपणे विचारले, ''ते तुमच्याबद्दल काय म्हणत?'' त्या खळखळून हसल्या नि म्हणाल्या, ''ते म्हणत, बानू काही कारणांनी तुझे कुटुंब संपले, तर दुसऱ्या दिवशी तू आता नवीन संसार उभा कसा करायचा याचा विचार करून कामाला लागशील!''

बानूबाई अडचणींना न डगमगणाऱ्या, अतिशय आशावादी आणि उत्साही स्वभावाच्या होत्या. शेवटच्या दिवसांत त्यांच्या पायाच्या हाडांना पट्ट्या ठोकणे आदी शस्त्रक्रिया झाल्या. केव्हाही गेले की त्या म्हणत, ''आता मी बरी आहे. एक दोन आठवड्यांनी कामाला लागेन.'' कधीही त्यांनी स्वत:बद्दल तक्रार केली नाही. मी नेहमी फोनवर आधी कल्पना देऊन भेटायला जात असे. त्या नट्टापट्टा करून बसलेल्या असत. सर्व गोष्टींची चौकशी करीत. आदरातिथ्याला कमी पडत नसत. दारापर्यंत सोडायला येत.

'सळसळता उत्साह सामाजिक जाण असलेले, अभ्यासू कणखर, आपल्यावरील जबाबदाऱ्यांचे ओझे अखंडपणे वाढवीत नेणारे प्रेमळ व्यक्तिमत्त्व', असे त्यांचे थोडक्यात वर्णन करता येईल.

मला बानूबाईंचा जो सहवास व प्रेम मिळाले त्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो.

❖ ❖ ❖

**राजकारणात व समाजकारणात निस्पृह नेतृत्वाचा आदर्श घालून देणाऱ्या कै. नानाजी देशमुख यांचंही यंदा जन्मशताब्दी वर्ष आहे. यानिमित्ताने त्यांच्या आठवणींचा केलेला हा जागर...**



## राष्ट्रऋषी नानाजी देशमुख आणि ग्रामविकास

**– श्री. गणेश पाठक, सौ. मृदुल पाठक**

एकात्म मानव दर्शनचे प्रणेते स्व. पं. दीनदयालजी उपाध्याय यांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या विचारांना प्रत्यक्ष रूप देण्यासाठी मा. नानाजी, मा. अटलजी आणि त्यावेळच्या त्यांच्या अन्य सहकार्यांनी एकत्र येऊन 'दीनदयाळ शोध संस्थान'ची नई दिल्ली येथे १९७२ साली स्थापना केली. एक वैचारिक मंच तयार झाला. परंतु त्या देशाची एकंदर परिस्थिती बघता प्रत्यक्ष कार्याला प्रारंभ होऊ शकला नाही. राजकीय वातावरण अस्थिर होते. त्यावेळच्या परिस्थितीचा अंदाज घेऊन स्व. जयप्रकाशजी नारायण यांच्या नेतृत्वाखाली लोकसंघर्ष समितीची स्थापना झाली आणि समग्र क्रांतीचा शंख फुंकला गेला. देशभर महासभांचे आयोजन करण्यात आले. आपल्या विरोधातील जनक्षोभ उसळत असल्याच्या वातावरणाचा इंदिराजींनी धसका घेतला आणि २५ जून १९७५ रोजी आणीबाणीची घोषणा केली. सर्व विरोधी पक्षाच्या प्रमुखांना, सामाजिक संस्थांच्या प्रमुखांना, विरोधात आवाज उठविणाऱ्यांना बंदी करण्यात आले. परिस्थिती अतिशय गंभीर होती. अशा परिस्थितीला नियोजनपूर्वक धाडसाने विरोध करण्याचे कार्य नानाजींकडेच दिले गेले. त्यामुळे भूमिगत राहून नानाजी देशभर जनतेला मार्गदर्शनाचे कार्य करीत होते. देशभर जेलभरो आंदोलने झाली. एके दिवशी नानाजींनाही पकडण्यात पोलिस यंत्रणा यशस्वी झाली.

प्रत्येक मनुष्याच्या जीवनात एक 'टर्निंग पॉईंट' असतो, असे म्हणतात. तसे नियतीने नानाजींचे जेलमध्ये जाणे हा 'टर्निंग पॉईंट' ठरविला असावा. जेल में मैं देश के स्थितीके बारे में सोचने लगा तो मुझे दीनदयालजी का एकात्म मानव दर्शन ही देश विकसित करने का एकमेव मार्ग दिख रहा था। तो उसके लिए गावों मे काम करना पडेगा। और मैने निश्चय किया की अब इसी मार्ग पर चलना। मैने उसका अभ्यास करना प्रारंभ किया। जिन महापुरुषोंने इस कार्य का प्रयास किया था उसका अध्ययन किया। महात्मा गांधी, विनोबा भावे, धीरेन्द्र मुजुमदार ऐसे अनेकोंने इस विषयपर कार्य किया है।''

राजकारणात एवढ्या उंचीवर असताना, जनता पार्टीचे सर्वेसर्वा असताना; तसेच जनता पार्टी विजयी झालीच तर तुमचा शब्द शेवटचा, असा मान-सन्मान मिळणार हे दृष्टीक्षेपात असताना, तुम्ही चलो गाव की ओर का

भारतीय ऋषींची समाधानी वृत्ती, त्यांचं समाजातील महत्त्व, विशुद्ध चारित्र्य या गोष्टी आपल्या राष्ट्रीय जीवनातील मोलाचा ठेवा आहेत.

निवडले, या माझ्या प्रश्नाचे उत्तर नानाजींनी वरीलप्रमाणे दिले. म्हणून नानाजींचे जेलमध्ये जाणे त्यांच्या जीवनाचा 'टर्निंग पॉईंट' होता असे मी म्हणालो. त्यासाठी पर्याय म्हणजे त्यांनी निवडणुकीत उभे रहावे. तो प्रस्ताव त्यांनी मान्य केला. परंतु फक्त एकदाच निवडणूक लढण्याचा. नानाजी उत्तर प्रदेशमधील बलरामपूर मतदारसंघातून प्रचंड बहुमताने विजयी झाले. जनता पार्टीचे राज्य आले. पंतप्रधान पदासाठी श्री. मोरारजी देसाई ह्यांच्या नावावर एकमत झाले व ते पंतप्रधान झाले. त्यांनी आपल्या मंत्रीमंडळात नानाजींकडे उद्योग मंत्रालयाचा भार दिला. परंतु नानाजींचा विचार पक्का झाला होता. त्यामुळे त्यांनी हे मंत्रीपद नम्रपणे नाकारले. ८ ऑक्टोबर १९७८ रोजी पाटणा येथील जगमातृभूमी या हिन्दी साप्ताहिकाच्या प्रकाशन कार्यक्रमात जयप्रकाशजींच्या उपस्थितीत त्यांनी ६० वर्षावरील ज्येष्ठ राजकारणातून कार्यकर्त्यांनी बाहेर पडावे व तरुणांना वाव द्यावा अशी घोषणा केली. केवळ नानाजींनी राजकारणाचा मार्ग सोडला व बलरामपूर लोकसभा क्षेत्र ज्या जिल्ह्याचा भाग आहे असा गोंडा जिल्हा ग्रामविकासाच्या कार्यासाठी आपली कर्मभूमी ठरविली.

'राष्ट्रनवरचना का कार्य ग्रामीण अंचलोसेही होना चाहिये । जीवन का मूल व प्राकृतिक संसाधनो का स्त्रोत और विकास का क्रम भी यही है ।' पं. दीनदयालजींच्या या विचारांना मूर्त रुप देण्याकरिता ग्रामविकासाच्या कार्याचा शुभारंभ तत्कालीन राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी आणि सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्या उपस्थितीत झाला. नानाजींच्या चिंतनातून कार्याची दिशा ठरली होती. शिक्षण-आरोग्य-स्वावलंबन-सदाचार-कृषी ह्या पाच मानबिंदूवर कार्य योजना तयार झाली. परंतु हे कार्य करण्यास कार्यकर्त्यांची आवश्यकता होती. नानाजींनी तरुणांना आवाहन केले. त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत पन्नास तरुण कार्यकर्ते ग्रामविकासाच्या सेनेत दाखल झाले. इतक्या संख्येने तरुण कार्यकर्त्यांनी प्रतिसाद द्यावा ही एक मोठी गोष्ट होती. त्यांना खेड्यात काम करताना प्रतिष्ठा मिळावी म्हणून त्यांना 'ग्रामोदय संयोजक' या नावाने संबोधावे असे ठरले. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी व पिण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक पाण्याच्या समस्येवर कार्य सुरू झाले. विंधन विहीरीच्या (बोअरवेल) च्या माध्यमातून जमिनीखालील पाणी वर आणण्याचे ठरले. शेतकऱ्यांच्या सहकार्याने व बँकेच्या आर्थिक सहकार्याने दोन वर्षात २७००० च्या वर विंधन विहीरी घेण्याचे कार्य झाले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. एका पिकाच्या ऐवजी ३ पिके घेऊ लागले. त्यामुळे बँकेचे कर्ज परत करून विश्वासाचे वातावरण तयार झाले. जी. आय. पाईपच्या ऐवजी बांबूचा पाईप हा प्रयोग यशस्वी झाला व त्यामुळे कमी खर्चात विंधन विहीरी घेण्यात शेतकरी तयार होऊ लागले.

जिल्ह्यातून ५० गावांची ग्रामविकासाच्या कामासाठी निवड करून प्रत्येक ग्रामोदय संयोजकाकडे एकेका गावाची जबाबदारी देण्यात आली व त्यांनी त्या गावांमध्ये 'ग्रामविकास कार्य समित्या' तयार केल्या. १) शेती २) शिक्षण ३) आरोग्य ४) ग्राम स्वच्छता ५) उद्योग ६) महिला ७) बाल संस्कार ८) खेलकुद ९) शासकीय कार्य १०) समन्वय ११) धर्मस्थळ अशा विषयांसाठी गावातील तरुणांना प्रमुख केले. याकरिता कार्यकर्ता अभ्यास वर्ग, कार्यशाळा शिबिर, सहल असे अनेक उपक्रम स्वतः नानाजींच्या उपस्थितीत व अन्य तज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने होत असत. १९८५ च्या दरम्यान ३५ गावे तंटामुक्त झाली. एकूण २० ते २२ हजार कि.मी. अंतराचे गावातून मुख्य रस्त्यापर्यंत अनेक जोडरस्ते तयार करण्यात आले. गावागावातील शाळा, मंदिरे, दुरुस्त करून सुशोभित करणे, मुलांचे खेळ, महिलांचे प्रबोधन, भजन, सत्संग असे अनेक उपक्रम सुरू झाले. त्यामुळे समरसता, समानता, एकता, द्वेषरहित वातावरणातून व अनेक वर्षे अबोला असलेली घरे जोडली गेली. २५ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर (पं. दीनदयाल व श्री. जयप्रकाश नारायण यांची जयंती) दरवर्षी वृक्षारोपण कार्यक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविला जायचा.

ग्रामोदय संयोजक ही संकल्पना थोडी मर्यादित वाटू लागली. गावात कार्य करणारा 'ग्रामोदय संयोजक'; परंतु इतर कार्यातील संलग्न कार्यकर्ता कोण ? मग 'समाजशिल्पी' ही संकल्पना समोर आली. पण या संकल्पनेत केवळ एकटा पुरुष किंवा महिलाच संबोधित होत. जेव्हा एकटे कार्यकर्ते कार्यात सहभागी होतात तेव्हा भविष्याच्या दृष्टीने ते फार काळ कार्य करतील असे निश्चित सांगता येत नाही. म्हणून नंतर तरुण परिवार-छोटा परिवार, स्नातक परिवार कार्यात असावा हा विचार झाला आणि 'समाजशिल्पी दम्पती योजना' कार्यान्वित झाली.

शेतीविषयक कार्य सुरू असताना उद्योगाचे कार्य प्रारंभ झाले. ग्रामीण युवकांना वेगवेगळ्या विषयांचे प्रशिक्षण देण्यासाठी सात मार्केटिंग सेन्टर्स सुरू केले. तिथे लाकडी बैलगाडी, लोखंडी बैलगाडी, चप्पला तयार करणे, लाकडी-लोखंडी फर्निचर तयार करणे अशा अनेक प्रशिक्षणांची व्यवस्था केली गेली. दोरी तयार करण्याची मशीन तयार करून हाही व्यवसाय हजारो शेतकऱ्यांनी स्वीकारला. स्वयंपाक करताना चुलीच्या धुराने महिलांना डोळ्याचा त्रास होत असतो म्हणून 'धूररहित चूल' प्रचारात आणली. गोंडा शहरात युवकांना प्रशिक्षण देण्याकरिता दीनदयाल औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करून त्यात वायरिंग, मोटार रिवाईंडींग, शिलाई, तारपट्टी तयार करणे असे अनेक प्रशिक्षण दिले जाते. आरोग्याच्या दृष्टीने आयुर्वेद उपचार पद्धतीला प्राधान्य देण्यात आले. जयप्रभा ग्रामआरोग्य केंद्राच्या मार्फत अनेक गावांमध्ये आरोग्य परीक्षण व केंद्रावर औषध निर्मिती सुरू झाली. अनेक गावात 'दादी माँका बटुआ' कार्यान्वित झाला. मोतीबिंदुमुळे गावांमध्ये अंधत्व आल्याच्या अनेक केसेस लक्षात आल्यावर त्यासाठी उपाय म्हणून 'नेत्रशिबिरे' घेण्यास सुरुवात झाली. लखनऊ, कानपूर, दिल्लीवरुन तज्ज्ञ डॉक्टर्स येऊन सेवा देऊ लागले. गावागावांतील शाळांमधून व्यवस्था करून एका कँपमध्ये १०० ते १५० मोतीबिन्दू ऑपरेशन होऊ लागले. एका जन्मान्ध मुस्लिम मुलीला दृष्टी मिळाल्याचे वृत्त सर्व जिल्हाभर पसरले आणि गावागावातून भरपूर सहकार्य मिळू लागले.

गोंडा जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला. पुरुष ७% महिला ३% असे शिक्षित समाजाचे प्रमाण. ५० गावामध्ये शाळाबाह्य मुलांसाठी शाळेत जाण्याविषयी प्रयत्न झाले. मुलींचे शिक्षण व्हावे यासाठी 'जयप्रभा ग्रामोदय विद्यालय' सुरू झाले. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना आंघोळ घालून घ्यावे लागायचे. कारण शाळेत आंघोळ करून जायचे असते हा विचारच नव्हता. कालांतराने चांगले परिवर्तन घडले. त्याच शाळेत आज २५०० मुलेमुली शिक्षण घेताहेत आणि १२ वी पर्यंत शिक्षणाची व्यवस्था आहे. म. गांधीच्या 'नयी तालीम'प्रमाणेच इथल्या मुलांना शेतीकाम, बागकाम, मत्स्यपालन, कोंबडीपालन, रेशमकिड पालन, दोरी तयार करणे अशा अनेक लघु उद्योगाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था तर आहेच; परंतु 'पढाई के साथ कमाई' हाही विषय अभ्यासक्रमात जोडला आहे.

गोंडा जिल्ह्याची एक सीमा नेपाळला लागली आहे. त्या सीमावर्ती भागात 'थारु' जनजातीच्या आदिवासी लोकांची ५० गावे आहेत. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी 'थारु जनजाती विकास केन्द्राची' स्थापना केली. कष्टकरी आणि स्वच्छताप्रिय स्वभावाचे अतिशय साधे लोक आहेत. त्यांचा विश्वास संपादन करायलाच तीन वर्ष लागली परंतु त्यानंतर त्यांच्याच सहकार्याने मुलामुलींचे निवासी विद्यालय, आरोग्य केंद्र, उद्योग प्रशिक्षण केंद्र, महिला संगठन अशी कार्ये सुरू झाली. ते स्वतःला महाराणा प्रतापांचे वंशज म्हणवतात. म्हणून महाराणा प्रतापांचा अश्वारुढ पुतळा सर्वांच्या सहकार्याने बसविण्यात आला.

सामाजिक कार्याला अध्यात्मिकतेची जोड असावी म्हणून जयप्रभाग्राम परिसरात 'भक्तिधाम' मंदिराची निर्मिती झाली. या मंदिरात चारहीधाम, पवित्र धर्मस्थळ, देव, संत, ज्योर्तिलिंग ह्यांच्या दगडात कोरून प्रतिकृती

आयुष्यभर मला एकच ओझं वागवायला आवडेल ते म्हणजे विवेकानंदांचं कार्य.
त्याच्यापुढे मुक्तीसुद्धा तुच्छ आहे.

तयार केल्या आहेत. ज्या व्यक्ती तीर्थयात्रा करण्यास असमर्थ आहे अशांना एकाच ठिकाणी सर्वदर्शन घडते हे वैशिष्ट्य आहे. 'भक्तिच्या शक्तीला ग्राम विकासाकडे वळविण्याचा उद्देश', त्यामागे होता.

१९७८ ते १९९० या बारा वर्षाच्या कालावधीमध्ये गोंडा जिल्ह्यातील कार्याचे वृत्त देशभर पसरले होते. लोकशक्तिच्या आधारे खराच विकास झाला का ह्याची वास्तविकता जाणून घेण्यासाठी शासकीय समित्या येऊन निरीक्षण-परीक्षण करून कार्याच्या योग्यतेच्या पावत्या देऊन गेल्या. अनेक क्षेत्रातील उच्चपदस्थ महानुभवांनी भेटी दिल्या. कार्याचा विस्तार व्हावा असा विचार होऊ लागला व महाराष्ट्रात नागपूर, बीड, औरंगाबाद, गुजराथमध्ये अहमदाबाद, बिहारमध्ये सिंहभूम, मध्य प्रदेशमध्ये चित्रकुट अशा काही निवडक ठिकाणी कार्य प्रारंभ करण्यात आले. प्रत्येक ठिकाणच्या कार्याचे स्वरुप जरी वेगळे असले तरी उद्देश आणि मानबिन्दू सारखेच होते. नागपूरचे कार्य बालकांसाठी संस्काराचे 'बालजगत' या नावाचे सुरू झाले. यामधून सामाजिक भिन्न-भिन्न वर्गातील अशा २०० मुलामुलींना एकत्र आणून त्याच्यात समरसता, समानता, एकता, बन्धुभाव अशा विचारांची पेरणी करणे, अनेक कामाचे मार्गदर्शन-प्रशिक्षण व व्यावहारिक जीवनाची ओळख त्याचबरोबर स्पर्धांच्या माध्यमातून आनंद असे उपक्रम चालतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडणवीस त्याचे माजी विद्यार्थी आहेत.

मराठवाडा हा महाराष्ट्राचा दुर्लक्षित व उपेक्षित भाग. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, उद्योग, राजकीय अशा क्षेत्रात मागे. त्यातलाच बीड जिल्हा सरकारी दप्तरी मागासलेला जिल्हा अशी नोंद आहे. म्हणून या जिल्ह्यात दीनदयाळ शोध संस्थानचे कार्य सुरू झाले. ह्या जिल्ह्यातून उसतोड कामगार खूप मोठ्या प्रमाणावर पश्चिम महाराष्ट्रात जातात तेव्हा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होत असे. ह्या विषयावर कार्य करण्याचे ठरवून पाटोदा तालुक्यातील डोमरी या पहाडी क्षेत्रातील गावात 'गुरुकुल' सुरू केले. वर्ग ५ ते १० वीपर्यंतची निवासी शिक्षण व्यवस्था केली. आज अनेक विद्यार्थी भिन्न भिन्न क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करताहेत. केवळ शासनाकडूनच विकास कामाची अपेक्षा न करता समाजाने एकत्र येऊन कार्य केल्याने आपणच आपल्या विकासाला न्याय देऊ शकतो. याचे उदाहरण म्हणजे भर उन्हाळ्यातील मे महिनाभर चाललेले डोमरी गावातील तलावाचा गाळ काढण्याचे कार्य म्हणजेच 'धन्यता अभियान.' ७००-८०० लोकांचा रोज निवास. वय वर्ष ५ ते ८५ या वयोगटातील लोक तिथे असत. रोज सकाळ-संध्याकाळ गाळ काढण्याची श्रमसाधना असायची. शेजारच्या गावकऱ्यांकडून जेवणाची व्यवस्था. स्वतः नानाजी एक महिना निवासी. मा. अण्णा हजारे, मा. साखरे महाराज, आ. बाबुजी (सुधीर फडके) यांचे मार्गदर्शन झाले. तरुण वर्गात एक जोश होता, नवचैतन्य घेऊन गेले व अनेक गावांमध्ये हा प्रयोग झाला.

महिलांमध्ये खूप क्षमता असते. काही कलासुद्धा त्यांना दैवी असतात. शिवणकला, भरतकाम, वीणकाम, पेन्टींग, खाद्यपदार्थ अशा अनेक. त्या कला दुसऱ्याला देण्याची व्यवस्था 'मथुरा महिला उद्योग प्रशिक्षण प्रतिष्ठान'च्या माध्यमातून करण्यात आली. गरजू आणि वेळ देऊ शकणाऱ्या अनेक महिलांनी ह्या कला शिकून त्यातून निर्मिती-उत्पादन व विक्री करून आपल्या कुटुंबाचा आर्थिक भार पण सांभाळला. महिला बचत गट या अभियानाचे बीजारोपणच एक प्रकारे ह्या प्रकल्पाद्वारे झाले.

लहानपणापासून बचतीचा संस्कार देण्याच्या दृष्टीने 'मेरी बचत योजना' हा प्रकल्प सुरू केला. केवळ २५ पैशात आपले खाते उघडून वर्षभर पैसे जमा करायचे आणि वर्षानंतर शाळा सुरु होते तेव्हा त्या पैशाने आपले शालेय साहित्य घेऊन स्वावलंबनाचा आनंद घ्यायचा हा हेतू. १५००-१६०० मुलांची ही 'मेरी बचत' योजना चालायची.

आई–वडील दोघे नोकरी करतात, त्यामुळे दिवसभर बाहेर, आजी आजोबा असतीलच असे नाही. मग त्या मुलांचा विकास कसा होणार, कधी एकटेच तर कधी कोण्या दायीच्या भरवशावर त्यांचे जगणे. ह्यातून मार्ग काढण्यासाठी 'गोकुळ पाळणाघर' हा प्रकल्प सुरू झाला. ह्याची पुढची पायरी ती 'शिशुवाटिका.' नव्या युगातील नर्सरी.

जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी. पावसाच्या पाण्यावरच शेतीची निर्भरता. त्यामुळे लोकसहभागातून 'पाणी अडवा पाणी जिरवा' कार्यक्रम सुरू झाला. हळूहळू प्रतिसाद मिळू लागला आणि अनेक समस्या दूर करता आल्या. आहे तेवढ्याच पाण्याचे योग्य नियोजन. एक ते दोन एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्याचे उत्पन्नवाढीचे प्रयोग, सेन्द्रीय शेतीवर भर, शेतीसंबंधी सरकारी योजनांच्या माध्यमातून विकास, शेततळे, फळबाग योजना, बांध बंदिस्ती अशा अनेक योजनांचा शेतकऱ्यांना लाभ मिळाला. मातीचे परीक्षण करून पिकांना सेंद्रिय खत देणे, जैविक कीटनाशकांचा वापर करणे, शेतकऱ्याच्या शेतीवरच योग्य बी, लागवण, योग्य पेरणी, भाजीपाला उत्पादन हे प्रयोग केले. हे सर्व कार्य 'कृषी विज्ञान केन्द्रा'द्वारे झाले.

अशिक्षित, अल्पशिक्षित तरुण महिला–पुरुषांना व्यावसायिक लघुउद्योगाच्या प्रशिक्षणाची व्यवस्था 'जनशिक्षण संस्थान'द्वारा कार्यान्वित झाली. बीड जिल्ह्यातील २०० गावातील २०,००० लोकांना प्रशिक्षण देण्यात आले. आज त्यातील ३५ ते ४०% लोक आत्मनिर्भर झाले. कार्य चालू आहे. एक अभिनव प्रयोग महिलांना नळजोडणी (Plumbing)चे प्रशिक्षण दिले. आज त्या महिला अतिशय उत्तम कार्य करून अर्थार्जन करीत आहेत.

बीड जिल्ह्यात कार्य प्रारंभ झाले, परंतु शहरात दीनदयाल शोध संस्थेची वास्तु किंवा भवन नसल्यामुळे बालवाडी, पाळणाघर, मथुरा महिला उद्योग प्रतिष्ठान आणि जिल्ह्याचे कार्यालय व जनशिक्षण संस्थान हे सर्व प्रकल्प २३ वर्ष वास्तुमध्ये चालवले जात होते. कार्य आपल्या गतीने वाढू लागले व जनसहभाग आणि जनसहकार्य मिळू लागले आणि त्यातून 'राष्ट्रऋषी नानाजी देशमुख उद्यमिता भवन' ही वास्तु उभी राहिली.

दीनदयाळ शोध संस्थानचे मुख्यालय दिल्लीला आहे. त्याची वास्तु नानाजीच्या कल्पनेतील असल्यामुळे देखणी आहे. त्या वास्तुच्या सर्वात वरच्या गच्चीवर उत्तम बाग आहे व रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्याला दिसेल अशी तिची रचना आहे. चित्रकुटमधील अनुसुया आश्रमचे संत भगवानदास महाराजांच्या दिल्ली वास्तव्यात त्यांच्या ती नजरेस पडली व त्यांना आश्चर्य वाटलं. इतक्या उंचीवर ही बाग कोणी केली ह्याची त्यांनी चौकशी केली; तेव्हा त्यांना सांगण्यात आले. लवकरच भगवानदास महाराज व नानाजी या दोन संतांची भेट झाली. त्यांनी नानाजींना चित्रकूटमध्ये कार्य करण्याचा आग्रह धरला. एवढेच नाहीतर आपली १६० एकर जमीन देऊ केली. सर्व विचारांती १९९०–९१ च्या सुमारास चित्रकूटच्या पावन भूमीवर दीनदयाळ शोध संस्थानच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. नानाजींनी केवळ १० वर्षात चित्रकुटचे रुप सर्वांगानी बदलले. शैक्षणिक, आरोग्य, शेती, उद्योग, ग्रामविकास सर्व विषयाचे मॉडेल स्वरूपात कार्य उभे झाले. इतकेच नव्हे तर चित्रकुट ग्रामीण विश्वविद्यालयाची स्थापना केली. त्याचा उद्देश एकमात्र हाच आहे की इथून जी व्यक्ती शिकून बाहेर पडेल ती ग्रामविकासाची मानसिकता घेऊनच. पुढे अन्य कार्यही अतिशय उत्तम पद्धतीने उभी राहिली.

१) रामनाथ आश्रम शाळा – ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था आहे.

२) कृष्णादेवी वनवासी बालिका आवासीय विद्यालय – वनवासी क्षेत्रातील मुलीची शाळा

३) परमानंद आश्रम पद्धती विद्यालय – मागासवर्गीय जातीच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था

४) सुरेन्द्रपाल ग्रामोदय विद्यालय – सर्व स्तरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय.

**भारताचे हे ऐक्य भुतकालीन नाही किंवा भविष्यकालीनही नाही. वर्तमानकाळातही आपण सारे भारतीय एकच आहोत. फक्त आपल्याला त्याची जाणीव नाही इतकंच.**

५) नन्ही दुनिया नर्सरी – वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील मुलामुलींची बालवाडी.

६) गुरुकुल संकुल – २० ते २५ मुलांच्या समुहासोबत एक ज्येष्ठ नागरिकाचे जोडपे राहते. त्या मुलांची सर्व व्यवस्था तेच बघतात असे ८ समुहामधून मुलांची राहण्याची व्यवस्था आहे.

७) आरोग्य धाम – महिला-पुरुष-मुले यांच्यासाठी आयुर्वेदिक दवाखाना नॅचरोपॅथी-योगा व आयुर्वेद उपचार पद्धतीने कार्य चालते.

८) रसशाला – आयुर्वेद औषधी निर्मिती केंद्र

९) गोवंश विकास एवम् अनुसंधान केन्द्र – देशी गायीचे संगोपन. संपूर्ण देशातून १२ जातीच्या गोवंशाचे एकत्रीकरण करुन हा प्रकल्प चालतो आहे.

१०) उद्यमिता विद्यापीठ – विविध व्यावसायिक प्रशिक्षणाचे केंद्र, खाद्यपदार्थ निर्मिती व विक्री केंद्र

११) रामदर्शन श्रीराम जीवनावर आधारित कलाकृती श्री. सुहास बहुलकर या कलाकाराची कला-नानाजींची कल्पना. एक अद्‌भुत रामदर्शन समाजाला घडविण्याचे कार्य.

१२) कृषी विज्ञान केंद्र – २ ठिकाणी कार्य करतात. दोन्ही केंद्रांना भारत सरकार कडून उत्तम कार्याबद्दल सन्मानित केले आहे.

१३) जनशिक्षण संस्थान – लघुउद्योगांचे गावागावात प्रशिक्षण कार्य – अनेकांचे संसार उभे झालेत.

मा. नानाजींचा एक संदेश कार्यकर्त्यांसाठी असायचा – ''हम अपने लिए नही, अपनोंके लिए है, अपने वे है जो पीडित और उपेक्षित है ।'' आणि हेच संस्थानच्या कार्याचे ध्येय ठरले. चित्रकुटला सृष्टी निर्माण झाली. अनेक सुंदर वास्तु उभ्या राहिल्या पण ज्यासाठी नानाजींनी राजकारणाचा संन्यास घेतला होता, ते ग्रामविकासाचे कार्य इथे हवे तसे दिसत नव्हते. त्यासाठी ५०० गावांचा संकल्प करण्यात आला. त्याला तीन टप्प्यात विभागले. प्रथम चरण १०० गावांचे लक्ष ठेवले. त्यासाठी समाजशिल्पी दम्पती योजनेतून तरुण जोडपी कार्यात सहभागी झाली. १९९५-९६ दरम्यान ३० जोडप्यांची पहिली तुकडी प्रशिक्षण घेऊन कामाला लागली. नानाजींचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांची कार्यनिष्ठा यातून गावागावात परिवर्तन दिसू लागले.

परिवर्तन कथा गावागावातून जाऊ लागल्या. एक मोठी पदयात्रा सर्व गावामधून काढण्यात आली. नानाजींचे वय ९०-९१. चालण्यास असमर्थ म्हणून Wheel Chair च्या साह्याने त्यांनी पदयात्रेत सहभाग घेतला. परंतु एक चमत्कार झाला. भारत बदलतोय. दीनदयाळ शोध संस्थानने नानाजींच्या नेतृत्वाखाली एक परिवर्तन घडविले. आता पहाड ओसाड नाहीत. सर्वदूर हिरवेगार दिसते. पाणी अडविले जाते. लोक आनंदी, पशु स्वस्थ दिसताहेत. उद्योग वाढताहेत. एकदम कायापालटच झाला आहे. मुले-मुली शिक्षण घेताहेत. चित्रकुट परिसरात डाकू लोकांचे फार प्रमाण होते. लोकांना खूप त्रास व्हायचा. दीनदयाल शोध संस्थानच्या कार्याने लोकांमध्ये, गावामध्ये जे परिवर्तन झाले, त्यामुळे डाकू तिथून निघून गेले.

राजकीय शक्तींपेक्षा जनतेची शक्ती अधिक शक्तिशाली, दीर्घकाळ काम करणारी व प्रोत्साहन देणारी असते हे नानाजींनी आपल्या कार्ययज्ञातून दाखवून दिले.

❖ ❖ ❖

**छत्रपती शिवराय ! चातुर्य आणि पराक्रमाच्या अद्‌भुत घटनांनी आजही आश्चर्यचकीत व्हावे अशी जीवनगाथा ! यातीलच एक दैदीप्यमान पर्व म्हणजे आग्र्याहून सुटका ! महाराजांच्या जीवनातील या तेजस्वी पर्वाला या वर्षी ३५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने हा लेख प्रपंच.**

## आग्र्याहून सुटका

**– श्री. मोहन शेटे**

स्वराज्य प्राप्तीच्या महासंग्रामास राजांनी सुरुवात केली ती पुण्याच्या दक्षिणेला. कारण दक्षिणेची आदिलशाही उत्तरेच्या मोगलाईपेक्षा दुबळी होती. मात्र एक संधी आयतीच चालून आली. मोगल बादशहा शहाजहान आजारी पडला आणि त्याचे शहजादे सत्तेसाठी आपापसात लढू लागले. राजांनी याच वेळी मोगल मुलखात लुटालुट केली. तिकडे औरंगजेब मुघल तख्त कब्जात घेण्यात यशस्वी ठरला आणि आता त्याची नजर वळली शिवाजी राजांवर ! एक ना एक दिवस हे प्रकरण आपल्याला महागात पडणार याची त्यालाही जाणीव होती आणि म्हणूनच राजांच्या विरुद्ध अदिलशाही सरदार सिद्दी जौहर स्वारीस निघाला, तेव्हा औरंगजेबानेही शाहिस्तेखानास पाठवले. राजांनीही हिंमत दाखवून पुण्याच्या लाल महालावर छापा टाकला आणि राजांकडून तीन बोटे तुटलेला शास्ताखान तीन दिवसात पुणं सोडून निघून गेला. आता राजांनीही आक्रमक पवित्रा घेतला. मोगलांची आर्थिक राजधानी सुरतेवर धडक मारली. अगणित संपत्ती लुटून मोगली मस्तीचा माज उतरवला.

आता औरंगजेबाला शि–वा–जी ही तीन अक्षरे काट्यासारखी सलू लागली. कोणाला पाठवावे या सिवाच्या विरुद्ध? कोण घेईल या दख्खन मोहिमेची जबाबदारी ? कोण ?

आणि औरंगजेबाने निवड केली ती मोगल दरबाराचा मातब्बर सरदार मिर्झाराजा जयसिंग याची. प्रचंड लष्कर घेऊन मिर्झाराजा दक्षिणेत आला. बरोबर होता दिलेरखान. आणि मिर्झाराजांनी मराठी मुलखातील गावे बेचिराख करण्याचा सैन्याला हुकूम दिला. मोगली भूतावळीचा राक्षसी नंगानाच चालू झाला. त्यांच्या टाचांखाली स्वराज्याचा अंकुर तुडवला जात होता हे पाहून राजांनी निर्णय घेतला तह करण्याचा.

पुरंदरच्या पायथ्याशी झालेल्या तहात राजांना तेवीस किल्ले मोगलांना द्यावे लागले. काळजावर दगड ठेवून राजांनी हे दुःख सहन केलं खरं. पण मिर्झा राजेंच्या मनात वेगळाच विचार घोळत होता.

आजपर्यंत या शिवाजीराजास पराभूत करणे कोणासही जमले नाही ते आपण करून दाखवले. जर या शिवाजीस आपण दिल्ली दरबारात हजर करू शकलो, तर आपली कीर्ती उभ्या हिंदोस्तानात दुमदुमेल. पण... पण या साठी राजांनी उत्तरेत दरबारात जायला हवं.

मिर्झानी राजांकडे दरबारात जाण्याचा आग्रह धरला आणि राजांनीही विचार केला. 'जाऊ या ! पाहू या या मोगली सत्तेची ताकद ! आणि हो भावी काळात हा संघर्ष ज्याला खेळायचा आहे त्या युवराज संभाजीलाही घेऊन जाऊ या.'

आणि राजांनी उत्तरेत जाण्याचा निर्णय पक्का केला. तिकडे शहाजहान मेल्यामुळे निश्चिंत झालेल्या औरंगजेबाने आपला दरबार दिल्लीहून आग्र्याला हलवला. आणि आता तो आपला पन्नासावा वाढदिवस मोठ्या थाटात करणार होता. याच दरबारात हजर राहण्यासाठी राजे उत्तरेस निघाले.

राजांनी आऊसाहेबांचा आणि राजगडाचा निरोप घेतला तो दि. ५ मार्च १६६६ रोजी. अवघ्या नऊ वर्षांच्या शंभूराजांना दूर जाताना पाहून आऊसाहेबांचं मन गहिवरुन आलं होतं.

राजांनी तापी, नर्मदा ओलांडत उत्तरेच्या अंगणात पाऊल ठेवलं. त्यांच्या बरोबर होते त्र्यंबक सोनदेव डबीर, बाजी जेधे, येसाजी कंक, हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर, कवींद्र परमानंद अशी सारी जीवाला जीव देणारी माणसं. औरंगजेबाच्या वाढदिवसाचा खास दरबार १२ मे रोजी भरणार होता. त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे ११ मे लाच राजे आग्र्याच्या वेशीवर पोचले.

बलवंत शत्रूला नामोहरम करीत दख्खनमध्ये स्वतःचं राज्य निर्माण करणारा एक तेजस्वी वीर आग्र्यात प्रवेश करीत होता. राजे विचार करीत होते. आता आपल्या स्वागताला कोण येईल ? एखादा शहजादा ? किंवा मातब्बर सरदार ? निदान राजांची तशी अपेक्षा होती.

पण स्वागताला आलं कोण ? तर मिर्झाराजांचा मुलगा रामसिंग यांच्या पदरी काम करणारा एक कारकून गिरिधरलाल मुन्शी!

पण त्यावेळी राजे शांत राहिले. दुसरा दिवस उजाडला. आज खास दरबारात जायचे; पण आजही रामसिंग आलाच नाही. राजांना घेऊन मुन्शी निघाले. रामसिंगची भेट होण्यात एवढा वेळ गेला की मुख्य दरबार संपलासुद्धा.

अखेर राजे लाल किल्ल्यात पोचले. दरबारात प्रवेशले. तो मोगली वैभवाचा दिमाख ! तो दरारा ! ती भव्य वास्तू ! कदमबोसी कुर्निसात करणारे ते हिंदोस्तांचे जाँबाज सरदार! आणि उच्च आसनावर बसलेला तो आलमगीर औरंगजेब ! पातशहाँ ए हिंदोस्तां !

ते पाहताना राजांच्या मनी कोणते कल्लोळ उमटले असतील ? ते मनात म्हणाले असतील 'अरे तू बसलाहेस ते सिंहासन चंद्रगुप्त मौर्याचं ! पृथ्वीराज चौहानाचं ! इथं बसण्याचा मान आमचा ! तू कोण ? कुठला ? आणि इथे राज्य करतोस ?' पण राजे शांतपणे चालत तख्तासमोर गेले. नजराणा पेश केला. पण बादशहाच्या चेहऱ्यावरील रेषसुद्धा हलली नाही. आणि राजांना तेथून मागे नेण्यात आलं. अगदी पंचहजारी मनबदारांच्याही मागे. ज्या जसवंतसिंगाला मर्द मावळ्यांनी सिंहगड पायथ्याला बेदम चोप दिला होता त्याच्या मागे राजांना उभं केलं...

अपमान!... पुन्हा पुन्हा अपमान ! आता सहनशक्तीचा कडेलोट झाला. ज्वालामुखीचा उद्रेक झाला आणि सह्याद्रीच्या नरसिंहानं मोगल दरबारात गर्जना केली. 'रामसिंग ! हमारे सामने ये कौन खडा है ? अरे ज्यांनी माझ्या मरहट्ट्यांचे घाव पाठीवर घेतले त्याच्या मागे मला उभं करता ? माझा अपमान करता ? सांगा तुमच्या पातशहाला की मी मराठी मुलखाचा स्वतंत्र राजा आहे. एकवेळ मी मरण पत्करेन, पण अपमान नाही.' बादशहाने दिलेल्या खिलतला ठोकर मारून आणि बादशहाकडे पाठ दाखवून राजे दरबारातून बाहेर पडले.

आणि अवघा आग्रा दरबार हादरला ! धरणीकंप !! आजपर्यंत बादशाही जोडे चाटण्यात धन्यता मानणाऱ्या लाचारांचे लोंढे या दरबाराने पाहिले होते. पण स्वाभिमानाचा हुंकार प्रथमच अनुभवला होता.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. फौलादखानाच्या तीन हजार सैन्याच्या गराड्यात राजांना कोंडण्यात आलं. सह्याद्रीचा गरुड मोगली पिंजऱ्यात कैद झाला. आता कसला राजगड आणि कुठलं स्वराज्य ! सारा अंधार !

पण संकटकाळीही राजे धीराने विचार करत होते. यातून कसं निसटायचं याचं चिंतन करत होते.

अखेर राजांनी नाटक केलं ते आजारी पडण्याचं. कितीही औषधं घेतली तरी तब्येत ढासळत चालली. आता यावर उपाय काय? दवा उपयोगी पडत नसेल तर दुवाँ मागावी. म्हणून राजांनी साधुसंतांना मिटाई वाटण्याचे ठरवले.

आता मिठाईसाठी पेटारे हवेलीत ये-जा करू लागले. सुरुवातीला फौलादखानाचे शिपाई पेटारे तपासत होते. पण हळूहळू त्यांनाही कंटाळा येऊ लागला. तिकडे औरंगजेबही शांत नव्हता. फिदाईहुसेन खानाच्या हवेलीत राजांना

न्यायचं आणि ठार करायचं असा बेत होता त्याचा. राजांना तिकडे नेण्याची तारीख होती १८ ऑगस्ट.

मात्र राजांनी १७ ऑगस्टला चपळाई केली. मिठाईच्या पेटाऱ्यात राजे आणि शंभूबाळ बसले. पेटारे निघाले. हवेलीच्या बाहेर पडताना राजांच्या जीवलगांची हृदये धडधडत होती.

अखेर पेटारे बाहेर पडले. अगदी आग्रा शहराच्याही बाहेर. यमुनेच्या काठावर राजे आले. आता कुठे जायचं ? आपण पळालो हे कळताच आग्र्याच्या दक्षिणेला आपला शोध सुरू होईल. म्हणून शत्रूला चकवा देण्यासाठी राजे गेले उत्तरेला. मथुरेच्या दिशेने.

तिकडे राजांच्या जागी झोपला होता हिरोजी फर्जंद आणि त्याचे पाय चेपत होता मदारी मेहतर. काही काळाने हिरोजी उठला. पलंगावर उशी व लोड घेऊन असं पांघरुण त्यावर अंथरलं की पहाणाऱ्याला वाटेल राजेच झोपले आहेत. राजांचं औषध आणायला हिरोजी व मदारी जे गेले, ते परत कधीच आले नाहीत.

राजे मथुरेत गेले ते पंतप्रधान मोरोपंतांच्या नातेवाईकांकडे. छोट्या शंभूराजांना पुढची प्रवासाची दगदग झेपणार नाही म्हणून त्यांना मथुरेतच ठेवलं. शत्रूच्या मुलखात त्यांना सोडून जाताना राजांचं मनही गहिवरलं.

आता महाराष्ट्रात जायचं ते कोणत्या मार्गानं ? बुंदेलखंडातून दक्षिणेत गेलो तर वाटेत सारा मोगली मुलुख. म्हणजे तिकडे धोका आहे. राजस्थान, गुजराथमध्ये असलेले राजपूत राजे मोगलांचे मांडलिक म्हणून तेही सोईचे नाही. म्हणून राजांनी पूर्वेची वाट पकडली. काशी, प्रयाग, गया या तीर्थस्थानात साधूसंन्याशांमध्ये मिसळणे सोपे होणार होते. गयेपासून राजांनी दक्षिण दिशा पकडली आणि अखेर महाराष्ट्रात प्रवेश केला. राजांनी बेमालूम वेशांतर केलं होते. दाढी काढली. संन्याशाची भगवी वस्त्रे धारण केली. आता त्यांना ओढ लागली होती त्यांच्या लाडक्या राजगडाची. राजांबरोबर आलेल्या संन्याशाच्या टोळीनं राजगडाचा पाली दरवाजा ओलांडला. ते सदरेवर आले आणि त्यांनी निरोप पाठवला, ''आम्हास पैसा नको. भिक्षा नको. धनधान्य नको. आम्हास शिवाजीराजांच्या माऊलीस भेटावयाचे आहे.''

थरथरत्या पावलांनी माँसाहेब सदरेवर आल्या. त्या नमस्कारासाठी वाकणार तोच तो तेजस्वी संन्यासी पुढे सरसावला. आपल्या मातृदेवतेला वंदन करत आणि नेत्रांतील अश्रूंना वाट मोकळी करून देत शब्द उमटले ''माँसाहेब !'' होय हेच. हेच ते शब्द जे ऐकण्यासाठी सहा महिने मी तळमळत होते.

''आले ! आपले राजे आले ! शिवबाराजे सुखरुप परतले.''

औरंगजेबी कैदेतून सुखरुप सुटून मोगली शहेनशहाँचं राजांनी नाक कापलं होतं. साऱ्या जगानं थक्क व्हावं असा हा पराक्रम.

खुद्द औरंगजेबानंही आपल्या मृत्यूपत्रात लिहून ठेवलं की ''माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक म्हणजे शिवाजी माझ्या हातून निसटला.''

मित्रांनो ! आज जर तुम्ही आग्र्याला गेलात तर तिथे पुतळा उभा केला तो कुणा बादशहाचा नाही, शहेनशहाँचा नाही, तर आग्र्याच्या बुलंद किल्ल्यासमोर दिमाखात पुतळा उभा आहे तो आपल्या लाडक्या शिवाजी महाराजांचा.

❖ ❖ ❖

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रायोपवेशनाचे हे पन्नासावे वर्ष आहे. त्या तेजस्वी पुण्यमय देशभक्ताचे त्यांच्या ओजस्वी काव्य रचनेद्वारे आम्ही स्मरण करीत आहोत...**

## स्वातंत्र्यवीर सावरकरांचे पुण्यस्मरण

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी पन्नास वर्षांपूर्वी प्रायोपवेशनासारखे कठोर व्रत स्वीकारून स्वतःला अनादि-अनंत-निर्गुण-निराकार परमात्मरूपात विलीन करून टाकले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनात मृत्यूशी दोन हात करण्याचे जे जे प्रसंग आले त्या त्या प्रसंगांना त्यांनी निधड्या छातीनं तोंड दिलं. असाच एक प्रसंग मार्सेलिसचा. त्यांना लंडनला पकडण्यात आलं. तिथून बोटीने भारतात आणलं जात होतं. मार्सेलिस जवळ येत असता ते स्वच्छतागृहात गेले. दार बंद केले. वरच्या बाजूस असलेल्या झरोक्याचं (पोर्ट होल) काचेचं तावदान फोडलं आणि त्या झरोक्यातून भर समुद्रात उडी घेतली. अरुंद झरोक्यामुळे अंगावर उमटलेले ओरखडे आणि खरचटणं, त्यावर समुद्राच्या खाऱ्या पाण्याच्या लाटांचा झोंबरा मारा. शिवाय सावरकर पळाल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्यावर सुरु झालेला गोळ्यांचा वर्षाव. या साऱ्याला तोंड देत ते किनाऱ्यावर पोचले. ही उडी त्रिखंडात गाजली. पण दैवाची साथ न मिळाल्यानं ते पुन्हा पकडले गेले. याचा सूड म्हणून आपल्याला अमानुष छळाला तोंड द्यावं लागणार याची कल्पना त्यांना आली. याला तोंड देण्याकरिता स्वतःला बलसंपन्न करण्याकरिता त्यांनी त्याही अवस्थेत गीतेतील तत्त्वज्ञानाच्या साक्षीनं एक कविता रचली-

नैनं छिन्दंति शस्त्राणि, नैनं दहति पावकः। न चैनं क्लेदयन्त्यापः (पो), न शोषयति मारुतः ।।

आत्मा अमर आहे, त्याला मृत्यूचं भय नाही. या कवचमंत्राला धारण करीत त्यांनी अंदमानातही छळ झेलला आणि तशाच वीरवृत्तीनं पन्नास वर्षांपूर्वी ज्या कार्याकरिता या स्वातंत्र्यवीरांनी आयुष्य वेचले ते स्वातंत्र्यप्राप्तीचे लक्ष्य पूर्ण झाल्याचे पाहून 'धन्योहं, धन्योहम्' म्हणत आपल्या कृतार्थ जीवनाचा चे अर्ध्य मातृभूमीच्या चरणी अर्पण केले. सावरकरांचे असे हे अजेय मनोबल प्रकट करणारी १९१० मध्ये केलेली 'आत्मबल' ही कविता -

### आत्मबल

**अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला । मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ।।ध्रु.।।**

**अट्टहास करित जइीं धर्मधारणीं । मृत्युसीच गाठ घालु मी घुसे रणीं**

**अग्नि जाळि मजसी ना खड्ग छेदितो । भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो**

**खुळाऽरिपूऽ । तया स्वयें । मृत्युच्याचि भीतिने भिववु मजसि ये ।।१।।**

**लोटि हिंस्र सिंहाच्या पंजरीं मला । नम्र दाससम चाटिल तो पदांगुला**

**कल्लोळीं ज्वालांच्या फेकिशी जरी । हटुनि भंवति रचिल शीत सुप्रभावली**

**आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें । यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकतें**

**हलाऽहलाऽ । त्रिनेत्र तो । मी तुम्हांसि तैसाची जिरवितो! ।।२।।**

❖ ❖ ❖

**शाखा विभाग**

**संक्रांत उत्सव – समता आणू समरसतेतून**

दि. २४ जानेवारीला शनिवारवाड्याच्या प्रांगणात 'समरसता' या विषयावरचे महानाट्य शाखा विभागाच्या वार्षिक मकर संक्रमण उत्सवात उत्साहात सादर झाले. बेरड समाज व देवदासींसाठी काम करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. भीमराव गस्ती व दहशतवाद विरोधी पथकाचे सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. भानुप्रताप बर्गे हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित होते.

'आम्हाला माणूस म्हणून स्वीकारावे यासाठी आम्ही संघर्ष केला. एकेकाळी पोलिसांना पाहून बेरड समाजातील लोक पळून जायचे. पण आता त्याच पोलिस खात्यात आमच्या समाजातील तरुण आय. पी. एस. अधिकारी झाले आहेत. मात्र आम्हाला माणूस म्हणून स्वीकारावे यासाठी लढा द्यावा लागला', अशी खंत डॉ. गस्ती यांनी व्यक्त केली. 'धर्म, जात, पंथ, लिंग यापेक्षा राष्ट्रनिष्ठा महत्त्वाची' असे श्री. बर्गे यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त 'बंधुत्वाचे घडवू दर्शन, समता आणू समरसेतून' या विषयावरील महानाट्याचे सादरीकरण झाले. 'कामाच्या स्वरुपानुसार निर्माण झालेली समाजव्यवस्था, शूरवीर योद्ध्यांवरही लादण्यात आलेली जातीव्यवस्थेची उतरंड, त्यामुळे कष्टाची, अंगमेहनतीची कामे करणाऱ्यांना नाकारलेला शिक्षणाचा अधिकार, छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीतील मावळ्यांना सैन्यात दिलेले स्थान, संतांनी जातीव्यवस्थेतील अपप्रवृत्तींवर केलेला प्रहार, महात्मा ज्योतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज यांनी दिलेला पुरोगामी विचार आणि डॉ. बाबासाहेबांनी जातीव्यवस्थेविरुद्ध दिलेला लढा' अशा प्रसंगातून महानाट्य उलगडत गेले. या महानाट्यात एकूण ६०० वर्धक वर्धिका, महिलांचा सहभाग होता.

या कार्यक्रमात 'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखेत शिकणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना २०१५ चे **'माडगावकर पुरस्कार'** देण्यात आले. माध्यमिक गट – कु. शेखर गणेश चव्हाण उच्च माध्यमिक गट – कु. अजय दिगंबर हवाले

पदवीधर गट – कु. वेदांग शेखर बेहरे

**विज्ञान दिन –**

रविवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१६ या दिवशी 'स्व'-रूपवर्धिनीच्या भाग-१ आणि भाग-५ या दोन्ही भागांचा एकत्रित विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या वर्षी विज्ञान दिनाकरता सध्या चर्चेत असलेला 'स्मार्ट सिटी' हा विषय घेतला गेला. विषयानुरुप मुलांच्या १) दृकश्राव्य सादरीकरण (पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन) २) भित्तीपत्रक (पोस्टर) ३) प्रतिकृती तयार करणे (मॉडेल) या स्पर्धा घेण्यात आल्या.

५ शाखांची जवळपास १६० मुले व मुली एकत्र आली होती. स्पर्धेकरता मुलांचे गट पाडण्यात आले होते. सर्व गटांचे मिळून ३० विद्यार्थी सहभागी झालेले होते.

श्री. मयूर शेडगे आणि श्री. नकुल थावरे यांनी मुलांचे परीक्षण केले. विज्ञानदिनाच्या कार्यक्रमास म. गांधी विद्यालय (उर्दू शाळा) घोरपडे पेठ या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख व इतर शिक्षिका उपस्थित होत्या. या शाळेत श्रद्धानंद शाखा भरते. शाखेतील चालणारे उपक्रम बघून त्या या कार्यक्रमात सहभागी झाल्या. मुलांनी तयार केलेले भित्तीपत्रके व प्रतिकृती बघण्यासाठी अभ्यासिकेतील विद्यार्थी व पालक आवर्जून आले होते.

संध्याकाळी बक्षीस समारंभ पार पडला ज्यात भगिनी निवेदिता शाखेने सात बक्षिसे, सावित्रीबाई फुले आणि स्वामी श्रद्धानंद शाखेने एक-एक बक्षिस पटकाविले.

बक्षीस समारंभात श्री. कौस्तुभजी साखरे यांनी मुलांना स्मार्ट सिटी संदर्भातले बारकावे, स्मार्ट सिटी म्हणजे नेमके काय ? हे समजावून सांगितले आणि मुलांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

**उन्हाळी शिबिरे –**

**१) वीर अभिमन्यू बाल शाखा –**

वार्षिक परीक्षा झाल्यावर मुलांना कला शिबिरात पाठवण्यासाठी भेटकार्ड बनवणे, काव्यवाचन, गटशः नाटिका सादर करणे अशा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यातूनच तिसरी व चौथीतील १० मुलांची कला शिबिरासाठी निवड झाली. शिबिरात मुलांचे चित्रकला, पोवाडा सादरीकरण व अभिनय या कलांचे प्रशिक्षण झाले. याचा उपयोग गणेशोत्सवात पथनाट्य करण्यासाठी निश्चित होईल. सध्या शाखेत ही मुले रोज नवनवीन पद्य स्वतः शिकून इतर मुलांना शिकवत आहेत.

**२) शाखा – समर्थ रामकृष्ण, स्वामी योगानंद, स्वामी श्रद्धानंद, वीर अभिमन्यू (भाग १)**

**स्थळ – शिशु विहार विद्यालय, पुणे विद्यापीठ, कालावधी – २१ एप्रिल ते २३ एप्रिल,**

**उपस्थिती – ११०, विषय – कृतियुक्त कला शिबिर**

शिबिरात पोवाडा, चित्रकला व अभिनय या विषयांची कृती सत्रे झाली. तीन दिवसांसाठी वर्धकांची तीन गटात विभागणी करून त्यांना एकाच विषयाचे तीनही दिवस मार्गदर्शन झाले. २१ एप्रिलला श्री. उदयन इंदूरकर यांच्या मार्गदर्शनाने शिबिराचे उद्घाटन झाले. या सत्रात त्यांनी 'कलेचे आपल्या आयुष्यातील महत्त्व, ती का जोपासली पाहिजे' याबरोबरच 'जगप्रसिद्ध शिल्पांबद्दलची माहिती' सांगितली.

नामवंत शाहीर श्री. दादा पासलकर यांनी पोवाड्याचा सुरुवातीपासूनचा इतिहास मुलांना सांगितला. 'प्रथम पोवाडा गद्यात कसा वाचला पाहिजे म्हणजे चालीत म्हणताना कोणत्या शब्दांना महत्त्व किंवा वजन दिले पाहिजे हे समजते.' याबद्दल मुलांना मार्गदर्शन करून पोवाडा चालीत म्हणून घेतला.

चित्रकला विषयासाठी व्यावसायिक चित्रकार श्री. दीपक साळी यांचे मार्गदर्शन झाले. वारली चित्रकलेची प्राथमिक ओळख त्यांनी चित्रफिती दाखवून करून दिली. तसेच एक दिवस विद्यापीठातील बागेत निसर्गचित्र कसे काढाल याचे कृतिसत्र झाले. 'अभिनय' म्हणजे चेहऱ्यावरील हावभाव, त्याप्रमाणे होणारे आवाजातील बदल आणि इतर अवयवांची हालचाल यांचा ताळमेळ कसा साधला पाहिजे याचे मार्गदर्शन श्री. अक्षय कोथिंबिरे व श्री. संकेत जोशी यांनी केले. त्यांनी घेतलेल्या रंगमंचीय खेळांतून व नावाजलेल्या अभिनेत्यांच्या चरित्र कथनातून सर्वांना खूप प्रेरणा मिळाली. यामुळे ही सत्रे खूपच उत्साहवर्धक आनंददायी झाली.

विषयाला अनुसरून 'कलाकार शोधू या', 'पथनाट्य' या गटशः स्पर्धा झाल्या. 'खेळ मांडला' ह्या फिरोदिया करंडक विजेत्या नाटकाची चित्रफीत दाखवली. प्रेरणादायी सत्रांमध्ये ज्येष्ठ शिल्पकार श्री. विवेक खटावकर यांची युवक कार्यकर्तेअक्षय देशमुख व ओंकार दासरी यांनी मुलाखत घेतली, तर श्री. दिनेश दिघे यांचे 'बालपणातील डॉ. आंबेडकर' या विषयावर व्याख्यान झाले. शिबिराचा समारोप अभिनेते श्री. अजिंक्य भोसले यांनी केला.

**३) शाखा – स्वामी सुबोधानंद, स्वामी श्रद्धानंद, राजर्षी शाहू, नरवीर तानाजी मालुसरे (भाग ३)**

**स्थळ – शिशु विहार विद्यालय, पुणे विद्यापीठ, कालावधी – १८ एप्रिल ते २१ एप्रिल,**

**उपस्थिती – ९० विषय – कथाकथन कौशल्य**

शिबिराचे उद्घाटन श्री. शिवाजी खरात यांच्या व्याख्यानाने झाले. त्यांनी त्यांच्या बालपणीच्या मजेदार



**तुम्ही आपली हीनभाव सोडून द्या. जगात कोणाही जवळ नाही असे हिंदुधर्माचे रत्नभांडार तुमच्याजवळ आहे.**

आठवणीतून कथाकथन कसे गुंफावे, कसे सांगावे याचे मार्गदर्शन केले. कथाकथनातील वैशिष्ट्ये लक्षात यावीत यासाठी शिबिरात कृतिसत्रे घेण्यात आली. यासाठी श्री. मयुर कर्जतकर, श्री. कैलास जव्हेरी, सौ. संध्या साबणे यांनी मार्गदर्शन केले. श्री. मयुर सरांनी कथांचे प्रकार, त्यांचे सादरीकरण याविषयी सांगितले, तर श्री. जव्हेरी सरांनी मुलांना छोट्या छोट्या गोष्टी सांगायला लावल्या. सौ. संध्याताईंनी सादरीकरणाचे मंत्रतंत्र एकपात्री नाटकाच्या सादरीकरणातून मुलांना समजावून दिले.

प्रेरणादायी सत्रात श्री. संदीप मोरे यांनी 'डॉ. बाबासाहेबांचे वैचारिक कार्य' त्यांच्या १९५० व १९५३ साली प्रसिद्ध झालेल्या भाषणांच्या आधारे मांडले. श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी स्वा. सावरकरांचे जातीभेदाच्या विरोधातील कार्य व त्यांचे चरित्र गोष्टीरुपात सांगितले. श्री. शंकर भडकवाड यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची शिक्षणाची तळमळ, समाजातील अनिष्ट प्रथांना त्यांनी केलेला विरोध व त्यांचे कार्य मुलांना सांगितले.

शिबिराचा समारोप श्री. रामभाऊ डिंबळे यांच्या मार्गदर्शनाने झाला. 'कथाकथनाची आजच्या काळातील गरज, तिचे महत्त्व व त्यामुळे होणारे परिणाम, बदल' त्यांनी सांगितले. तसेच मुलांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

**४) शाखा – स्वामी विवेकानंद, स्वामी अभेदानंद (भाग ४)**

**विषय : 'भारत' – सांस्कृतिक, प्राकृतिक, सामाजिक.**

**स्थळ : पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्, चिंचवड** **कालावधी : २२ एप्रिल ते २५ एप्रिल,**

**उपस्थिती : वर्धक – ५८, युवक – १५,** **गुरुकुलातील विद्यार्थी – ३०**

भारताची सांस्कृतिक, प्राकृतिक, सामाजिक व ऐतिहासिक अशा वेगवेगळ्या अंगांनी ओळख व्हावी यानुसार शिबिरातील सत्रांचे आयोजन केले होते.

उद्घाटन सत्रात राष्ट्रप्रेम जागवणारी भारताची ओळख श्री. गिरीश प्रभुणे सरांनी करून दिली. भारतात ठिकठिकाणी दिसणाऱ्या विविध वनवासी लोकांची माहिती सांगितली. 'आपण म्हणजे भारत आणि भारत म्हणजे आपण' हा विचार त्यांनी मांडला.

मा. शिरीष आपटे यांनी दृकश्राव्य माध्यमातून भारताची प्राकृतिक रचना मांडल्याने भारतातील प्रमुख नद्या, पर्वतरांगा, सीमा याचे महत्त्व मुलांना समजले. या प्राकृतिक रचनेची सांस्कृतिक अंगाने झालेली मांडणी हे या सत्राचे वैशिष्ट्य होते.

धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण तसेच विज्ञान, कला, वाङ्मय या मुद्द्यांना धरून श्री. तुकाराम चिंचणीकर सरांनी भारताची सांस्कृतिक जडणघडण उलगडत नेली.

पाठ्यपुस्तकात शिकतो त्यापेक्षाही वेगळे भारताच्या प्रेरणादायी इतिहासाचे चित्र वेगवेगळ्या प्रेरक गोष्टींतून श्री. जगन्नाथ देविकर सरांनी रंगवले. सर्वजण हा इतिहास ऐकताना गुंगून गेली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावरील सत्रात डॉ. सुनील भंडगे यांनी बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील अलौकिक अशा अनेक गुणांचा परिचय करून दिला.

'भारत एक खोज' अशा कार्यक्रमांतून चर्चा सत्रातून व स्पर्धांमधून मुलांनी पुनरुत्थान समरसता गुरुकुलाची संकल्पना, रचना व कार्य याची माहिती गुरुकुलात राहणाऱ्या विद्यार्थ्यांशी, शिक्षकांशी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून करून घेतली. यामुळे समाजातील इतर घटकांसाठी चालणाऱ्या कार्याची माहिती मुलांना मिळाली.

सामाजिक बांधिलकी जपण्याचा संस्कार सर्व शिबिरार्थींना कळत नकळत मिळाला. शिबिराच्या समारोप कार्यक्रमात वर्धकांशी संवाद साधताना युवा विभाग प्रमुख श्री. सागर शिंदे म्हणाले की खरा भारत समजून घेण्यासाठी आपण सर्वांनी स्वामी विवेकानंदांसारखे परिव्राजक बनून समाजातील सर्व स्तरांत प्रवास केला पाहिजे. पुढील काळातील शालेय सुट्ट्यांचा वापर यासाठी करून मातृभूमीचे समग्र दर्शन करण्याचा संकल्प या शिबिरानिमित्ताने सर्वांनी केला.

**५) शाखा – भगिनी निवेदिता, क्रांतीज्योती सावित्रीबाई, कर्वेनगर साप्ताहिक शाखा (भाग ५)**

**स्थान – 'स्व'–रूपवर्धिनी कालावधी – १ मे ते ३ मे संख्या – ३० वर्धिका, ६ युवती.**

**विषय – विज्ञान व कला**

शिबिराच्या विषयाला अनुसरून पहिल्या दिवशीची पिंपरीमधील सायन्स पार्कला दिलेली भेट सर्वांच्याच लक्षात राहील. तेथील प्रयोग स्वतः करून बघताना, विज्ञानावर आधारित खेळ खेळताना सर्व वर्धिका रंगून गेल्या होत्या. तारांगण व थ्रीडी शो बघताना शाळेत शिकलेल्या संकल्पना, गोष्टी शिबिरार्थी, विद्यार्थिनींना समजल्याचे जाणवले. श्रीमती प्रेरणा डोंगर यांनी छोट्या छोट्या प्रयोगांच्या आधारे विज्ञानातील मूलभूत संकल्पना स्पष्ट केल्या. दुपारच्या सत्रात शिवप्रसाद पासलकर दादाने विविध प्रेरणादायी पोवाड्यांचे प्रशिक्षण दिले.

रेशमाताईंनी एकपात्री नाटिकेतून मुलींना शिकवताना समाजाकडून झालेल्या विरोधांचे व सावित्रीबाईंच्या जिद्दीचे दर्शन सर्वांसमोर जिवंत उभे केले. श्री. संदीप मोरे सरांनी डॉ. बाबासाहेबांचे गोष्टीरूप चरित्र मांडले.

समारोप सत्रामध्ये विज्ञान वर्धिनीच्या शर्वरी ताई व अमेय दादाने सोप्या भाषेत पर्यावरण समतोलाची आर्थिक बाजू सर्वांना समजावून सांगितली. यासाठी कचरा वर्गीकरण, सामाजिक स्वच्छता, पाण्याचा काटकसरीने वापर इ. साध्या व सोप्या तंत्रांचा अवलंब करणे खूप गरजेचे आहे हे पटवून दिले.

**भात लावणी –**

दि. १७ जुलैला वेल्हा भागातील विंझर, शिरगाव व मालवणी या गावांत वर्धिनीचे २५० वर्धक वर्धिका भात लावणीसाठी गेले होते. त्यांच्याबरोबर विमलाबाई गरवारे, रेणुका स्वरुप व सेवासदन या शाळांतील १३५ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. वर्धिनीच्या भाग क्र. ४ मधील शाखांचे वर्धक, वर्धिनीचे सर्वसाधारण सभा सदस्य व मार्गदर्शक श्री. दत्ताजी देवधर यांच्या शेतात भातलावणीसाठी गेले होते. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पावसात गुडघाभर चिखलात पेरणीच्या कामाचा आनंद घेतला. यामुळे शेतकऱ्यांच्या श्रमांचे महत्त्व समजले.

सहभागी शाळांचे विद्यार्थी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, "दरवर्षी आम्ही यात सहभागी होऊ. कार्यक्रमातील प्रेरणादायी पद्याचे वेगळेपण जाणवले. शेतकरी मित्रांचा लाभलेला सहवास अविस्मरणीय होता."

**गुणगौरव समारंभ –**

समाजातील मान्यवर व्यक्तींकडून झालेल्या कौतुकातून वर्धकांना प्रोत्साहन मिळते. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर अभिनय, गायन, निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. शालेय स्पर्धा व परीक्षांमध्ये विशेष कामगिरी बजावलेल्या वर्धकांना या कार्यक्रमात प्रशस्तीपत्र व पुस्तक भेट देऊन गौरवण्यात आले.

| भाग | बक्षीसपात्र संख्या | स्थळ | प्रमुख वक्ते |
|---|---|---|---|
| भाग १ मध्य पुणे परिसर | ४८ | 'स्व'-रूपवर्धिनी | डॉ. आशिष पुराणिक |
| भाग २<br>बिबवेवाडी अप्पर इंदिरानगर | १५० | सीताराम आबाजी विद्यालय | प्रा. विजय नवले |
| भाग ३ कर्वेनगर, सिंहगड रोड | २० | के. बी. चव्हाण प्रशाला | श्री. नारगोळकर,<br>कर्नल मगदूम |
| भाग ४ वडारवाडी, गोखलेनगर | १८ | संत रामदास स्वामी विद्यालय | श्री. योगेश जाधव |
| भाग ५ मध्य पुणे परिसर<br>बालशाखा, वर्धिका शाखा | ५३ | आगरकर प्रशाला | श्रीमती निरुपमा दिवेकर |

* श्रीमती निरुपमा दिवेकर यांनी महाभारतातील कृष्णकथांच्या मांडणीतून एक अभिनव संदेश दिला. कोणतेही स्वीकारलेले किंवा नेमून दिलेले काम कमी अथवा उच्च श्रेणीचे नसते. आपण ते कसे करतो यावर त्याचे महत्त्व अवलंबून असते हा विचार यातून रुजला.

* श्री. योगेश जाधव सरांनी वर्धकांशी संवाद साधून स्वातंत्र्याचा अर्थ समजावून सांगितला. ते म्हणाले, संविधानाने दिलेल्या वेगवेगळ्या रुपातील स्वातंत्र्याचा वापर आपण 'स्व' आणि 'समाज' या दोन्हींच्या उन्नतीसाठी केला पाहिजे.

* प्रा. श्री. विजय नवले यांनी कथांच्या माध्यमातून संवाद साधला. नियमित अभ्यासाद्वारे उच्च ध्येयाची प्राप्ती कशी करून घेता येईल याचा मूलमंत्र त्यांनी सांगितला.

* श्री. नारगोळकर सरांनी मार्गदर्शन करताना संत रामदास स्वामी यांच्या चरित्रातून आहार व व्यायाम यांचे महत्त्व तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले.

* नरवीर तानाजी मालुसरे शाखेतील वर्धकांनी सावरकरांनी केलेल्या विदेशी कपड्यांची होळी हा प्रसंग नाट्यरुपातून सादर केला.

प्रतिवर्षीप्रमाणे काका हलवाई स्वीट सेंटर, टिळक रोड पुणेचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी पेढ्यांच्या रुपाने देणगी देऊन उपस्थितांचे तोंड गोड केले. याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

**गणेशोत्सव पथक विभाग –**

या गणेशोत्सवात पथक प्रमुख म्हणून काम करताना बैठकीत ठरल्याप्रमाणे नियोजन आणि सराव यावर भर देण्यात आला. खालीलप्रमाणे शाखाशः पथके ठरली –

झांज पथक : स्वामी अभेदानंद शाखा, स्वामी दयानंद शाखा, स्वामी ब्रह्मानंद शाखा, स्वामी योगानंद शाखा

घुंगरु काठी : स्वामी दयानंद शाखा

लेझीम : भगिनी निवेदिता शाखा

ध्वज पथक : राजर्षी शाहू शाखा, युवती विभाग

टिपरी : वीर अभिमन्यू बाल शाखा

सर्व शाखांना साहित्य देऊन प्रत्येक शाखेच्या सरावाची पाहणी केली. काही अपेक्षित बदलांच्या सूचना दिल्यानंतर सर्वांची रंगीत तालीम झाली. सर्वानुमते शिस्तबद्ध व चांगले पथक व्हावे म्हणून सरावावर जास्त भर देण्याचे ठरले. त्यामुळे गणेशोत्सवात पथकांचे सादरीकरण चांगले झाले.

गणेश चतुर्थीच्या आधीच्या दिवशी स्वामी योगानंद शाखा व भगिनी निवेदिता शाखा यांची पथके जनजागृती मित्रमंडळ, कसबा पेठ येथे होती. छोट्या रस्त्यांतून खेळताना मुलांची खरी परीक्षा झाली. गणेश चतुर्थीला नवरंग मित्रमंडळ, बिबवेवाडी येथे स्वामी दयानंद व स्वामी ब्रह्मानंद शाखा, जय गणेश मित्रमंडळ, बिबवेवाडी गावठाण येथे राजर्षी शाहू शाखा, स्वामी अभेदानंद शाखा व स्वामी रामकृष्ण शाखा यांची पथके झाली. या सादरीकरणातून मुलांना त्रुटी समजल्या आणि शेवटच्या दिवसासाठी नवीन प्रकारांची रचना केली गेली.

काही ठिकाणी पाचव्या व सातव्या दिवशी गणपती विसर्जन होते. तेव्हा चाकणला स्वामी दयानंद शाखा व बालशाखा आणि कोंढवा येथे स्वामी योगानंद व स्वामी ब्रह्मानंद शाखा यांच्या पथकांचे सादरीकरण उत्साहात झाले. स्थानिक लोकांनी सर्वांचे खूप कौतुक केले.

अनंत चर्तुदशीच्या लक्ष्मी रस्त्यावरील मिरवणुकीत पाऊस असला तरी सर्व पथकातील वर्धकांचा उत्साह शेवटपर्यंत कायम होता. मल्लखांब करणाऱ्या वर्धकांनी जाहीर शाबासकी मिळवली.

तुळशीबाग गणपती मिरवणुकीत स्वामी रामकृष्ण शाखा, राजर्षी शाहू शाखा, भगिनी निवेदिता शाखा, स्वामी अभेदानंद शाखा व दगडूशेठ गणपतीच्या मिरवणुकीत स्वामी दयानंद शाखा सहभागी झाल्या होत्या.

सर्व पथकांमधून डॉ. आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांचे विचार, ऑलिपिंक स्पर्धेतील मुलींचा सहभाग, विविध प्रकारचे मनोरे, श्री. अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचाराविरुद्धचे काम यावर सादरीकरण झाले.

**गणेशोत्सव – पथनाट्य –**

रात्री ७ ते १० ची वेळ, पुण्यातील विविध ठिकाणी काही मुले छोटे गट करून नाट्य सादर करताना दिसत होती. 'मोबाईल–बिबाईल–फायदा तोटा' हे पथनाट्य मी पाहिले आणि मला वाटले, ''अरे ! गणेशोत्सवात अनेक चांगल्या प्रबोधनाच्या गोष्टी होत आहे की, या मुलांचे कौतुकच केले पाहिजे.'' वरील प्रतिक्रिया 'स्व'रूपवर्धिनीचे पथनाट्य पाहणाऱ्या एका प्रेक्षकाची आहे.

गणेशोत्सवात वर्धिनीच्या ४–५ शाखांनी पथनाट्य बसवून एकूण ४५ हून अधिक ठिकाणी याचे प्रयोग केले.

| शाखा | विषय |
|---|---|
| समर्थ रामकृष्ण शाखा | मोबाईल–फायदा–तोटा |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | शिवराय–भीमराय वसा एकतेचा आणि समतेचा |
| स्वामी सुबोधानंद शाखा | शिवराय–भीमराय वसा एकतेचा आणि समतेचा |
| स्वामी विवेकानंद शाखा | शिवराय–भीमराय वसा एकतेचा आणि समतेचा |

साधारण १५–२० जणांचा गट. १०–१२ मिनिटांचे पथनाट्य. रोज ४ ठिकाणी प्रयोग. असे सूत्र बांधून मुलांनी सामाजिक समस्या, सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

'– आम्हीच लिहिले – बसविले – केले : मोबाईल फायदा तोटा' हे पथनाट्य समर्थ रामकृष्ण शाखेच्या युवकांनीच स्वतः माहिती मिळवून, एक एक प्रसंग लिहून, स्वतः गाणी तयार करीत, संवाद रचित हे पथनाट्य लिहून काढले, मग स्वतःच दिग्दर्शक बनून बसविले. त्यासाठीची मंडळे ठरविली, तेथे सादरीकरण केले.

विशेष पथनाट्य – डॉ. बाबासाहेब यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त 'शिवराय–भीमराय वसा एकतेचा आणि समरसतेचा' हे जागर पथनाट्य मुलांनी बसविले. स्त्री शिक्षण, जातीनिर्मूलन यासाठी बाबासाहेबांनी

केलेल्या कामांची मांडणी यातून केली. ‘खंबीर नेता अखंड भूमीवरी हो झाला का होणार भीमराव त्याच्या परी हो ।’ या शब्दांनी डॉ. बाबासाहेबांचे मोठेपण या पथनाट्यातून अधोरेखित केले.

**गणेशोत्सव – पपेट शो –**

वादन–पथक–पथनाट्य याबरोबरच क्रांतीज्योती सावित्री शाखेने ‘कचरा समस्या’ या विषयावर जनवाणी संस्थेच्या मदतीने कसबा गणपती, हुतात्मा बाबू गेनू मंडळ, हत्ती गणपती या मंडळांसमोर बाहुली नाट्य (पपेट शो) सादर केले. यातून कचरा समस्येबद्दल जागरुकता वाढवण्याचा प्रयत्न वर्धिकांनी केला. प्रेक्षकांनी सादरीकरणाचे कौतुक केले.

**श्रीगणेश प्राणप्रतिष्ठापना प्रशिक्षण वर्ग (शाखा विभाग) :**

दि. २८ ऑगस्टला दुपारी ३.३० ते ६.३० या वेळात ‘स्व’–रूपवर्धिनीच्या वास्तूत शाखेतील युवक–युवतींसाठी गणेश प्रतिष्ठापनेचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. यात समर्थ रामकृष्ण शाखा व क्रांतिज्योती सावित्रीबाई शाखेतील २२ जण सहभागी होते. ज्ञान प्रबोधिनीच्या सौ. स्मितातांईनी सर्वांना मार्गदर्शन केले. प्रत्येक विधीमागचे शास्त्रीय कारण सर्वांना समजले. ‘‘समाजातील कोणतीही सश्रद्ध व सामाजिक बांधिलकी असणारी व्यक्ती गणपतीची प्राणप्रतिष्ठापना पूजा सांगू शकते, करू शकते. लोकमान्य टिळकांचा लोकजागरण व लोकसंगठन तसेच सामाजिक समरसता हे तीनही हेतू या उत्सवातून साध्य होतात आणि यासाठी प्रत्येकाने हा पारंपारिक विधी समजून घेतला पाहिजे’’ असेही त्यांनी सांगितले.

**११ वी – १२ वी प्रशिक्षण शाखा :**

शाखेत येणारा वर्धक महाविद्यालयात जाऊ लागला की युवा कार्यकर्ता बनतो. शाखेतील विविध प्रकारच्या कामांच्या जबाबदाऱ्या सांभाळताना सहज संवादांपासून ते गृहभेटीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध कौशल्यांचे प्रशिक्षण या टप्प्यावर होणे अत्यंत गरजेचे असते. आपला कल आणि क्षमता ओळखून आयुष्याचे ध्येयस्थान निश्चित करण्याचा हाच महत्त्वपूर्ण कालखंड ठरतो. सुसंगतीच्या आधारे प्रवाहाविरुद्ध पोहोण्याची उमेद जागवण्याचे हेच ते वय. वरील सर्व आवश्यकता लक्षात येऊन या ११ वी– १२ वी प्रशिक्षण शाखेच्या कार्यक्रमांची रचना करण्यात आली आहे. भागस्तरावर आठवड्यातून दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण शाखेत किती प्रकारचे विषय मांडले गेले ते खालील यादीवरून स्पष्ट होईल.

१) सारंग यादवाडकर – नदीपात्रातील अनधिकृत बांधकामाविरुद्धची विजयकथा

२) डॉ. वरदा संभूस–पाठक – पंढरपूर वारीची वैशिष्ट्ये

३) जयंतराव कवठेकर – गुरुवर्य किशाभाऊ पटवर्धन

४) निलेश धायरकर – ‘स्व’–रूपवर्धिनीत सहवासातून शिक्षण

५) संदीप मोरे – योगाभ्यास व आसनांचे महत्त्व

६) योगेश जाधव – ओळख सिनेसृष्टीची

७) विलास कुलकर्णी – व्यवसायाची यशसुत्रे

८) सुमीत डोळे – वाटचाल ‘स्वप्न उद्योगची’

९) विवेक साने – कृष्ण एक लोकनेता.

१०) अनया चाबुकस्वार – लढाई व्यसनांशी (PACE संस्थेचा परिचय)

गटकार्य व उपक्रमांअंतर्गत युवकांनी गणेशोत्सवातील बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिस बंधुंशी संवाद साधून त्यांच्या ताण–तणावांची माहिती करून घेतली. ज्या वर्धिनीत आपण घडलो तिच्या कार्याचा ५ मिनिटात नेमका व प्रभावी परिचय करून देण्यासाठी तयारी करून युवकांनी सादरीकरण केले. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाशी जवळीक साधण्यासाठी आपल्या वस्तीतील प्रश्न वर्तमानपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहारात छापून येण्यासाठी पत्रे पाठविली. कमी शब्दात नेमकेपणाने प्रश्न मांडण्याचा सराव या निमित्ताने झाला.

**हिवाळी शिबिरे –**

**लहान गट शिबिर. विषय – वाचू आनंदे**

स्थळ – ॲड. पु. वा. परांजपे विद्यामंदिर, तळेगाव दाभाडे.   कालावधी – २ ते ६ नोव्हेंबर

संख्या : वर्धक – १६० युवक – ३५

यंदा लहान गटाच्या केंद्रीय शिबिरासाठी 'वाचू आनंदे' हा मुलांच्या भविष्यासाठी, व्यक्तिमत्त्व विकसनासाठी खऱ्या अर्थाने उपयोगाचा व सातत्याने पाठपुरावा करण्याचा विषय निवडला होता.

उद्घाटन सत्रात तळेगाव दाभाडे येथील 'कलापिनी' या कला गटाला बोलावले होते. गटाचे प्रमुख परांजपे सर व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी एक सुंदर 'नाट्यवाचन  मुलांसाठी सादर केले. 'मोठे झाले छोटे' या नाट्यवाचनातून मुलांना खरे नाटक सादर झाल्यासारखेच वाटले. त्याचबरोबर त्यांच्या हस्ते वाचनालय प्रतीकृतीचे फीत कापून उद्घाटन झाले.

शिबिरातील काही वेळ मुलांना प्रत्यक्ष 'वाचनासाठी मिळावा या हेतूने तीन दिवस सकाळी एक तास वाचनासाठी होता. या वेळामध्ये प्रत्येक वर्धकाने आपल्या गटाच्या उपलब्ध पुस्तकांपैकी आवडीचे पुस्तक वाचन करून त्यावर मनोगत सादर केले. यामुळे वाचनाबरोबर आकलनही महत्त्वाचे हे वर्धकांना उमगले. शिबिरातील ग्रंथालयाचा वर्धकांनी या वेळामध्ये पुरेपूर लाभ घेतला.

श्री. अरविंद केळकर तसेच श्रीमती स्वातीताई गाडगीळ यांनी 'वाचनातील मजा' या विषयावर सत्र घेतले. यामध्ये मुलांना वाचावे कसे? विरामचिन्हांचा योग्य वापर व त्यामुळे वाचनात येणारी मजा हे माहीत झाले. यामध्ये वक्त्यांनी वर्धकांच्या विविध शंकांचे निरसन केले. संपूर्ण शिबिराची या सत्रासाठी दोन गटांमध्ये विभागणी झाली. उत्तम वाचन व आकलन असलेले वर्धक तसेच वाचनातील सुधारणा करण्यास वाव असणारा 'सुधारक गट' यामध्ये ही सत्रे पार पाडली. यामुळे प्रत्येक वर्धकाच्या वाचन गरजेनुसार त्यास प्रशिक्षण मिळाले.

प्रेरणासत्रात वाचनातील मान्यवरांच्या मुलाखती व कथारूपात पुस्तक परिचय' ही सत्रे झाली. पुस्तकाच्या वाचनातून आयुष्याची दिशा ठरण्यात मदत झालेले वर्धिनीच्याच परिवारातील श्री. शिरीष आपटे व श्रीहर्ष सगरे यांवेळी उपस्थित होते. पुस्तकवाचनाचे फायदे स्वत:च्या अनुभवातून सांगितल्यामुळे वर्धकांना आयुष्यामध्ये काहीतरी दिव्य करण्याकरिता आकलनासह पुस्तकवाचन हे महत्त्वाचे ठरते. हे समजले.

श्री शिरीष पटवर्धन व श्री. अवधानी सर यांनी कथाकथनाच्या स्वरूपात काही पुस्तकांतील आशय वर्धकांपुढे सादर केला. शिरीष पटवर्धन सरांनी कवितांचे अभिवाचन केले व कवितांतील शब्द योजनेचे वैशिष्ट्य मुलांपुढे ठेवले तर अवधानी सरांनी 'मुसाफिर' लेखक अच्युत गोडबोले, हे पुस्तक कथारूपात सादर केले.

शिबिरामध्ये व्यवस्थेतील युवकांनीच सकाळच्या प्रबोधन सत्रात मुलांना वाचनाचे फायदे समजावून सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वाचनसंपत्ती, वाचनातील कौशल्य तसेच स्वत:च्या विकासासाठी

आवश्यक असणारे वाचन या विषयांची प्रबोधनात मांडणी केली.

शिबिरामध्ये वाचन, अभ्यास, जाणिवांचे विकसन व स्वत:च्या घडणीकरिता एक छान प्रेरणा मिळावी म्हणून 'नील बटे सन्नाटा' हा चित्रपट दाखविण्यात आला. 'अभ्यासाच्या जोरावर अधिकारी झालेली सामान्य मुलगी' पाहून शिबिराचा विषय वर्धकांपर्यंत समर्पक पद्धतीने पोचवता आला; वर्धकांनी छान अभिप्राय दिले व भविष्यात भरपूर पुस्तके वाचू, असा संपल्पही सोडला.

शिबिरात अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये शक्ती-बुद्धी, खजिनाशोध या स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे वाचनाकृती स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये अग्निबाण, ज्ञानवृक्ष अशा प्रतिकृती सादर होत्या. त्याचप्रमाणे मुलांनी वाचनाचे फायदे सांगितले. तसेच अनेक वर्धकांनी उत्स्फूर्तपणे स्व-रचित कविता देखील सादर केल्या. यामुळे शिबिराचा विषय मुलांपर्यंत पोहोचला आहे असा विश्वास वाटला.

अखेरच्या रात्री मुलांसाठी विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये मुलांनी नृत्य, नाट्य, पोवाडा, गीतगायन, कविता यांचे सादरीकरण केले.

शिबिराच्या समारोप सत्रांसाठी श्री रामभाऊ डिंबळे उपस्थित होते. सर्व मुलांनी मिळून 'वाचनसंकल्प' केला. याप्रसंगी बोलताना व वाचनावरील या 'यशस्वी शिबिरा'चे वर्णन श्री. रामभाऊंनी आपल्या खास शैलीमध्ये शीघ्रकविता तयार करून केले. त्यांचे उद्‌गार शिबिर यशस्वी ठरल्याचे प्रशस्तिपत्रक म्हणावे लागेल. ते म्हणाले, 'उमलत्या फुलांचा मळा डोलतो आहे, शिबिरात उद्याचा युवक बोलतो आहे!''

मुलांना असणारी वाचनाची आवड, त्यांचे वाचनाचे आकलन, गती , प्रत्यक्ष वाचन अशा गोष्टी ध्यानात घेऊन प्रसंगी तसे गट पाडून सत्रांचे, स्पर्धांचे, नियोजन केल्यामुळे 'वाचू आनंदे' या विषयाला न्याय मिळाला.

**'वाचू आनंदे' शिबिरातील आनंददायी आठवणी –**

❖ शिबिर संपल्यानंतर एका वर्धकाच्या भावाचा फोन येतो, 'अहो, सर शिबिरात काय घेतले नक्की तुम्ही'? मला प्रश्न पडला. तो पुढे म्हणाला की, 'शिबिरावरून आल्यापासून अप्पा बळवंत चौकातून मला विवेकानंद व शिवाजी महाराज यांची पुस्तके घेऊनच द्या असा आग्रह करीत आहे. गेले चार दिवस टीव्ही, मोबाईलपासून दूर राहिलेला आपला भाऊ पुस्तके मागतो आहे, याचा आनंद त्यांना फार झाला होता.

❖ शिबिराचे समारोप सत्र झाले. शिबिर संपले. गटशिक्षक वर्ग व्यवस्थित आवरले आहे की नाही यासाठी शेवटची फेरी मारत असताना एका वर्गात ७-८ वर्धक पुस्तके वाचताना त्यांना दिसली, 'अरे शिबिर संपले, जेवून घरी जायचे आता.' तर मुले म्हणाली 'नाही, नाही. शेवटची ५-६ पाने राहीली आहेत. पुस्तक वाचूनच जेवणार.'

❖ शिबिरातील पहिल्या दिवशी मुलांना पुस्तक वाचन जरा कंटाळवाणे वाटले. परंतु विषयाची गोडी वाढली आणि मग, वर्धक दुपारचे भोजनावेळी सुद्धा पुस्तक वाचन करीत होते. दुपारची विश्रांती न घेता एखादे पुस्तक वाचू लागले. ज्यांनी पूर्वी एकही पुस्तक वाचले नाही, अशा मुलांनी किमान ५ नवीन पुस्तके हाताळली व २ वाचली. **एका वर्धकाने तर २१ पुस्तके ५ दिवसात वाचून काढली. याच वर्धकाने स्वत: 'वाचू आनंदे शिबिरा'साठी एक कविता तयार केली व तेच 'शिबिरगीत' म्हणून गायिले गेले.**

❖ काही शाखांवर मुलांनी पेपर वाचन चालू केले आहे. एक वर्धक म्हणाला की 'मी शाखेतून सांगितलेली कामे पूर्ण केली की, मला पुस्तकच बक्षीस द्यायचे.' वरील वाचन समृद्ध व वाचन संवर्धन करणारे

अनुभव चार दिवसाच्या वाचन शिबिरात आम्हाला आले. **'वाचन संपणार नाही वाचनाने माणूस घडतच राहिला'**, असा अनुभव आला.

**मोठा गट हिवाळी शिबिर २०१६**

विषय – तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला (जाणिवांचा विकास)

ठिकाण – आदिवासी आश्रम शाळा, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे

कालावधी – २ ते ६ नोव्हेंबर, संख्या – वर्धक १६०, युवक १५

**कार्यशाळा**

**१) जाणिवांचे प्रगटीकरण : वक्ते – श्री. डंके सर –** आपल्या अवतीभोवती अनेक घटना घडत असतात. आपले त्या गोष्टींकडे लक्ष असायला हवे. या घटनांना प्रतिसाद दिला पाहिजे. हा प्रतिसाद नेहमी सकारात्मक असावा. समोरील व्यक्ती काय म्हणेल याचा फार विचार न करता आपली भूमिका बजावली पाहिजे' असे सरांनी सांगितले. अनेक लहान लहान उदाहरणे देऊन त्यांनी मुलांना व्यक्त व्हायला प्रेरित केले. आपल्याला होणाऱ्या जाणीवा, आपली मते व विचार योग्य पद्धतीने मांडता आले तर आपला विकास होतो.

**२) स्वीकार–समायोजन–दुसऱ्यांच्या विकासात सहभाग –** या कार्यशाळेत मुलांनी आपल्यातील गुण आणि दोष यांची यादी बनवली. आपले गुण आणि दोष यावर आपल्या मित्रांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन आवश्यक ते बदल लिहून काढले. यानंतर कार्यशाळेत आपण दैनंदिन आयुष्य जगत असताना कोणाकोणाचा विचार करतो हे मुलांनी सांगितले. माझ्या अवतीभोवती असणाऱ्या व्यक्तींपैकी कोणाकोणाचा माझ्यावर जीव आहे याचे मुलांनी चिंतन केले. आपल्याला सर्वात जवळचे असणारे आई–वडील, बहीणभाऊ, मित्र यांच्या गरजा, अडचणी, स्वप्न, इच्छा आपल्याला माहीत आहेत का याचा विचार केला गेला. काही मुलांना आपल्या आई–वडील यांची जन्मतारीख माहीत नव्हती याचे वाईट वाटले. आपल्याला आपल्या जवळच्या माणसांबाबत माहिती असली पाहिजे हे मुलांना जाणवले.

**३) स्वतःची विशेषणे आणि १० वर्षांनंतरचा मी... –** दैनंदिन जीवनात असणाऱ्या स्वभाव विशेषण, वर्तन विशेषण यांची यादी मुलांनी केली व यापैकी माझ्यात किती आहे हे लिहून काढले. आपल्यात असणारे दोष कमी केले पाहिजेत आणि गुण वाढवण्यात आले पाहिजेत असे प्रत्येक मुलाने ठरवलं. आणखी १० वर्षांनंतर मी कुठे असेन याचे 'रस्ते आराखडे' मुलांनी तयार केले. १० वीच्या मुलांना याचा विशेष फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले. **आपल्याला मोठेपणी काय व्हायचे आहे आणि त्यासाठी माझे कोणते गुण, दोष, सवयी पूरक आणि मारक आहेत याचा विचार मुलांनी केला.**

**४) सामाजिक बदलातील माझी भूमिका –** मित्र–मित्र, आपण आणि घरातील इतर व्यक्ती, आपण आणि शिक्षक, दोन गणपती मंडळे यांतील होणारा संवाद मुलांनी बसवला. यातून आधी स्वतःच्या भूमिकेतून आणि नंतर समोरच्या व्यक्तीच्या भूमिकेतून मुलं बोलली. स्वतःबरोबर समोरील व्यक्तीचाही आपण विचार केला यातून समोरच्याची बाजू–भूमिका समजावून घेतली पाहिजे हे मुलांना समजले.

सार्वजनिक उत्सव, सार्वजनिक शिस्त, सार्वजनिक स्वच्छता, सामाजिक प्रश्न यांवर भाष्य करणारी काही प्रसंग नाट्ये मुलांनी बसवली. **या नाटकातून शेवटी या सर्व प्रश्नांना आपणच जबाबदार आहोत आणि यावर आपणच उत्तर शोधली पाहिजेत ही जाणीव निर्माण झाली.**

**५) अभिव्यक्ती कार्यशाळा वक्ते – श्रीमती उर्मिलाताई गुजर व रत्नप्रभाताई राजहंस**

आपल्या अवतीभोवती अनेक घटना घडत असतात, त्यांना आपण कसे प्रतिसाद देतो यावर कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत मुलांनी काही प्रसंग करून दाखवले. **आपण योग्य पद्धतीने व्यक्त झाले पाहिजे असे मुलांना समजले.**

**६) संघटन –** विविध प्रकारे आपण संघटन करत असतो. या आपल्या संघटनेस पूरक आणि मारक असणाऱ्या गोष्टींची यादी मुलांनी केली आणि नंतर यावर चर्चा केली. आपल्यामुळे संघटन कसे बळकट होईल याचा विचार मुलांनी केला. यामध्ये माझी शाखा आदर्श शाखा कशी होईल आणि त्यात माझे काय योगदान असेल याबद्दल मुलांनी विचार मांडले.

**शिबिरात दाखवलेला चित्रपट : नील बटे सन्नाटा –** या हिंदी चित्रपटामध्ये आई आणि मुलगी यांची सुंदर गोष्ट मुलांनी अनुभवली. मुलीची स्वतःच्या स्वप्नाबद्दल संकल्पना आणि आईची संकल्पना यातील दरी मुलांना समजली. स्वप्न पाहताना आपले आई वडील आपल्यासाठी जे कष्ट करतात त्याचा विचार केला पाहिजे. स्वप्न मोठी असली पाहिजेत, स्वप्न पूर्ण करण्यासाठी खूप कष्ट केले पाहिजेत अशा अनेक गोष्टी मुलांना लक्षात आल्या.

**लघुपट आणि चर्चा –** वरील कार्यशाळेतच मुलांना काही लघुपट दाखवण्यात आले. आपलं घर, शेजार, परिसर या ठिकाणी घडणाऱ्या लहान लहान गोष्टींचे चित्रण यात होते. सर्व लघुपटांवर मुलांनी चर्चा केली.

**कार्यशाळा – मी कोण ? वक्त्या – डॉ. सुनंदा आगाशे –** मुलगा आणि मुलगी यांमधील जाणवणारे बदल आधी त्यांनी मुलांना विचारले. पोशाख, स्वभाव, शरीररचना, गुण, दोष इ. मुलगा आणि मुलगी यात असणारा मुख्य शारीरिक फरक सुनंदाताईंनी मुलांना खूप सोप्या पद्धतीने समजावला. यावेळी मुलांना असणारे प्रश्न आणि त्याची उत्तरे सांगण्यात आली.

**प्रेरणासत्र :** हमको मन की शक्ती देना..., मन शुद्ध तुझ..., तू शुद्धी दे... अशा काही पद्यांवर हे सत्र झाले. या सत्रामध्ये या पद्यांचा अर्थ सांगून त्यावर चर्चा घेण्यात आली. या पद्यांना अनुसरून काही गोष्टी मुलांना सांगण्यात आल्या.

**रात्रकार्यक्रम – विमान पडते आहे –** विद्यार्थी, युवक, शिक्षक, राजनेता, सैनिक, कामगार, शेतकरी, कलाकार, शास्त्रज्ञ, व्यापारी अशा समाज उपयोगी असणाऱ्या घटकांची नावे मुलांना देऊन त्यांचे महत्त्व सांगण्यात आले. या सर्व घटकांचे समाजात असणारे स्थान मुलांनी जाणून घेतले. या निमित्ताने ही मंडळी काय काम करतात, त्यांचे विचार, वागणूक, जबाबदारी, हक्क इ. गोष्टींचा मुलांनी विचार केला.

**अभिवाचन –** डॉ. अनघाताई लवळेकर यांनी लिहिलेल्या 'नाही कसे म्हणू तुला ?' या कथेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या कथेतून महाविद्यालयात होणाऱ्या मानसिक-शारीरिक शोषणाची मुलांना कल्पना आली. या विरोधात आपली ठाम भूमिका कशी बजवायची हे मुलांना समजले.

**अभिरुप न्यायालय –**

८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी पालक, शिक्षक, विद्यार्थी असे गट पाडून यांची बाजू मांडण्यास सांगण्यात आले. १० वी, ११ वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी नागरिक, पर्यावरणवादी, रुढीवादी अशा भूमिका मांडण्यास सांगण्यात आले.

**मनाची एकाग्रता आणि मन संयम :**

'मनाची एकाग्रता' या विषयावर मनःशक्ती केंद्र लोणावळाचे मा. फापाळे सर यांनी मार्गदर्शन केले. वेगवेगळ्या परिस्थितीत स्वतःवर कसे नियंत्रण ठेवायचे हे मुलांना समजले. अभ्यास करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी काही सोप्या पद्धती त्यांनी मुलांना सांगितल्या.

**कथाकथन : जाणिवांचे स्फूर्तीस्थान –** श्री. योगेश माकणे सर यांनी विविध प्रेरणादायी कथा मुलांना सांगितल्या. यातून शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाणिवांचा विकास कसा झाला याची माहिती मुलांना समजली.

**समारोप सत्र –** समारोप सत्रामध्ये प्रत्येक गटातील २-२ वर्धकांनी आपली मनोगते मांडली. सर्वांनी हे शिबिर आणि विषय आवडल्याचे सांगितले. श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी समारोप करताना शिबिराचा धावता आढावा मुलांसमोर ठेवला. **शिबिरात आपण स्वतःबद्दल ज्या गोष्टी जाणून घेतल्या आहेत आणि जे ठरवलं आहे ते यापुढे दैनंदिन जीवनात नेहमी वापरायचे आहे असे सांगितले.**

**भाग ५**

भगिनी निवेदिता शाखा, क्रांतीज्योती सावित्री शाखा

स्थळ – भावे प्राथमिक विद्यालय. दिनांक २ नोव्हेंबर – ६ नोव्हेंबर २०१६

विषय – कला : निर्मिती ते विक्री. संख्या – ६५

| | २ नोव्हें. | ३ नोव्हें. | ४ नोव्हें. | ५ नोव्हें. | ६ नोव्हें. |
|---|---|---|---|---|---|
| प्रबोधन | ---- | श्री. श्रीकांत यादव | श्री. सुमित डोळे | श्री. मयुर कर्जतकर | कु. दिपाली साका |
| सत्र १ | सौ. अनुराधा आपटे – कृत्रिम फुले श्रीमती मनीषा नडे – ग्लास पेंटिंग | सौ. अनुराधा आपटे श्रीमती मनीषा नडे भडसावळे ताई | सौ. भडसावळे मण्यांच्या वस्तू | तयारी | विक्री |
| सत्र २ | ---- | कु. कल्याणी भोईटे – पॉट पेंटिंग सौ. धनश्री केळकर – फ्रेमस | कु. कल्याणी भोईटे सौ. धनश्री केळकर | तयारी | |
| प्रेरणासत्र | श्री. विलास कुलकर्णी | कॅप्टन सनत भाटे | श्री. रवी देव | श्री. विश्वास कुलकर्णी | |

शिबिराच्या विषयाला अनुसरून उद्घाटन सत्रापासूनच वेगवेगळ्या वस्तू बनवायची सत्रे सुरु झाली. श्रीमती अनुराधाताईंनी कृत्रिम फुले, श्रीमती मनिषाताईंनी ग्लास पेंटिंग, श्रीमती कल्याणीताईंनी पॉट पेंटिंग व पेन स्टँड, श्रीमती धनश्रीताईंनी फ्रेम बनवणे व श्रीमती भडसावळे ताईंनी कमळ, कीचेन्स, महीरपी या मण्यांच्या वस्तू बनवायला शिकवले. हे प्रशिक्षण गटशः झाले. या तयार केलेल्या वस्तूंची नंतर ६ नोव्हेंबरला महाराष्ट्र मंडळ, ग्राहक

पेठ, ज्ञानप्रबोधिनी व न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे स्टॉल उभारून विक्री करण्यात आली. दोन्ही उपक्रमात वर्धिकांनी उत्तम भाग घेतला.

प्रेरणासत्रामध्ये श्री. विलास कुलकर्णी सरांनी आपले व्यक्तिमत्त्व आपणच कसे फुलवू शकतो हे सांगितले. श्री. सनद् भाटे सरांनी नेव्हीमधील अनुभव कथनातून आपण निवडलेल्या कार्यक्षेत्रात कसे यशस्वी होऊ शकतो हे सांगितले. श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी विक्री कौशल्यातील महत्त्वाच्या गोष्टी समजावून सांगितल्या. ज्याचा उपयोग वर्धिकांना दिनांक ६ च्या विक्री उपक्रमात झाला.

रात्र कार्यक्रमात विनोदी नाटक, मूक नाटक, जाहिरात बनवून तिचे सादरीकरण अशा गटशः स्पर्धा झाल्या.

शिबिराचा समारोप श्री. रामभाऊ डिंबळे सरांच्या 'विक्री कौशल्य मार्गदर्शना'ने झाला. वस्तूची विक्री करताना ग्राहकांशी कसे बोलावे, आपल्या मालाचे वर्णन ग्राहकांच्या गरजेनुसार कसे करावे, विक्री करताना येणाऱ्या संभाव्य अडचणी व त्यावर मात कशी करावी याबद्दल त्यांनी सांगितले.

◆◆◆

**फिरती प्रयोगशाळा : द्वि-दशकपूर्ती**

'स्व'-रूपवर्धिनी १५-१६ वर्षांची झाली अन् १९९६ साली ग्रामीण मुला-मुलींसाठी हीच अशीच चळवळ उभी करायची ठरले. वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करण्यासाठी विविध माध्यमांद्वारे समाजापर्यंत जाऊन कार्य करणारी विज्ञानभारती व 'स्व'-रूपवर्धिनी या दोघांनी मिळून हा प्रकल्प उभा केला. परिसर निवडला होता मुळशी खोऱ्यातील आठ-दहा गावे. उद्दिष्ट होते – ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्वयंप्रेरणा, आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांच्यामधून भविष्यात गावाच्या विकासाची धुरा सांभाळणारे समर्थ नेतृत्व देऊ शकणारे सुदृढ, बुद्धिमान युवक-युवती निर्माण करणे. वयोगट ठरला ५ वी ते ७ वी. माध्यम ठरले विज्ञानप्रयोग, शिक्षण व खेळ यांचे.




आज हा प्रकल्प वीस वर्षेपूर्ण करीत आहे. गेल्या वीस वर्षात या प्रकल्पाद्वारे काय काम केले, ह्याचा घेतलेला हा धांडोळा!

सुरुवातीला एक जीप मिळाली. विज्ञान भारतीचे शिक्षक, वर्धिनीचे कार्यकर्तेयांची एक फौज तयार झाली. दर शनिवारी मुळशीमधील गावांतील शाळांमध्ये आपली प्रयोगशाळा नित्यनेमाने जाऊ लागली. तीन वर्षांनंतर जे.आर.डी.टाटा ट्रस्टने ह्या प्रकल्पासाठी मोठी गाडी देणगी म्हणून दिली आणि आता आठवड्यातील पाच दिवस मुळशी खोऱ्यात जाणाऱ्या ह्या प्रयोगशाळेची वाट मुले आतुरतेने पाहू लागली.

विज्ञानातील प्रयोग मुलांनी स्वतः करून बघणे, मोठे प्रयोग प्रात्यक्षिकांद्वारे करून दाखविणे, सोबत ८ वी ते १० वीतील मुलांना गणित, इंग्रजी व विज्ञान यांचे सोप्या सुलभ साधनांद्वारे मार्गदर्शन, परीक्षेच्या आधी उत्तरपत्रिका लेखन तंत्र, चुका कशा टाळायच्या, लक्षात कसे ठेवायचे, अशा अनेक विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजली गेली आणि हे सर्व कसे सोपे आहे, काहीही अवघड नाही, मलापण हे जमेल हा आत्मविश्वास मुलांना मिळाला.

वेद आणि उपनिषदे यांच्यापासून प्रेरणा घेऊनच भारतातील नानाविध पंथ आणि संप्रदाय उत्पन्न झाले.

अन् पाहता पाहता एखाद्या गबाळ्या, मुखदुर्बळ मुलाचे सशक्त, बुद्धिमान युवकात रुपांतर होताना अनुभवास येते. ह्याचा फायदा कसा झाला हे आज ते विद्यार्थी भेटले की सहजच लक्षात येते. शाळांचे १० वी चे निकाल ४०-४५% वरून ९०-९५% पर्यंत वाढले.

काही वर्षे गावातील रुग्णांसाठी आठवड्यातून दोन दिवस आरोग्य केंद्र चालू होते. सरासरी ६० ते ७० रुग्ण ह्याचा लाभ घेत असत. नेत्रचिकित्सा शिबिरे, मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया, मोफत चष्मे वाटप ह्या आरोग्य केंद्रामार्फत केले गेले.

दोन गावातून दर रविवारी व शुक्रवारी साप्ताहिक शाखा भरत असे. कोळवणमध्ये संगणक प्रशिक्षण वर्गाचा लाभ मुलेच नाहीतर शिक्षकही घेत असत. विविध विषयांवरील व्याख्याने, पेटी वाचनालय, सुटीतील शिबिरे असे नानाविध उपक्रम घेतले जात असत. गेली काही वर्षे हा उपक्रम राजगुरुनगर परिसरातील दहा गावातील शाळांमध्ये घेतला जात आहे.

नित्य नवीन अनुभव, त्या त्या गावांमधले जीवनातील चढ-उतार, मुलांच्या अडचणी, उत्साह, अशा अनेक गोष्टी कामात मोठी प्रेरणा निर्माण करतात तसेच शहरी सुखाच्या मुबलकतेची जाणीवही करून देतात. त्या पार्श्वभूमीवर ग्रामीण समाधानाचे महत्त्व लक्षात येते. परंतु २१ व्या शतकातील जागतिक स्पर्धेत आपला ग्रामीण विद्यार्थी टिकवणे ही काळाची गरज असली तरी हे किती पराकाष्ठेचे आहे हे जाणवते.

ह्यासाठी आवश्यक आहे जीव ओतून काम करणारे तज्ज्ञ, उदार देणगीदार, किमान प्रोत्साहन देणारे - पाठीवर आश्वासक थाप देणारे ग्रामस्थ, शिक्षक ह्यांची साथ, सहकार्य ! मग आज जे काम अवघ्या १० शाळांमध्ये चालू आहे ते आणखी किमान २५ गावांमध्ये सुरू करून आपले ग्रामीण विद्यार्थी सर्व आघाड्यांवर चमकताना दिसतील हे स्वप्न प्रत्यक्षात आणणे अवघड नसेल.

**- श्री. सुनील कुलकर्णी**

**ही वस्ती माझी... 'समतेची' -**

अनेक झोपडपट्ट्या वस्त्यांमध्ये लहानाचे मोठे झालेले सुशिक्षित व रुढार्थाने ज्यांनी आपले करियर उत्तम केले आहे असे तरुण आपल्या वस्तीतून एकदा शिकून बाहेर पडले की पुन्हा फिरकत नाही. त्या वस्तीविषयीचे प्रेम आटते व तीच वस्ती त्यांना समस्या वाटते. परंतु वर्धिनीच्या मुशीत तयार झालेले आमचे युवक-युवती हा अपराध करणार नाही. संदीप मोरे व वर्धिनीतील काही युवक-युवतींनी एकत्रित येऊन स्वतःचे असे वेगळे काम चालू केले आहे. वस्तीतून नेतृत्व तयार करायचे आणि या नेतृत्वांनी वस्तीसाठी काम करायचे हा आदर्शपथ डोळ्यासमोर ठेवून या सर्वांनी मिळून सावित्रीबाई फुलेंच्या जन्मदिनानिमित्त 'समता प्रतिष्ठान' स्थापन केले. आज वस्तीतील बाल व महिला यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था कार्य करीत आहे.

स्पर्धा, नैमित्तिक कार्यक्रम, चर्चा या माध्यमातून सुरुवात करीत रोजची दैनंदिन अभ्यासिका समता प्रतिष्ठान घेत आहे. यांच्याकडे पाहिल्यावर वाटते की, पुढील काही वर्षात नक्कीच वस्तीतील सर्व प्रकारच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी वर्धिष्णू झालेले युवक-युवती अहोरात्र झटतील.

आम्ही पुत्र अमृताचे, आम्ही पुत्र या धरेचे । उजळून आज दावू, भवितव्य भारताचे ।।

**शाखा प्रकल्पाचा पुण्याबाहेरील विस्तार –**

**लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान – सातारा, सेतू चॅरिटेबल ट्रस्ट–कोल्हापूर आणि जनभारती प्रतिष्ठान–लातूर या तीन समविचारी न्यासांच्या माध्यमातून सातारा, कोल्हापूर आणि लातूर येथे वर्धिनीचे उपकेंद्र चालू झाले आहे. या तीनही उपकेंद्रांच्या माध्यमातून वर्धिनीच्या शाखा विभागाचे काम सुरू आहे. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित स्तरातील गुणी मुलामुलींच्या सर्वांगीण विकासाचे काम अतिशय उत्साहाने चालू आहे. व्याख्याने, संस्थाभेटी, छोट्या सहली, शिबिरे या उपक्रमातून हळू हळू तीनही ठिकाणी काम स्थिर होत आहे. नवीन कार्यकर्ते कामाला जोडले जाऊ लागले आहेत.**

**सातारा उपकेंद्र –**

सातारा येथील केंद्राचा विस्तार होऊन आता सात ठिकाणी शाखा सुरू झाल्या आहेत आणि संस्थेतून घडलेले युवक–युवती कार्यकर्ते या शाखा सांभाळत आहेत. वर्धिनीमार्फत सुरू असलेल्या फिरती प्रयोगशाळेचा प्रकल्पही सातारा येथे सुरू झाला असून सुरुवातीला नगरपालिकांच्या शाळांना या प्रकल्पसेवेचा लाभ मिळत आहे. मे महिन्यात तीन दिवसांचे निवासी शिबिर संपन्न झाले. या शिबिरात कोल्हापूर येथील सेतू चॅरिटेबल ट्रस्ट या उपकेंद्रातील २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. दिवाळी सुट्टीत युवक–युवती कार्यकर्त्यांचा निवासी अभ्यास वर्ग संपन्न झाला. सातारा उपकेंद्र हळूहळू विस्तारतही आहे आणि स्थिरही होत आहे.

**कोल्हापूर उपकेंद्र –**

सेतू चॅरिटेबल ट्रस्टच्या सहयोगाने सुरू असलेल्या या उपकेंद्राचाही थोडा विस्तार झाला आहे. गेल्या वर्षी एकाच वस्तीत एक शाखा होती. या वर्षी आता दोन वस्त्यांसाठी दोन शाखा सुरू झाल्या आहेत. पुण्यातून चि.पद्मनाभ धायगुडे हा विद्यार्थी विस्तारक कोल्हापूर येथे गेला असून त्याची चांगली मदत या केंद्रांना होत आहे. या वर्षी ठरवून दिवाळी सुटीतील शिबिर या उपकेंद्राने आपल्या ताकतीवर संपन्न केले. तीन दिवसांच्या या निवासी शिबिरासाठी आवश्यक असे निधी संकलन व वस्तुरुपाने देणगी गोळा करण्याचे कामही या उपकेंद्रातील उत्साही युवक युवती कार्यकर्त्यांनी केले. यशस्वी झालेल्या पहिल्या निवासी शिबिरामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढला असल्याचे जाणवत आहे.

**लातूर उपकेंद्र –**

जनभारती न्यासाच्या माध्यमातून सुरू झालेल्या या उपकेंद्राचे काम उत्साहाने सुरू आहे. या वर्षीच्या भीषण दुष्काळामुळे निवासी शिबिरासारखा उपक्रम घेणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीतही अनेक छोट्या छोट्या उपक्रमांतून येथील पूर्ण वेळ कार्यकर्ता राहुल गायकवाड हा विद्यार्थ्यांचा उत्साह टिकवून ठेवू शकला. डॉ. आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने १४ एप्रिल रोजी या उपकेंद्राने विद्यार्थ्यांच्या मदतीने डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचारांचे स्टिकर्स २५०० नागरीकांना भेट दिले. प्रखर उन्हाळ्यातही बाबासाहेबांच्या प्रखर देशभक्तीने ओतप्रोत विचारांनी नागरिकही भारावले.

**अपेक्षा –** या तीनही आणि आणखीन एक–दोन जिल्ह्यांमध्ये नव्याने विस्तार होऊ शकणाऱ्या या केंद्रांचे काम अधिक प्रभावी होण्यासाठी महिन्यातून एखादी भेट त्या त्या केंद्रांना देऊ शकतील अशा कार्यकर्त्यांचा एक स्वतंत्र संच उभा राहण्याची आवश्यकता जाणवत आहे. अशी मदत करू शकणाऱ्या कार्यकर्त्यांचे विस्तार विभागात स्वागत आहे.

### मैदान विभाग – सांघिक क्रीडादिन २०१६

या वर्षी क्रीडादिन दोन गटांत घेण्यात आला – सांघिक व वैयक्तिक.

सांघिक क्रीडादिन हा २७ नोव्हेंबर २०१६ या दिवशी भारत स्काऊट गाईड या मैदानावर पार पडला. संख्या ३०० होती. या वर्षी प्रथमच सांघिक क्रीडादिन हा आधी भाग स्तरावर आणि नंतर केंद्रिय स्तरावर भागश: संघ पाठवून स्पर्धा झाल्या. या नवीन संकल्पनेला भाग स्तरावरून भरभरून प्रतिसाद मिळाला.

भागस्तरावरून चाळणी होऊन सर्वोत्तम खेळाडूंचा संघ तयार करून भागाचे संघ स्पर्धेत सहभागी झाले. या सर्व संघांचे साखळी पद्धतीने सामने घेण्यात आले, व त्यातून वर्धिनीचे केंद्रिय संघ निवडण्यात आले.

हे सर्व संघ या वर्षभरात 'स्व' रूपवर्धिनीच्या नावे स्पर्धांमध्ये सहभागी होतील व वर्धिनीच्या नावलौकिक वाढवतील याकडे क्रीडाविभाग लक्ष देईल.

खेळ – ५ वी – ६ वी लंगडी   ७वी – ८ वी खो खो   ९ वी – १० वी कबड्डी
११ वी – १२ वी कबड्डी   F.Y. - T.Y कबड्डी
व्यावसायिक युवागट – व्हॉलिबॉल.

**वर्धिकांच्या सांघिक क्रीडा स्पर्धा –** कबड्डी विजेता गट – भगिनी निवेदिता शाखा
लंगडी विजेता गट – क्रांतीज्योती सावित्री शाखा

### वैयक्तिक क्रीडादिन २०१६

या वर्षीचा वैयक्तिक क्रीडादिन दि. ४ डिसेंबर २०१६ या दिवशी पुण्यातील नामांकित बाबुराव सणस ह्या मैदानावर पार पडला. संख्या ४०० होती. स्पर्धेचे उद्घाटन आपल्या क्रीडा प्रतिभा विकसन प्रकल्पातील खेळाडूंच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून करण्यात आली. डॉ. विनेश नगरे सरांनी खेळाडूंचा जोश वाढवला. खेळ पुढील प्रमाणे – १) ५० मी. धावणे – बालशाखा २) १०० मी. धावणे ३) १५०० मी. धावणे ४) लांब उडी, ५) गोळाफेक, ६) १०० X ४ रिले.

या वर्षी प्रथमच आपण युवकांसाठी १०० X ४ या स्पर्धेचा समावेश केला. युवकांचा त्यासाठी उत्तम प्रतिसाद मिळाला. दुपारी त्याच ठिकाणी सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आली. लहान गट, मोठा गट, युवक गट या गटांत विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके सादर केली. या स्पर्धासाठी केदार देशपांडे, विश्वास कुलकर्णी हे मार्गदर्शक म्हणून लाभले. सूर्यनमस्कार स्पर्धेत लहान गटात – अभेदानंद शाखा, मोठा गट – रामकृष्ण शाखा व युवक गट – दयानंद शाखेने प्रथम क्रमांक पटकावला.

**वैयक्तिक स्पर्धा – मुले –**

| | १०० मी | १५०० मी. |
|---|---|---|
| ५ वी - ६ वी | प्रशांत कोल्हे | अभिषेक भोसले |
| ७वी - ८ वी | आकाश ठोंबरे | रविकुमार महतो |
| ९ वी - १० वी | कुमार खराडे | रोहन नरके |
| ११ वी - १२ वी | अनिकेत कावणकर | संकेत पासलकर |
| महाविद्यालयीन गट | जितेंद्र काळे | जयेश येमुल |
| व्यावसायिक युवा गट | राज जाधव | – |

| | लांब उडी | गोळा फेक |
|---|---|---|
| ५ वी– ६ वी | कृष्णा जगताप | – |
| ७वी – ८ वी | सुजित तिवारी | सार्थक खोपडे |
| ९ वी – १० वी | अभिषेक साबळे | अमन प्रजापती |
| ११ वी – १२ वी | शेखर चव्हाण | अनिकेत दिघे |
| महाविद्यालयीन गट | जितेंद्र काळे | अजय सोमवारे |
| व्यावसायिक युवा गट | – | उमेश मठपती |

**१०० X ४ रिले**

प्रथम – स्वामी श्रद्धानंद शाखा, द्वितीय – स्वामी विवेकानंद शाखा, तृतीय – स्वामी दयानंद सरस्वती शाखा

**वैयक्तिक – मुली –**

| | १०० मी. | लांब उडी | गोळा फेक |
|---|---|---|---|
| ५ वी– ६ वी | काजल थापा | अंकिता तिवारी | – |
| ७वी – ८ वी | ऐश्वर्या जाधव | मानसी माझिरे | पायल जिरेसाळ |
| ९ वी – १० वी | समृद्धी यादव | समृद्धी यादव | सायली कांबळे |
| युवती गट | – | पूजा बत्तीन | आरती दासरी |

**बालशाखा –**

| | ५० मी | लांब उडी |
|---|---|---|
| ३ री –४ थी | श्रावणी मोरे | करण सरोज |

## क्रीडा कौशल्यांचा विकास

क्रीडा प्रतिभा विकास प्रकल्पाद्वारे सर्व शाखांवर मैदान विभागात विशेष साधनांद्वारे प्रशिक्षण दिले जाते. आठवड्यातून एकदा दिल्या जाणाऱ्या या प्रशिक्षणामुळे मुलांच्या क्रीडा कौशल्यांमध्ये विकास झाल्याचे आढळून आले. यासाठी वर्धिनीच्या युवक–युवतींना C.P.Ed. कोर्सचे शिक्षण देण्यात आले होते.

## मैदान समिती

प्रत्येक शाखेची लहान गट व मोठा गट मिळून मैदान समिती बनवण्यात येत आहे. ही समिती साप्ताहिक नियोजन, खेळ, योगासने, मैदान आखणी आणि आचार विभाग यांचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाहीत लक्ष घालते. या समितीमुळे मुलांमध्ये क्रीडा स्पर्धांचे नियोजन कसे करावे हे शिकण्यास मदत होते.

## रोजचे मैदान – रोजचे उपक्रम

**स्वामी श्रद्धानंद शाखा –**

११ मे पासून पोषक आहार सप्ताहाला सुरुवात झाली. सिंबायोसिस कॉलेजच्या तन्मयी ताई यांनी पोषक आहार सप्ताहाला सुरुवात केली. आहार आणि पचनसंस्था यांची माहिती वर्धकांना दिली. कार्यक्रमाच्या शेवटी पौष्टिक आहार कसा बनवावा यावर 'पाककला स्पर्धा' घेण्यात आली. वर्धकांनी गटशः शाखेतच चविष्ट, सकस अशा विविध पाककृती बनवल्या. परीक्षकांना त्याची कृती व त्यातील घटक तसेच त्यांचा होणारा फायदा स्पष्ट करून सांगितला. पालकांनाही मुलांचे कौतुक वाटले. आठवडाभर मुलांच्या तोंडी फॅटस्, कार्बोहायड्रेटस्,

विटॅमिन्स, मिनरल्स, सॉल्ट हीच भाषा होती. आता तरी वडापावचा हट्ट कमी होईल अशी आशा पालकांनी व्यक्त केली.

५ ते २१ ऑगस्ट – गतवर्षी रिओ शहरात पार पडलेल्या ऑलिंपिक स्पर्धा सर्वांसाठी उत्सुकतेचा विषय ठरला. ह्या ऑलिंपिक वेळी शाखेतील युवक संदीप जगधने याने वर्धकांना अॅथलेटिक्स या प्रकारांविषयी माहिती देणारे सत्र घेतले. फुटबॉल ह्या खेळाविषयी योगेश नराल तसेच व्हॉलीबॉल ह्या खेळाविषयी ओंकार चौधरी यांनी वर्धकांना माहिती करून दिली. तसेच वर्धकांना ऑलिंपिक प्रोजेक्ट देण्यात आला होता. या स्पर्धेत इ. ९ वी तील वेदांत मद्देल या वर्धकांस बक्षीस देण्यात आले.

**स्वामी योगानंद शाखा –**

योगानंद प्रिमिअर लीग आणि योगानंद ऑलिंपिक या दोन क्रीडा स्पर्धा शाखेमध्ये घेण्यात आल्या. कबड्डी व फुटबॉल या स्पर्धांचे उद्घाटन शाखेतल्या पालकांनी केले. शाखेने वर्धकांना कबड्डी आणि खोखो या दोन खेळांचे वर्षभर प्रशिक्षण दिले.

**क्रीडा प्रतिभा विकास प्रकल्पाचे प्रतिभावंत खेळाडू**

**१) रविकिरण संजय कच्छवे : खो–खो :** श्री सरस्वती विद्या मंदिरमधील हा विद्यार्थी सर्व खेळांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये पुढे होता. खेळ हा त्याचा आवडीचा विषय असल्यामुळे खो–खो लवकर खूप चांगल्या रित्या शिकला. इ. ६ वी पासून तो नियमित शाखेत येतो. क्रिडादिनाला खो–खो असल्यामुळे खो–खो ची प्रॅक्टिस खूप मन लावून केली. आणि तेथूनच खो–खो या खेळाची आवड निर्माण झाली. मात्र सन्मित्र खो–खो संघामधील आकाशदादा आणि समीरदादा यांनी त्याच्यातील क्षमता ओळखली आणि त्याला सन्मित्र संघामध्ये बोलावून घेतले. येथून त्याच्या खो–खोच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. या दोनही दादांच्या अफाट कष्टातून आणि रवीने घेतलेल्या मेहनतीतून आज हे यश प्राप्त झाले आहे.

हे यश त्याला खूप खडतर कष्टातून मिळाले. शाळेत सराव, सन्मित्र संघामध्ये सराव, रविवारी सकाळी ९ ते १ सराव, संध्याकाळी ७ ते ९ सराव... यात कुठल्याही सणाला त्याला सुट्टी नव्हती. ३६५ दिवस फक्त एकच स्वप्न महाराष्ट्राकडून खेळायचे. आज तो पुण्यातील २००३ नंतर पहिला खेळाडू आहे, ज्याची महाराष्ट्राकडून निवड झाली आहे. या सर्व गोष्टींमध्ये शाखेचे कामही तितकेच महत्त्वाचे होते. त्याच्या घरी जाऊन समजावून सांगणे आणि त्याच्या अभ्यासाची काळजी घेणे.

त्याच्या घरची परिस्थिती सर्वसामान्य आहे. पाच जणांचे कुटुंब. वडील एकटेच कमावणारे. आज त्याच्या घरातील सर्वांना खूप अभिमान वाटतो. त्याच्याबद्दल आणि त्याच्या यशाबद्दल.

जिल्हा क्रीडा परिषद पुणे व पुणे शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय खो–खो स्पर्धेमधून विभाग स्तरावर त्याची निवड झाली. यानंतर विभागस्तरीय निवड सोलापूर या ठिकाणी झाली व तिथून त्याची राज्य स्तरीयसाठी औरंगाबाद या ठिकाणी महाराष्ट्र खो–खो संघासाठी निवड करण्यात आली.

**२) रविकुमार महतो :** रविकुमार विनोद महतो हा इ. ६ वी पासून शाखेशी जोडला गेला. सुरुवातीपासून त्याला खेळांची आवड होती. सगळ्या मैदानी स्पर्धा व मैदानी खेळ यांमध्ये तो नेहमीच पुढाकार घ्यायचा. लहान गटात असूनसुद्धा तो अनेक वेळा मोठ्या गटामध्ये खेळायचा.

वर्धिनीच्या क्रिडादिनामध्ये स्पर्धा जिंकावी म्हणून त्याने काही दिवस शाखेत सराव केला. पहाटे लवकर त्याने

धावायचा सराव केला. याचा क्रिडादिनामध्ये त्याला फायदा झाला. ७वी ला असूनसुद्धा ५वी ते १० वी सर्व मुलांमध्ये मिळून त्याची धावण्याची वेळ सर्वोत्तम होती. त्याच वर्षी वर्धिनीने सुरू केलेल्या 'क्रिडा प्रतिभा विकास प्रकल्पात', त्याची निवड झाली. आधीपासून खेळांची आवड असल्याने तोही या निवडीमुळे खूष झाला व Long Distance Events ची तयारी करू लागला. वर्धिनीच्या निवडीला व त्याच्या आवडीला घरातूनही पाठिंबा मिळाला अणि इथूनच रविला त्याचा मार्ग मिळाला.

आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसली तरीसुद्धा वर्धिनीचा पाठिंबा असल्याने आर्थिक कारणामुळे सरावात कधी खंड पडला नाही. त्याचा सराव सुरूच होता. मनापासून केलेल्या सरावाचे त्याला लवकरच फळ मिळाले. कटारिया हायस्कूल आयोजित क्रॉसकंट्री २०१६ या स्पर्धेमध्ये १३ वर्षांचा असूनसुद्धा १६ वर्षाखालील वयोगटात दुसरा क्रमांक पटकावला. त्यानंतर जिल्हा परिषद आयोजित स्पर्धेमध्ये त्याने भाग घेतला.१६ वर्षाखालील वयोगटात १५०० मी. शर्यतीमध्ये पहिला आला व सुवर्णपदक पटकावले. तसेच ३ किलोमीटर या शर्यतीमध्ये सुद्धा रजत पदक पटकावले. वय तुलनात्मक कमी असतानाही मोठ्या वयोगटांमध्ये त्याने विजय संपादन केला. १९ वर्षाखालील वयोगटात ५ किमी स्पर्धेतसुद्धा रजत पदक पटकावले. ही समर्थ रामकृष्ण शाखा व 'स्व'–रूपवर्धिनीसाठी अभिमानाची गोष्ट आहे. दामले कुमार मैदानी स्पर्धेतसुद्धा १ किमी मध्ये ३रा आला. या स्पर्धेदरम्यान त्याला पोटाला दुखापत असूनसुद्धा त्याने हा विजय संपादन केला. हडपसर येथील आदिदास मॅरेथॉन स्पर्धेत खुल्या गटात ३ रा क्रमांक पटकावला भारती विद्यापीठ येथे झालेल्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. अशा प्रकारे केवळ एका वर्षाच्या मेहनतीमुळे त्याने विविध स्पर्धा जिंकून यश संपादन केले. यामुळे पुढील सर्व स्पर्धा जिंकण्याचा त्याचा मानस आहे व त्यासाठी कठोर मेहनत करायची त्याची तयारी आहे.

* समर्थ रामकृष्ण शाखेतील युवक तुषार मुढे याने २१ मिनिट ३ सेकंदात राजगड किल्ला चढून राजगड मॅरेथॉन स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावला.

* शाहू शाखेतील ३ जणांची पुणे जिल्हा संघात व एकाची महाराष्ट्राकडून खोखोसाठी निवड झाली आहे.

– अभिषेक भोसले ७ वी – जिल्हा, रितेश काडगी ७ वी – जिल्हा

– अविनाश शिरसाट ७वी – जिल्हा, रविकिरण कच्छवे ८ वी – महाराष्ट्र संघ

श्री. विठ्ठलराव जोशी ट्रस्टतर्फे चिपळूण येथे सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे दि. २० मार्च ते २६ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी वर्धिनीच्या शाखांमधून ३० विद्यार्थी पाठविण्यात आले होते. कबड्डी, खोखो या सांघिक तर १०० मी., १५०० मी. धावणे, लांब उडी, गोळा फेक, जलतरण या वैयक्तिक स्पर्धांमध्ये मुलांचा सहभाग होता. कबड्डीच्या संघाने उपउपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. हा सामना अतिशय चुरशीचा झाला. तसेच वैयक्तिक खेळात मोहन कानडे याचा जलतरण प्रकारात ४ था क्रमांक आला. रवी महतो याने १५०० मी. धावणे स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.

सर्व खेळाडूंना या स्पर्धेमुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मैदानांवर खेळण्याचा अनुभव आला. हा अनुभव त्यांच्या पुढील वाटचालीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

## रुप पालटू तासिकेचे

**क्रांतिज्योती सावित्री शाखा –** शाखेत अभ्यास तासिकांच्या आधी प्रत्येक वर्गामध्ये पाढे पाठांतर घेतले जातात. त्यानंतर १० मिनिटे इंग्रजी वाचन, लेखनाचा सराव घेतला जातो. २७ ऑगस्ट या दिवशी झालेल्या पालकसभेत लताताईंनी पालकांना 'स्व' रूपवर्धिनी समजावून सांगितली. ही पालकसभा वर्धिका व पालकांना सोबत झाली. पालकांना शाखा काय आहे ते समजले आणि प्रतिसाद चांगला मिळाला. ऑक्टोबर महिन्यात दर रविवारी वर्धिकांचे अभ्यास शिबिर घेतले. त्यामध्ये वर्धिकांचा 'स्व' अभ्यास चांगला झाला.

१५ ऑक्टोबर हा दिवस डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस म्हणून वाचन प्रेरणा दिन शाखेत साजरा झाला. त्यात वर्धिकांनी व युवतींनी १ तास वाचन केले. वाचलेले इतरांना समजावून सांगितले.

**स्वामी विवेकानंद शाखा –** पाढे पाठांतर स्पर्धा. इयत्ता ५ वी ते १२ वी या वयोगटासाठी पाढे पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. ८ वी ते १२ वी पर्यंतच्या वर्धकांनी किमान २५ पर्यंत पाढे पाठ केले. इयत्ता ५ वी ते ७ वीच्या काही मुलांनी ३० पर्यंत पाढे पाठांतर करण्यात यश मिळवले.

दि. ९ ऑक्टोबर या दिवशी एक दिवसीय अभ्यास शिबिर घेण्यात आले. एकूण ३० वर्धक आणि १० युवकांनी यात सहभाग घेतला. या शिबिरात स्वयंअध्ययन कसे केले जाते हे मुलांना सांगण्यात आले. ह्या अभ्यास शिबिरात पुढील तासिकांचा समावेश करण्यात आला होता.

१) १ तास – वाचन + पाठांतर (मराठी, हिंदी, संस्कृत) २) १ तास – गणित तंत्र (जास्तीत जास्त गणिते सोडवणे) ३) १ तास – जास्तीत जास्त प्रश्न काढणे (विज्ञान) ४) १ तास – शब्द खेळ ५) ३ तास – चित्रपट आणि चर्चा. परीक्षेच्या कालावधीत हे शिबिर पार पडल्याने मुलांना उपयोगी ठरले. अभ्यासाचा कंटाळा असणारी मुलं पण मन लावून अभ्यास करताना पहायला मिळाली.

**स्वामी अभेदानंद शाखा –** संपूर्ण महिन्याभराचा अभ्यासक्रम ठरवला. त्यानुसार अभ्यास करून घेतला. उदा. (१०० गणिते, प्रत्येक विषयाचे प्रत्येकी ५०–५० प्रश्न सोडवून घेतले. मराठीचे निबंध, विज्ञानातील व्याख्या, संयुगे इ.) ई–लर्निंगद्वारे शिकवण्यात आले. फेब्रुवारी महिन्यात शाखेत अवांतर वाचनासाठी आणलेल्या पुस्तकांची देखभाल करणे असा उपक्रम झाला. यातून वर्धकांना पुस्तकांची बांधणी कशी करावी याची माहिती मिळाली.

**स्वामी योगानंद शाखा –** इंग्रजी लेखनकौशल्य व व्याकरणातील प्रेपोझिशन, व्हर्ब, नाऊन, प्रोनाऊन हे शिकवले गेले. हस्ताक्षर सुधारण्यावर भर देण्यात आला.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –** ५ जून या दिवशी इ. ८ वी ते १० वी गटातील वर्धकांच्या पालकांची सभा झाली. यात 'अभ्यास कसा घ्यावा' या विषयावर शिक्षकांनी पालकांशी संवाद साधला. ८ ऑक्टोबर या दिवशी युवकांच्या पालकांबरोबर संवाद साधताना श्री. सचिन वाडेकर यांनी महाविद्यालयीन युवकांचे वेळापत्रक व अभ्यासातील सातत्य याकडे लक्ष देण्याचे महत्त्व पालकांना विशद केले.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** १५ ऑक्टोबर – वाचन प्रेरणा दिनानिमित्त शाखेच्या ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन घेण्यात आले. कार्यक्रमांस एकूण २७ उपस्थिती होती. तसेच कोजागिरीनिमित्त दुग्धपानाचा कार्यक्रम शाखेत झाला.

**स्वामी शिवानंद शाखा –** ९ जानेवारीला प्रथम गटशः व नंतर वैयक्तिक प्रश्न मंजूषा स्पर्धा झाली. या स्पर्धेत कु. चैतन्य घेवारे विजयी झाला.

१६ जानेवारीला 'इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा असावी की नसावी' या विषयावर दोन गट पाडून वादविवाद स्पर्धा

झाली. यात परीक्षांचे फायदे व त्यातील ताण यावर चर्चा झाली. पण शेवटी परीक्षा असाव्यात हा मुद्दा उचलून धरला गेला. अवांतर वाचनाची गोडी वाढावी, विषयाचे महत्त्व लक्षात यावे ह्या दृष्टीने दररोज एका शास्त्रज्ञाची व त्यांनी लावलेल्या शोधांची माहिती मुलांना सांगितली. त्यामुळे वैज्ञानिक खेळण्यांची जोडणी व त्यातून उपयोगी वस्तू बनवणे या खेळात मुले उत्साहाने सहभागी होतात. निबंध लिखाण उत्तम व्हावे या दृष्टीने काही थोर नेत्यांची, कार्यकर्त्यांची वाक्ये गणेशदादाने अर्थासहित मुलांना सांगितली.

**भगिनी निवेदिता शाखा** – 'इतिहास विषय अभ्यासक्रमात हवा की नको' या विषयावर गटशः वादविवाद स्पर्धा झाली. यातून या विषयाचे महत्त्व सांगणारे मुद्दे मांडले गेल्याने त्याचा अभ्यास कसा केला पाहिजे याचे मार्गदर्शन सर्वांना झाले.

**तासिका विभागाचे अन्य उपक्रम** –

**१० वी –१२ वी करिअर मेळावा** – दि. ११ एप्रिल २०१६ रोजी इ. १० वी, १२ वी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे करियर व पुढील दिशादर्शनासाठी विशेष वर्ग घेण्यात आला. यामध्ये 'श्यामची आई फाऊंडेशन'च्या सौ. मंजिरी टकले व सुरेखा माळी यांनी मार्गदर्शन केले.

यामध्ये 'स्व'चा शोध, क्षमतावर्धन आणि करियरचे विविध पर्याय यावर सविस्तर चर्चा झाली.

विविध खेळ, चलतचित्र यांच्या माध्यमातून अतिशय आशयपूर्वक सत्रे झाली. एकूण ३५ विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रश्नमंजुषा** – ५ मार्च व ६ मार्चला ८ वी व ९ वी या इयत्तांची नवीन मराठी शाळेत इतिहास–भूगोल प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यात प्रश्न तयार करणे, दृकश्राव्य सादरीकरण (पीपीटी), नकाशा तयार करणे, नाटकातून एखादा ऐतिहासिक प्रसंग सादर करणे, छोटे खेळ याद्वारे वर्धक वर्धिकांचा अभ्यास घेण्यात आला. यात श्री. संदीप मोरे यांनी एकाग्रतेसाठी विविध योगासने, सूर्यनमस्कार यांचे प्रशिक्षण दिले.

**पूर्वपीठिका शिबिर** – १० वीच्या वर्धक वर्धिकांचे पूर्वपीठिका शिबिर मे महिन्यात घेण्यात आले. यात सर्व विषयांचा अभ्यास कसा करावा याचे नियोजन व अभ्यास कौशल्यांच्या संदर्भात सौ. उमाताई यांनी मार्गदर्शन केले.

**तासिका सर्वेक्षण** – तासिकेची सद्यस्थिती आणि आनंददायी शिक्षणाच्या शिक्षक आणि वर्धकांच्या कल्पना जाणून घेण्यासाठी यांच्याकडून खालील माहिती संकलित करण्यात आली.

* तांत्रिक अडचणींवर मात केली तर मुलांना जीवन शिक्षण देण्यात जास्त वेळ देता येईल.
* उपक्रमांद्वारे शिक्षण दिल्याने ते नक्कीच आनंददायी होईल.
* मुलांची अध्ययन शैली माहीत करून प्रत्येकावर वैयक्तिक लक्ष देण्यात यावे.
* मूलभूत संकल्पना शिकवून स्व–अध्ययनासाठी भरपूर वेळ द्यावा.
* दैनंदिन व्यवहारातील उदाहरणे देणे व त्यावर आधारित उपक्रम दिल्यावर मुलांची Involvement वाढेल. त्यामुळे शिक्षणाचा खऱ्या अर्थाने जीवनात उपयोग होईल.
* कृती आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब व्हावा.
* अभ्यास तंत्रांचा वापर विद्यार्थ्यांना करता आला पाहिजे.

**शिक्षक बैठक व चर्चासत्र** – वर्धिनीच्या तासिकेमध्ये केवळ परीक्षेची तयारी करून घेतली जात नाही तर खऱ्या अर्थाने जीवनशिक्षण दिले जाते. वर्धिनीची तासिका वर्षभर दररोज १ तास विज्ञान, इंग्रजी व गणित ह्या विषयांच्या संकल्पना स्पष्ट करण्यावर भर देते. ह्या तासिकांचे मार्गदर्शन करण्यात शिक्षकांचा सिंहाचा वाटा असतो. मुलांच्या

बालकांनी आधी आपली मातृभाषा नीट शिकावी आणि
स्वदेशातील संस्कृती अंगिकारावी असे माझे स्पष्ट मत आहे.

शंकांचे पूर्ण समाधान होऊन त्यांची कुतुहल जागृती व्हावी हाच तासिकेचा उद्देश आहे.
बदलत्या काळाच्या शिक्षण पद्धतीचा आणि वेगवान होत चाललेल्या जगाच्या स्पर्धेत जिंकायचे असेल तर मुलांना नव्या काळातील अध्ययन कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे. यासाठी शिक्षकांची तासिका चिंतन बैठक घेण्यात आली. बैठकांमध्ये सध्याच्या तासिकेचा आढावा आणि पुढील शैक्षणिक वर्षांच्या तासिका कशा असाव्यात यावर चर्चा झाली आणि नवीन तासिकेचे नियोजन करण्यात आले.
बालककेंद्री, सृजनशील, कृतीशील आनंददायी तासिका कशी होतील यावर चिंतन झाले व कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

## कार्यक्रम विभाग

**वीर अभिमन्यू बालशाखा –** सप्टेंबर महिन्यात घेतलेली जाहिरात स्पर्धा खूपच चुरशीची झाली. मुलांनी मानवी आकृत्या, मनोरे यांद्वारे अभिनव सादरीकरण केले. शाखेत रोज सांगण्यात येणाऱ्या बोधकथा हा परिपाठातील मुलांचा अत्यंत आवडीचा विषय आहे. आता मुलेही वर्तमानपत्रांतून निवडक बोधकथा शाखेत घेऊन येतात. मुलांचे भीमरुपी स्तोत्र व मनाचे श्लोक तोंडपाठ झाले आहेत. ऑक्टोबर महिन्यात दिवाळीनिमित्त मुलांचे भेटकार्डे बनवणे, पणत्या रंगवणे व आकाशकंदिल तयार करण्याचे वर्ग झाले. नोव्हेंबर महिन्यात चांदणी भोजनाच्या कार्यक्रमात छत्रपती शिवरायांवर एक लघुपट दाखवला व त्यावर प्रश्न विचारले. एकाग्रतेने चित्रपट पाहिल्याने सर्व प्रश्नांची उत्तरे १००% बरोबर आली.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** रायगड सहलीमध्ये गडाचा इतिहास जाणून घेऊन त्या विषयावरच विविध गटशः स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये गडाचे स्थापत्य, उभारणी व गडाचा नकाशा अत्यंत अभ्यासपूर्वक व बारकाव्यांनिशी सादर करणाऱ्या प्रतिकृती मुलांनी तयार केल्या. नंतर शिवथरघळ येथे 'भक्ती' या विषयावर नाट्यस्पर्धा घेण्यात आली. असा माझा गाव, माझ्या आवडीचा चित्रपट, आमचे काल्पनिक यंत्र, आमची वाय फाय (Wi Fi) शाळा या शीर्षकांवरून किती वैविध्यपूर्ण उपक्रम व स्पर्धा शाखेत झाल्या असतील याची कल्पना येते. १ ऑगस्ट या दिवशी टिळक पुण्यतिथी व आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सुजीत तिवारी, रोहित कुगाटे यांचे कथाकथन झाले. इको फ्रेंडली सजावट कशी करावी यावर कागदापासून पंखे, फुले, झालरी, चित्र यांचा वापर करून सजावट कार्यशाळा घेण्यात आली.

**शाखेतील उपक्रम –** पत्रकार मंडळाची स्थापना करण्यात आली. व्याख्यानाबरोबरच प्रात्यक्षिकांवर भर दिला गेला. सायकलची देखभाल कशी करावी हे ओंमकारदादाने व मोटारसायकलची देखभाल महेशदादाने शिकवली. वर्धापन दिनी १४ झाडांचे वृक्षारोपण तळजाई येथे करण्यात आले. ६ जुलै (रमजान ईद) – हिंदु–मुस्लिम ऐक्य भावनेच्या उद्देशाने शाखेने ह्या वर्षी रमजान ईद निमित्त मुस्लिम बांधवांना ईद शुभेच्छा भेटकार्ड देण्यात आले. शाखेजवळील मोमीनपुरा मस्जिद परिसर तसेच लोहियानगर, घोरपडे पेठ व गंज पेठ ह्या शाखेजवळील परिसरात भेटकार्ड देऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**शिव–भीम सप्ताह –** दि. १२ डिसेंबर ते १८ डिसेंबर शाखेत शिव–भीम सप्ताह योजिला होता. या सप्ताहात शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्फुर्तीदायी पद्य आणि त्यांच्या जीवनावर आधारित कथाकथन झाले.

**क्रांतिज्योती सावित्री शाखा –** २३ जुलैला शाखेत वादविवाद स्पर्धा घेतली. विषय होता गणेशोत्सवाचे बदललेले स्वरूप. या विषयावर मुलींनी विविध सकारात्मक आणि नकारात्मक मुद्दे मांडले. ५ ऑगस्ट रोजी शाखेत मेहंदी स्पर्धा घेतली.

शाखेतील उपक्रम – शाखेतील मुलींना पर्वती बघायला १४ ऑगस्ट रोजी घेऊन गेलो. या स्थानाची ऐतिहासिक माहिती व पेशव्यांचे संग्रहालय दाखवले. पुण्याचे विहंगम दृश्य पर्वतीवरून दिसते खरे पण प्रदूषणाचा पडदा पाहून आम्ही अस्वस्थ झालो. ८ सप्टेंबर या दिवशी पेरूगेट येथील शिवाजी मित्र मंडळात अथर्वशीर्ष पठण केले.

**भगिनी निवेदिता शाखा –** रस्सीखेच, संगीतखुर्ची, खजिनाशोध, फलक लेखन अशा अनेकविध स्पर्धा शाखेत झाल्या.

तळजाई पठार या ठिकाणी १५ झाडे वर्धिकांनी व युवतींनी लावली. मुलींना हा उपक्रम खूपच आवडला. त्यांनी खूप आनंदाने वृक्षारोपण केले.

नाटक स्पर्धा विषय – १) समाजप्रबोधन २) आदर्श गणेशोत्सव ३) जागर 'स्त्री' शक्तीचा. या तीन विषयावर वर्धिकांनी उत्तम प्रकारे नाटक सादर केले.

किल्ले स्पर्धा – वर्धिकांनी 'स्व' स्वतःच्या हाताने किल्ला बनविला. आजपर्यंत त्यांनी कधीच किल्ला बनवला नव्हता पण खूप चांगल्या प्रकारे त्यांनी किल्ला बनविला आणि किल्ला बनवताना खूप मजा आली.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –** ऑगस्ट महिन्यात झालेल्या ऑलंपिक स्पर्धेवर प्रकल्प करण्यात आला. मुलांची २ गटात विभागणी करून त्यांना ऑलंपिक विषयी माहिती सांगण्यात आली. वर्धकांनी प्रकल्प सादरीकरण केले. पर्वती येथील पेशवेकालीन साहित्याचे प्रदर्शन मुलांना दाखवण्यात आले व त्यावर चर्चा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने शाखेत बुद्धवंदना झाली व परिसरातील २५० घरी जाऊन पेढे वाटप केले व आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. रमजान ईद या दिवशी शाखेतील जुना युवक अल्ताफ दादाच्या घरी जाऊन शुभेच्छा दिल्या. त्याच्या घरी शिरखुर्म्याचा आस्वाद घेतला.

**समर्थ रामकृष्ण शाखा –** बालदिनानिमित्त शाखेत विशेष कार्यक्रम घेण्यात आले. सुरेश पवार यांनी खेळ, उपक्रम घेतले. लघुपट दाखवले. मुलांनी बालगीतांवर नृत्य केले. सिद्राम शासम यांनी नोटाबंदीचे फायदे–तोटे यावर चर्चासत्र घेतले. फेब्रुवारी महिन्यात दप्तरातील साहित्यातून तसबिरी बनवणे, सामान्यज्ञानाची कौन बनेगा करोडपती, काल्पनिक वस्तू बनवणे अशा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांतून मुलांची कल्पकता, एकजुटीने काम करणे, नियोजन करून स्पर्धेत उतरणे हे गुण दिसून आले. नोव्हेंबर महिन्यात बोधकथांवर आधारित नाट्यस्पर्धा झाली. श्री. संदीप माहेश्वरी यांच्या प्रेरणात्मक अनुबोधपटांचा लाभ मुलांनी घेतला.

**स्वामी विवेकानंद शाखा –**

टाकाऊतून टिकाऊ स्पर्धा – कचऱ्यात टाकल्या जाणाऱ्या अनेक गोष्टींपासून वर्धकांनी नवनिर्मिती केली. शोभेच्या वस्तुंपेक्षा विज्ञान व गणित या विषयांना पूरक असणाऱ्या वस्तू बनवण्यावर भर देण्यात आला.

**स्वामी दयानंद शाखा –** 'नोटाबंदी' विषयावरील अर्थतज्ज्ञ श्री. अनिल बोकील यांची एबीपी माझा वरील मुलाखत दाखवली व त्यानंतर त्यावर चर्चा घेण्यात आली. युवकांची नोटाबंदीवर कार्यशाळा घेण्यात आली. मुलांनी अप्पर भागाचं वर्तमानपत्र तयार केले होते. त्यांचं परीक्षण करण्यासाठी महाराष्ट्र टाईम्सचे पत्रकार श्री. योगेश बोराटे हे शाखेत आले होते. नोटाबंदी या निर्णयामुळे समाजातील बहुतेक चित्र बदलले होते. शाखेतील युवकांनी

ठरवले की आपण बँकेच्या बाहेर जाऊन ज्यांना अडचण आहे त्यांना मदत करावी. यासाठी एकूण २५ युवकांची कार्यशाळा घेण्यात आली. २६/११ या घटनेला एकूण ८ वर्षे झाली. त्यानिमित्त शहीदांना आदरांजली वाहण्यात आली. पोलिसांची समाजातील भूमिका समजून घेण्यासाठी बिबवेवाडी चौकीतील पोलिस उपनिरीक्षक जयवंत पाटील यांना बोलावून त्यांची मुलाखत शाखेत झाली. २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाची माहिती सांगून व युवकांची निवडणूक घेऊन 'लोकशाही प्रक्रिया' समजावून सांगितली. सर्व मुलांनी गुप्त मतदान केले. यातूनच विधानसभा, लोकसभा निवडणूक यांची ओळख मुलांना करून देण्याचा प्रयत्न केला.

**स्वामी अभेदानंद शाखा –** शाखेची माहिती शाखेच्या परिसरात म्हणजेच गोखलेनगर भागात पोचावी, शाखेची पटसंख्या वाढावी या हेतूने ५ वी ते ८ वी या वयोगटातील परिसरातील सर्व विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा झाल्या. यात १५० मुलांनी सहभाग घेतला. दि. ६ जुलै रोजी बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमात २५ जणांना बक्षिसे मिळाली. श्री. विक्रांत दिघे सरांनी मार्गदर्शन केले.

## वारी उपक्रम

**क्रांतीज्योती सावित्री शाखा –** ३० जूनला पालखी पुण्यात आली होती. त्या वेळेस मुलींनी वारकऱ्यांसोबत अभंग सादर केले. वारकऱ्यांनी मुलींचे कौतुक केले. १६ जुलैला आषाढी एकादशी निमित्त संतांची वेषभूषा व वक्तृत्व यांची स्पर्धा झाली. शाखेतील वर्धिका साक्षी खताळ हिचा प्रथम क्रमांक आला. तिने संत बहिणाबाई यांची व्यक्तीरेखा खूप छान प्रकारे सर्वांसमोर मांडली.

**भगिनी निवेदिता शाखा –** शाखेत वर्धिकांनी भारूड आणि अभंग सादर केले. ह.भ.प.माऊली राऊत यांनी ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित कथा सांगितल्या.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा –** १ जुलै रोजी १५ वर्धक व ४ युवक यांनी पुणे ते सासवड वारीत सहभाग घेतला. वर्धकांनी वारकऱ्यांशी गप्पा मारून वारीचे महत्त्व जाणून घेतले.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** पालखी पुण्यात आली त्यानिमित्त शाखेतील मुलांचा ओवी पठणाचा व त्यांचा अर्थ समजावून घेण्याचा कार्यक्रम झाला. आषाढी एकादशीला संत तुकाराम चित्रपट दाखविला.

**स्वामी सुबोधानंद शाखा –** दरवर्षीप्रमाणे पालखीनिमित्त वारकऱ्यांशी संवाद साधला आणि वारीमध्ये प्रसाद वाटप करण्यात आले.

**समर्थ रामकृष्ण शाखा –** वारकरी दिंडीचा वारीतील परिपाठ माहिती व्हावा या हेतूने श्रीकृष्णदास लोहिया महाराज यांच्या दिंडीतील वारकरी शाखेत आले होते. त्यांच्या वर्धकांनी मुलाखती घेतल्या. नंतर हरिपाठ व अभंग गायन असा कार्यक्रम झाला.

## कार्यक्रम विभागाच्या यशस्वी कथा

भगिनी निवेदिता शाखेतील इ. ८ वीतील कु. श्रुतिका मोहिते या वर्धिकेची 'कास्प' या संस्थेने आयोजित केलेल्या 'स्वच्छता' या विषयावर चित्रकला स्पर्धेत ५० शाळांमधून प्रथम क्रमांकावर निवड झाली.

**'माझा BRAND केला आहे' –**

भगिनी निवेदिता शाखेतील इ. १० वीतील कु. समृद्धी यादव या वर्धिकेची 'कास्प' या संस्थेने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत ५० शाळेतून प्रथम क्रमांकावर निवड झाली.

समृद्धी यादव जेव्हा भेटायला आली तेव्हा उत्साहाने अनेक गोष्टी, स्पर्धा त्यातील विषयांबाबत बोलू लागली. ''सर, आता शाळेच्या स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन मी करणार आहे.''
मी आश्चर्यचकीत होऊन म्हणालो, ''एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचे तुला कसे काय सूत्रसंचालन दिले ?''. त्यावर समृद्धी म्हणाली, ''सर आता माझा BRAND तयार झाला आहे. वक्तृत्व, गायन, वाचन काहीही असो मलाच नेतृत्वाची संधी मिळते.''
समृद्धीच्या या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू वर्धिनीच्या शाखेतील छोट्या छोट्या स्पर्धांमधून खुलले आहेत.

**महानाट्यातून घडलेला साधाच पण मोठा बदल –**

'तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला। तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।।'

एका युवक कार्यकर्त्याच्या घरी झालेला संपर्क मंदार पोफळे आणि मला वर्धिनीचे काम अधिक गतीने करण्याची प्रेरणा देऊन गेला. घर अगदी साधं. त्याहून घरातील माणसेही अगदी साधी. गेली अनेक वर्ष या घरातील कुटुंबप्रमुख दारुच्या भयानक व्यसनात अडकले होते. या व्यसनामुळे एक चांगली सरकारी नोकरी गेली. रोजच्या या कटकटीच्या मानसिक त्रासामुळे पत्नीला मुलाबाळांसह काही काळ पती व घरापासून दूर रहावे लागले. वडिलांच्या या व्यसनापायी मुलाचे शिक्षणाचे एक वर्ष वाया गेले. त्याच्या आयुष्यातील हे महत्त्वाचे वर्ष. हे कमी की काय म्हणून निवासी जागेचीही समस्या उभी राहिली. अशी कथा अनेक घरात असते. म्हणूनच अशा घरातील मुलांचे आयुष्य घडवण्याचा प्रयत्न 'स्व'–रूपवर्धिनी करीत आली आहे.

नुकत्याच झालेल्या 'स्व'–रूपवर्धिनीच्या समरसता महानाट्यातील विचार करायला लावणारे प्रसंग पाहून वर्धिनीसारख्या चांगल्या संस्थेत आपला मुलगा उत्तम काम करीत आहे हे जाणवून भारावून गेलेल्या वडिलांनी दि. २४ जानेवारी पासून दारु सोडली ! होय दारु सुटली !! कुणीही न सांगता त्यांची दारु सुटली आणि तेव्हापासून त्यांनी खरंच पुन्हा दारु घेतली नाही; हे सांगताना त्या युवकाच्या डोळ्यात अश्रू दाटले होते आणि आम्ही दोघे सुन्न झालो होतो.

महानाट्याचा मागोवा घेताना या महानाट्याने काय साधले, यापेक्षा यामुळे एक घर सावरले गेले असा सकारात्मक बदल महत्त्वाचा आहे असे मला वाटते. हा प्रश्न फक्त एका कुटुंबापुरता मर्यादित नाही तर तुमच्या कुटुंबातील समस्याही जणू माझ्या कुटुंबातील आहे, याची ज्यावेळी जाणीव होईल त्याचवेळी समाजातील असे प्रश्न कमी होण्यास मदत होईल.

आपण लहानपणी म्हणत असलेल्या शाळेतील आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे... 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत...' असे जर आपण सगळेच जण समजून, उमजून वागू लागलो तर लहानपणी म्हटलेल्या या प्रतिज्ञेचे उत्तरदायित्व खऱ्या अर्थी पाळले जाईल व मानसिक समाधान नक्कीच मिळेल असे वाटते. ज्या कुटुंबामध्ये व्यसनाचे प्रमाण आहे, घरातील कर्ती व्यक्तीच व्यसनी आहे त्याला याचे महत्त्व काय आहे हे ते तीव्रतेने समजेल. सर्व घरातून व्यसन हद्दपार व्हावे आणि कुटुंबं सुखी व्हावीत... असा शाश्वत बदल वर्धिनीला घडवायचा आहे आणि तोही संस्कारक्षम कार्यक्रमातून.

'स्व'–रूपवर्धिनी आपल्या सर्वांच्या सहकार्याने असे अनेक बदल घडतील असा विश्वास वाटतो.

**– निलेश धायरकर**

**असे वक्ते – अशी व्याख्याने**

| शाखा | वक्ते | विषय |
|---|---|---|
| भगिनी निवेदिता शाखा | ज्ञानेश पुरंदरे | नियोजनाचे तंत्र |
| | मोहन शेटे | वक्ता कसा असावा ? |
| | श्री. रघुनाथ नरवणे | गुरु–शिष्य |
| | कोमल गोरे | घटस्थापना का ? कशासाठी ? |
| | श्री. ओमकार वानखेडे | क्रीडा विषयातील करिअर |
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | मयुर बडदे | भारतीय नौसेना – करिअर व माहिती |
| | चैतन्य तेंडुलकर | भगवद्गीता |
| | सुदर्शन गायकवाड | जालना अभ्यास दौरा अनुभव |
| समर्थ रामकृष्ण शाखा | श्री. राहुल कोकीळ | अभ्यास कौशल्य |
| | सिद्राम शासम | नोटाबंदी : फायदे–तोटे |
| स्वामी अभेदानंद शाखा | श्री. रामभाऊ डिंबळे | नियोजन कसे करावे ? |
| स्वामी सुबोधानंद शाखा | श्री. कैलास जव्हेरी | अभ्यास – त्रुटी व उपाय |
| | श्री. सागर शिंदे | भारतीय संविधान |
| स्वामी दयानंद शाखा | श्री. सौरभ करडे | संभाजी महाराज |
| | श्री. प्रसाद गाडे | थोर क्रांतिकारकांच्या कथा |
| | श्री. संदेश शेंडकर | नोटाबंदी : नफा–तोटा |
| | श्री. योगेश बोराटे | वर्तमानपत्र |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | श्री. सागर शिंदे | क्रांतिदिन |
| | श्री. महेश ढवळे | इंडियन मार्स मिशन,जर्मन भाषेची ओळख |
| | कु. तन्मयी नाईक | आहार कसा असावा ? |
| | श्री. विकी साळुंखे | मृदा |
| | श्री. योगेश नराल | चिकनगुनिया व डेंग्यू जनजागृती |
| स्वामी योगानंद शाखा | श्री. प्रसाद गाडे | आठवणी शाखेच्या |
| | श्री. निलेश धायरकर | शाखा कशासाठी ? |
| | श्री. विनेश नगरे | प्रथमोपचार |
| | श्री. पुष्कर वाडेकर | नोटाबंदी व कारणे |
| नरवीर तानाजी मालुसरे शाखा | श्री. योगेश माकणे | भारतीय अर्थव्यवस्था |
| क्रांतीज्योती सावित्री शाखा | श्री. मारुती शिंदे | बोधकथा |
| | श्री. निलेश धायरकर | लढा क्रांतिकारकांचा |
| | श्री. भाग्येश जावळे | राजर्षी शाहू महाराज |

## वर्धापनदिन

**भगिनी निवेदिता शाखा –** १ जून शाखेच्या वर्धापनदिनाचा कार्यक्रम 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत साजरा झाला. कार्यक्रमास पालक, शिक्षक व माजी वर्धिकाही उपस्थित होत्या. कार्यक्रमात उन्हाळी सुट्ट्यांमधील विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण, मुंबई सहलीचे दृकश्राव्य सादरीकरण झाले. वर्धिनीच्या कार्याची ओळख, कामाचे महत्त्व श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांच्या मुलाखतीतून सगळ्यांना समजले. ही मुलाखत शाखेची युवती प्रियांका घारे हिने घेतली.

**स्वामी दयानंद शाखा –** १४ ऑगस्ट २०१६, स्थळ – आण्णाभाऊ साठे सभागृह, पुणे, महानाट्य – यशोगाथा महाराष्ट्राची. प्रमुख वक्ते – शाहीर दादा पासलकर, सहभाग – १२५ युवक (महानाट्यामधील), प्रेक्षक – ५५० संख्या. या महानाट्यातून महाराष्ट्राचा इतिहास आणि भाग्यशाली परंपरेचे दर्शन घडविण्यात आले. श्रीकृष्णापासून ते सध्याच्या काळातील यशस्वी आणि थोर व्यक्तींच्या कर्तृत्वाचे प्रेरणादायी प्रसंग या महानाट्यात होते.

**स्वामी श्रद्धानंद शाखा –** दि. २७ ऑगस्ट या दिवशी शाखेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमांचे प्रमुख पाहुणे श्री. संजय तांबट सर होते. एकूण १५० संख्या उपस्थित होती. कार्यक्रमात वर्धिनीचे व शाखेचे महत्त्व सरांनी सांगितले. शाखेतील वर्धकांनी विनोदी नाट्य सादर केले. रोहित कुगाटे या वर्धकाने इंग्रजीमध्ये अब्दुल कलाम हा विषय प्रभावीपणे मांडला. तसेच पालकांना शाखेची ध्वनिचित्रफित दाखवण्यात आली.

**स्वामी योगानंद शाखा –** शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त १३ नोव्हेंबर या दिवशी ओम साई सेवा या मतिमंद मुलांच्या शाळेस ४० वर्धकांनी भेट दिली. तेथील उपक्रमांची माहिती घेऊन विद्यार्थ्यांबरोबर छोटे छोटे कार्यक्रम केले. नंतर सर्वांनी मिळून खाऊचा आस्वाद घेतला.

**स्वामी अभेदानंद शाखा –** २६ ऑक्टोबरला शाखेला १९ वर्षे पूर्ण होऊन २० व्या वर्षात पदार्पण केले. या निमित्ताने मागील १९ वर्षातील घडलेल्या घटनांचा, गोष्टींचा, आठवणींचा लिखित स्वरुपातील आढावा हस्तलिखिताद्वारे प्रदर्शित केला. या हस्तलिखिताचे अनावरण करण्यासाठी श्री. रामकृष्ण चिंचकर सर आले होते. मुलांसाठी प्रेरणादायी गोष्टी त्यांनी सांगितल्या. 'विल्मा रुडॉल्फ' यांचे त्यांनी उदाहरण दिले.

## संपर्क व्यवस्था

**संस्थेचा स्वार्थ नाही –** राजर्षी शाहू शाखेच्या ८ व्या वर्धापनदिनानिमित्त भाषण करताना सम्राट अशोक विद्यालयाच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.कदम वर्धिनीविषयी म्हणाल्या, ''शाखेतील मुलांचे वर्तन इतरांपेक्षा चांगले आहे. या मुलांना शिकविणारे दादा हे त्यांचे आदर्श आहेत. दादांचे वर्तन अनुकरणीय असते. वस्तीतील मुले व त्यांचे वर्तन याबाबत शंका नेहमीच असते. परंतु या मुलांनी आपल्यातले बदल दाखवून दिले आहेत. मुलांचे शाखेवर जास्त प्रेम आहे. थोडा वेळ खेळ आणि नंतर अभ्यास याची उत्तम जोड शाखेने लावली आहे. वर्धिनीने आमच्या शाळेत पालकसभा घ्याव्यात. पालकांनी हे लक्षात घ्या की संस्थेचा यात कोणताच स्वार्थ नाही, त्यामुळे आपल्याबरोबर इतर पालकांनाही आपला मुलगा शाखेत पाठवावा यासाठी आग्रह धरावा.''

**स्वामी योगानंद शाखा –** 'शाखाप्रेमी' ही वैयक्तिक स्पर्धा दर महिन्याला घेण्यात येते. वर्धकाची शाखेतील १००% उपस्थिती, त्याचे घरातील व शाळेतील वर्तन, अभ्यासातील गोडी व कामांमधील सहभाग या निकषांच्या आधारे अंतिम निवड करण्यात येते व त्याला 'शाखाप्रेमी' असे संबोधले जाते. वर्धकाची निवड करताना त्या वर्धकाच्या घरी नित्य संपर्क केला जातो.

**इंग्लिश लोकांचा एतद्देशीयांविषयीचा दृष्टिकोन पाहिल्यास मला जशी लाज वाटते तशी तुलाही वाटेल.**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष कार्यक्रम

सन २०१६-१७ हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष होते. ज्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित वर्गासाठी 'स्व'-रूपवर्धिनी गेली ३२ वर्षेकाम करत आहे, अशा समाजातून बाबासाहेबांसारखे बुद्धिवादी राष्ट्रीय विचारांचे कार्यकर्ते तयार व्हावे व त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा बाबासाहेबांचा प्रेरणामंत्र कृतीत आणावा यासाठी संस्थेच्या सर्व विभागांनी १२५ व्या जयंतीनिमित्त दर्जेदार व नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेतले.

**समरसता महानाट्य -**

भारतीय समाज एकसंध व भेदाभेद विरहीत निर्माण व्हावा यासाठी महापुरुषांनी केलेल्या प्रयत्नांची आकर्षक व रोमांचित करणारी मांडणी ६०० कलाकारांनी सादर केली. 'समता आणू समरसतेतून' हा मंत्र मनी बाळगून वर्धक व युवक कार्यरत झाले. या कार्यक्रमाला डॉ. भीमराव गस्ती हे प्रमुख वक्ते होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार व कार्य अभ्यासवर्ग -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त 'स्व'-रूपवर्धिनी संचालित 'लोकशाही जागर मंच' व 'स्पार्क' (Social Practices And Research Center) अंतर्गत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार व कार्य' अभ्यास वर्ग घेण्यात आला. संविधानिक मूल्ये, सामाजिक समता, न्याय, स्वातंत्र्य व बंधुभाव जोपासण्यासाठीची मानसिकता समाजात निर्माण व्हावी या हेतूने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य जाणून घेण्यासाठी अभ्यासवर्गाचे आयोजन केले होते. दि. २५, २६, २७ मार्च २०१६ या कालावधीमध्ये पुण्यामध्ये भावे शाळेतील प्र. ल. गावडे सभागृहात (पेरुगेट, सदाशिव पेठ) हा अभ्यासवर्ग झाला. या अभ्यास वर्गात पुणे व राज्यातून पूर्णवेळ ८० व अर्धवेळ ४५ अशा १२५ युवक-युवती, अभ्यासकांनी सहभाग घेतला. एकूण सात मुख्य सत्रे या वर्गात झाली. विषय मांडणी व प्रश्नोत्तरे-चर्चा अशी सत्रांची योजना होती. अतिशय अभ्यासू अशा नामवंत वक्त्यांनी आपापल्या विषयाची मांडणी केली. विविध वक्त्यांनी खालील विषयांची मांडणी केली.

| माननीय वक्ते | विषय |
|---|---|
| उद्घाटन - प्रा. शेषराव मोरे | डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक धोरणातील परिवर्तने |
| ॲड. प्रकाश आंबेडकर | डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित लोकशाही, आरक्षण व जातीअंत विषयक विचार |
| श्री. सागर शिंदे, श्री. निलेश धायरकर | फुटीरतावादी चळवळीचे आव्हान |
| श्री. भाऊ तोरसेकर | आंबेडकरी चळवळ आणि हिंदू समाज |
| श्री. प्रदीपदादा रावत | रा. स्व. संघ आणि डॉ. आंबेडकर |
| प्रा. डॉ. सदानंद मोरे | सामाजिक समता, संतांची शिकवण व डॉ. आंबेडकर |
| समारोप - प्रा. शेषराव मोरे | डॉ. आंबेडकरांनी केलेली धर्म चिकित्सा |

नामवंत वक्त्यांनी अतिशय अभ्यासू मांडणी केली. मुक्त प्रश्नोत्तरे व सुसंवाद झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य आजच्या संदर्भात समजून घेताना वक्त्यांनी अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या विचारांची उंची आणि त्यांची समाज व देशाविषयीची तळमळ यानिमित्ताने जाणून घेता आली. सहभागी अभ्यासकांच्या उत्तम प्रतिसादात अभ्यास वर्ग यशस्वीरीत्या संपन्न झाला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती –**

**रक्तदान शिबिर २०१६ –**

दि. १४ एप्रिल २०१६ या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सर्व रक्तदात्यांना पूजनीय बाबासाहेबांच्या मार्गदर्शनपर बोधवाक्याची (स्टिकर) भेट देण्यात आली. **एकूण ३०० वर्धक–वर्धिका, महिला –पुरुष या रक्तदान शिबिरात सहभागी झाले होते. त्यापैकी २३२ जणांच्या रक्तपिशव्या यावर्षी संकलित करण्यात आल्या.**

| | **भाग १ व ५** | **भाग २** | **भाग ४** |
|---|---|---|---|
| दिनांक : | १४ एप्रिल २०१६ | १० एप्रिल २०१६ | १७ एप्रिल २०१६ |
| ठिकाण : | 'स्व'–रूपवर्धिनी वास्तू | व्हीआयटी कॉलेज | संत रामदास विद्यालय |
| संकलन : | ९७ रक्तपिशव्या | ८४ रक्तपिशव्या | ५१ रक्तपिशव्या |
| प्रमुख : | हरिश्चंद्र मिसाळ | हिमांशु भारती, आकाश देशमुख | विपुल शेलार, विजय धोत्रे |

**'समरसतेसमोरील आव्हाने' या विशेष व्याख्यानात प्रा. रमेश पांडव यांनी मांडलेले प्रेरक विचार–**

* इथल्या भूमिपुत्रांचे संघटन म्हणजेच हिंदू संघटन गरजेचे आहे.
* हिंदू समाजात अनेक दोष आहेत ते दूर केले पाहिजेत. त्याची जबाबदारी आपलीच आहे.
* समता आणणे हे संघाचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्या अगोदरची पायरी समरसता आहे. समता हे फळ तर समरसता हा त्या फलप्राप्तीकरिता करायचा प्रयत्न आहे.
* 'समता' या शब्दाला 'समरसता' हा शब्द पर्यायी नाही आणि परस्परविरोधी नाही. समता ध्येय तर समरसता ध्येयवाट, मार्ग व माध्यम आहे.
* समता आणण्यासाठी मनापासून एकमेकांचा स्वीकार, एकमेकांचा सन्मान, एकमेकांच्या सुख दुःखात समरस होणे याचेच नाव समरसता.
* जातीप्रथा माणसांचे मुडदे पाडून नष्ट होणार नाही तर माणसे जोडून होईल. द्वेषातून नव्हे तर प्रेमातून परिवर्तन करू या.
* संघाने या देशातील सात हजार जाती समूहातील सर्वांचे संघटन करायचे ठरवले असून सर्व जातीतील लोक संघात आहेत. ते आपापली जात विसरुन हिंदू या एकाच नावाने एकत्र येतात. तो संघ जातीयवादी कसा?
* आपली जातीची ओळख सोडून संघाने विशाल संघटन केले.
* कोणत्याही जातीला गाळायचे नाही, जाळायचे नाही आणि टाळायचे नाही.
* व्यावसायिक गटांच्या जाती आल्या, या जाती जोडण्याचे काम आपण केले पाहिजे.
* हिंदू समाजात प्रार्थना करण्याच्या विविध पद्धती दिसून येतील. त्यात असलेल्या चुकीच्या गोष्टींची चिकित्सा आपण केली पाहिजे. चुकीच्या पद्धती नष्ट करून वैज्ञानिक गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.
* भगवान बुद्ध आणि बाबासाहेब समाज संशोधक व समाज सुधारक होते.
* हिंदू तत्त्वज्ञान उच्च पण सध्या व्यवहार अतिशय नीच आहे. सामाजिक समतेसाठी 'सर्वांभूति आत्मा आहे' ह्या तत्वज्ञानापेक्षा मोठा आधार सापडणार नाही.

* बाबासाहेब म्हणत, ''हिंदू रक्षणासाठी अस्पृश्यांचेही मोठे योगदान आहे, त्यामुळे हिंदुत्वावर सर्वांइतकाच आमचाही अधिकार आहे.''

* उपेक्षित समाजाशी आपल्या कुटुंबाने मैत्री केली पाहिजे. म्हणजे मग आपला व्यवहार दुरुस्त झाला हे मानता येईल.

* बाबासाहेबांनी हिंदू समाजासाठी हिंदू कोड बिल लिहिले. देशाच्या एकात्मतेसाठी त्यांना ते महत्त्वपूर्ण वाटे. समता, मानवता, समरसता या शब्दामागचा भाव समजून घ्यावा, कीस पाडत बसू नये.

* सामाजिक सन्मान, आदर प्रत्येकाला द्या. ती गरज आहे. आपण हे केलेच पाहिजे.

**बुद्धविहार भेटी –** यंदाच्या वर्षी सर्व शाखांनी १० बुद्धविहारांना भेटी दिल्या. यामध्ये बुद्धवंदना घेऊन डॉ. आंबेडकर चरित्र कथाकथन झाले. स्थानिक कार्यकर्त्यांना हा उपक्रम फारच आवडला.

**समता यात्रा –** 'स्व'–रूपवर्धिनीच्या ३५० वर्धकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'स्व'–रूपवर्धिनी, मंगळवार पेठ, सोमवार पेठ, पुणे स्टेशन अशी समता यात्रा काढली. यामध्ये भीमनगर येथे बुद्धवंदनेचा कार्यक्रम घेण्यात आला.

**'कथा महामानवाची' अभियान –**

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजन्म विद्यार्थी होते. पुस्तक वाचणे, अभ्यास करणे, नवनवीन शिकत रहाणे त्यांचा आवडीचा विषय होता. त्यामुळेच या अभियानाची सुरुवात केली.

– या अभियानात १२५ शाळा महाविद्यालयांमध्ये डॉ. आंबेडकर यांची विद्यार्थ्यांसमोर एक कथा व एक गीत सादर करण्याचा उपक्रम करण्यात आला.

– यासाठी वक्ते म्हणून बाहेरील कोणतीही व्यक्ती न बोलविता 'स्व'–रूपवर्धिनच्याच शाखांमधील वर्धक–वर्धिका व युवक–युवती यांनी विषयाची मांडणी केली होती.

– यासाठी विविध कथा व त्यासाठी वक्तृत्वाचे मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण घेण्यात आले. या उपक्रमाची दखल लोकसत्तासारख्या दर्जेदार वृत्तपत्राने घेतली हे विशेष.

**सर्वव्यापी आंबेडकर मालिका –**

– युवा शिबिरांत आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविण्यासाठी 'ABP माझा' या वृत्तवाहिनीवरील 'सर्वव्यापी आंबेडकर' मालिकेचे पाच भाग दाखविण्यात आले. त्यानंतर गटचर्चा व प्रश्नोत्तरे घेण्यात आली होती.

**शिवजयंती व दीक्षाभूमी –**

'स्व'–रूपवर्धिनीच्या कर्वेनगर भागातील युवकांनी एकत्रित येऊन सुरु केलेल्या राजे शिवराय प्रतिष्ठानने यंदाच्या वर्षी शिवजयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा देण्यासाठी नागपूर येथील दीक्षाभूमीची प्रतिकृती तयार केली होती. तसेच या प्रसंगी राष्ट्रवादी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयाची मांडणी श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी केली.

**पथनाट्य –**

गणेशोत्सवात 'शिवराय ते भीमराय वसा एकतेचा आणि समतेचा' या पथनाट्याचे १२५ हून अधिक प्रयोग केले.

**सामूहिक बुद्ध वंदना –**

**दि. २६ मे रोजी, बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शनिवारवाडा प्रांगणात 'सामूहिक बुद्ध वंदना' आयोजित करण्यात आली.**

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे श्री. गिरीशराव प्रभुणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व बुद्ध पूजनाने झाली. त्यानंतर एकात्मता मंत्राचे पठण झाले. एकात्मता मंत्राचा अर्थ व कार्यक्रमाचा उद्देश श्री. शिरीष पटवर्धन सरांनी प्रास्ताविकातून मांडला. ते म्हणाले, ''गौतम बुद्ध हे एका समाजाचे नाहीत. ते संपूर्ण जगाला शांततेचा संदेश देणारे योगी होते आणि म्हणूनच हा संदेश सर्वांनाच अनुकरणीय आहे''

मा. गिरीश प्रभुणे सरांनी डॉ. आंबेडकरांचे सामाजिक समरसतेच्या कार्याचे सद्यः स्थितीतील महत्त्व सांगितले.

श्री. मधुकर बहुले सर व त्यांच्या सहकाऱ्यांनी बुद्धवंदना सांगितली. उपस्थित ७०० जण या वंदतेत सामील झाल्याने सर्व परिसर दुमदुमून गेला. यानंतर श्री. बहुले सरांनी वंदनेचा अर्थ समजावून सांगितला. त्यामुळे 'वंदनेतील प्रत्येक ओळ आपण आचरणात आणू शकू' हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचला.

**कारगिल विजय दिवस –**

'स्व'–रूपवर्धिनीत दरवर्षी प्रेरणादायी व्याख्यानाने '२६ जुलै कारगिल विजय दिवस' साजरा होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त प्रसिद्ध वक्ते, युवा अभ्यासक **डॉ. अभिराम दीक्षित यांचे 'डॉ. आंबेडकरांचे राष्ट्र संरक्षण विचार'** या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी लष्करी अधिकारी कॅप्टन स्मिता गायकवाड होत्या. डॉ. अभिराम दीक्षित सरांनी विचारांची मांडणी दृकश्राव्य सादरीकरणाद्वारे केली. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांचा भाग खूपच रंगला. त्यांनी मांडलेले प्रमुख व निवडक मुद्दे –

* डॉ. आंबेडकर लष्करी डावपेच मांडणारे (स्ट्रॅटेजिक) बुद्धिवादी विचारवंत होते.
* डॉ. आंबेडकरांची देशभक्ती त्यांच्या स्पष्ट, तार्किक आणि बुद्धिवादी विचारातून प्रकट होते.
* सुसज्ज सैन्य असावे असे मत त्यांनी मांडले आहे.
* डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्रउभारणीच्या मांडणीत राष्ट्र उभारणी आणि संरक्षण या संकल्पना एका पातळीवर आणल्या.
* डॉ. बाबासाहेबांनी संविधान निर्मितीसाठी घेतलेले कष्ट व त्यांची सामाजिक न्यायाची भूमिका ह्यांचे राष्ट्रउभारणीमध्ये मोठे योगदान आहे.

या कार्यक्रमासाठी स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी, अन्य अभ्यासू युवक वर्ग, नागरिक, पत्रकार आवर्जून उपस्थित होते.

**रक्षाबंधन :** सर्व शाखेतील वर्धकांनी रक्षाबंधनानिमित्त शाखेजवळील परिसरातील वस्त्यांमधील एकूण २५०० घरी संपर्क करून राख्या बांधल्या. त्याबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे पत्रक सर्वांना दिले. या संपर्कातून मिळालेल्या काही प्रतिक्रिया –

* डॉ. बाबासाहेबांचे विचार घरोघरी पोचवण्याचा उपक्रम उत्तम आहे.
* या उपक्रमातून मुलांचा आत्मविश्वास जाणवला व तो अजून वाढण्यास निश्चित मदत होईल.
* अनोळखी व्यक्तीकडून राखी बांधून घेताना वेगळेपणा जाणवला व आनंदही वाटला.
* अप्पर इंदिरानगरच्या चैत्रबन वसाहतीत पत्र्याच्या घरातील काका म्हणाले, ''तुम्ही आमच्या बाबासाहेबांसारखंच

काम करत आहात. हे सर्वदूर पोचायला हवं.''

* समाजात चांगले विचार रुजण्यासाठी पत्रके वाटण्याबरोबरच ते विचार स्वतः सांगणे हे महत्त्वाचे. यातूनच कार्यकर्त्यांची जडणघडण होते.

* अशा उपक्रमांमध्ये आम्हालाही सहभागी व्हायला आवडेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त शाखेच्या परिसरातील वडारवाडी, पांडवनगर या वस्तीतील सर्व मुलांसाठी (५ वी ते १० वी) १५ जून ते २० जून या कालावधीत चित्रकला, निबंध, गीत गायन, हस्ताक्षर अशा स्पर्धा झाल्या.

निबंध स्पर्धेत 'माझ्या स्वप्नातील वडारवाडी' या विषयातून 'सध्याची वडारवाडीची समस्या, सकारात्मक आवश्यक बदल' प्रभावी शब्दात मांडले. या समस्या सोडवण्यासाठी काही कृतिशील विचारही लक्षात आले. या स्पर्धेत १७५ विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. ३५ विद्यार्थी व ३७ विद्यार्थिनींना बक्षीसे मिळाली. या कार्यक्रमात श्री. संदीप मोरे सरांनी मार्गदर्शन केले. उपस्थितांना वर्धिनीच्या कार्याची ओळख व्हावी म्हणून शाखेचे उपक्रम दृकश्राव्य सादरीकरणाद्वारे दाखवले.

आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर स्वामी सुबोधानंद शाखेने 'समता दिंडी' काढली.

स्पर्धा परीक्षा केंद्राने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा चित्रपट दाखविला.

**व्याख्याने –** १)अत्याचार निर्मूलन समिती (Atrocity Prevention Act) – श्री. प्रियदर्शी तेलंग २) संविधान दिन (काळा पैसा) – श्री. यमाजी मालकर

**आम्ही युवा 'सेवेकरी' ! शिवरायांचे धारकरी !!**

'स्व'-रूपवर्धिनीच्या कामातून सेवेकरी निर्माण करायचे आहे, हे किशाभाऊंचे स्वप्न सत्यात उतरविणाऱ्या अनेक युवकांपैकी महेश पवळे व शिवाजी खरात हे होय. वर्धिनीच्या शाखेतून घडलेल्या युवकांनी समाजाच्या भिन्न-भिन्न प्रश्नांना समोर जाऊन भिडणे, त्या सोडविणे याचसाठी हा सारा वर्धिनीचा खटाटोप आहे. महेश व शिवाजी यांनी कर्वेनगर परिसरातील इतर काही युवकांनी एकत्रित सुरू केले. राजे शिवराय प्रतिष्ठान... देव, देश, अन् धर्मकारणे...

राजे शिवराय प्रतिष्ठानने सिंहगड किल्ला संवर्धन, शिवजयंती उत्सव, अशा कामातून आपली सुरुवात केली. ही पायवाट आता महामार्ग होत आहे. कारण गडकोट संरक्षण-संवर्धन यासोबतच युवकांचे सबलीकरण, त्यांना व्यसनमुक्त करणे, व्यवसाय मार्गदर्शन, दुर्बल घटकांना शैक्षणिक मार्गदर्शन इ. उपक्रम राबवित आहे.

शिव-महेश जोडी, वर्धिनीचे तसेच परिसरातील युवकांनी शिवपालखी सोहळा काढून परिसरातील सर्व लहानमोठ्या मंडळांची वज्रमूठ केली. तुम्ही जर रविवारी सिंहगडावर गेलात तर तिथे 'मी सिंहगड बोलतोय' हा लघुपट प्रतिष्ठानतर्फे दाखविला जातो. सामाजिक प्रश्नांची होळी व त्यावर प्रत्यक्ष कार्य, रक्तदान शिबिर, माहिती अधिकाराचा वापर करून किल्ले सिंहगडावरील निधी सकारात्मक कामी लावण्यात यश, महिला अपहरण करणारी धुळे जिल्ह्यातील टोळीस पकडून दिले. कार्यकर्त्यांना आर्थिक बचतीची सवय लागावी म्हणून कार्यकर्ता बचत गट अशा सामाजिक उपक्रमांनी राजे शिवराय प्रतिष्ठान वर्धिनीचे स्वप्न पूर्ण करीत आहे. आमुची वस्ती, आमुचे प्रश्न आम्हीच शोधू यावर उत्तर, हा विचार ठेवून काम करताना याची प्रेरणा म्हणून मातृसंस्था म्हणून वर्धिनी नेहमी हृदयस्थ आहे. हे यश शिव-महेश व त्यांच्या असंख्य प्रामाणिक-निस्वार्थी कार्यकर्त्यांचे आहे.

**'प्रबोध' सभागृह – युवा विभाग कक्ष उद्घाटन सोहळा –**

'स्व'–रूपवर्धिनी वास्तूमध्ये युवा विभागासाठी स्वतंत्र कक्ष असावा अशी अनेक वर्षापासूनची योजना होती. ती साकार झाली. नवीन युवा विभाग कक्षाचे – 'प्रबोध' सभागृह – उद्घाटन दि. १२ फेब्रु. २०१६ रोजी प्रबोध उद्योगसमूहाचे संचालक मा. मोहन गुजराथी यांच्या हस्ते झाले. शाखा विभाग प्रमुख श्री. निलेश धायरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्र संचालन केले. युवा विभाग प्रमुख श्री. सागर शिंदे यांनी युवा विभागाची ओळख व रचना, आढावा व पुढील नियोजनाची माहिती दिली. वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष श्री. रामभाऊ डिंबळे यांनी मा. मोहनरावांचा सविस्तर परिचय करून दिला. मा. मोहनराव यांनी ज्ञान प्रबोधिनीमध्ये अनेक वर्ष युवक विभागाचे दायित्व सांभाळले. शिक्षण, सेवा या विषयांमध्ये कार्य केले. प्रबोध उद्योग समूह स्थापन करून उद्योग क्षेत्रातही त्यांनी उत्तम यश संपादन केले.

या प्रसंगी मा. मोहनराव गुजराथी यांची प्रकट मुलाखत श्री. अमोल उंदरे यांनी घेतली. त्यात त्यांनी प्रेरणादायी अशी अनुभवाची शिदोरी उलगडली. कै. अप्पा पेंडसे व कै. किशाभाऊ पटवर्धन यांच्या सहवासात केलेल्या कामाच्या अनुभवांचे कथन त्यांनी केले. ज्ञान प्रबोधिनीतल्या कामामुळे आयुष्याला मिळालेल्या कलाटणीबद्दलही ते आर्वून बोलले.

मा. मोहनराव गुजराथी यांनी केलेल्या मार्गदर्शनातले महत्त्वाचे काही मुद्दे –

* इतरांशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वतःशीच स्पर्धा करायला हवी.
* जीवनात स्वतःवर प्रयोग करत राहायला हवे.
* ठरवल्याप्रमाणे कृती नाही केली किंवा चुका केल्या तर अशा वेळी स्वतःला शिक्षाही करायला हवी.
* अनुभवातून माणूस नेहमी घडतो.
* उद्योग क्षेत्रातील यशाबद्दल बोलताना ते म्हणाले, 'नियत चांगली असेल तर नियती चांगलीच असते.'
* स्वतःच्या यशाबरोबर दुसऱ्यांच्याही यशाचा विचार करावा.

युवा विभागाचे पालक प्रा. संजय तांबट सरांनी कार्यक्रमाचा समारोप केला. आजचे समाज–वास्तव व युवा विभागासमोरील पुढील आव्हानांची थोडक्यात त्यांनी मांडणी केली.

**१२ वी सहल वृत्त –**

दरवर्षी बारावीच्या परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थी वर्धकांना वेध लागतो तो सहलीचा. ही सहल दरवर्षी कामशेतजवळील ढाक भैरी या ठिकाणी जाते. ढाक भैरी ट्रेकचे आकर्षण सर्वच युवकांना असते. यावर्षी दि. १४ व १५ मार्च २०१६ या कालावधीत सहल झाली. सहलीची तयारी म्हणून दि. १३ ला सर्व अपेक्षित वर्धकांचे एकत्रीकरण झाले. सहलीच्या सूचना दिल्या गेल्या. पुणे–लोणावळा लोकल ट्रेनने जाण्याचे निश्चित झाले. ठरल्याप्रमाणे दु. २ पर्यंत सर्वजण वर्धिनीत एकत्र झाले. भोजन तयार करण्यासाठी लागणारे आवश्यक साहित्य घेतले व पुणे रेल्वे स्टेशन येथून दु. ३ च्या लोकलने सर्वजण कामशेतच्या दिशेने निघालो. एकूण २२ + ६ असे २८ संख्या होती. कामशेतला रेल्वेतून उतरलो व कामशेतमधून भोजनासाठी लागणारा भाजीपाला व किराणा घेतला. सर्वांनी थंडगार उसाचा रस पिला आणि जीपने ढाक भैरीच्या पायथ्याच्या जांभवली गावी सायं. ६ वा. पोहोचलो. पुढे तीन किलोमीटर पायी चालत कोंडेश्वर मंदिरात पोहोचलो. मंदिरात मुक्काम करायचे ठरले होते. सर्वांनी मंदिरात पिशव्या ठेवल्या. सकाळी चहा व भोजन तयार करण्यासाठी सरपणाची (लाकूड–फाटा) गरज होती. मग काय सर्वचजण

थोडे वरती डोंगरावर जाऊन सापडेल ते सरपण घेऊन आले. नंतर शाखा भरवली. ज्ञापुंनी (श्री. ज्ञानेश पुरंदरे) जोरदार खेळ घेतले. प्रार्थना झाली. यानंतर भोजनासाठी सर्वांनी आपापले डबे घेतले. मंडलात बसून भोजन मंत्र झाला. भोजनानंतर रात्रीच्या सत्रासाठी सर्वजण मंदिरात एकत्र जमले. ज्ञापुंनी सत्र घेतले. या सत्रामध्ये बारावीच्या युवकांना त्यांचे Strengths, Weakness, Future Plannings, Vacations Plannings याविषयी लिहिण्यास सांगितले. लिहून झाल्यानंतर प्रत्येकाने स्वतःचेच गुण-दोष आणि सुट्टी व भविष्यातील नियोजन हे सर्वांसमोर खुलेपणाने मांडले. त्यावर छान चर्चा झाली. सत्र समारोपाच्या मार्गदर्शनात ज्ञापुंनी स्वतःच्या उणीवा-दोष दूर करण्यासाठी व सद्गुणांच्या सहाय्याने आपले सामर्थ्य कसे वाढवावे आणि त्यासाठी नियोजनाचे महत्त्व समजून सांगितले. रात्री पसायदान झाले व सर्वजण झोपले. पहाटे ५.३० वा जागरण झाले. सर्वांनी आवरले व पहाटेच्या शांत आणि पवित्र वातावरणात उपासना झाली व चहा पिऊन सर्वजण ट्रेकिंगसाठी तयार झाले. सर्वांनी घोषणांच्या गजरात गड चढण्यास सुरुवात केली. सभोवताली गड-किल्ल्यांची पर्वतरांग, मोठमोठी झाडे, पक्षांचे आवाज, सकाळचे थंड वातावरण आणि सूर्योदय हे सर्व म्हणजे एक सुंदर अनुभवच. मस्त पाऊलवाट तुडवत, सेल्फी काढत, वाट शोधत चालत होतो. पुढे एक दरी लागते. ती उतरताना व पुढे दोरी व रोपच्या साहाय्याने उभा खडक चढताना येणारा थरारक अनुभव घेऊन सर्वजण गुहेत पोहचतात. गुहेत पिण्यासाठी थंड पाणी आहे, मंदिर आहे. सर्व युवक गुहेत बसलो. सामुहिक ओंकार स्तवन झाले. थोडावेळ तेथील शांतता सर्वांनी अनुभवली. त्यानंतर सागर शिंदे यांनी युवकांशी इतिहास व लोकशाही जागर मंच विषयी गप्पा मारल्या. नंतर सोबत आणलेली भेळ खाल्ली आणि परत कोंडेश्वर मंदिराकडे निघालो. काही युवक भोजन तयारीसाठी पुढे गेले. सर्वजण मंदिरात पोहोचलो. खूप भूक लागली होती. ज्ञापू आणि पुढे गेलेल्या दादांनी छान खिचडी तयार करून ठेवली होती. भोजन मंत्र झाला आणि पोटभर खिचडी खाऊन छान झोपलो. तीन वाजता उठून, आवरून परतीच्या प्रवासाला निघालो. एक छान अनुभवाची शिदोरी घेऊन पुण्यात पोहोचलो.

**स्वामी विवेकानंद मातृभूमी गौरव पुरस्कार वितरण सोहळा –**

स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने २०१३ पासून 'स्व'-रूपवर्धिनी व तात्यासाहेब नातू फौंडेशन यांच्या वतीने प्रतिवर्षी 'स्वामी विवेकानंद मातृभूमी गौरव पुरस्कार' देण्यात येतो. शनिवार दि. ७ मे रोजी पत्रकार भवन सभागृहात झालेल्या कार्यक्रमात यावर्षीचा पुरस्कार सजग नागरिक मंचाचे ज्येष्ठ कार्यकर्तेश्री. विवेक वेलणकर यांना श्री. अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी श्री. विवेक वेलणकर म्हणाले, 'हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून या पुरस्कारात सजग मंचाचे कार्यकर्ते तसेच श्री. वैद्य, श्री. कमळापूरकर, श्री. जुगल राठी यांसारखे सहकारी कार्यकर्ते व माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या माझ्या पत्नीसह सर्वांचा यात मोठा वाटा आहे. प्रशासनातील अधिकारी व राजकीयदृष्ट्या वजनदार मंडळी यांच्या संगनमताने होणाऱ्या अहितकारी गोष्टी माहिती अधिकार कायद्याचा उपयोग करून जनहिताच्या दृष्टीने पुढे आणण्याकरिता कार्यकर्तेखूप परिश्रम करतात. निर्भयपणे, चिकाटीने काम करतात. गैर गोष्टी करणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवून समाजहित साधण्याचा हा प्रयत्न असतो. गैरगोष्टी करणाऱ्यांवर वचक बसवण्याच्या व त्यातून प्रशासकीय यंत्रणेत परिवर्तन घडवण्याचा हा प्रयत्न असतो. श्री. वेलणकर यांनी पुरस्काराची रक्कम ग्रामीण भागातील तरुण पिढीसाठी काम करणाऱ्या श्री. प्रदीप लोखंडे यांच्या संस्थेकडे पुस्तक रुपाने सुपूर्द करण्याचा मनोदय व्यक्त केला व प्रतिकात्मक पाच पुस्तकांचा संच या संस्थेच्या प्रतिनिधीकडे सुपूर्द केला.

अध्यक्षीय भाषणात श्री. अविनाश धर्माधिकारी म्हणाले, 'टिळक, आगरकर यांनी गरिबी पत्करून समाजसेवा करण्याची प्रतिज्ञा केली. असे ध्येयवेडेच समाजात काही चांगले बदल घडवू शकतात. त्यांनी स्वराज्याला जन्मसिद्ध हक्क मानले. भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी लोकं कशी करतात यावर तिचं मोल ठरणार आहे असं पूजनीय बाबासाहेबांचं म्हणणं होतं. मिळालेल्या स्वराज्याचं, स्वातंत्र्याचं, संविधानाचं रक्षण डोळ्यात तेल घालून करावं लागेल. गोपनीयतेच्या कायद्याचा अडथळा जायलाच हवा. तसेच प्रशासन फक्त लोकप्रतिनिधींनाच नव्हे तर जनतेलाही जबाबदार असायला हवं. प्रशासनात परिवर्तन व चारित्र्य निर्माण हे घडवण्यासाठी आपण सर्वजण हातात हात घेऊन पुढे जाऊयात.'

**कातवडी ग्राम सर्वेक्षण वृत्त –**

१३ मे 'स्व'–रूपवर्धिनीचा वर्धापन दिन. या दिवसाचे निमित्त साधून कातवडी गावाचे सर्वेक्षण करण्यात आले.

पुण्यापासून जवळच मावळ भागामध्ये कातवडी या गावी 'स्व'–रूपवर्धिनीने चार एकर जमीन घेतली आहे. या जागी प्रशिक्षण व शिबिरस्थळ असावे आणि ग्राम विकासाचे कार्य उभे राहावे असा मानस आहे.

नेमके कशा स्वरूपाचे कार्य उभे राहावे याचा विचार सुरू झाला. या ग्रामीण भागातील गावांची–वाड्यावस्त्यांची सध्या काय स्थिती आहे, समस्या कोणत्या व त्यांच्या आवश्यकता काय हे जाणून घेऊन मगच काय काम सुरू करावे हे समजेल हे जाणून कातवडी परिसरातील ६२ गावे व वाड्या निवडून ग्राम सर्वेक्षण करण्याचे ठरले. शेती–पशुपालन, सर्वसाधारण सुविधा, शिक्षण–प्रशिक्षण, उद्योग–व्यवसाय युवक व महिलांच्या समस्या या घटकांच्या संदर्भाने सर्वेक्षण माहिती पत्रके तयार करण्यात आली. प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या आधी सर्व गावांना तेथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांच्या भेटी घेऊन त्यांना होणाऱ्या सर्वेक्षणाची माहिती देण्यात आली. दोन गावांमध्ये प्राथमिक (पायलट) सर्वेक्षणही करण्यात आले.

प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी वर्धिनीचे १२५ युवक जाण्याचे निश्चित झाले. या सर्व युवकांना भागशः प्रशिक्षण देण्यात आले. अनेक बैठकांमधून या सर्वेक्षणाचे सविस्तर नियोजन करण्यात आले. दि. १४ व १५ मे, २०१६ रोजी प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे दिवस ठरले. नियोजन असे होते की दि. १४ ला शनिवारी दुपारी ठरवून दिलेल्या गावांमध्ये युवकांनी पोहचणे व सर्वेक्षण सुरू करणे, रात्री गावात भोजन व मुक्काम करणे, रात्री गावातील तरुणांना एकत्र करून बैठक घेणे किंवा गप्पा मारणे. दुसऱ्या दिवशी राहिलेल्या भेटी व सर्वेक्षण पूर्ण करणे व दुपारी १२ पर्यंत कातवडी गावी पोहचणे.

या सर्वेक्षणासाठी कातवडी परिसराचे तीन मुख्य मार्ग व भागांमध्ये विभाजन केले होते. सर्व ६२ गाव, वाड्या–वस्त्यांमध्ये सर्वेक्षक युवकांची भोजन व मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली होती.

ठरल्याप्रमाणे दि. १४ मे, २०१६ शनिवारी सर्व युवक पुण्यातील तीन ठिकाणाहून बस व टेम्पोने निघाले आणि दुपारी ३ च्या सुमारास ठरविलेल्या गावी पोहोचले आणि सर्वेक्षण सुरू केले. यासाठी युवकांनी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व प्रत्यक्ष घराघरात जाऊन माहिती गोळा केली. तर काहींनी चक्क ग्रामसभा आयोजित करून तिथल्या लोकांशी संवाद साधला.

या संपूर्ण मोहिमेचा मुख्य भाग होता की, युवकांनी रात्री गावातच निवास करणे व गावातल्या लोकांशी जास्तीत जास्त संवाद साधणे. यावेळी मात्र आपल्या युवकांनी कमालच केली. जवळपास प्रत्येक गावात कमीतकमी एक मित्र जोडला. गावाच्या समस्या, युवावर्गाची सद्यःस्थिती, गावातील दलित वस्ती–आदिवासी पाडे यासंबंधीचे प्रश्न, तसेच गावकऱ्यांना आपल्या गावात हव्या असणाऱ्या सुधारणा इत्यादी बाबतीत त्यांचे दृष्टिकोन जाणून घेणारे

प्रश्न विचारण्यात आले होते. मुख्य भर गावातील तरुण पिढीसमोरील आव्हाने व त्यांच्या अपेक्षा यावर होता. तसेच युवकांना सांगण्यात आले होते की, आपल्याला दिलेल्या माहितीपत्रकाच्या ही पुढे जाऊन गाव समजून घ्या. गावातील सर्वांशी भरपूर संवाद साधा व गावातील किमान दहा ते वीस युवकांची संपर्क क्रमांकासह यादी करा. सांगितल्याप्रमाणे युवकांनी उत्साहाने काम केले.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे दुपारी १२–१ या वेळेपर्यंत सर्व मार्गावरील युवक गट कातवडीला पोहोचले. सर्वांनी आपापल्या गावाचे सर्वेक्षण माहितीपत्रके शुभम जगताप, सुरेश पवार यांच्याकडे जमा केले. सर्व युवक तसेच कातवडीतील गावकरी हे भोजन पंगतीला बसले. मस्त जेवण झाले. भोजनानंतर मंदिराच्या सभागृहात एकत्रित असा मुख्य कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी प्रास्ताविक केले व सर्वेक्षणाच्या माहितीच्या आधारे सांख्यकी आकडेवारी मांडली. यानंतर तीन मार्गावरील सहा युवकांनी अनुभव कथन कले. यामध्ये सर्वेक्षणाचा एकूणच अनुभव, काय जाणवले, ग्रामस्थ काय म्हणाले आणि काय करायला हवे असे मुद्दे सर्वांनी मांडले. यानंतर या सर्व सर्वेक्षणासाठी ज्या स्थानिक गावकऱ्यांनी सहकार्य केले त्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी वर्धिनीचे कौतुकही केले व अपेक्षाही व्यक्त केल्या. या सर्व सर्वेक्षण उपक्रमात स्थानिक सामाजिक कार्यकर्ते श्री. रामचंद्र काळोखे यांनी मोठे सहकार्य केले. सर्व गावांमध्ये युवकांची भोजन व निवासाची व्यवस्था यांनी केली. तसेच एकूणच सर्वेक्षणाच्या व्यवस्थांमध्ये सहकार्य केले. श्री. काळोखे यांनीही याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. यानंतर वर्धिनीच्या युवा विभागाचे पालक प्रा. संजय तांबट सर व युवा विभाग प्रमुख सागर शिंदे यांनीही विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप करताना या उपक्रमाचे मार्गदर्शक श्री. रामभाऊ डिंबळे यांनी वास्तव समोर ठेवून मार्गदर्शन केले.

'छत्रपती शिवरायांच्या या मावळच्या भूमीतला मावळा आज घडीला काय करतोय ? सुराज्य तर आले पण स्वराज्य येण्या काय उपाय ?' हे प्रश्न उपस्थित करून त्यांनी अनेक उपायांची चर्चा केली. 'गावांमध्ये काही युवक असे उभे राहावे की त्यांनी गावाच्या विकासासाठी प्रयत्न करावे व असे युवकांचे गट निर्माण करण्यासाठी वर्धिनीने संपर्क समन्वय दल (संसद) म्हणून काम करावे' अशी रामभाऊंनी या संपूर्ण प्रकल्पाची संकल्पना, गरज आणि त्याची उपयोगिता सांगितली. त्यांनी 'प्रशासनातील वेगवेगळ्या त्रुटी, त्यावर काम करण्याची गरज व आपण प्रत्येकाने त्याच्याशी कसे दोन हात केले पाहिजेत' हेही सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, 'हा उपक्रम केवळ उद्योगधंदे देण्यासाठी उभा राहणार नसून, गावातूनच गावासाठी काम करणारे काही तरुण तयार करणे, त्यांना हवे ते प्रशिक्षण, हवी ती मदत या प्रकल्पातून मिळवून देणे, व त्यांना स्वयंपूर्ण बनवणे' हा मुख्य उद्देश असणार आहे.

या सर्वेक्षणातून समोर आलेल्या काही प्रमुख समस्या स्थलांतर, शेतीसाठी पाण्याचा अभाव, रोजगार उपलब्धता, ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, अल्पभूधारकता, गुणवत्तायुक्त शिक्षण, सार्वजनिक वाहतूक व रस्ते, विविध कौशल्य व व्यवसाय प्रशिक्षणाचा अभाव, शेतीसाठी वर्षभर पाणी नसते. त्यामुळे फक्त पावसाळी शेतीच केली जाते. जोडधंदे जवळपास नाहीतच. याविषयी प्रशिक्षण देऊ शकेल अशी संस्थाही जवळपास नाही. या भागात आंदगाव, भोडे, जातेडे, लव्हार्डेअशा अनेक गावांमध्ये कातकरी पाडे आहेत. या पाड्यांची अवस्था तर अत्यंत दयनीय आहे. अजूनही हे कातकरी कुडाच्या घरात राहतात. पक्की घरे नाहीत, शिक्षण नाहीच असले तरी हे जास्तीत जास्त दहावीपर्यंत, जमीन नाही, रोजगाराचे निश्चित साधन नाही (मजुरी, मासेमारी), व्यसनाचे प्रमाण जास्त, सरकारी योजना माहीत नाहीत, लहान वयात विवाह, एका पाड्यावरील बऱ्याच जणांना मराठी भाषा नीट कळत



देशाच्या राखेच्या ढिगाऱ्यावर खेळणारा आणि आपलं राज्य भक्कम पायावर उभारलं जात आहे असं मानणारा इंग्रज मूर्ख आहे.

नव्हती' असे अनेक अनुभव, निरीक्षणे युवकांनी सांगितली.

या संपूर्ण प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून श्री. रामभाऊ डिंबळे सर होते. सर्वेक्षण परिसरातील तीन मार्गांचे प्रमुख व सहाय्यक म्हणून ज्ञानेश पुरंदरे, निलेश धायरकर, सागर शिंदे, चेतन कुसाळकर, प्रसाद मोहोळ, धीरज तारे यांनी कामगिरी पार पाडली. सर्वेक्षणाच्या विविध व्यवस्था पुढील कार्यकर्त्यांनी सांभाळल्या. भोजन व्यवस्था – विजय कुर्ले, राकेश शेडगे, संजय राचेल्ली, दत्ता सकट. वाहतूक व्यवस्था – सुशील दळवी. सर्वेक्षण माहिती पत्रक व प्रशिक्षण व्यवस्था – संजय राचेल्ली, निशिकांत वाईकर, मंदार पोफळे.

**जव्हार–मोखाडा अभ्यास दौरा वृत्त –**

दि. १२, १३ व १४ जून २०१६ या कालावधीमध्ये तीन दिवसांच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन जव्हार जि. पालघर येथे करण्यात आले होते. आम्ही १० युवक तीन दिवस जव्हार भागात अभ्यास दौऱ्यासाठी गेलो आणि प्रचंड प्रेरणा, ऊर्जा व अनुभवाची शिदोरी घेऊन परतलो.

९५% पेक्षा अधिक वनवासी बांधव या तालुक्यात राहतात. कोकणा, वारली, ठाकर, कातकरी या जनजाती या भागात राहतात. दि. १२ जूनला पहाटेच आम्ही पुण्याहून निघालो आणि दुपारपर्यंत जव्हारला पोहोचलो. प्रगती प्रतिष्ठानचे कार्यकर्ते श्री. सखाराम तराळ व अनिल सर यांनी आमचे स्वागत केले. दुपारचे भोजन झाल्यानंतर आम्ही मनमोहाडी या पाड्यावर जाण्यासाठी तयार झालो. मनमोहाडी या वनवासी पाड्यावर गाडी लावून आम्ही पायी चालत निघालो. रस्त्यात झाडाला लागलेली करवंदे, जांभळे स्वतःच्याच हाताने तोडून खाण्याची मजा आम्ही मनसोक्त अनुभवली. एक डोंगर खाली उतरून आम्ही पाड्यावर पोहोचलो. अजूनही वीज व रस्ता नसलेला हा पाडा. माणूस चंद्रावर पोहोचला, पण येथे वीज व रस्ता पोहोचला नाही, असेसुद्धा गाव आहे यावर विश्वास बसत नव्हता. पण हे वास्तव आम्ही पाहत होतो. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या दुर्गम पाड्यावरील अंधार नाहीसा व्हावा या हेतूने 'प्रगती प्रतिष्ठान' या संस्थेने येथे गावकऱ्यांच्या सहाय्याने सौरऊर्जा पॅनल बसवले आहेत. त्याद्वारे गावात दूरदर्शन संच, छोटी गिरणी व रात्रीचा उजेड पोहोचला आणि मोबाईल चार्ज होऊ लागला. पावसाळ्यात प्रचंड पाऊस असणाऱ्या या भागात सध्या मात्र दुष्काळ जाणवला. पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. पाड्यावरील लोकांनी श्रमदानातून एक खडबडीत रस्ता तयार केला आहे. ६६ घरांचा हा पाडा आता कुठे विकासाची कास धरतो आहे. मनमोहाडी पाड्यावरील विकासकामांची तसेच अनेक विषयांची माहिती घेऊन आम्ही जव्हारला परतलो.

१३ जूनला सकाळी ८ वाजताच आम्हाला भेटायला एक तरुण कार्यकर्ते आले. त्याचं नाव श्री. वीरेंद्र चंपानेरकर. वीरेंद्रदादाने आय.आय.टी. चेन्नईमधून गणिताचे शिक्षण पूर्ण केले व तामिळनाडूमध्येच संघाचे प्रचारक म्हणून काही वर्ष काम केले. प्रचारक कार्य थांबवल्यानंतर कोणतीही मोठ्या पगाराची नोकरी न करता ते जव्हारला परतले आणि येथे राहूनच ते कार्य करताहेत. हे आमच्यासाठी प्रेरणादायी होते. त्यांच्या सोबत तासभर विविध विषयांवर गप्पा मारल्या. नंतर न्याहारी करून आम्ही प्रगती प्रतिष्ठान संस्थेत पोहोचलो. श्री. अनिल डोंगरे यांनी आमचे स्वागत केले व कार्यालयात बसून आम्ही संस्थेची माहिती घेतली. येथे कर्ण–बधीर विद्यार्थ्यांसाठी शाळा व वसतीगृह चालवले जाते. आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने एक फिरते रुग्णालय उभारले आहे. वारली कलेला प्रोत्साहन देण्यासाठी एक केंद्र उभारून प्रशिक्षण व बाजारपेठ निर्माण करून दिली आहे. कृषी विकास, जल संधारण, पिण्याच्या पाण्यासाठी नळ–पाणी योजना, स्वयंसहायता गट अशा अनेक विषयात मोठे

कार्य प्रतिष्ठानने या भागात उभे केले आहे.
'वयम्' - 'आपल्या विकासाची आपली चळवळ.'
'वयम्' नावाच्या संस्थेने तर या भागात लोकसहभागातून विकासाची चळवळ सुरू करून अनेक पाड्यांचा विकास घडवून आणला. वनवासी बांधवांना स्वतःचा हक्क व कायद्याविषयी जागृत केले आहे. रोजगार हमी कायद्याअंतर्गत रोजगार मिळाला आहे. नियमित रेशन मिळू लागले आहे. वयम्ने पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी अनेक पाड्यांवर केली. त्यासाठी जैवविविधता नोंदवही तयार केली. ग्रामसभेचे महत्त्व व ताकदीची जाणीव करून दिली. पेसाअंतर्गत पाड्यांनी विविध ठराव करून विकासाची कास धरली आहे. 'वयम्'चे श्री. मिलिंद थत्ते हे तसे मुंबईचे व उच्च शिक्षण घेतलेले पण आदिवासी विकासाचा ध्यासच त्यांनी घेतला आहे. ते स्वतः जव्हारपासून १२ किमी आत एका पाड्यावर सहकुटुंब राहतात. मिलिंद सर मार्मिक लिखाणही करतात. त्यांचा ब्लॉग आपण पुढील लिंकवर वाचू शकतो, forstandpeople.wordpress.com.
'वयम'च्या कार्याने सरकारी व्यवस्थेवर कायदेशीर वचक निर्माण केला आहे. मिलिंदजींची कामाची पद्धत विलक्षण आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊन कामात सहभागी करून घेतले आहे. आम्ही दुपारी कोकनपाड्यावर गेलो. या ठिकाणी 'वयम'चे कार्य चालू आहे. येथे आम्ही स्थानिक कार्यकर्ते श्री. प्रभाकर गावीत यांना भेटलो. आमचे दुपारचे भोजन व निवास त्यांच्याकडेच पाड्यावर होता. रोजगारहमी योजनेअंतर्गत गावकऱ्यांनी ४५०० खड्डे खोदले आहेत. पूर्वी खूप दाट झाडी होती पण प्रचंड वृक्षतोड झाली. आता पुन्हा जंगल निर्माण करून जल, जंगल, जमीन व जनावर या चतुःसुत्रीवर भर द्यायचा असे ठरवले आहे. त्यासाठी कुऱ्हाडबंदीचा नियम केला आहे. या पाड्याने पेसा कायद्याच्या द्वारे ग्रामसभेअंतर्गत जंगल गावाच्या ताब्यात घेतले. सर्वानुमते नियम करून ते राखताहेत; तसेच गावात अन्य विकासाची कामे होत आहेत. पाड्यावर रात्री श्री. मिलिंदजी थत्ते व वयमच्या स्थानिक कार्यकर्त्यांसोबत छान चर्चा झाली व भोजनही झाले.
शुद्ध हवा, छान निसर्ग, प्रेमळ माणसे. काहीही घाई-गडबड नाही, गरजा अत्यंत कमी त्यामुळे कसलाही खटाटोप नाही. उद्याची फार चिंताही नाही असे या जनजाती बांधवांचे साधे जीवन आहे. त्यांची ही जीवनशैली, संस्कृती, विकासकार्य व समस्या याविषयी शेवटच्या दिवशी मिलिंद सरांसोबत दिवसभर चर्चा केली. त्यांनीही आम्हाला मार्गदर्शन करून अनेक मुद्द्यांवर अंतर्मुख व्हायला लावले. अशी ही प्रेरणादायी अनुभवाची शिदोरी घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. आमच्यातील दोन युवक किरण बेंडगे आणि स्वप्नील कुंभारकर हे आणखी सात दिवस 'वयम'सह कार्यानुभवासाठी थांबले व पुढील सात दिवस अनेक पाड्यांवर जाऊन मुलाखती घेणे, काही विषयांची जागृती करणे अशी कामे केली. किरण पुण्यात आल्यावर म्हणाला की, 'शहरातील युवक हे व्हॉटस् ॲपवर सक्रीय असतात. त्यांना वाटते, आम्ही खूप आधुनिक आहोत. पण तिकडे पाड्यावरील चौथी शिकलेले युवक माहिती अधिकार कायदा व अनेक कायद्यांचा वापर करतात हे पाहून मला हा प्रश्न पडला की खरेच कोण आधुनिक आहे?'

**'उद्योग व्यवसाय मार्गदर्शन वर्ग' वृत्त :**

'स्व'-रूपवर्धिनी व 'दे आसरा' फौंडेशनच्या वतीने वर्धिनीचे व्यवसायी युवक व उद्योग व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असलेल्या युवकांसाठी 'उद्योग व्यवसाय मार्गदर्शन वर्ग' आयोजित करण्यात आला होता. दि. १७-०८-२०१६ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रबोध सभागृहात हा वर्ग संपन्न झाला. ५० युवकांनी या मार्गदर्शन वर्गात सहभाग



धर्माबाबत भारताला पश्चिमेपासून घेण्यासारखं काही नाही,
पण इतरांना देण्यासारखं पुष्कळ आहे हे आतापर्यंत सिद्ध झालं आहे.

घेतला. स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करणे हे अनेकांचे स्वप्न असते, पण त्याकरिता काय उद्योग करावा, भांडवल उभारणी कशी करावी, जागा, मनुष्यबळ व कर्ज कुठे व कसे मिळेल असे अनेक प्रश्न व अडचणी असतात. त्यामुळे युवावर्ग हा कुवत-कौशल्य असूनही व्यवसाय करण्याच्या भानगडीत पडत नाही किंवा धोका पत्करत नाही. 'दे आसरा' फौंडेशन ही संस्था व्यवसाय-उद्योग करण्यासाठी प्रोत्साहित करते आणि येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्यासाठीचे मार्गदर्शनही करते. तसेच कर्ज उभारणीसाठी साहाय्य करते. 'दे आसरा' संस्थेचे श्री. अनिल पाठक यांनी यावेळी मार्गदर्शन केले. 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी प्रास्ताविक केले. श्री. अनिल पाठक यांनी युवकांशी उत्तम सुसंवाद साधला व युवकांच्या अनेक प्रश्नांचे उत्तरे दिली व शंकांचे समाधान केले. पाठक सरांनी केलेल्या मार्गदर्शनाचे महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे -

* भारतात रोजगार निर्मितीसाठी उद्योग व्यवसायांची उभारणी आवश्यक आहे.

* आज उद्योग-व्यवसायासाठी भांडवल उभारणी हा प्रश्न दुय्यम आहे. अनेक बँका कर्ज देण्यासाठी तयार आहेत. तसेच सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातूनही भांडवल उपलब्ध होऊ शकते. फक्त उद्योग-व्यवसाय सुरू करण्याची तयारी व इच्छाशक्ती हवी.

* आपल्या उद्योग-व्यवसायाला सरकारच्या विविध योजनांच्या आधारे वित्तीय संरक्षण मिळू शकते.

* सध्या व्यवसायाचे अनेक नवनवीन प्रकार येत आहेत.

* जगात असे अनेक उद्योग-व्यवसाय आहेत जे बिनभांडवली आहेत. इंटरनेट, वेबसाईट, सोशल मिडीया व विविध ॲप्सच्या माध्यमातून व्यवसायाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे.

**सामाजिक बांधिलकी जपणारा युवक अधिकारी -**

(कैलास अंडिल हा वर्धिनीचा एक कार्यकर्ता व स्पर्धा परीक्षा केंद्राचा विद्यार्थी. कैलास याची तहसीलदार पदासाठी निवड झाली. निवड झाल्यानंतर सहा महिन्यांसाठी नायब तहसीलदार म्हणून काम करावे लागते. परंतु कैलासच्या प्रभावी कामाने त्याला दोन महिन्यातच जालना जिल्ह्यातील घनसावंगी या तालुक्याचा तहसीलदार म्हणून स्वतंत्र पदभार देण्यात आला. यापूर्वी त्यांनी दोन महिन्यात अंबड तालुक्यात दुष्काळ निवारणाचे काम करताना स्वतःचा एक संपूर्ण पगार दुष्काळी कामासाठी दिला.)

आम्ही त्यांना भेटायला गेलो होतो. तहसीलदार असलेल्या कैलास सरांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अनेक रोखठोक मोहीमा राबवल्या. समाजकंटकांविरुद्ध जोरदार कारवाया सरांनी कोणत्याही धमक्यांना न घाबरता केल्या आहेत. त्याचबरोबर तालुक्यातील चांगल्या आणि होतकरू युवकांना गावाच्या प्रगतीसाठी प्रोत्साहित केले आहे. बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे त्यांनी मार्गी लावली आहेत. दुष्काळाच्या झळा कमी व्हाव्यात यासाठी जलसंधारणाची कामे स्वतः लक्ष घालून गावकऱ्यांच्या सहकाराने पूर्णत्वास नेली आहेत. शेतकऱ्यांना त्यांचे हक्क तसेच योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. यामुळे गावकऱ्यांनी सरांना मनःपूर्वक आशीर्वाद दिले आहेत. भ्रष्टाचाराने मलिन झालेल्या यंत्रणेत आशेचा किरण असलेल्या कैलास सरांचा खूप खूप अभिमान वाटतो.

'स्वच्छ हाताचे, समर्थ खांद्याचे, तल्लख बुद्धीचे, विशाल मनाचे, सामाजिक बांधिलकी मानणारे सेवेकरी वर्धिनी तयार करेल' या संस्थापक किशाभाऊ यांच्या वाक्याची अनुभूती कैलास सरांना भेटल्यावर आली.

**युवक शिबिर २०१६ वृत्त –** या वर्षीचे युवकांचे निवासी शिबिर २ ते ५ मे, २०१६ या कालावधीत स्व. रामभाऊ म्हाळगी प्रशाला, राजस सोसायटी, बिबवेवाडी परिसर, पुणे या ठिकाणी संपन्न झाले. आपला अभ्यास सांभाळून वर्षभर शाखांच्या विविध जबाबदाऱ्या निभावणारे सर्व भागांतील युवक या निमित्ताने एकत्र आले. विविध बौद्धिक सत्र, मैदानावरील शारीरिक कार्यक्रम व आपापल्या शाखांचा आढावा व पुढील नियोजनाचे सादरीकरण अशी शिबिराची रचना होती. बौद्धिक कार्यक्रमात दिवसभरात सहा सत्रांचे आयोजन केले होते. यामध्ये प्रबोधन सत्र, दृकश्राव्य सत्र, गटशः चर्चा, कृती सत्र, संवाद सत्र, प्रेरणा सत्र व रात्री माहितीपर व गप्पा सत्र इ. या सत्रांद्वारे युवकांचे वैचारिक अधिष्ठान, विविध गुण–कौशल्यांचा विकास साधता येईल असे सत्र, विषय व वक्ते यांचे नियोजन करण्यात आले. शिबिरामध्ये पूर्णवेळ व काहीजण अर्धवेळ अशा ११५ युवकांनी सहभाग घेतला. तसेच २२ व्यवसायी युवकांनी शिबिरास भेट दिली व काही युवक निवासी राहून सहभागी झाले. सकाळ व संध्याकाळी मैदानावर जोरदार खेळ तसेच समता झाली. सर्व सत्रे उत्तमच झाली. अतिशय उत्साही वातावरणात शिबिर संपन्न झाले.

युवा विभागाचे पालक प्रा. संजय तांबट यांनी शिबिराचा समारोप केला.

* या देशाचे संविधान हाच आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. संविधानाला अपेक्षित समाज निर्माण करण्याचे कार्य वर्धिनी करत आहे. * देशातील सध्याच्या समस्या समजून घेण्यासाठी युवकांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध अभ्यास वर्गात सहभागी व्हावे. * डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त वर्धिनीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. भेद निर्माण करणाऱ्या व्यवस्थांचा अभ्यास करणे काळाची गरज आहे. * आपली प्रार्थना ही प्रेरणादायी आहे. तसे कामही व्हायला हवे. * कार्य करताना शिक्षणाकडे दुर्लक्ष नको. वेळेचे उत्तम नियोजन करावे. * सध्याची प्रसारमाध्यमे प्रतिमा निर्मितीचे काम करतात. आपल्याला डोळसपणे पाहण्याची व सजग राहण्याची गरज आहे. * सामाजिक माध्यमांचा (Social Media) चा वापर चांगल्या कामासाठी करावा.

| सत्र स्वरुप | दि. ३ जून (शुक्रवार) | दि. ४ जून (शनिवार) | दि. ५ जून (रविवार) |
|---|---|---|---|
| दृकश्राव्य | एबीपी माझा – बहुस्पर्शी आंबेडकर प्रसंग – १–२ व चर्चा | एबीपी माझा – बहुस्पर्शी आंबेडकर प्रसंग – ३–४ व चर्चा | एबीपी माझा – बहुस्पर्शी आंबेडकर प्रसंग– ५ व समारोप – निलेश धायरकर |
| गटशः चर्चा (वरिष्ठ महाविद्यालय गट) | सोशल मीडिया सागर शिंदे, किरण बेंडगे | फुटीरतावादी चळवळींचे आव्हान व युवकांची महाविद्यालयातील सक्रियता सागर, मयूर, निलेश | 'सैराट' चित्रपट – आकलन मयूर कर्जतकर, संदीप मोरे, सागर शिंदे |
| कनिष्ठ महाविद्यालय गट (११/१२ वी युवक) कृती सत्र | स्वयं–मूल्यमापन श्री. शिरीष पटवर्धन, गट बांधणी (Team building) – श्री. विनयजी पत्राळे | ११/१२ वी युवक शाखा नियोजन श्री. शिरीष पटवर्धन, संवाद संपर्क (Communication) श्री. विवेक यल्लाळकर | पौगंड अवस्थेतील बदल श्री. शिरीष पटवर्धन, निलेश धायरकर व्यवस्थापन (Management games) श्री. विलास सर, अमोल सर, विश्वास सर |
| संवाद आणि चर्चा | ध्येयवादी जीवन – स्वामी आर्यानंद, रामकृष्ण मठ, पुणे | करिअर व वेगळ्या वाटा श्री. नितीन रानडे | समारोप प्रा. संजय तांबट सर |
| प्रेरणासत्र/ अहवाल सादरीकरण युवक सहभाग सत्र | वर्धिनी कशासाठी ? श्री. ज्ञानेश पुरंदरे अंटार्क्टिका एक आव्हान – श्री. सुहासराव काणे | शाखाशः वार्षिक अहवाल सादरीकरण वरिष्ठ व्यवसायी युवकांसोबत गप्पा | |



मनोधर्माचा साधना करणाऱ्या योग्याने केलेला अभ्यास पाश्चात्त्यांच्या बौद्धिक कसरतीपेक्षा कितीतरी अधिक विलोभनीय आहे.

**युवती शिबिर** –युवतींचे वार्षिक शिबिर ओंकार न्यास संस्था, गुजरवाडी येथे १० जून ते १२ जून या कालावधीत झाले. १७ युवती शिबिरात सहभागी होत्या. शिबिराची सुरुवात गुजरवाडी, निंबाळकरवाडी, माळवाडी या वस्त्यांमधील ४५ घरांच्या सर्वेक्षणाने झाली. युवती वर्धिकांनी वाड्यांमधील महिला, बाल, तरुण, तरुणी यांच्या अपेक्षा व गरजा यांची माहिती घेतली. यातून महिलांनी गृहउद्योग सुरु व्हावेत, त्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण वर्ग व्हावेत, ८ वी ते १० वीच्या मुलांसाठी अभ्यासाचे मार्गदर्शन हवे, तरुणांसाठी खेळांचे मार्गदर्शन व्हावे, दळणवळण सुविधेत सुधारणा हवी अशा अपेक्षा व्यक्त केल्या.

'समज माध्यमांची' हा विषय मांडताना श्री. संजय तांबट सरांनी माध्यमांचे विविध प्रकार, त्यांच्या वापराचे फायदे–तोटे, त्यासाठी माहिती संकलन कसे होते, या संकलित माहिती मांडणीचे तंत्र याची सविस्तर माहिती सांगितली.

'माझे आचार–माझे विचार' हे चर्चासत्र श्री. सुमित डोळे सरांनी घेतले. यातून यापुढे आपल्याला नक्की काय करायचे आहे याची दिशा युवतींना मिळाली.

श्री. विलास कुलकर्णी सरांनी कृतियुक्त खेळ घेतला. त्यामुळे प्रत्येक युवतीला आपल्यातील गुण दोषांची जाणीव होऊन स्वतःमध्ये सुधारणा कशी केली पाहिजे हे समजले. हा खेळ सर्वांना खूपच भावला.

सौ. सुदर्शना त्रिगुणाईत या वर्धिनीच्या माजी कार्यकर्त्या. त्यांच्या मुलाखतीतून युवतींमध्ये चैतन्य निर्माण झाले. त्यांची जिद्द, आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन बघून सगळ्या युवती भारावून गेल्या. बालवाडीमुळे ताई वर्धिनीच्या संपर्कात आल्या. एकत्र कुटुंबात राहूनही त्यांनी जिद्दीने वर्धिनीतील शिवणवर्ग, होम नर्सिंग वर्ग पूर्ण केला. त्यानंतर फॅशन डिझायनिंगचे शिक्षण घेऊन ह्या वर्गाची वर्धिनीत सुरुवात केली. नुकतीच त्यांनी कात्रजला इंग्रजी माध्यमांची शाळा सुरू केली आहे. 'वर्धिनीच्या कामांतून, उपक्रमांतून मिळालेल्या संस्कारांमुळे अन्य सामाजिक कामात व राजकीय पक्षात कामाचा चांगला प्रभाव पाडू शकले' असे त्यांनी विशेषत्वाने सांगितले.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे श्री. ठाकुरदास सरांचे सत्र खूपच प्रेरणादायी झाले. आंबेडकरांचे विचार, त्यांचे सामाजिक काम, त्यांनी लिहिलेल्या वेगवेगळ्या योजनांची माहिती, घटनेचे काम इ. गोष्टी हिंदी भाषेतून ऐकताना हा विषय सखोल अभ्यासला पाहिजे अशी प्रेरणा युवतींना मिळाली.

श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी शिबिराचा समारोप करताना वार्षिक उद्दिष्टांची प्रभावी कार्यवाही, बदलत्या काळानुसार वाढलेले शाखेचे महत्त्व व त्यासाठी युवती कार्यकर्त्यांकडूनच्या अपेक्षा मांडल्या.

| | शुक्रवार १० जून | शनिवार ११ जून | रविवार १२ जून |
|---|---|---|---|
| स. ९ ते १०.३० | | समज माध्यमांची<br>श्री. संजय तांबट | स्वयंमूल्यमापन |
| दु. ११.३० ते १२.३० | | माझे आचार माझे विचार<br>श्री. सुमित डोळे | शाखा संचालन आणि स्वतःचे<br>नियोजन – श्री. संदीप मोरे |
| दु. ३ ते ४ | | कौशल्य विकसन<br>श्री. विलास कुलकर्णी | वार्षिक उद्दिष्टे सादरीकरण |
| दु. ४.३० ते ५.३० | ग्राम सर्वेक्षण | मुलाखत<br>सौ. सुलक्षणा त्रिगुणाईत | समारोप<br>श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| सायं. ७.३० ते ८.३० | ग्राम सर्वेक्षण | डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. श्री. ठाकुरदास सर | |

**युवती प्रशिक्षण शाखा –**

वर्धिका विभागाच्या दोन्ही शाखांच्या युवतींची ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात चार वेळा 'प्रशिक्षण शाखा' घेण्यात आली. १५-२० युवती या शाखेत सहभागी झाल्या. भागप्रमुख कु. गौरी यद्रे व महाविद्यालयीन प्रमुख कु. वैदेही बेहरे यांनी या शाखेची जबाबदारी घेतली आहे. प्रशिक्षण शाखेत झालेले विषय –

१) व्यक्तिमत्त्वाचा शोध २) वेळेचे नियोजन ३) प्रेरणादायी चित्रपटावर चर्चा ४) आहार – कोणता व का ? ५) युवती प्रशिक्षण का व कशासाठी ? अशा विविध विषयातून कार्यकर्ता घडविण्याचे उद्दिष्ट या शाखेने ठेवले आहे.

**आगळावेगळा तहसीलदार –**

एखादी व्यक्ती गाडीतून खाली उतरते, तिचे लगेच फोटो काढले जातात. हस्तांदोलन, फुलांचे बुके यांसाठी हात पुढे सरसावतात. फोटो काढण्यासाठी मोबाईल खिशातून बाहेर निघतात. हे आपण एखाद्या अभिनेता, अभिनेत्रीच्या बाबतीत सहजच अनुभवतो, पण खूप कमी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत असा प्रसंग घडतो. त्यातलेच एक अधिकारी व आमच्या 'स्व'-रूपवर्धिनीच्या मुशीत आणि कुशीत घडलेले वर्धिनीच्या संस्कारांची शिदोरी सोबत घेऊन धडाडीने काम करणारे, सामान्य माणसांचे अधिकारी श्री. कैलास अंडील सर ! त्यांच्यासोबतच हे प्रसंग अनुभवण्याची संधी आम्हाला मिळाली, याचे निमित्त होते 'स्व'-रूपवर्धिनीने आयोजित केलेला अभ्यास दौरा. अधिकारी झाल्यानंतर कराव्या लागणाऱ्या कामांची प्राथमिक ओळख व्हावी या उद्देशाने वर्धिनीने प्रशासकीय क्षेत्रात करियर करु इच्छिणाऱ्या व्यक्ती, वर्धक-युवकाचा हा अभ्यास दौरा दि. १ ते ३ डिसेंबर या कालावधीत आयोजित केला.

लोकसेवा आयोगाच्या २०१४ च्या बॅचमध्ये कैलास अंडील सरांची तहसीलदारपदी निवड झाली. सुरुवातीच्या प्रशिक्षणातील एक प्रकार फिल्ड पोस्टिंग. त्यात त्यांना जालना जिल्ह्यातील अंबड या तालुक्यात काम करण्याची जबाबदारी मिळाली. त्या जबाबदारीला संधी मानून त्यांनी इतक्या धडाडीने कामाला सुरुवात केली की सामान्य अधिकाऱ्याला प्रशिक्षणासाठी दिला जाणारा सहा महिन्यांचा कालावधी त्यांच्यासाठी दोन महिन्यांपर्यंत शिथिल करण्यात आला व त्यांची शेजारच्याच घनसावंगी तालुक्यात नियुक्ती करण्यात आली.

घनसावंगीत आल्यावर त्यांच्यासमोर एकच आव्हान नव्हते. गोदावरी खोऱ्यातील अवैध वाळू वाहतूक, पाण्याच्या दुष्काळाची समस्या, रेशन वितरणमधील काळाबाजार, प्रशासकीय कामातील दिरंगाई अशा अनेक समस्यांचे जाळे त्यांच्यासमोर आ वासून उभे होते. त्यासोबतच या सर्वांच्या मागील प्रमुख प्रश्न म्हणजे भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे. यासाठी त्यांना विशेष प्रयत्न करावे लागणार होते.

या कामांचा श्रीगणेशा त्यांनी आपल्या टीम बांधणीपासून केला. या प्रश्नांवर सखोल विचार करता त्यांच्या लक्षात आले की आपल्या कार्यालयातील अपुऱ्या पायाभूत सुविधा या प्रश्नांमध्ये अधिकच भर घालत आहेत. म्हणून या कामाची सुरुवात त्यांनी आपल्या कार्यालयापासूनच केली. कार्यालयातील संपर्क प्रभावी करण्यासाठी इंटरकॉम व्यवस्था. संपूर्ण स्टाफ आजूबाजूच्या घडामोडींबाबत जागरुक राहण्यासाठी इंटरनेट कनेक्शन व कॉन्फरन्स रुमची व्यवस्था केली. वर्षानुवर्षे पडून राहिलेल्या कागदपत्रांची योग्य ठिकाणी व्यवस्था करून, त्याच ठिकाणी भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी प्रतिक्षा कक्षाची सोय केली. तसेच तलाठी व इतर कर्मचाऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांनी विश्रांती कक्षाची व्यवस्था केली. एकंदरीत जुन्या, जीर्ण झालेल्या प्रशासकीय सुसज्ज इमारतीला आधुनिक स्वरुप प्राप्त करून दिले.

त्यांच्या कार्यालयीन कामकाजाचा अनुभव घेण्यासाठी पहिला पूर्ण दिवस आम्ही त्यांच्या कार्यालयात व्यतीत केला. भेटायला येणाऱ्या लोकांची लागलेली रीघ व सोबत कर्मचाऱ्यांची कामासाठीची चाललेली धावपळ या सर्वांचे योग्य संतुलन साधत त्यांचा कामाचा झपाटा पाहून आम्ही सर्वजण अवाक झालो. येणाऱ्या प्रत्येक समस्येचे योग्य व जलद निराकरण करून ते पुढच्या प्रश्नाला तत्परतेने प्रतिसाद देत होते. त्यांची जनसुनावणी पाहण्याची संधी आम्हाला मिळाली. वादी व प्रतिवादी अशा दोन्ही पक्षांचे म्हणणे संयमाने ऐकून, निष्पक्ष व स्पष्ट ठाम निर्णय देऊन ते वेगवेगळ्या प्रकारच्या प्रश्नांची उकल प्रभावाने करत होते.

या सर्व वैविध्यपूर्ण विषयांची हाताळणी कशा पद्धतीने करता ? या एका वर्धकाच्या प्रश्नाला त्यांनी अतिशय समर्पक उत्तर दिले. मी फक्त किशाभाऊंच्या स्वप्नातील अधिकारी होण्याचा प्रयत्न करतो. त्यांनी जसे म्हटले आहे की, ''आपल्याला स्वच्छ हाताचे, समर्थ खांद्यांचे, तल्लख बुद्धीचे, विशाल मनाचे, सामाजिक बांधिलकी जपणारे अधिकारी घडवायचे आहेत.'' या पद्धतीने काम केल्यावर विविध प्रश्नांची उकल आपोआप होते.

त्यानंतरचा पुढचा टप्पा प्रत्यक्ष कामाची पाहणी. विविध गावात केलेली जलशिवाराची कामे, सार्वजनिक वितरण प्रणालीतील गैरप्रकार रोखण्यासाठीचे उपाय प्रत्यक्ष पाहता आले. गेल्याच महिन्यात अवैध वाळूउपसा करणाऱ्या तस्करांनी सरांवर ट्रक घातला. सुदैवाने ते बचावले, पण अजिबात विचलित न होता त्यांनी हा लढा अधिकच तीव्र केला आहे. कैलास सरांच्या कर्तृत्वाचा आम्हाला अभिमान वाटतो. कोणत्याही गावात प्रवेश केल्यावर वृद्धांना वाकून नमस्कार करणारे, तरुणांच्या खांद्यावर हात टाकून मैत्रीचे बंध जोडणारे, लोकांच्या घरात जमिनीवर मांडी घालून बसणारे असे आमचे जगावेगळे तहसीलदार. त्यांचे कार्य व ही सर्व रुपे कायम स्मरणात राहतील.

**स्नेहांकुर (स्नेहालय) –**

नगरमध्ये काम करणाऱ्या स्नेहालय संस्थेचे काम पाहण्यास आम्ही गेलो होतो. स्नेहालयाच्या 'स्नेहांकुर' नावाच्या प्रकल्पाला आम्ही भेट दिली. अनैतिक संबंधातून जन्माला आलेले अपत्य रस्त्यावर कोठेही टाकून दिले जाते. या बाळाला सांभाळायचे पवित्र काम ही संस्था करत आहे. प्रत्येक बाळाला आपलं म्हणावं असं घर मिळावं हेच या प्रकल्पाचे उद्दिष्ट. अपंग, मतिमंद किंवा इतर शारीरिक व्याधीग्रस्त मूल कोणी दत्तक घेत नाही याची खंत तेथील कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. हे काम करत असताना अनेक कडू गोड अनुभव त्यांनी सांगितले. घरात एक बाळ सांभाळताना आई त्रस्त होऊन जाते पण तेथील २३ बाळांना सेविका अगदी आनंदाने सांभाळत होत्या.

**केशव बळीराम हेडगेवार रुग्णालय –**

औरंगाबाद येथील डॉ. हेडगेवार रुग्णालय आणि रक्तपेढी आम्ही पाहिली. सर्वप्रथम रक्तपेढीची रचना व कार्यपद्धती समजून घेतली. रक्तदान ते रुग्णापर्यंत रक्त पोहोचेपर्यंतची कार्यपद्धती यात समाविष्ट होती. या रक्तपेढीचे विशेष म्हणजे या ठिकाणी रक्तदात्याकडून रक्त घेतल्यानंतर तपासणी वेळेस एचआयव्ही बाधा आढळल्यास त्याला योग्य तो सल्ला व उपचार पुरवले जातात.

रुग्णालयाची कार्यपद्धती फारच वेगळी व परिणामकारक होती. कमी खर्चात दर्जेदार आणि योग्य उपचार देण्याचे रुग्णालयाचे उद्दिष्ट आहे. रुग्णालय सुरु करण्यापासूनचा संघर्ष जाणून घेतला. डॉक्टर म्हणून पैसे कमावताना सामाजिक जाणीव ठेवावी हा प्रामाणिक विचार यातून समोर आला. भव्य सुसज्ज इमारत, स्वच्छता, वैद्यकीय व्यवस्था, प्रशिक्षित वैद्य इ. गोष्टींनी रुग्णालयाच्या दर्जात मानाचा तुराच रोवला आहे. सेवानिवृत्त जीवन जगणारे

अनेक सेवाभावी लोक रुग्णालयाने आवाहन केले म्हणून रोज रुग्णालयात येऊन सेवाव्रती बनून कोणत्याही अपेक्षेविना रुग्णांशी संवाद साधताना व त्यांची सर्व प्रकारे काळजी घेताना आम्ही पाहिले. सेवा परमो धर्मः या वचनाचे सत्यरुपच रुग्णालयाचे काम पाहून प्रचितीस आले.

**झारखंड अभ्यासदौरा... एका दृष्टिक्षेपात...**

सर्वप्रथम वाचकवर्गाला 'जोहार'. जोहार म्हणजे आदिवासी भाषेत नमस्कार. डिसेंबर २०१६ मध्ये 'स्व-रूपवर्धिनी' युवा विभागातर्फे आम्ही ८ युवक झारखंड दौऱ्यासाठी गेलो होतो. तेथील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्न आम्ही समजून घेतले. त्यात आम्ही विविध संस्थांना भेटी दिल्या. त्याचा तपशील खाली दिलेला आहे.

**शेती :** सामाजिक संस्थांनी मचाण शेती, सेंद्रिय खत वापर प्रशिक्षण, पाणीपुरवठा नियोजन, एकात्मिक शेती अशा शेतीतील आधुनिक परंतु आदिवासींना शक्य असणाऱ्या पद्धती त्यांना सांगितल्या. त्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ झाली. अशाच एका गावात नदीवर तात्पुरता बांध घालण्याचे काम चालू होते तेथे आम्ही सर्वांनी श्रमदानही केले. अशाच एका गावात आम्हाला स्वदेश चित्रपटात शाहरुख खानने केलेल्या कामाप्रमाणे गावात पाणी आणणारे श्री. चम्पा भगत भेटले. त्यांनी आणि गावकऱ्यांनी मिळून ३.५ कि.मी. लांबून डोंगरातून चर खोदून गावात पाणी आणले. हे सर्व करण्यासाठी त्यांना तब्बल १४ वर्षे लागली. विशेष म्हणजे सुरुवातीला प्रकल्प चालू करण्यापूर्वी तेथील अभियंत्यांनी हा प्रकल्प होऊ शकत नाही असे सांगितले होते. **परंतु अथक प्रयत्नांच्या आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी हे अशक्य काम शक्य करून दाखविले.**

**समाजव्यवस्था :** भारत देशाला काळीमा असणारी जातीव्यवस्था आदिवासींमध्येही अस्तित्वात आहे. परंतु त्याची तीव्रता मात्र कमी आहे. येथे आंतरजातीय लग्न होत नाहीत. परंतु झालीच तरी त्याला विरोध होत नाहीत. हाच समजूतदारपणा आपल्या इथेही असावा असे वाटले. दैनंदिन जीवनात स्वच्छतेचा अभाव जाणवला, परंतु हळूहळू शिक्षणाचा प्रसार होत असल्याने जागरूकता निर्माण होत आहे. प्रत्येक छोट्या गावात पहिली ते चौथी एक शाळा आता आहे; मात्र गुणवत्तेचा प्रश्न आहेच.

**स्थलांतर :** शेतीतील अनिश्चितता, घरगुती लहान उद्योगांची कमतरता यामुळे येथील युवक मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करत आहेत. फक्त मोठमोठ्या इमारती बांधणे, धरणे बांधणे म्हणजे विकास नाही तर तेथील पर्यावरणाचा आणि तेथील मूळ आदिवासी लोकांचादेखील विकास झाला पाहिजे.

**नक्षलवाद :** गाडीतून जात असताना रस्त्याशेजारील एका इमारतीला खूप कुंपणे, तारा आणि भिंतींना काचा लावलेल्या दिसल्या. नंतर जवळ गेल्यावर दिसले तर हे पोलीस स्टेशन होते. खुद्द पोलिसांना एवढी सुरक्षा पाहून आम्ही अवाक् झालो. हा सर्व नक्षलवादाचा प्रभाव होता. परंतु गावागावात फिरताना गावकऱ्यांशी झालेल्या प्रश्नोत्तरांतून असे जाणवले की आता तेथील नक्षलवादाची तीव्रता कमी झाली आहे. पूर्वीइतकी दहशत राहिलेली नाही. नक्षलवादाची कारणे तपासली असता हे जाणवले की, पोलिसांकडून फक्त संशयावरून आदिवासींवर केला जाणारा अत्याचार, राजकारण्यांकडून नक्षलवाद्यांचा केला जाणारा वापर, युवकांची बेरोजगारी यांमुळे हा प्रश्न अजूनही आहे. या प्रश्नावर एकच उपाय म्हणजे बालकांना शिक्षण, तरुणांना रोजगार, आधुनिक शेती आणि सर्वसमावेशक शाश्वत विकास...

**धर्मांतर :** आदिवासी हे आधुनिक जगाशी परिचित नसल्याने ते भोळे असतात त्याचाच फायदा

समाजसेवेच्या नावाखाली काम करणाऱ्या संस्था उचलतात आणि धर्मांतर घडवून आणतात. प्रौढ साक्षरता, आर्थिक मदत, शिक्षणसंस्था याद्वारे मदत करून सहानुभूती मिळवली जाते. नंतर त्यांचे धर्मांतर केले जाते.

अशा प्रकारे ३.५ कि.मी. अंतरावरून १४ वर्षेप्रयत्न करून पाणी आणणाऱ्या श्री. चम्पा भगत यांच्याकडून प्रबळ इच्छाशक्ती, सेवा भारतीचे ३२ वर्षेकाम करणाऱ्या श्री. महेंद्रजी भगत यांच्याकडून अखंड साधनेचा ध्यास, Iron Lady of Jharkhand – श्री. दयामनी बरला यांच्याकडून ध्येयप्राप्तीपर्यंत अविरत संघर्ष करणे, ARouse संस्थेचे विवेक रॉय यांच्याकडून पर्वत चढताना होणाऱ्या त्रासाचा विचार न करता शिखरावरून दिसणाऱ्या नजाऱ्याचा विचार करून काम करणे अशा अमूल्य विचारांची शिदोरी घेऊन आम्ही परत निघालो.

अशा प्रकारे आम्ही झारखंड राज्यातील विविध प्रश्नांचा अभ्यास केला आणि तेथील आदिवासींचे कथा मांडणारे गाणे आमच्या मनात या दौऱ्यातून कोरले ते म्हणजे 'गाव छोडब नही, जंगल तोडब नही, माय–माटी छोडब नही. लढाई छोडब नही!!!'

| संस्था | गाव | कार्य |
|---|---|---|
| १) अराऊस | सालिया टोली | – शेतीतील प्रयोग, मचान शेती |
| | | – रोजगार, ग्रामविकास समिती, महिला मंडळ |
| | | – शेती तलाव |
| २) अराऊस | खारखोटा टोली | – कुक्कुट पालन |
| | | – महिला उद्योग भेटी |
| ३) अराऊस | खिराखाडा | – जंगल शेती, तलाव, डिंकाचे उत्पादन |
| | | – वनसुरक्षा समिती, महिला मंडळ |
| | | – ग्रामसहभागातून बांधलेला बंधारा |
| ४) अराऊस | मातेवाडा | – कायदे व अधिकार माहिती बैठक |
| | | – अन्नसुरक्षा कायदा माहिती. |
| ५) विकासभारती | बिशनपूर | – कृषी विज्ञान केंद्र, अन्न उत्पादन विभाग, |
| | | – प्रधानमंत्री कौशल्य विकास केंद्र, सेंद्रिय शेती प्रयोग |
| | | – गांडूळ खत प्रकल्प, माती परीक्षण केंद्र |
| ६) विकासभारती | शिवराजपूर | – ग्रामसहभागातून बांधलेला छोटा बंधारा |
| | | – चंपा भगत या प्रमुखाशी भेटी |
| ७) विकासभारती | बेलगाडा गाव | – एकात्मिक शेती प्रयोग |
| | | (नर्सरी, वनराई, मत्स्यपालन, डुक्कर पालन इ.) |
| ८) रांची शहर | | – माजी मुख्यमंत्री बाबुला मुरंडी प्रश्नोत्तरे व भेटी |
| ९) रांची शहर | | – Iron Lady of Jharkhand |
| | | सौ. दयामनी बरला (Social Activist) |
| | | – शेती, नक्षलवाद, धर्मांतर, संस्कृती/उत्सव, रोजगार |
| | | – समस्या स्थलांतर |

**'पाकोळी बालवाडी' संक्रांत उत्सव –**

बालवाडीचा संक्रांत उत्सव डॉ. आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे दि. २९ जानेवारीला साजरा झाला. या वर्षी प्रथमच 'क्रीडा' विषय उत्सवासाठी निवडला होता. या विषयानुरुप उत्कृष्ट खेळाडू, मार्गदर्शक, परीक्षक असलेल्या श्रीमती निर्मलाताई गायकवाड या पाहुण्या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात ओंकार पूजनाने झाली. बालवाडी शिक्षिकांच्या पद्यानंतर सौ. अक्षताताईंनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय सौ. कविताताईंनी केला. पाहुण्यांच्या हस्ते गुरुकुल चित्रकला स्पर्धेत बक्षीस मिळालेल्या ११ मुलांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

श्रीमती निर्मलाताईंनी 'दैनंदिन जीवनात खेळाचे महत्त्व सांगताना अभ्यासाबरोबर खेळाचा आग्रह पालकांनी धरला पाहिजे,' असे सांगितले.

पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर प्रात्यक्षिकांची सुरुवात घुंगरु काठीवरच्या गणेशवंदनाने झाली. छोट्या गटाची मुले संगीताच्या तालावर जंपिंग टेबल, बोगदा व ट्रॅकर या साधनांवर मजेत खेळली. त्यांच्या उड्या व तोल सांभाळून चालणे कौतुकास्पद होते. मधल्या गटातील मुलांनी 'डंबेल्स व रिंग कवायत' केली. मोठ्या गटाने सूर्यनमस्कार, आसने व लेझिम यांची प्रात्यक्षिके सादर केली. ढोलाच्या तालावरील लेझिम खेळाने सर्व सभागृह नादमय झाले होते. सर्वात शेवटी बालशाखेच्या मुलांनी मानवी मनोऱ्यातून दहीहंडी, गणेशोत्सव, शिवजयंती, भारतमाता यांचे देखावे 'शिवशक्तीचा अपूर्व संगम' या गीताच्या तालावर सादर केले.

**सहल –**

२७ फेब्रुवारीला बालवाडीच्या सर्व गटांची सहल राजमाता जिजाऊ उद्यान, पिंपळे गुरव येथे गेली होती. भोंडवे ट्रॅव्हल्सच्या दोन गाड्या फुगे, झिरमळ्यांनी सजवल्या होत्या. खिडकीजवळ बसण्यासाठी मुलांच्यात चढाओढ झाली. पण ताईंनी समजावून सांगितल्यावर मुलांनी समजुतदारपणा दाखवला. बागेत पोहोचेपर्यंत गाडी घोषणा, गाणी, गजर यांनी दुमदुमून गेली. बागेत पोचल्यावर वेगवेगळ्या खेळण्यांवर खेळायला ताईंची परवानगी मिळाल्यावर सर्वजण धावत सुटले. वर्गात जमलेली जोडी खेळण्यांवर पण दिसत होती. छोट्या गटातील मुले उत्साहाने सर्व खेळ खेळली. डायनासोरला बघून घाबरली नाहीत. मोठ्या गटाच्या सौ. कविताताईंनी सर्वांना भेळ खायला दिली. खाणे झाल्यावरही बागेतून निघायला मुले तयार नव्हती. आपण संध्याकाळी घरी जाऊ असं म्हणत होती. बागेत खेळायची साधने खूप असल्याने मुलांनी सहलीचा आनंद मनसोक्त लुटला.

**होळी–रंगपंचमी –**

फाल्गुन महिन्यातील होळी व रंगपंचमी मुलांच्या आवडीचे सण. पण या वर्षी पाण्याची कमतरता असल्याने रंगपंचमी साजरी न करता 'घरी पण कोरडे रंग खेळा, पाणी वाया घालवू नका' असे ताईंनी वर्गात सांगितले. दुसऱ्या दिवशी पालकांनी मुलांनी अशीच रंगपंचमी खेळली हे आवर्जुन सांगितले.

एप्रिलमध्ये बालवाडीला सुटी लागणार म्हणून दि. २९ मार्चला मार्च, एप्रिल व मे महिन्यातील मुलांचे वाढदिवस साजरे झाले. या कार्यक्रमात पालकही उत्साहाने सहभागी झाले होते. या दिवशी 'डोसा पार्टी' झाली. सर्व मुलांना हा खाऊ खूप आवडला. बालवाडीचा माजी विद्यार्थी नितीन गायकवाड याने अल्प दरात मुलांना गरम गरम डोसे दिले. या मेजवानीचा खर्च पालकांनी स्वखुशीने दिला.

❖ दि. १३ एप्रिलला सर्व गटांना प्रगतीपुस्तकं देण्यात आली. मोठ्या गटातील मुलांना शुभेच्छा देण्यासाठी सर्व गटांचे पालक एकत्र आले होते. मुलांनी वर्षभर केलेले साहित्य ठेवण्यासाठी पालकांनी रंगीबेरंगी, सजावट केलेल्या कागदी पिशव्या स्वतः तयार करून दिल्या. शुभेच्छा समारंभात पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. बालवाडीत होणाऱ्या संस्कारांमुळे सर्व मुले चांगली घडली आहेत, डब्यातील पोळीभाजीच्या आग्रहाने मुलांना चौरस आहाराची सवय लागली. रोज मिळणाऱ्या मोडाचे मूग व भिजलेले दाणे यामुळे मुलांच्या तब्येती सुधारल्या. घरी पण मोडाची धान्ये आवडीने खातात. अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. 'गुर्जर आईस्क्रीम' यांच्याकडील आईस्क्रीमचा आनंद मुलांबरोबर पालकांनीही घेतला.

**निवासी शिबिर –**

दि. १५ व १६ एप्रिल रोजी बालवाडीतील मोठ्या गटातील २८ मुलांचे निवासी शिबिर घेण्यात आले. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या प्रमुख सौ. मनिषाताई नरडेकर यांनी शिबिराचे उद्‌घाटन केले. 'शाळेत लागलेल्या आरोग्याच्या चांगल्या सवयी आपण पुढेही पाळणार आहोत' हे त्यांनी गप्पागोष्टीतून मुलांच्या मनावर बिंबवले. रामजन्मोत्सव साजरा करून मुलांचे राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न असे गट पाडून दोन दिवसात पद्य पाठांतर, कागदी काम, 'आळशी विनू' या गोष्टीवरून प्रसंग नाट्य, टेलि मॅचेस, संगीत खुर्ची स्पर्धा असे उपक्रम घेण्यात आले. संध्याकाळी शाहू बागेत जाऊन दोन तास मनसोक्त खेळण्याचा आनंद मुलांनी लुटला. या स्पर्धांमधून विजयी गटाला बक्षिसे देण्यात आली. शिबिर प्रमुख सौ. राणीताई काळे यांनी शिबिराचे नियोजन उत्तम केल्याने मुलांनी सर्व उपक्रमात चांगला सहभाग घेतला. शिबिराच्या समारोपासाठी नू. म. वि. प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ. शेलार व सौ. तावरे उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मनोगतातून सर्व शिक्षिकांचे व मुलांचे खूप कौतुक केले. रात्री ताईंनी मुलांना गोष्टी, गाणी सांगत झोपवले. पण दोनच्या सुमारास संजनाला खूप खोकला येऊन ताप भरला. दूरध्वनी लागेना. शेवटी संगीताताई, अश्विनीताई व अक्षता ताई तिला घेऊन तिच्या घरी रात्री ३ वाजता सोडून आल्या; पण दुसऱ्या दिवशी ही संजना पालकांच्या मागे लागून सकाळी ८ वाजताच शिबिरात सामील झाली.

❖ १३ जून पासून नवीन वर्षाच्या (२०१६-१७) बालवाडीला सुरुवात झाली. सर्व वर्ग चित्रांनी सजवले होते. छोट्या गटात उत्साही वातावरण होते. पालक गेल्यावर ताईंना मुले बिलगून बसली. काहीजण नवीन खेळ खेळण्यात दंग होती. मधल्या गटातील मुले नवीन सजवलेले वर्ग बघून आनंदून गेली. सुट्टीतल्या गोष्टी ताईंना सांगण्यात रमली. मोठ्या गटातली सर्व मुले आधीच रुळली असल्याने नव्या ताईंबरोबर रोजची प्रार्थना, परिपाठ म्हणण्यात सहभागी झाली. यावर्षी एकूण २५० मुले बालवाडीत आहेत.

**छोट्या गटातील गौरी वर्गात खूप रडत होती. ताई म्हणाल्या, 'चल आईला फोन करुयात.' ताईंनी खेळण्यातला फोन उचलला तर गौरी म्हणते, 'ताई, तुमच्या पर्समधल्या फोनवरून करा हं. ह्या फोनवरून नको.'**

**बालवाडी शिक्षिका प्रेरणा शिबिर –**

नव्या शैक्षणिक वर्षाला सामोरे जाताना बालवाडी शिक्षिकांचे शिबिर नवीन विषय घेऊन वेगवेगळ्या अनुभवी, अभ्यासू वक्त्यांमुळे शिक्षकांना वर्षभर पुरणारी प्रेरणा देणारे ठरले.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १ जून २०१६ | सौ. साधनाताई सेठीया | उद्‌घाटन |
| | पुष्पाताई नडे | बालकल्याण समाजशास्त्र |
| २ जून २०१६ | श्री. ज्ञानेश पुरंदरे | संघटनेचे महत्त्व |
| ३ जून २०१६ | डॉ. सौ. अनघाताई लवळेकर | मूल्यशिक्षण |
| | सौ. संध्या साबणे | गोष्ट तयार करणे |
| ४ जून २०१६ | सौ. संगीताताई येवले | प्रसंग नाट्य बसविणे |
| | सौ. शुभांगी तांबट | व्यवस्थापन कामाचे |
| ६ जून २०१६ | सौ. संध्या साबणे | कृतीयुक्त शिक्षण |
| | सौ. सुषमा दाबके | जीवन व्यवहार |
| ७ जून २०१६ | श्रीमती अंजलीताई कार्येकर | गणित |
| | सौ. अर्चना दोडे (पोफळे) | क्राफ्ट (वर्ग सजावट) |

शिबिराचे उद्‌घाटन ज्ञान प्रबोधिनीच्या संवादिनी गटाच्या सौ. साधनाताई सेठी यांनी केले. सर्वांशी प्रश्नोत्तर रुपातील चर्चेतून त्यांनी विषय मांडला. घराइतकेच सुरक्षित, संस्कारित वातावरण आपल्या बालवाडीत आपल्या स्वतःच्या वर्तणुकीतून कसे तयार केले पाहिजे याचे मार्गदर्शन त्यांनी केले.

श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी संघटनेचे महत्त्व सांगताना 'कुशल संघटक'ची वैशिष्ट्ये लक्षात आणून दिली. 'संघटन असेल तरच व्यक्तीने उभे केलेले काम त्याच्यानंतरही चांगल्या रीतीने वाढू शकते. म्हणून सामाजिक कार्यास वाहून घेणाऱ्या संघटनेकडे कुशल संघटक अत्यावश्यक असतो. तो निःस्वार्थी असावा. प्रसंगी शंकरासारखा विषाचा घोट स्वतः घेऊन इतरांना वाचवणारा, काम पुढे नेणारा, सेवेकरी तयार करणारा हवा. मा. डॉ. हेडगेवार, मा. किशाभाऊ, मा. अप्पा पेंडसे, डॉ. अशोक कुकडे यांच्या कार्याची माहिती देत त्यांचा आदर्श घेऊन आपण इथून बाहेर पडून समाजाला जिथे गरज आहे तिथे जाऊन आपण काम केले पाहिजे म्हणजेच कार्य वाढेल. त्याबरोबर आपणही मोठे होऊ', हा विचार त्यांनी मांडला.

डॉ. सौ. अनघाताई लवळेकर यांनी 'मूल्यशिक्षण' हा विषय मुलांना आपण कृतीतूनच पोहोचवतो व तो आपल्या दोन-तीन तासांच्या बालवाडीतून इतरही विषय शिकवताना चांगल्या पद्धतीने कसे शिकवता येईल हे सांगितले. हात धुऊन डबे खाणे- 'स्वच्छता', मन लावून चित्र रंगवणे- 'एकाग्रता', खूप भूक लागली असली तरी प्रार्थनेनंतरच डबा खाणे - 'स्वयंशिस्त'. 'वाट पाहणे' अशी उदाहरणे त्यांनी दिली.

गोष्ट तयार करणे, पसंग नाट्य, वर्ग सजावट या कृतीशील सत्रांचा उपयोग शिक्षकांना अन्य उपक्रमात होईल. त्याची छोटीशी उजळणी या शिबिरातही झाली.

सौ. शुभांगीताईंनी 'कामाचे व्यवस्थापन' महत्त्वाचे असते हे शिक्षकांना प्रश्नोत्तरातून 'उपक्रमाचे उद्दिष्ट, जागा, वेळ, खर्च, मनुष्यबळ इ. बाबी लक्षात ठेवून त्याचे नियोजन, कामाची विभागणी, उपक्रमांचे सातत्य' अशा मुद्द्यांना घेऊन सांगितले. सुयोग्य व्यवस्थापनामुळे आपणही कामातील आनंद घेऊ शकतो. कामाचा कधीही ताण येत नाही असा विचार मांडला.

सौ. अंजलीताई कार्येकर म्हणाल्या, 'गणितातील मूलभूत संकल्पना छोट्या छोट्या कृतीतून मुलांना समजावून सांगा. उदा.लहान-मोठा, उंच-बुटका, कमी-जास्त. पहिली गोष्ट लक्षात आल्याशिवाय पुढची संकल्पना शिकवू नका.

सौ. सुषमा ताई म्हणाल्या, 'जीवन व्यवहार या विषयातील सर्व पाठांमध्ये प्रत्येकजण समरसून काम करतो आहे. याकडे लक्ष असले पाहिजे. कारण या पाठांतून मुलांची सौंदर्यदृष्टी वाढते. मुले स्वावलंबन, स्वच्छता शिकतात. त्यांच्या शरीराला नकळत व्यायाम होत असतो.' शिबिराचा समारोप, झालेल्या सर्व विषयांचा आढावा घेऊन, गटचर्चांमधून झाला.

**पालखी सोहळा –**

१५ जुलैला आषाढी एकादशीला बालवाडीच्या मुलांनी पालखीच्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला. छोट्या गटातील पालक श्री. कांबळे आणि श्री. शिरीष पटवर्धन यांनी पालखीची पूजा केली. पालखी वर्धिनीतून कण्वाश्रम विठ्ठल मंदिराकडे ज्ञानेश्वर तुकारामांचा जयघोष करीत निघाली. बालशाखेच्या वर्धकांनी चौकाचौकात रिंगण करून पारंपारिक खेळ खेळले. सर्वांनी त्यांचे खूप कौतुक केले. मंदिरात गेल्यावर सर्वांनी भजनं म्हटली. बालशाखेच्या वर्धकांनी पाण्याचे महत्त्व कीर्तनातून मांडले. कीर्तन ऐकण्यासाठी व पालखीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील अनेकजण मंदिरात आले होते.

**गणपती उत्सव –**

गणपती उत्सवाची पूर्वतयारी म्हणून मोठ्या गटाला गणपती अथर्वशीर्ष शिकवायला ऑगस्टमध्ये सुरुवात केली होती. रोजच्या रोज स्तोत्रपठणाचा सराव झाल्याने कसबा गणपती, गोसावीपुरा, तरवडे गणपती, सूर्योदय मित्रमंडळ, दत्त मित्र मंडळ या सार्वजनिक मंडळांमध्ये अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम झाला. सर्व ठिकाणी मुलांचे खूप कौतुक झाले.

**म. गांधी जयंती –**

म. गांधी जयंतीनिमित्त मधल्या व मोठ्या गटातील मुलांनी वर्गाबाहेरील व्हरांड्याची स्वच्छता केली. मुले एप्रन बांधून ताईंच्या सूचना ऐकून कामे करत होती. ''ताई, उद्या आता वर्ग पण स्वच्छ करुयात''. मनाप्रमाणे काम करायला मिळाल्याने मुलांना असा उत्साह आला होता.

**दिवाळी –**

२५ ऑक्टोबरला बालवाडीत दिवाळी साजरी झाली. मुलांनी स्वतः भेटकार्ड व आकाशकंदील बनवले होते. या आकाशकंदिलांनी, रांगोळ्यांनी सर्व वर्ग सजवले होते. मोठ्या गटातील मुलांनी ताईंच्या मदतीने मातीचा किल्ला बनवला. त्यात चित्रे मांडली. याबरोबर मुलांचे वाढदिवसही साजरे करण्यात आले. श्री. शिरीष पटवर्धन व श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी मुलांना शुभेच्छा व भेटवस्तू दिल्या. सर्व मुलांनी दिवाळीच्या सहभोजनाचा आनंद घेतला.

**कोसबाडच्या टेकडीवर...**

बालशिक्षणात मैलाचा दगड ठरलेल्या कै. अनुताई वाघांचे आणि ताराबाई मोडक यांचे काम अभ्यासण्यासाठी बालवाडीच्या आम्ही सात जणी २८ डिसेंबरला कोसबाडच्या टेकडीवर गेलो आणि किती पाहू आणि किती नको, किती ऐकू आणि किती नको असे माझ्या सर्व सख्यांना झाले होते. जवळ जवळ सात तासाचा प्रवास संपून आम्ही त्या टेकडीवर पाय ठेवले आणि त्या शुद्ध, प्रसन्न आणि निरोगी वातावरणाने सर्वांचा शीण कुठल्या कुठे गेला. दीड दिवस त्या टेकडीवर होतो, पण थकवा म्हणून कोणालाच आला नाही.

कै. ताराबाई मोडक तसेच कै. अनुताई वाघ याच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेली ही टेकडी. प्राचार्य लुले सरांनी आम्हांला माहिती सांगताना ताराताई व अनुताई यांच्या काळात नेऊन बसवले. म. गांधीजींच्या भाषणानंतर ताराताईंनी विचारले, ''मग कोण येते आहे माझ्या बरोबर आदिवासी भागात काम करायला ?'' त्या बरोबर एवढ्या गर्दीतून एक हात वर झाला आणि पाठीमागून ''मी येते तुमच्याबरोबर'' असे म्हणून अनुताई ताराताईंच्याबरोबर चिखलमय टेकडीवर आल्या आणि दोघी पण कामाला लागल्या. ''अहो ताई मुले जगायला (कमवायला) गेलीत, ती शाळेत येत नाहीत काय करूया ?'' असं अनुताईंनी म्हटलं की ताराताईंनी म्हणावे ''मग तुम्ही त्याच्याजवळ कुरणात जा तिथे काम करा'' असं म्हणून कुरणशाळा सुरू झाल्या. मुलं आपल्याकडे येत नसतील आणि जर अंगणात खेळत असतील तर तिथे अंगणात जाऊन वर्ग घ्या असं म्हणून अंगणवाड्या सुरु झाल्या. पाड्या पाड्यावर वर्ग घेणे अजूनही चालू आहे.

टेकडीवर बालवाडी ते ८वी पर्यंतची शाळा आहे. शाळेत एका वर्गात तारांगण आहे. दिवसा छान आकाश दिसते. अत्याधुनिक संगणक कक्ष आहे. सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत वातावरण अगदी मुलांनी फुलून आलेले असते. अंगणवाडी प्रशिक्षिका वर्ग तसेच डी. एड. चे वर्ग चालू आहेत. डी. एड.च्या ७९ मुली आम्हाला भेटल्या. त्यांच्याबरोबर आमची जेवण नाष्टा याची सोय होती.

हे सर्व वातावरण फुलून राहण्याचे कारण म्हणजे तेथील शिक्षक वर्ग. हा वर्ग तिथेच लहानाचा मोठा झाला. पुढील कॉलेजचे शिक्षण, कोर्सेस मुंबई मध्ये पूर्ण करून पुन्हा कोसबाड या ठिकाणी शिक्षक म्हणून कामास आलेले. प्रा. लुले सर तर सांगत होते, ''माझी मुलाखत स्वत: अनुताईंनी घेतली आहे''. अनुताईंचा सहवास मिळालेल्या अनेक शिक्षिका भेटल्या.

त्यानंतर आम्ही डोंगरपाडा येथे बालवाडीचा वर्ग पाहायला गेला. मुले एवढी गोड होती की आम्ही गेल्याबरोबर आमच्या शेजारी येऊन बसली. छान गाणी म्हणून दाखविली. न लाजता, न रडता अभिनय केले. नाहीतर नवीन कुणी मुलांसमोर आल की मुलं बुजतात. आम्ही निघालो तेव्हा सगळे वर्गाबाहेर आले व गाडी निघेपर्यंत आम्हाला बाय बाय करत होते. तेथून ४० कि.मी. असणाऱ्या आयना याठिकाणी प्रकल्प पाहायला आलो आणि दुग्ध शर्करा योग घडला. आमची भेट तेथे पुजनीय सिंधुताई अंबिके याच्याबरोबर झाली. वय वर्षे ८७, पण तरुणीला लाजवेल असा उत्साह. त्यांनी मुलांसाठी गाण्याची अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी अनुताई, ताराताई याच्या सोबत काम करतानाच्या खूप गमती सांगितल्या. अनेक गाणी खणखणीत आवाजात शिक्षिकांना म्हणून दाखविली व आमच्याकडून म्हणून घेतली. दीड तास गप्पा झाल्या. पण त्या मात्र थकल्या नाहीत. बालशिक्षणातील अदम्य, उत्कट प्रेरणेचा आमच्यामध्ये संचार झाला होता.

– श्रीमती पुष्पा नडे

**महिला दिन –** ८ मार्च जागतिक महिना दिनाच्या निमित्ताने 'शाश्वत इको सोल्यूशन फाऊंडेशन' ह्या संस्थेने 'स्व'–रूपवर्धिनीत पाणी संवर्धन व हिमोग्लोबीन तपासणी कार्यशाळा घेतली. कार्यक्रमासाठी श्री. विलास कुलकर्णी, श्री. भिसे, डॉ. गौरी बारलिंगे व श्रीमती पुष्पाताई नडे हे मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेत वर्धिनीतील सर्व महिला कार्यकर्त्या, शिवण व रुग्ण सहाय्यक वर्गाच्या विद्यार्थिनींनी भाग घेतला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाणीटंचाईवर चित्रफीत दाखवली. त्यामुळे शहरांपेक्षा गावांमध्ये असलेल्या पाण्याच्या प्रश्नाचे गंभीर स्वरुप सर्वांच्या लक्षात आले. श्री. विलास कुलकर्णींनी प्रश्नोत्तर रुपात आपण कसे पाणी वाचवू शकतो हे महिलांना सांगितले. आपल्याकडेही सांडपाण्याचे शुद्धीकरण करून ते परत वापरायची गरज निर्माण झाली आहे.

डॉ. गौरी बारलिंगे यांनी सांगितले, '' 'ॲनिमिया' या रोगाकडे गांभीर्याने बघा. आपले 'Hb' योग्य प्रमाणात आहे ना याची तपासणी आवश्यक आहे. साधी, किरकोळ दिसणारी दुखणी आजार 'Hb' योग्य प्रमाणात आल्यावर कमी होतात. पायात गोळे येणे, दम लागणे, थकवा येणे ही 'Hb' कमी असल्याची लक्षणे असतात. त्याकडे दुर्लक्ष करू नका.''

दि. ३१ मार्चला सर्व महिलांसाठी पाककला, रांगोळी, मेंदी व वेशभूषा या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. ४० महिला सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक स्पर्धेत तीन क्रमांक काढून बक्षिसे देण्यात आली.

सौ. संगीता पाटील – प्रथम क्रमांक – पाककला

सौ. वैशाली मेवाती – प्रथम क्रमांक – मेंदी

सौ. अश्विनी महाडीक – प्रथम क्रमांक – रांगोळी

सौ. अक्षता पवार – प्रथम क्रमांक – वेशभूषा

सौ. वासंती कुलकर्णी, सौ. उषा दांडेकर, सौ. मधुरा पारधी, कु. शिवानी सुरपुर, कु. फाल्गुनी पाटील, कु. प्रतीक्षा ओसवाल यांनी स्पर्धांचे परीक्षण केले.

स्पर्धांचे बक्षीस वितरण सातारा येथील सौ. लताताई बनसोडे यांच्या हस्ते झाले. स्वतःचे अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, ''मी एक कष्टकरी महिला आहे. माझ्या कामावर मी खूप प्रेम करते. जिद्द न सोडता बँकेकडून कर्ज काढून दोन मिनी लिफ्ट मशीन घेऊन बांधकामांवर स्वतः चालवते. हे कर्ज काढताना अनेक वेळा बँकेत हेलपाटे घालावे लागले. यातून धडा घेऊन प्रथम महिलांची एकूण दीड लाख रुपयांची भिशी सुरू केली आणि आता 'अंजली महिला ग्रामीण बँके'ची माणदेशात स्थापना करून महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत आहे.'' लताताईंच्या या सर्व मेहनतीचे कौतुक अन्य संस्थांनी केले आहे. त्यांना माणदेशी फाऊंडेशन पुरस्कार मिळाला आहे. शिक्षणाचे महत्त्व सांगताना त्या म्हणाल्या, ''अडाणी बाप डोक्याला ताप, अडाणी आई घर वाया जाई.'' पुढे आलेल्या संकटाला धीराने तोंड देत आपणच जिद्दीने परिस्थितीत बदल करू शकतो असा विश्वास त्यांनी सर्व महिलांच्या मनात निर्माण केला.

**शैक्षणिक शिष्यवृत्ती वाटप –**

दि. ६ जूनला 'स्व'–रूपवर्धिनीच्या उपासना मंदिरात 'अस्मिता मूव्हमेंट'कडून शैक्षणिक शिष्यवृत्ती कार्यक्रम घेण्यात आला. 'स्व'–रूपवर्धिनीच्या परिसरातील, बचत गटातील व बालवाडीतील फक्त मुली असलेल्या महिला पालकांकडून आवेदनपत्रे घेण्यात आली होती. यातून १४ अत्यंत गरजू मुलींची निवड केली.

डॉ. अस्मितातई गुप्ते यांनी ओंकार पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. ओंकार स्तवनानंतर सुवर्णाताईंनी अस्मिता मूव्हमेंटची सविस्तर माहिती सांगितली. या अंतर्गत शाळांमधून, वस्त्यांमधून स्त्री आरोग्याची जागृती वेगवेगळ्या उपक्रमांतून केली जाते. पुष्पाताईंनी डॉ. अस्मितातई गुप्ते यांची ओळख करून दिली. महिला व मुलींशी अनौपचारिक संवाद साधताना डॉ. गुप्ते म्हणाल्या, ''आर्थिक परिस्थिती बिकट असतानासुद्धा मुली जिद्दीने शिकत आहेत. त्यांची अजून चांगली प्रगती व्हावी यासाठी आम्ही मदत करत आहोत. शालेय शिक्षणाबरोबर आपले व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी संगीत, नृत्य, कराटे अशा वेगवेगळ्या गोष्टी पण शिकल्या पाहिजेत. यासाठीही आम्ही मदत करू. या शिक्षणानेच तुम्ही प्रत्येकजण आर्थिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाल.'' या उपक्रमातून परिसरातील १४ विद्यार्थिनींना एक लाख चौतीस हजार रुपयांची शैक्षणिक मदत देण्यात आली.

**आरोग्य शिबिर –**

२३ ऑगस्ट रोजी 'प्रशांती कॅन्सर केअर मिशन' या संस्थेच्या साहाय्याने वर्धिनीच्या वास्तूत मंगळवार पेठेतील पुणे महानगरपालिका कर्मचारी वसाहत या भागातील ४५ महिलांची आरोग्य तपासणी झाली. त्यासाठी शिबिराच्या आधी महिलांशी संवाद साधून त्यांना याचे महत्त्व व आवश्यकता पटवून सांगितली. त्यामुळे तपासणी शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळाला.

## बचत गट व शिवणवर्ग

**महिलांचा मेळावा –**

दि.८ फेब्रुवारी रोजी बचतगटातील महिलांचा व महिला विभागातील सर्व कार्यकर्त्यांचा संक्रांत, हळदीकुंकू कार्यक्रम झाला. ७५ महिला कार्यक्रमास उपस्थित होत्या. वर्धिनीच्या ग्रंथालय प्रमुख श्रीमती नीला कुडलिंगार (अव्वा) या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

पुष्पाताईंनी पद्य सांगून बचतगट कशासाठी हे सांगितले. महिलांचे संघटन हा प्रमुख हेतू ठेवून त्याबरोबर त्यांचे आर्थिक स्वावलंबन ही झाले पाहिजे. यासाठी महिलांचाही उत्तम प्रतिसाद मिळाला पाहिजे.

अव्वांनी स्वतःला व त्यांच्या मुलांना वर्धिनीचा झालेला फायदा सांगितला. ''प्रोत्साहन व संपर्क यामुळे हा बदल झाला. मिळालेल्या संधीचा सुयोग्य उपयोग मी केला, तुम्हीपण करा'' असे त्या म्हणाल्या.

सौ. मंजुषाताई कुलकर्णी यांनी बचत गटाच्या माध्यमातून स्वतःचे आर्थिक स्वावलंबन होतेच; पण त्याबरोबर सामाजिक उपक्रमही आपण महिला राबवू शकतो हे औरंगाबादच्या बचत गटाच्या उदाहरणातून स्पष्ट केले.

सौ. उषाताई पोफळेंनी या वर्षीच्या बचत गटाच्या उलाढालीचा थोडक्यात आढावा घेतला.

सर्व महिलांना तुळशीच्या रोपाचे वाण दिले.

बालवाडीच्या गणवेशाबरोबरच राणी लक्ष्मीबाई मुलींच्या सैनिकी शाळेतील मुलींचे गणवेश यावर्षी शिवणवर्गातील माजी विद्यार्थिनी व बचतगटातील महिलांनी शिवले. यामुळे बचतगटाशी नवीन महिला जोडल्या गेल्या आणि त्यांचा आत्मविश्वास व कामातील सफाईदारपणा वाढला आहे. या कामातून सुमारे दोन लक्ष रुपयांची उलाढाल झाली. यापेक्षा मोठी कामे घेण्याची उमेद जागृत झाली.

**रुग्ण सहाय्यक वर्ग –**

❖ **संस्था भेट –** विद्यार्थिनींवर शिक्षणाबरोबर सामाजिक बांधिलकीचे संस्कार विविध उपक्रमातून केले जातात. माले वर्गातील मुलींनी दि. १६ जानेवारीला भूगावजवळील मानव्य संस्थेस भेट दिली. संस्थेची सर्व माहिती समन्वयक श्री. अनिकेत जोशी यांनी दिली. कै. विजयाताई लवाटे यांनी १९९७ मध्ये या संस्थेची स्थापना केली. पुण्यात डॉ. कोटणीस आरोग्य केंद्रात काम करताना वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या व त्यांच्या मुलांच्या आरोग्याचे प्रश्न त्यांना समजले व यातून एचआयव्ही बाधित मुलांच्या पुर्नवसनासाठी मानव्य संस्था काम करू लागली. परिस्थितीवर मात करून या मुलांना समाजात ताठ मानेने जगता यावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. सध्या संस्थेत ६५ मुले, मुली व ६ गृहमाता आहेत. मुलांची दिनचर्या आखीव व शिस्तबद्ध असते. ७ वी पर्यंतची शाळा संस्थेतच आहे. त्यानंतर पुण्यातील एस.एन.डी.टी. किंवा मोरे विद्यालयात मुले शिकायला येतात. काहीजण महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. या सर्वांचे आरोग्य उत्तम राहील याकडे विशेष लक्ष दिले जाते. सतत तपासण्या तसेच पौष्टिक आहार व औषधोपचार मुलांना मिळतो. त्यामुळे संस्थेत उत्साही व आनंदी वातावरण अनुभवयाला मिळते. मुलांमधील अंगभूत कलागुणांना पण वाव मिळतो. त्याबरोबर शिवणकाम, संगणक, फाईल बनवणे असे व्यवसायपूरक शिक्षणही त्यांना दिले जाते. या संस्था भेटीमुळे एका अनोख्या व अवघड सामाजिक कामाची ओळख मुलींना झाली.

❖ **निवासी शिबिर –** माले, पुणे व दौंड या तीनही वर्गातील विद्यार्थिनींचे एकत्रित निवासी शिबिर १२ व १३ फेब्रुवारीला झाले. ४५ विद्यार्थिनी सहभागी होत्या. शिबिरात खालील कार्यक्रम झाले.

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १२-२-१६ | जनकल्याण रक्तपेढी भेट | डॉ. आशुतोष काळे |
| | नातेसंबंध टिकवताना... | सौ. संध्या साबणे |
| | सहजीवनाच्या उंबरठ्यावर | सौ. साधना सेठिया |
| | आर्थिक बचतीचे फायदे | श्री. संतोष बाम |
| | माहितीपट | कचराकुंडी |
| १३-२-१६ | रुग्णांना समजून घेताना... | सौ. स्मिता पेंडसे |
| | अंधश्रद्धा निर्मूलन | सौ. नंदिनी जाधव व सहकारी |
| | मुक्त संवाद | सौ. विजयालक्ष्मी कुलकर्णी |
| | बौद्धिक खेळ | श्रीमती पुष्पाताई नडे व सौ. संध्या साबणे |
| | समारोप | डॉ. सतीश राजमाचीकर |

शिबिराची सुरुवात जनकल्याण रक्तपेढीच्या भेटीने झाली. डॉ. काळे यांनी रक्तपेढीतील सर्व विभाग दाखवून त्याची माहिती दिली. रक्तदानाबरोबर प्लेटलेटसही दान करता येते हे समजले. रक्तपेढीतील सर्व अत्याधुनिक उपकरणांची माहिती, रक्तासंबंधीच्या रोगांची माहिती मुलींना मिळाली.

सौ. संध्याताई साबणेंनी पौराणिक काळापासून ते सध्याच्या यांत्रिक युगात नातेसंबंध कसे जोपासले गेले त्याचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व सांगितले. सौ. साधनाताई व अनिताताईंनी 'सहजीवनाच्या उंबरठ्यावर' या सत्रात

वेगवेगळी उदाहरणे देत विद्यार्थिनींना प्रश्न विचारून बोलते करून मार्गदर्शन केले. वैवाहिक आयुष्यात नात्याला, विश्वासाला जास्त महत्त्व द्यायचे हे समजले.

नोकरीला लागल्यावर स्वतःला खर्चाची शिस्त कशी लावावी व त्यातून बचत कशी करावी हे जनता सहकारी बँकेचे अधिकारी श्री. संतोष बाम यांनी सोप्या शब्दात सांगितले. सौ. स्मितताई पेंडसे यांनी रुग्णाची सेवा करताना आपुलकी, प्रेमभाव आपल्या वागण्यातून व्यक्त व्हावा, आणि आपल्याला समाज सेवा करायची संधी मिळाली आहे हा विचार ठेऊन काम करा असे सांगितले.

'अंधश्रद्धा निर्मूलन' हा विषय सौ. नंदिनी जाधव आणि अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेच्या इतर सहकाऱ्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवल्याने खूपच रंगला. प्रत्येक प्रयोगामागील शास्त्रीय कारण समजल्याने मनातील गैरसमज दूर झाले.

समारोपाच्या सत्रात डॉ. सतीश राजमाचीकर म्हणाले, 'हॉस्पिटलमध्ये डॉक्टर इतकेच परिचारिकेचे महत्त्व आहे. आपुलकीने, प्रेमाने केलेल्या शुश्रुषेमुळे पेशंट लवकर बरा होतो. शिबिरातून झालेला एकीचा, संस्कार पुढील कामात खूप उपयोगी पडतो. समाजात काम करताना नेहमी स्वच्छ मनाने काम करा. मी प्रथम भारतीय आहे आणि संविधान माझा धर्म आहे हे लक्षात ठेवून माणूस म्हणून जगायचा प्रयत्न करा.'

सहल – १३ फेब्रुवारीला या वर्गाची सासवडला सहल गेली होती. केतकवळेच्या बालाजीचे दर्शन घेऊन कस्तुरबा गांधी ट्रस्ट व ममता बाल निकेतन या संस्थांना भेट दिली. कस्तुरबा गांधी ट्रस्टतर्फे मुलींचे अनाथाश्रम व वृद्धाश्रम चालवले जाते. श्रीमती सुहासिनी अटलेकर या तेथे प्रतिनिधी पदावर काम करतात. त्यांनी संस्थेची सर्व माहिती सांगितली. तेथील सर्व कार्यकर्ते आपलेपणाने, प्रेमाने सर्व मुलींचे संगोपन करतात हे सर्वांनी अनुभवले. प्राचीन श्री चांगवटेश्वर मंदिर व संत सोपानदेवांच्या समाधीचे दर्शन घेऊन कुंभारवळण येथील ममता बाल निकेतन बघितले. श्रीमती सिंधुताई सकपाळ यांनी सांभाळलेला पहिला मुलगा श्री. दीपक गायकवाड याला वारसा हक्काने मिळालेल्या जागेत हे अनाथाश्रम सुरू आहे. श्री. गायकवाड सिंधुताईंबरोबर पूर्ण वेळ काम करत आहेत. सध्या तिथे ५२ मुली रहात असून त्यांचा वयोगट ५ ते २० वर्षेआहे. त्यांच्या शालेय शिक्षणाबरोबर सर्वांगीण विकासाकडे ही लक्ष दिले जाते. संगणक वर्ग, अभ्यास वर्ग, व्यवसाय प्रशिक्षण, खेळ असे उपक्रम तिथे घेतले जातात. या संस्थेस सर्वांनी मिळून ११०० रु. ची देणगी दिली. या संस्था भेटीमुळे प्रतिकूल परिस्थितीतही मात करून सतत पुढे जात राहिले पाहिजे हे सर्वांनाच जाणवले.

**प्रशस्तीपत्रक वितरण –**

दि. १८ जुलैला २०१५-१६ च्या वर्गाचा प्रशस्तीपत्रक वितरण कार्यक्रम झाला. कार्यक्रमास ॲक्युप्रेशर विकास संगठन संस्थेचे ट्रस्टी कमांडर प्रबोध जोशी, श्रीमती प्रतिमा कुलकर्णी, टाटा पॉवर कंपनीचे श्री. कवडे सर, श्रीमती कल्पनाताई हबडे उपस्थित होत्या. या सर्वांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रके व बक्षीसे देण्यात आली. ही बक्षिसे श्री. चंद्रकांत कुलकर्णी व श्री. बी. जी. नातू यांच्या कायम निधीतून देण्यात येतात. विशेष बक्षिसे मिळालेल्या मुली:

१) उज्ज्वला परदेशी – प्रसुतीशास्त्र
२) राखी सोनावणे – शरीरशास्त्र
३) दिपाली नागावी – आहारशास्त्र
४) कीर्ती गायकवाड – प्रात्यक्षिक, पुणे विभाग प्रथम.
५) रजिता ढेबे – माले विभाग प्रथम.
६) अबोली मानकर – आदर्श विद्यार्थिनी, माले विभाग
७) महादेवी गायकवाड – उत्तेजनार्थ पुणे विभाग
८) शीतल निंबाळकर – उत्तेजनार्थ, माले विभाग.

या वर्गामुळे आत्मविश्वास वाढला, घरची जबाबदारी चांगल्या पद्धतीने मी पेलू शकते, यजमानांच्या निधनानंतर मी मुलांना योग्य पद्धतीने शिकवू शकेन असे उत्स्फूर्त मनोगत एका विद्यार्थिनींनी मांडले. माले व पुणे या दोन्ही वर्गांचा निकाल ९० टक्के लागला. माले वर्गातील दोन मुलींनी पुढे A.N.M. च्या वर्गासाठी प्रवेश घेतला आहे. पुण्याच्या नवीन वर्गाची ११ जुलैला तर माले वर्गाची १ जुलैला सुरुवात झाली. दोन्ही वर्गांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.
माले व पुणे या दोन्ही वर्गासाठी 'ॲक्युप्रेशर विकास संगठन' या संस्थेचा ॲक्युप्रेशर प्रशिक्षण वर्ग २० ऑगस्टपासून सुरू झाला आहे. सर्वांनाच हा विषय व ही उपचार पद्धती नवीन आहे. पण शिक्षकांची शिकवण्याची पद्धत व त्यातून मिळालेली माहिती यामुळे सर्व मुली आवडीने शिकत आहेत.

**प्रामाणिक कष्ट आणि शिक्षणाचा ध्यास**

**संजना (ज्योत्स्ना खांडेकर)** – पौडमध्ये राहणारी. छोटी छोटी दोन मुले. घरात चौघेजण. बाकी नातेवाईक गावी. त्यामुळे घरात मोठं माणूस किंवा बाईमाणूस कोणीच नाही. पौडला वर्ग असल्यापासून आपण हा वर्ग करावा अशी संजनाची मनापासूनची इच्छा. सेवा पण घडेल आणि चार पैसेही मिळतील. तेव्हा तिचा दुसरा मुलगा तान्हा होता. मुलगा शाळेत जाऊ लागला तेव्हा तिची इच्छा पुन्हा तीव्र झाली. पण पौडचा वर्धिनीचा वर्ग माले या ठिकाणी हलवला होता. संजना पुन्हा एकदा नाराज झाली. काय करावे ? आधीच नवरा सोडायला तयार नव्हता. आता तर कारणही मिळाले. लहान मुलांची शाळा महत्त्वाची की तुझं नर्सिंग? पौडमध्ये दुसऱ्या एका संस्थेचा नर्सिंगचा वर्ग सुरू होता. पण एकही पैसा फी न घेता अभ्यासक्रम करणारी वर्धिनी तिला सोडायची नव्हती. खूप प्रयत्न करून शेवटी तिने नवऱ्याकडून परवानगी मिळवली आणि माल्याच्या वर्गात प्रवेश घेतला. पहिले तीन-चार महिने उत्तम गेले. प्रॅक्टीकल सुरू झाल्यावर संजनाला अवघड जाऊ लागले. कारण सकाळी साडेसातला संजीवन हॉस्पिटल, पुणे येथे उपस्थित रहायचे. पुन्हा अडीचला मालेच्या वर्गासाठी जायचे. प्रॅक्टीकल व वर्ग या शिवाय घर, मुलं, त्यांची शाळा, आजारपण वगैरे. मला म्हणाली, 'ताई, मी इथेच गावात प्रॅक्टीकल करू का ? मला जमणार नाही पुण्यात रोज यायला.' मी निक्षून सांगितले, 'जमणार नसेल तर सोडून दे वर्ग.' तिला वाईट वाटले. पण जिद्दीने प्रॅक्टीकलचे तीन महिने आणि पुढील वर्ग संपूर्ण केला. परीक्षा पुण्यात होती. रोज १५ दिवस पुण्यात येऊन तीही झाली. नववी नापास झालेली, लवकर लग्न झाल्यामुळे पुढे शिकू न शकलेली पण जिद्दीने शिक्षणाची हौस भागवून आता ग्रामीण भागातील हॉस्पिटलमध्ये ५००० रु. पगारावर संजना नोकरी करत आहे आणि खूशही आहे. हळूहळू पुढील शिक्षणही पूर्ण करणार आहे. अनुभव कथनासाठी शिबिरात ती दोन्ही मुलांना घेऊन आली होती. मुलींना खूप प्रश्न विचारले. ती बोलत होती तेव्हा मुलींचे व आमचे सर्वांचेच डोळे भरून येत होते. प्रामाणिकपणे खूप कष्ट घेऊन स्त्रिया आपल्या संसारासाठी, मुलांसाठी झटत असतात. संजना तशी फार मोठी नाही. २४ वर्षांची आहे. मला अशा मुलींचा गर्व वाटतो.

**अमृता फाले** – ग्रामीण भागातील पहिलीच नर्सिंगची बॅच खूप प्रयासाने सुरू झाली. ४२ मुलींनी फॉर्म भरले; पण प्रत्यक्षात ३५ मुलीच वर्गात आल्या. त्यातील बहुतेक १२ वीपर्यंत शिकलेल्या. याच बॅचची अमृता फाले. पहिल्या दिवसापासून पॉझिटिव्ह एनर्जी असलेली मुलगी वेगळीच वाटत होती. चमकदार बोलके डोळे १२ वी कॉमर्स झालेली. रहायला नांदगावची. कोळवण फाट्यावरून ४-४॥ किमी. आत तिचे घर. एवढ्या लांबून येऊनही वर्गात प्रथम क्रमांकाने पास झाली. शिवाय दोन विषयांचे बक्षीसही मिळवले. माझ्या विनंतीला मान देऊन चार वर्षे को-ऑर्डिनेटरचे वर्गासाठी कामही केले. पैसे साठवल्यावर पुढे शिकायची इच्छा तिला स्वस्थ बसू देईना. आई-वडील

लग्नासाठी मागे लागले. पण मला पुढील शिक्षण करायचे आहे हा हेका धरून कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत जी.एन.एम.साठी प्रवेश घेतला. अतिशय कष्टाने तोही पूर्ण झाला. मी मधूनमधून तिला भेटत असे. 'अमृता किती बारीक होत चाललीस ?' 'खूप धावपळ करावी लागते. सकाळी ७ ला वर्ग असतो. त्याआधी १५० मुलींमध्ये नंबर मिळवायचा. तेच दिव्य जेवणासाठी. वेळेत गेलो तर जेवण मिळणार. नाहीतर मेस बंद. मग उपाशी राहावं लागतं.' तरीसुद्धा तिने दोन्ही वर्षात 'बेस्ट कॅंडिडेट' म्हणून बक्षीस मिळवले. त्यानंतर दीनानाथ रुग्णालयात नोकरी लागली. थोडी वर्षे नोकरी करून तिने बी.एस्सी.ला प्रवेश घेतला. उत्तम मार्कांनी पास झाली. तेव्हा संस्थेतील अधिकारी म्हणाले, 'दवाखान्यात नोकरी करू नकोस. आपल्या इथेच शिक्षक म्हणून कामाला सुरुवात कर.' अतिशय कष्टाने एका छोट्या वर्गापासून सुरुवात करून अमृता आज एका उत्तम संस्थेत शिक्षक म्हणून काम करत आहे. हे पाहून खूप समाधान वाटते.

– श्रीमती पुष्पा नडे

❖ ❖ ❖

### रुग्णसहाय्यक अभ्यासक्रमाचा पुण्याबाहेरील विस्तार

दौंड येथील योगेश्वरी हॉस्पिटलच्या माध्यमातून अभ्यासक्रम चालू असून त्याचे हे दुसरे वर्ष आहे. रेल्वेमार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या अशा या गावामध्ये रुग्णसहाय्यक अभ्यासक्रमाची गरज भागवण्याचा प्रयत्न या केंद्राच्या माध्यमातून हेत आहे. सांगली येथील भगिनी निवेदिता प्रतिष्ठान या प्रसिद्ध संस्थेने हा अभ्यासक्रम यावर्षी सुरू केला आहे. अभ्यासक्रम पूर्ण करीत असलेल्या विद्यार्थिनींमधील वाढता आत्मविश्वास आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होत असलेले बदल पाहून या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या बॅचसाठी विद्यार्थिनींची नोंदणी सुरू झाली आहे. बार्शी येथे १९३४ पासून बार्शी तालुका हरिजन सेवक संघ ही संस्था कार्यरत असून संस्थेमार्फत गांधी छात्रालय चालवले जाते. या संस्थेमार्फत या वर्षाच्या अखेरीस रुग्ण सहाय्यक अभ्यासक्रम सुरू झाला आहे.

या तीन आणि आणखीन एक दोन जिल्ह्यांमध्ये नव्याने विस्तार होऊ शकणाऱ्या या अभ्यासक्रमाचे काम प्रभावी होण्यासाठी महिन्या-दोन महिन्यातून एखादी भेट त्या त्या केंद्राला देऊ शकतील अशा कार्यकर्त्यांचा एक स्वतंत्र संच उभारण्याची आवश्यकता जाणवते आहे. इच्छुक कार्यकर्त्यांचे महिला विभागात स्वागत आहे.

### वर्धिनीचा परीस लाभला अन्...!

सोनाली मुळे ही शास्त्र शाखेतून उत्तीर्ण झालेली बीडची मुलगी. पुढे शिकायची इच्छा असूनही बिकट आर्थिक परिस्थितीमुळे स्वतःच्या पायावर प्रथम उभे राहून मग शिकूयात, या विचाराने तिने माल्याच्या सहाय्यक परिचारिका वर्गात प्रवेश घेतला. वर्ग पूर्ण करून तिला नोकरीही लागली. दर महिना ५००० रु. मिळू लागले. पण शिक्षणाची उर्मी तिला शांत बसू देईना. पुढे J.N.M. ला प्रवेश घ्यायचा तर एक लाखापर्यंतचा खर्च शक्य नव्हता. ही अडचण वर्धिनीत येऊन पुष्पाताईंना सांगितली. वर्धिनीने तिला मदतीचा हात पुढे केला आणि तिने J.N.M. पूर्ण केले. सध्या दीनानाथ हॉस्पिटलमध्ये ती काम करत आहे. वर्धिनीकडून झालेल्या मदतीची आठवण ठेवून साठवलेले पैसे परत द्यायला ती आली होती. घेतलेले सगळे परत करायचे होते पण अचानक वडिलांचे ऑपरेशन झाले. त्यामुळे सगळे पैसे परत करता येत नाहीत हे सांगताना तिचे डोळे भरून आले होते. ती म्हणाली, 'खरं तर खूप उशीर झाला आहे पण उरलेली रक्कम लवकरच वर्धिनीला देईन. कारण माझ्या प्रगतीत तिचा सहभाग खूप मोठा आहे.'

**❖ कात्रज डेअरी, पुणे – संस्थाभेट –**

दि. १६ जानेवारीला पुण्यातील 'कात्रज डेअरी भेट' निश्चित करण्यात आली. श्रीमती प्रगती तांबट यांनी कात्रज डेअरीचे संपर्क अधिकारी श्री. तनपुरे यांच्याशी संपर्क साधून भेटीची वेळ निश्चित केली.

'पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ' म्हणजेच कात्रज डेअरी येथे सकाळी ११.३० वाजता सर्वजण पोहोचले. येथे श्री. तनपुरे यांनी स्वागत केले व कात्रज डेअरीची माहिती देणारी एक चित्रफीत दाखवली आणि संस्थेची अधिक माहिती दिली. श्री. मामासाहेब मोहोळ, श्री. आप्पासाहेब बांदल व श्री. वामनराव घाटे यांनी संस्थेची स्थापना १९६० साली केली. संस्था २० एकर परिसरात पसरलेली आहे. सध्या ९०० सभासद आहेत. संस्थेला ISO 9001 हे मानांकन मिळालेले आहे. पुणे जिल्ह्यात शासकीय, सहकारी व खासगी असे ६५ प्रक्रिया प्रकल्प व २० शीतगृहे आहेत. आलेले दूध फक्त २० सेकंदामध्ये तपासले जाते व त्यानंतरच टँकर आत जातो. दररोज साधारण २ लाख लिटर दूध जमा केले जाते. दूधापासून २० प्रकारचे अन्य पदार्थ तयार केले जातात. लोणी, तूप, खवा, सुगंधी दूध, दही, ताक, बटर, आईस्क्रीम इ. यानंतर आम्ही पॅकिंग, स्टोअरेज, लाँच व पाश्चरायझेशन हे सर्व विभाग पाहिले. निघण्यापूर्वी श्री. विवेक क्षीरसागर (व्यवस्थापकीय संचालक) यांची भेट घेतली व वर्धिनीच्या कार्याची माहिती दिली. श्री. क्षीरसागर यांनी वर्धिनीच्या कामाचे खूप कौतुक केले व लगेचच रु. १०००/– देणगी देऊन मासिक कार्यवृत्ताचे सभासदत्व देखील स्वीकारले. दररोजच्या वापरातले दूध पण ते शहरांमध्ये घरोघरी कसे पोहोचते, ते कुठून येते, उरलेल्या दुधाचे काय होते, या सगळ्यांची पूर्ण तांत्रिक माहिती या भेटीद्वारे मिळाली.

❖ ❖ ❖

**भारतीय स्त्रिया...**

भारतीय स्त्रिया अज्ञानी आहेत असं जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा तर आम्ही कुतर्काची परिसीमाच गाठतो असं म्हणावं लागेल 'लेखन–वाचन' एवढ्यालाच आधुनिक माणसं ज्ञान समजत असतील तर इकडल्या थोड्या स्त्रियांना लिहिता–वाचता येतं हे मान्य करावं लागेल. पण याचा अर्थ भारतीय स्त्रिया अडाणी आहेत असा करायचा का ? असं असेल तर प्रत्येक आई आणि आजी आपल्या मुलांना रामायण, महाभारत आणि पुराणं यातल्या ज्या कथा सांगते ते वाङ्मयच नाही असं म्हणावं लागेल. पण युरोपातील कादंबऱ्या व स्ट्रँडसारख्या मासिकांना आम्ही 'वाङ्मय' या सदरात घालतो ! हा विरोध कोणी मान्य करील का ? वास्तविक पाहता लेखन म्हणजे संस्कृती तर संस्कृतीच्या विविध परिणामांपैकी तो एक परिणाम आहे. कोणत्या समाजात वाङ्मयीन युगाच्या सुरुवातीला अतिशय उच्च प्रतीचे वाङ्मय निर्माण होते ? भारतीय जीवन ज्याने जवळून पाहिलं आहे त्याला असं आढळून येईल की इथल्या गृहशिक्षणात जो भारदस्तपणा, सौहार्द, धार्मिक संस्कार, स्वच्छता–टापटीप, मानसिक सुसंस्कृतता, सहृदयता यांचा समावेश झालेला दिसतो तो स्त्रीमुळेच. अशा स्त्रीला जरी कदाचित वाचता आलं नाही किंवा स्वतःची सही करता आली नाही तरी ती तिच्या टीकाकाराहून शतपटीने अधिक सुशिक्षित असते असंच म्हणावं लागेल.

**– भगिनी निवेदिता**

(लेखिका – प्रव्राजिका आत्मप्राणा)

❖ **अभ्यास दौरा :**

**विद्यार्थी मनोगत –**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने दोन दिवसाच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते.

दौऱ्याचा प्रवास सुरू झाला तो 'आदित्य प्रांगण' या संस्थेला भेट देण्यापासून. ही निवासी संस्था मतिमंद मुलांचा सांभाळ करते. आम्ही सर्वांनी या संस्थेचं कामकाज पाहिल्यानंतर आम्हाला 'माणुसकी म्हणजे काय ?' या प्रश्नाचे आपोआपच उत्तर मिळाले. 'स्वतःचा मुलगा मतिमंद आहे. अशीच समाजातील कितीतरी मुलं असू शकतात. त्याच्यासाठी कष्ट घ्यायचे आणि त्यांना आधार द्यायचे ठरवले.' ते व्यक्तिमत्त्व म्हणजे केंजळे दाम्पत्य होय. त्यांचा या वयातही असणारा कामाचा उत्साह आणि वंचित घटकांसाठी केलेलं काम यातून आम्हाला प्रेरणा मिळाली.

यानंतर आमचा प्रवास सुरू झाला. 'हिम्मत शाळा' या संस्थेकडे. ही संस्था 'नापासांची शाळा' म्हणूनही ओळखली जाते. जे विद्यार्थी नापास होतात, त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होऊ नये म्हणून हा सर्व अट्टाहास. परंतु या संस्थेचा मुख्य हेतू 'गावाचा विकास व गावातील तरुण गावात कसा राहील यासाठी प्रयत्न करणे' आहे. त्यासाठी आरोग्य, शिक्षण, संस्कार, शेती या क्षेत्रात अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. यातून आम्हाला स्पर्धा परीक्षेत कितीही अपयश आलं तरी हिम्मत कमी होऊ न देता प्रयत्न करत राहणे असा संदेश मिळाला.

आता आम्हाला उत्सुकता लागली होती 'आदर्श गाव–जामगावची'. गावाला भेट दिली अन् आम्ही थक्कच झालो. लोकांच्या बोलण्यातून, वागण्यातून आदर्श गावाची संकल्पना त्यांच्यामध्ये किती रुजलेली आहे हे समजलं. तसेच सौर ग्राम (सोलर व्हिलेज) म्हणून या गावाला का ओळखले जाते याचीही प्रचिती आली. या गावाला 'तंटामुक्ती, हागणदारीमुक्त व पर्यावरणपूरक विकास' पारितोषिक मिळालेलं आहे. हे गाव आदर्श करताना किती कष्ट घ्यावे लागले याचा प्रत्यय सरपंचाशी झालेल्या चर्चेतून मिळाला.

दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमातला पहिला टप्पा आदिवासी पाड्यावर श्रमदान करण्याचा होता. श्रमदानात विद्यार्थ्यांनी १४० झाडांभोवती आळी बनवली. आजूबाजूचे फोफावलेले गवत व तण काढले. प्रत्येक झाडाभोवती काटेरी कुंपण तयार केले. पाड्यावरील लोकांची व्यथा पाहवत नव्हती. पण आमच्या परीनं आम्ही मुलांच्यात खेळून, मनोरंजन करून हास्य निर्माण केलं, आनंद निर्माण केला.

या दौऱ्याची शेवटची भेट म्हणजे 'मानव्य संस्था'. एचआयव्ही बाधित मुलांसाठी काम करणारी. तिथं गेल्यावर क्षणभरसुद्धा असं वाटलं नाही की, ती एडसग्रस्त मुलं आहेत. कारण ती प्रत्येक क्षणाचा आनंद घेत होती. मोठ्या जिद्दीने जगण्याची त्यांची उमेद कायम होती. या अभ्यास दौऱ्यामुळे आम्हा सर्वांना आपण काय केलं पाहिजे ? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी दिशा मिळाली.

६ फेब्रुवारीला माओवादी चळवळीचे अभ्यासक, दै.लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार व 'नक्षलवादाचे आव्हान' या पुस्तकाचे लेखक श्री. देवेंद्र गावंडे यांचे 'भारतीय संविधानापुढे नक्षलवादाचे आव्हान' या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन झाली. नक्षलवादाचा उदय कोठे झाला, त्यामागील उद्देश, त्यांच्या कामाची पद्धत याची माहिती त्यांनी दिली.

१९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या गावात चारु मुजुमदार, कानु संन्याल, जंगल संथाल यांनी सावकारांनी केलेल्या शोषणामुळे गरीबांच्या झालेल्या दयनीय अवस्थेला वाचा फोडण्यासाठी उठाव केला आणि

हळूहळू भारताच्या ठराविक क्षेत्रात नक्षलवादाने शिरकाव केला. १९७९ साली महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात नक्षलवाद पसरू लागला. नक्षलवादाचा मुख्य उद्देश राजकीय सत्ता प्राप्त करणे हा आहे. दलम व संघम या दोन रचनांच्या साहाय्याने हे काम करत असतात. संघममधील लोक गावातील घडामोडींची माहिती घेऊन ती पुढे पाठवत असतात आणि याच्या आधारे कारवाई करणारी शस्त्रसज्ज गणवेशातील माणसे म्हणजे दलम गट. यासाठी लागणारा पैसा, तेंदुपत्ता व्यापारी, उद्योगधंद्यातून उभा केला जातो. गडचिरोली भागात सध्या चालू असलेल्या नक्षलवादी कारवाया म्हणजे भारताची एकात्मता दुबळी करण्याचा कट. हा कट हाणून पाडण्यासाठी सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रवादी संघटनांनी जनजागरण, जनसंघटन आणि जनसंघर्ष या सूत्रांचा वापर करून सुसूत्रीतपणे काम केले पाहिजे. या व्याख्यानामुळे भावी अधिकारी म्हणून नक्षलवादाबद्दल आपली भूमिका, जबाबदारी तेथील लोकांचे प्रश्न, प्रशासन, व्यवस्था याची माहिती मिळाली.

**❖ शहीद दिन**

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही बुधवार, दि. २३ मार्च रोजी स्पर्धा परीक्षा केंद्राने शहीद दिनाचे आयोजन केले होते. युवकांमध्ये सळसळते चैतन्य आणि देशभक्ती जागविणारा दिवस. श्री. वसंतराव ढोबळे, निवृत्त - सहाय्यक पोलिस आयुक्त हे करारी व्यक्तिमत्त्व प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांमध्ये उत्स्फूर्त भावना जागवणारे 'मन मस्त फकिरी धारी है, अब एकही धुन जय जय भारत...' हे पद्य केंद्राचे पालक श्री. चंदन हायगुंडे यांनी सादर केले आणि वातावरण भारुन टाकले. केंद्रप्रमुख सौ. मनिषाताई नरडेकर यांनी प्रास्ताविक केले. श्री. केशव पवार याने ढोबळे सरांचा परिचय करून दिला. तत्पूर्वी ढोबळे सरांच्या कामाचा आढावा घेणारी एक छोटी ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली. वर्धिनीचे कार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी स्वागत केले आणि ढोबळे सरांनी त्यांच्या मार्गदर्शनास सुरुवात केली. मुंबईतील डान्स बारवरील बंदी, देहविक्री व्यवसायातून महिलांची मुक्तता, या महिलांचे पुनर्वसन या सगळ्या कामगिरी करताना त्यांच्यावर प्रचंड दबाव होता. सहायक कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, स्वतःच्या पद्धतीने काम केले म्हणून तुरुंगवास, वर्षभर पगार पूर्णतः बंद, प्रसारमाध्यमातून होणारी उलट-सुलट चर्चा अशा एक ना अनेक संकटांना ते हिमतीने सामोरे गेले. ढोबळे सरांच्याच शब्दांत सांगायचे तर, ''घाबरला तो संपला. चुकीचे काम संपवण्यासाठी, गैरकृत्ये थांबवण्यासाठी कधी कधी चौकटही मोडावी लागते. वरिष्ठ आपली खरडपट्टी काढतात. नोटीस बजावली जाते, असे होते. म्हणून आपण काम थांबवायचे नाही. नोकरी जाईल, जीव जाईल यापलीकडे आणखी काही होणार नाही. याच विचाराने मी माझे काम चालू ठेवले. एका घटनेत मला सस्पेन्ड केले गेले. पण मी अजिबात घाबरलो नाही. रडलो तर मुळीच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी मी माझ्या गावी शेतात जाऊन काम सुरू केले. कधी-कधी मोठ-मोठे राजकारणी कारवाई थांबवा म्हणून दबाव आणतात. पण मी माझे काम चालू ठेवणार हे ठामपणे त्यांना सांगतो. त्यामुळे माझी कार्यपद्धती सगळ्यांनाच माहीत झाली. ठरवले तर आपण मोजता येणार नाही एवढा पैसा मिळवू शकतो. पण त्यातून समाधान नाही मिळत. एखाद्या गरीब व्यक्तीसाठी जेव्हा आपण काम करतो तेव्हा त्या व्यक्तीच्या डोळ्यात जे भाव असतात, त्यातून जे समाधान मिळते ते अमूल्य आहे.

प्रशासकीय अधिकारी राजकारण्यांपुढे बरेचदा लाचार होतात. तुम्ही कधीच लाचार होऊ नका. लाचारी म्हणजे एखाद्या कुत्र्यासारखे जिणे. आयुष्यात कुणालाही कधीच घाबरू नका. घाबरावे ते फक्त स्वतःच्या आत्म्याला. कारण तोच आपल्या कर्माचा एकमेव साक्षीदार असतो. आणि काय योग्य, काय अयोग्य तोच सांगू शकतो.

प्रामाणिकपणे काम करणाऱ्याच्या पाठीशी चांगले लोक नेहमीच उभे असतात. मग कधी–कधी त्यासाठी वरिष्ठही चौकटीबाहेर जाऊनही पाठिंबा देतात. चाळीस वर्षाच्या सेवेत असे बरेच प्रसंग आले.''

ढोबळे सरांचे प्रशासकीय सेवेतील अनुभव हेच विद्यार्थ्यांसाठी अतिशय स्फूर्तिदायी होते. सर्वांचे रक्त सळसळू लागले. 'उत्कृष्ट आणि प्रामाणिक काम करण्याचा निश्चय' आपोआपच प्रत्येकाने मनःपूर्वक केला. अनुभव कथनानंतर विद्यार्थ्यांनी ढोबळे सरांना बरेच प्रश्न विचारले. त्यांनी अत्यंत तर्कसंगत उत्तरे देऊन विद्यार्थ्यांचे समाधान केले. विद्यार्थ्यांमध्ये एवढा उत्साह होता की शेवटी वेळेअभावी काही प्रश्न थांबवावे लागले. या कार्यक्रमामध्ये एप्रिलमध्ये होणाऱ्या 'महाराष्ट्र वनसेवा' व 'राज्य सेवा' पूर्वपरीक्षांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ढोबळे सरांनी खास त्यांच्या शैलीतून भावी अधिकाऱ्यांना खूप खूप शुभेच्छा दिल्या. तसेच याच कार्यक्रमात 'विक्रीकर निरीक्षकपदी' निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार ढोबळे सरांच्या हस्ते झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणखी कृतकृत्य वाटले आणि आम्हीपण सरांसारखे काम करू असा दृढनिश्चय केला.

शेवटी श्री. बापू शिंदे याने केलेल्या आभार प्रदर्शनाने आणखी रंग चढला.

❖ **गुणगौरव –**

जानेवारी ते एप्रिल २०१६ या चार महिन्यांत लागलेल्या निर्णयात केंद्रातील १० विद्यार्थी यशस्वी झाले.

राज्यसेवा परीक्षेत यात राज्यात कु. मेघा ढोले ही विद्यार्थिनी राज्यात मुलींमध्ये पहिली आली.

दि. २३ एप्रिल रोजी देशपातळीवरील माहितीच्या अधिकाराचे अभ्यासक श्री. विवेक वेलणकर यांच्या हस्ते व श्री. सतीश पाटील सर यांच्या उपस्थितीत गुलाबपुष्प व राज्यघटनेच्या प्रस्ताविकेची प्रत देऊन सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पाहुण्यांच्या हस्ते ओंकार पूजन व त्यानंतर चंदन हायगुंडे सर यांच्या प्रेरक गीताने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.

सत्कारार्थींनी आपल्या अभ्यासाच्या अनुभव कथनातून सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

* कु. मेघा ढोले – 'आई वडिलांच्या कष्टाने व नेहमी मिळालेल्या त्यांच्या प्रोत्साहनपूर्वक पाठिंब्याने हे यश मी गाठू शकले. यश बोलके असते तर अपयश मुके. अपयशाने खचून न जाता आपण कोठे कमी पडलो हे ओळखून सातत्यपूर्ण अभ्यासाला जास्त महत्त्व आहे. आयुष्यात कितीही मोठे झाले तरी आपल्या कामाप्रती सदैव नम्र राहण्याचा संस्कार 'स्व'–रूपवर्धिनीत झालेल्या व्याख्यानांतून व अन्य उपक्रमांतून झाला आहे.'

* श्री. हेमंत जगदाळे – ''पराभव आधी मनात होत असतो नंतर रणात', म्हणून तुमच्या मनाने एकदा तुम्हाला अधिकारी म्हणून स्वीकारले तर तुम्ही अधिकारी निश्चित व्हाल असा आत्मविश्वास ठेवूनच परीक्षार्थी व्हा. परीक्षेत लवकर यश मिळवण्यासाठी योग्य ध्येय, योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन, योग्य साधने आणि प्रेरणा या पंचसूत्रीला समोर ठेवून वाटचाल करा.'

* श्री. प्रवीण कोळी – 'स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना शिस्त व संयम याला खूप महत्त्व आहे. स्वयंअध्ययनाइतकीच गटचर्चाही महत्त्वाची आहे.'

* श्री. हिरालाल चौधरी – 'परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावर खचून न जाता, प्रामाणिकपणे व पूर्ण क्षमतेने सामोरे जा. यश मिळवण्यासाठी कठोर मेहनतीस पर्याय नाही.'

प्रमुख पाहुणे श्री. विवेक वेलणकर यांनी २००५ पासून लागू झालेल्या माहिती अधिकार अधिनियम याचा प्रसार व प्रचार करताना आलेले वेगवेगळे अनुभव सांगितले व पुढे म्हणाले की, ''शासकीय अधिकारीपद म्हणजे सतीचे

वाण आहे. तो तुम्ही स्वतःहून घेतलेला वसा आहे. तो टाकू नका. काम करताना उतू नका, मातू नका.''

कार्यक्रमाचा समारोप करताना श्री. सतीश पाटील सर म्हणाले, ''चारित्र्यशील अधिकारी घडवणे या एकाच ध्येयाने आपल्या केंद्राची सुरुवात झाली आहे. केंद्रात वर्षभर होणारे मार्गदर्शन, यशस्वी कार्यरत अधिकाऱ्यांची व्याख्याने, अभ्यास दौरे, विविध स्पर्धा यातून या वर्षाअखेरीपर्यंत निदान ५० विद्यार्थी अधिकारी म्हणून निवडले जातील.''

**❖ प्रेरणा सत्र –**

प्रमुख वक्ते – श्री. अक्षय शिंदे (IPS, महाराष्ट्र केडर)

ठराविक कालांतराने प्रत्येक विद्यार्थ्याला एका प्रेरणेची गरज असते. त्यामुळे अधिक जोमाने प्रयत्न सुरू होतात, विद्यार्थी प्रोत्साहित होतात. दररोज साचेबद्ध पद्धतीने अभ्यास करून जी मरगळ येते, ती झटकून टाकण्यासाठी ही प्रेरणासत्रे लाभदायक ठरतात.

दि. २९ जून २०१६ रोजी UPSC-२०१५ मध्ये निवड झालेले (IPS) भारतीय पोलिस सेवेतील अधिकारी श्री. अक्षय शिंदे यांचे प्रेरणासत्र झाले. सोबत केंद्राचे माजी विद्यार्थी श्री. संदीप भंडारे (गटविकास अधिकारी) हे उपस्थित होते. ओंकार पूजन व स्तवनाने सत्र प्रारंभ झाले. मनिषाताईंनी दोन्ही अधिकाऱ्यांचे स्वागत केले आणि शिंदे सरांच्या मार्गदर्शनास सुरुवात झाली.

''धरलेली वाट न सोडता त्याच मार्गाने चालत राहा आणि प्रामाणिक प्रयत्न करा, यश तुमचेच आहे. अंतिम ध्येय ठरवताना आपण कधीतरी गडबडतो. पण हे चुकले तरी अक्षम्य मात्र नक्कीच नाही. त्यातूनच शिका आणि मार्ग काढा. यश तुमचेच आहे. अभ्यासात सातत्य ठेवा, ताण न घेता नियोजनबद्ध अभ्यास करा. एकाच विषयाची भारंभार पुस्तके वाचण्यापेक्षा, एका विषयाचे एकच दर्जेदार पुस्तक वापरणे लाभदायक ठरते. 'पोस्ट'ला जीवन मरणाचा प्रश्न बनवू नका. तो जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे हे लक्षात घ्या. सहजपणे ताणरहित अभ्यासाचा प्रवास सुरू ठेवा.''

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देताना शिंदे सरांनी त्यांचे पूर्व परीक्षेपासून, मुलाखतीपर्यंतचे अनुभव सांगितले. प्रशिक्षणादरम्यानचे रंजक अनुभव कथन केले. पुढील काही दिवसांसाठी झटून अभ्यास करून भारतीय प्रशासनाकडे वाटचाल करायला विद्यार्थी पुन्हा सज्ज झाले.

**❖ शिष्यवृत्ती वर्गाचे उद्घाटन –**

दि. २७ सप्टेंबर या दिवशी ६ व्या स्पर्धा परीक्षा केंद्र शिष्यवृत्ती (MPSC मार्गदर्शन) वर्गाचे उद्घाटन केंद्राची माजी विद्यार्थिनी मेघा ढोले (तहसीलदार – २०१५, राज्यात मुलींमध्ये प्रथम) यांच्या हस्ते झाले. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या प्रथेप्रमाणे २०१५–१६ च्या विद्यार्थी प्रतिनिधींनी नवीन वर्गाच्या प्रतिनिधींना तुळशीचे रोप देऊन वर्गाचे हस्तांतरण झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात 'यशाने दुमदुमवू त्रिभुवने' ह्या प्रेरणादायी गीताने झाली.

आपल्या अनुभव कथनातून मेघाताईंनी सर्वांना मार्गदर्शन केले, ''अभ्यासासाठी दर्जेदार पुस्तके वापरून त्यात सातत्य ठेवा. पहिल्या प्रयत्नामध्ये यश मिळवण्याचा संकल्प करा. स्वतःवर व केलेल्या अभ्यासावर विश्वास ठेऊन परीक्षेला धाडसाने सामोरे जा. यश हे नक्की मिळेल. प्रश्नपत्रिकांचे सखोल निरीक्षण अभ्यासात महत्त्वाचे असते. वैयक्तिक गोष्टींचा परीक्षेवर परिणाम होऊ देऊ नका. इच्छा तेथे मार्ग असतो हे लक्षात ठेवा. यश हे अपयशाच्या बाजूलाच दडलेले असते तेव्हा अपयशाने निराश होऊ नका, स्पर्धा परीक्षा हेच जीवन नसून तो एक जीवनातला आपण निवडलेला मार्ग आहे. अभ्यासाबरोबर आपले छंद जोपासा. त्यामुळे आपण आनंदी राहतो. अनुभव हे

पुस्तकातून मिळत नाहीत म्हणून अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन घ्या. मनापासून अभ्यास करत असाल तरच स्पर्धा परीक्षेला वेळ द्या; अन्यथा आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करा.''

कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले वित्त व लेखा अधिकारी श्री. उमेश मगदूम यांनी आपल्या मनोगतात बालपणीच्या संघर्षमय आठवणी सांगितल्या. अशा अनेक अडचणींवर मात करून जिद्दीने त्यांनी स्पर्धा परीक्षेत यश मिळवले आहे. अधिकारी झाल्यानंतर सामाजिक कार्याचे भान ठेवून त्यांच्या गावात अभ्यासिका सुरू केली आहे.

यानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र खूप रंगले. यासाठी श्रीमती मेघाताई ढोले, श्री. उमेश मगदूम, श्री.विजय गोते (सहायक विक्रीकर आयुक्त) यांनी अभ्यासपूरक बहुमोलाचे मार्गदर्शन केले.

**❖ अभ्यास दौरा –**

दि. २४ ऑक्टोबरला स्पर्धा परीक्षा केंद्रातील नवीन शिष्यवृत्ती वर्गातील विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा सिंहगडला गेला. सकाळी ७ वाजता शनिवारवाडा बसस्थानकापाशी सर्वजण जमले. बस सुरु होताच 'भारत माता की जय', 'जय भवानी जय शिवाजी' अशा घोषणा देत प्रवास सुरु झाला. ९ वाजता सिंहगडाच्या पायथ्याशी सर्वजण पोचले. नाष्टा करून गड चढायला सुरुवात केली. थंडीचे वातावरण असले तरी सिंहगड चढताना दमछाक होत होती. ११.३० वाजता सगळेजण गडावर पोहोचले. आत्तापर्यंत पुस्तकात वाचलेला सिंहगडाचा इतिहास श्री. सौरभ करडे यांच्याकडून ऐकताना सर्वजण मंत्रमुग्ध झाले. कल्याण दरवाजा, तानाजी कडा येथे तानाजी व सर्व मावळ्यांच्या पराक्रमाचे स्मरण त्यांनी करुन दिले. या विषयाला अनुसरून प्रेरणादायी गीत सर्वांनी म्हटले. सगळा गड बघून झाल्यावर श्री. ज्ञानेश पुरंदरे सरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपूर्ण शैलीत सांगितले. जिजाबाईंनी शिवरायांवर केलेल्या संस्कारांमुळे हिंदवी स्वराज्य स्थापनेची प्रेरणा शिवरायांना मिळाली आणि यासाठी त्यांनी अविरत मोहिमा केल्या. अनेक संकटांना ते सामोरे गेले अशी प्रेरणा घेऊन आपणही काम केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. यानंतर सहभोजनाचा आस्वाद घेतला. नंतर प्रार्थना झाली व गड उतरायला सुरुवात केली.'आपल्या आयुष्यात सुभेदार तानाजीरावांप्रमाणे 'देशकार्य' हाच प्राधान्याचा विषय असायला हवा' हा विचार मनात घेऊन सर्वजण परतले.

❖ ❖ ❖

भगिनी निवेदितांनी मुलींसमोर चित्तोड दुर्गाचे शब्दचित्र उभे केले. त्या स्वतः चित्तोड पाहून आल्या होत्या. मी तेथे कशी गेले, दुर्ग कसा चढले, तेथील धूळ कपाळाला कशी लावली, गुडघे टेकून डोळे मिटून हात जोडून प्रार्थना कशी केली हे निवेदितांनी सविस्तर सांगितले. तेथील आठवणींनी त्यांचे अंतःकरण उचंबळून आले. त्या उद्‌गारल्या, 'मुलींनो काय सांगू तुम्हाला ? मला तेथे साक्षात पद्मिनी दिसली. मळवट भरलेली, केशरी वस्त्र नेसलेली, दोन्ही हातांवर जळता कापूर घेतलेली, धगधगत्या चितेत उडी टाकणारी पद्मिनी मी पाहिली. ती वीरकन्या आणि वीरपत्नी पद्मिनी ! विद्युल्लतेसारखी तळपणारी पद्मिनी ! हजारो लाखो वीरांना शतकानुशतके प्रेरणा देणारी पद्मिनी ! धन्य चित्तोड, धन्य भारत, धन्य भारतातील स्त्रिया !

**– भगिनी निवेदिता**

(लेखक – प्रा.प्र.ग. उपाख्य भय्याजी सहस्रबुद्धे)

**मनामनाला जोडणारी दिवाळी –**

'आलिया दिवाळी आनंद घेऊनी उजळेल आपले घर लख्ख प्रकाशांनी'

पण... असेल का कुठे असा आसरा प्रकाशाच्या कवडशासाठी तरसलेला.

'माझ्या घरी एक पणती, कुणीतरी लावून देईल' अशी वाट पाहणारा..

दिव्यांच्या झगमगाटाला, कवडशाची किंमत काय? लख्ख प्रकाशाने उजळून निघालेल्यांना अंधाराची जाणीव काय? जरी झाली जाणीव, तरी कोणते हात पुढे येतील आपल्याच बांधवांना प्रकाशात घेऊन जातील..'

दिव्यांच्या प्रकाशात सर्वजण आनंदाने दिवाळी साजरी करताना कुठेतरी फुटपाथवर अंधारात कोमजलेले चेहरे पण दिसत असतात. अशांना साथ हवी असते. प्रेमाने ओथंबलेल्या शब्दांची. आमची 'स्व'–रूपवर्धिनी' ही संस्था अशाच, कोमजलेल्या चेहऱ्यावर बहाराची लकेर उमटवणारी माणसं तयार करणे आणि समाजात त्यांना कार्यरत करणे हे काम करते.

कल्पना तशी साधीच. या वर्षी बऱ्याच मित्रमैत्रिणी परीक्षेमुळे दिवाळीला घरी जाऊ शकत नव्हते, म्हणून सगळ्यांनी ठरवलं की पुणे स्टेशनवरच्या रस्त्यावरील मुलांना आणि त्यांच्या पालकांना एकत्र आणून 'हृदयजोड दिवाळी' साजरी करूयात. त्यासाठी जनसंपर्क, नियोजन आणि प्रत्यक्ष कार्यक्रम अशा तीन टप्प्यात उपक्रमांची आखणी झाली. दिवाळीच्या तीन चार दिवस आधी त्या मुलांना व त्यांच्या पालकांना भेटायला सरुवात झाली. त्यामुळे संख्येचा अंदाज आला. त्याबरोबर आर्थिक बाबीचाही अंदाज आला. सर्वांचा फराळ, मुलांना भेटवस्तू व पालकांना शुभेच्छा पत्र अशा खर्चाच्या बाबी होत्या. यासाठी खर्चाची रक्कम अभ्यासिकेतील ४० मुलांनी उभी केली.

सगळ्यांनी मिळून पुणे स्टेशनच्या आजूबाजूचा परिसर हिंडून संपर्क केला. काहींनी या उपक्रमासाठी आर्थिक मदतही मिळविली. आणि पुढील नियोजन सुरू झाले. तीन गटात फराळवाटप, भेटवस्तू वाटप व मनोरंजनात्मक खेळ अशी कामांची विभागणी झाली.

ठरल्याप्रमाणे दिवाळीच्या पाडव्याला ३१ नोव्हेंबरला संध्याकाळी सोमवार पेठेतील शाहू उद्यानात आम्ही सर्वजण जमलो. काही विद्यार्थ्यांचे पालक व श्रीमती पुष्पाताई नडे या कार्यक्रमात स्वखुशीने सहभागी झाले. अभ्यासिकेतील ४० विद्यार्थी, संपर्कातील २५ मुलं–मुली व त्यांचे पालक असा जवळजवळ ८० जणांचा परिवार आगळी वेगळी दिवाळी साजरी करण्यासाठी जमला होता. प्रथम सर्व मुले, विद्यार्थी यांचा परिचय झाला. त्यानंतर पालकांचाही. अशी कधी वेळ त्यांच्यावर आलीच नव्हती. म्हणून प्रथम जरा अवघड वाटलेले काम 'पण मुलांच्या संदर्भातून परिचय करून द्या' असं सांगितल्यावर पालक छान बोलते झाले. यानंतर मुलांचे विविध गुणदर्शन–कला सादरीकरण झाले. कुणी गाणी म्हटली, कुणी कविता तर कुणी नाच केले. सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक केले. पालकांसाठी संगीत खुर्चीचा खेळ झाला. **खेळताना त्यांचा उत्साह बघून, त्यांचा आनंद बघून आम्ही सर्वजण कृतकृत्य झालो.** यानंतर फराळाची मेजवानी झाली. छोट्या मुलांना भेटवस्तू व पालकांना शुभेच्छापत्र व पुस्तके 'दिवाळीभेट' म्हणून दिली. **बागेतून निघताना प्रत्येकाचा चेहऱ्यावर समाधानाची लकेर दिसत होती. आणि आम्हालाही प्राप्त परिस्थितीत जिद्दीने मार्ग काढण्याची, हसत खेळत जीवन जगण्याची शिदोरी या कार्यक्रमातून मिळाली.**

**विशेष अभ्यास सत्र – 'अर्थक्रांती' – काळापैसा, नोटांचा बदल आणि त्याचे परिणाम –**

'दि. २६ नोव्हेंबर २०१६ संविधान दिन' या दिवशी सकाळी १०.०० वाजता 'स्व'–रुपवर्धिनीतील स्पर्धा परीक्षा केंद्राने संविधान दिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त 'काळापैसा, नोटांचा बदल व त्याचे अर्थकारणावर होणारे परिणाम' या विषयावर श्री. यमाजी मालकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. 'संविधानाच्या सरनाम्याच्या' वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर 'नवीन पर्व के लिए नवीन प्राण चाहिए' हे प्रेरणादायी गीत झाले.

२६–११ या दिवशी दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या व भारतीय सीमेवर लढताना वीरगती प्राप्त झालेल्या सर्व भारतमातेच्या सुपुत्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

'अर्थक्रांती' हा विषय समजून घेण्यासाठी मालकर यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेमधील स्थान याकडे लक्ष वेधले. जगामध्ये असलेल्या १९६ देशांमध्ये संपत्तीचा निकष मानले जाणारे 'सोने' याचे प्रमाण लक्षात घेता भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारत हा गरीब देश नसून तो एक आर्थिकदृष्ट्या संपन्न देश आहे असे ते म्हणाले. आपली समाजव्यवस्था चांगली आहे. फक्त आपली आर्थिक व्यवस्था बदलली पाहिजे आणि ही व्यवस्था बदलण्यासाठी घेतलेला निर्णय म्हणजे अर्थक्रांती असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारने पाचशे व हजार या चलनातील नोटांवर आणलेली बंदी ही योग्य आहे. हा निर्णय १३० कोटी लोकांच्या हिताचा आहे. हा निर्णय ७० वर्षापूर्वी घेणे गरजेचे होते; पण आपण दिशा चुकलो व आपण ज्या रस्त्याने जायला निघालो होतो, तो रस्ताच चुकीचा होता. योग्य रस्ता दाखविण्यासाठी केलेला हा बदल म्हणजे अर्थक्रांती होय. या बदलाची सुरवात म्हणजे पाचशे व हजार या नोटांवर आणलेली बंदी होय. यामुळे देशातील काळा पैसा कमी होईल, दहशतवाद कमी होईल व महागाईवर नियंत्रण येईल. सर्वसामान्य माणसाच्या जगण्यावर हा निर्णय परिणाम करेल अशी खात्री त्यांनी दिली.

भारतातील ७०% लोकांचे दरडोई उत्पन्न हे १५० रुपयांपेक्षा कमी आहे. यामुळे मोठ्या नोटांची आपल्याला गरज नाही. कारण या नोटांचा साठा हा खूप जास्त प्रमाणात आहे व तो काळा पैसा आहे. त्यामुळे हा निर्णय भारतीय अर्थव्यवस्थेला योग्य दिशा देणारा आहे. दुसरे म्हणजे पाचशेच्या नोटांचे प्रमाण ४५% आहे व एक हजार या नोटांचे चलनातील प्रमाण ३९% आहे. दोन्ही मिळून ८६% आहे. हा पैसा भारतीय अर्थव्यवस्थेला धोका निर्माण करणारा आहे. त्यामुळे त्याच्या साठ्यावर नियंत्रण हे भ्रष्टाचार, अमली पदार्थ या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी निश्चित प्रभावी ठरेल. नोटाबंदी नंतर आता करव्यवस्थेमध्ये बदल करण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. कर हा सामान्य माणसाला अडचणीचा ठरत असून त्यामधील बदल हा अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण बदल ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांना त्यांनी दृकश्राव्य सादरीकरणातून उत्तरे दिली. आपल्या मार्गदर्शनाच्या शेवटी त्यांनी भारताचे नागरिक म्हणनू सर्वांना खालील पाच संकल्प करायला सांगितले.

१) देशाच्या प्रश्नासाठी मी समूहांना जबाबदार धरणार नाही. आणि माझ्या देशाची बदनामी करणार नाही.

२) भारत हा अतिशय समृद्ध देश आहे. हे मला पटले असून त्याला मी यापुढे कधीही गरीब देश म्हणणार नाही.

३) भारतीय लोकशाही कितीही दृढ असली तरी चांगली व्यवस्था नसल्याने ती चांगली करण्याच्या प्रयत्नात मी सहभागी होईन.

४) भारतीय नागरीकांची वृत्ती दोषी नसून व्यवस्था दोषी आहे. त्यामुळे त्या व्यवस्थांना प्रश्न विचारण्यास मी सुरुवात करीन.

५) देशाचे आणि माझे आर्थिक व्यवस्थापन एकमेकांना घट्ट जोडलेले असल्यामुळे शक्य तेथे स्वच्छ पैशांचा मी आग्रह धरीन.

व्यवहार करीत असताना हे पाच संकल्प मी मनापासून पाळीन असा संकल्प प्रत्येकाने केला. यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

❖❖❖

## 'अमूल्य' अमोल

परवा अमोल श्रीनगरवरून आल्याचे कळले, घरी भेटायला गेलो. अमोल मावशीकडे राहतो, त्याचे मूळ गाव दिवळे. परंतु लहानपणापासून तो पुण्यात मावशीकडे आहे. भेटीत अनेक गप्पा झाल्या आणि विचारले, ''गावाकडे काय हालहवाल ?'' चेहऱ्यावरचे भाव बदलत गेले आणि अमोल बोलू लागला, ''सर, नोकरी करून आलेल्या पगारातून गावाकडचे घर बांधायचे ठरवले. गावाकडे आईला छानसे घर करून देऊ या विचाराने श्रीनगरवरून आलो, तर कळाले की आई गेल्या २ महिन्यांपासून गावाकडे नाही. इथे पुण्यातच असते. वडीलांनी दारु, कर्ज याची साथ सोडली नाही. आईला मारहाण करणे चालूच होते. त्यामुळे घर बांधायचा विचार कायमचाच बंद करून टाकला.''

मित्रांनो मी वरील सत्यकथा सांगतोय आपल्या वर्धिनीच्या श्रद्धानंद शाखेत लहानाचा मोठा झालेला युवक अमोल पांगारे याची. गावाकडे घर, स्वतःचे शेती, आई-वडील व २ बहिणी. परंतु वडिलांना दारुच्या व्यसनाने पुरते पछाडलेले. अमोल लहानपणापासूनच पुण्यातील मावशीकडे खडकमाळ इथे रहायला. चिवट खेळाडू आणि शांत स्वभावाचा अमोल. वडीलांचे दारु पिणे, शेतीकडे दुर्लक्ष करणे, घरात कोणतीही मदत न करणे, आईला मारहाण करणे हे रोजचेच होते आणि आहे.

शाखेचे संस्कार आणि मावशीने कष्ट करून मुलासारखा केलेला सांभाळ. यामुळे अमोल या सगळ्या विपरीत परिस्थितीतून शिकत आज भारतीय सेनेमध्ये भरती झाला आहे. महाविद्यालयीन शिक्षण करताना सकाळी चारला उठून पेपर टाकणे नंतर कॉलेज दुपारी नोकरी आणि संध्याकाळी शाखा असा खडतर प्रवास अमोलने केला.

'पदी धैर्य बाहूत शौर्य स्फुरावे, घडावी विवेकी कृती ध्यास हा ।' ही वर्धिनीची प्रार्थनेतील ओळ लक्षात ठेवून अमोल व त्याच्या दोन्ही बहिणींनी आज स्वतःचे उत्तम स्थान निर्माण केले आहे. स्वतःची जमीन, शेती असून पोट भरण्यासाठी आईला दुसऱ्यांच्या शेतीवर मजुरी करावी लागते... बहिणींनी स्वतःच्या लग्नासाठी स्वतः नोकरी करून पैसे कमाविले. अमोलने नोकरी करीत भारतीय सेनेत आपला ठसा उमटविला. या यशासाठी तो वर्धिनीला त्याचा प्रेरणास्त्रोत मानतोच परंतु मावशीने अमोलसाठी केलेले कष्ट, दिलेले संस्कार आणि भरपूर माया या जोरावर आज उत्तमतेकडे जाऊ शकलो असे तो म्हणतो. अमोलचे हे यश अमूल्य आहे एवढेच...

– श्री. निलेश धायरकर

## अभिनंदन

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | कु. मेघा ढोले | तहसीलदार–वर्ग अ (राज्यात मुलींमधून प्रथम) |
| २) | कु. प्रियांका ढोले | तहसीलदार वर्ग अ |
| ३) | श्री. संजयकुमार डव्हळे | तहसीलदार वर्ग अ |
| ४) | श्री. स्वप्नील जाधव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्ग अ |
| ५) | श्री. प्रसादकुमार सांगळे | कक्ष अधिकारी वर्ग ब |
| ६) | श्री. प्रवीण कोळी | कक्ष अधिकारी वर्ग ब |
| ७) | श्री. कैलास केंद्रे | मुख्याधिकारी नगरपरिषद वर्ग ब |
| ८) | श्री पंकज मंदाडे | नायब तहसीलदार वर्ग ब |
| ९) | कु. प्रिया देहेडकर | सहाय्यक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क वर्ग ब |
| १०) | कु. ज्योती भगत | मुख्याधिकारी नगरपरिषद वर्ग ब |
| ११) | श्री हिरालाल चौधरी | वन संरक्षक ऑफिसर वर्ग ब |
| १२) | श्री. प्रवीण लेले | वन संरक्षक ऑफिसर वर्ग ब |
| १३) | श्री. विक्रांत खाडे | वन संरक्षक ऑफिसर वर्ग ब |
| १४) | कु. चेतना शिंदे | वन संरक्षक ऑफिसर वर्ग ब |
| १५) | श्री. प्रदीप बागडे | विक्रीकर सहाय्यक |
| १६) | श्री हेमंत जगदाळे | सहाय्यक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक |
| १७) | श्री. रवी थोरे | न्यायदंडाधिकारी (JMFC-C) |
| १८) | श्री. चेतन कुंभार | विक्रीकर निरीक्षक |
| १९) | श्री. नंदिकेश्वर भुरे | विक्रीकर निरीक्षक |
| २०) | श्री. गणेश गोरे | विक्रीकर निरीक्षक |
| २१) | श्री. मिथुन मेटकरी | सहाय्यक कक्ष अधिकारी |
| २२) | श्री. पंकज आखरे | आरोग्य पर्यवेक्षक |
| २३) | श्री. विनोद लोंढे | जिल्हा महिला बाल विकास अधिकारी वर्ग ब |
| २४) | श्री. अभिमान माने | जिल्हा महिला बाल विकास अधिकारी वर्ग ब |
| २५) | श्री. तानाजी वांद्रे | पोलीस कॉन्स्टेबल |
| २६) | श्री. गोरख लवटे | SBI JUNIOR ASSOCIATE |
| २७) | श्री. गणेश गुजर | SBI JUNIOR ASSOCIATE |
| २८) | श्री. सागर साळवे | अग्निशमन सहाय्यक (मुंबई) |
| २९) | कु. राजश्री काटकर | कनिष्ठ अभियंता, जलसंपदा विभाग |
| ३०) | श्री. जीवन गंभीरे | कनिष्ठ लिपिक, वैद्य. शिक्षण व संशोधन विभाग |
| ३१) | श्री. नितीन एकुंडे | तलाठी |
| ३२) | श्री. उमेश मठपती | पोलिस कॉन्स्टेबल |
| ३३) | श्री. प्रदीप पाटील | कनिष्ठ अभियंता, जलसंपदा विभाग |



आजपर्यंत भारताने ज्या विकासाच्या कक्षा पाहिल्या असतील त्यापेक्षा कितीतरी विस्तृत विकास कक्षेच्या उंबरठ्यावर हा देश या शतकाच्या सुरुवातीपासून उभा आहे.

❖ पुण्यातील विशेष मुलांसाठी असणाऱ्या विद्याज्योती शाळेचे संचालक व 'स्व'-रूपवर्धिनीचे कोषाध्यक्ष श्री. कन्हैयालाल बलदोटा यांना त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल 'प्रसन्न ऑटिझम सेंटर'तर्फे ६ फेब्रुवारीला 'चतुरस्त्र' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

❖ सामाजिक समरसता मंचाचे पश्चिम क्षेत्रप्रमुख श्री. सुनील भंडगे यांना 'दलित उद्योजकांचे व्यवसाय व औद्योगिक विषयातील योगदान' या विषयावरील पीएच.डी. प्राप्त झाली आहे.

❖ 'स्व'-रूपवर्धिनीचे हितचिंतक, माजी शिक्षक, कार्यकर्तेव विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष प्रा. राघव अष्टेकर यांना 'सूर्यनमस्कार, श्वसन व्यायाम व ओंकार साधना यांचा ८ ते १६ या वयोगटातील जलपटूंच्या जलतरण क्षमतेवर होणारा परिणाम' या विषयावर पीएच.डी. प्राप्त झाली.

❖ ज्ञानप्रबोधिनी निगडी केंद्राचे संस्थापक श्री. वामन नारायण अभ्यंकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'स्व'-रूपवर्धिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. रघुनाथ नरवणे सर यांना त्यांच्या क्रीडा, नाट्य, वाद्यसंगीत, साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी, वर्धिनीच्या व्यक्तिमत्त्व विकसन अभ्यासक्रम तयार करण्यातील योगदानाबद्दल तसेच माध्यमिक अध्यापक या नात्याने राष्ट्रजीवनातील महत्त्वाच्या योगदानासाठी 'कृतज्ञता पुरस्कारा'ने गौरवण्यात आले.

❖ इनरव्हील क्लब ऑफ पुणे नॉर्थ यांनी शिक्षक दिनाच्या निमित्ताने एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. १३ सप्टेंबर रोजी झालेल्या या कार्यक्रमात 'स्व'-रूपवर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि फिरती प्रयोगशाळा प्रकल्पाचे प्रमुख श्री. सुनील कुलकर्णी सर यांचा गौरव करण्यात आला. गेल्या २२ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मुळशी आणि हवेली तालुक्यांमध्ये श्री. सुनील कुलकर्णी सर यांनी फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना जे मार्गदर्शन केले. त्यांच्यामध्ये विज्ञाननिष्ठा जागवण्याचे जे काम केले त्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ पुणे नॉर्थ यांनी 'नेशन बिल्डर अ‍ॅवॉर्ड' देऊन श्री. कुलकर्णी सरांचा यथोचित गौरव केला.

❖ विवेकानंद सेवा मंडळ, डोंबिवली यांच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ 'सृजन सोहळा' अद्ययावत तंत्रज्ञानाच्या यथोचित वापराने अत्यंत प्रेक्षणीय झाला. सोहळ्यात याच वर्षापासून सुरू करण्यात आलेला 'प्रकाशयात्री' पुरस्कार 'स्व'-रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन यांना प्रदान करण्यात आला. रु. २१,००० रोख, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. त्यांच्याबरोबर श्री. चंद्रिकाभाभी चौहान, उद्योगवर्धिनी सोलापूर व श्री. चैतराम पवार, वनवासी कल्याण आश्रम, बारीपाडा यांनाही हा पुरस्कार देण्यात आला.

'स्व'-रूपवर्धिनी परिवारातर्फे सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

❖ ❖ ❖

सामाजिक रुढी-परंपरा नष्ट करण्याच्या चळवळींमुळे भारत जागा झाला आहे.
त्याच्या अंगी कर्तृत्व आहे वगैरे गोष्टी आपोआप पुराव्याने सिद्ध झाल्या.

गतवर्षी वर्धिनीच्या कार्यकारिणीची पुनर्रचना केली गेली. त्यामध्ये अर्थसमितीच्या अंतर्गत वेगवेगळ्या उपसमित्यांची स्थापना करून त्यांचे प्रत्यक्ष कामही सुरू झाले आहे.

वर्धिनीचे विविध अंगांनी विस्तारणारे कार्यक्षेत्र, कामासमोरील विविध आव्हाने, भौगोलिक विस्तार या साऱ्याचा विचार डोळ्यासमोर ठेवून कार्यनियोजन केले आहे. दरवर्षी कामाची वाढ होत आहेच. त्यामुळे निधीचीही आवश्यकता वाढत आहे. हा सर्व निधी आपल्यासारख्या अनंत शुभचिंतकांच्या सहाय्यानेच देणग्यांमधून उभा करायचा आहे. 'स्व'-रूपवर्धिनीने आजपर्यंत कोणतेही शासकीय अनुदान घेतलेले नाही व भविष्यातही घेणार नाही. हा विश्वास केवळ आपल्यासारख्यांमुळेच आला आहे. आपले काम निधीअभावी कधीच अडले नाही, ते केवळ समाजातील आपल्यासारख्या सज्जन शक्तीमुळेच.

पण वाढीच्या या टप्प्यावर अर्थ विभागाची परिणामकारकता व वेग दोन्हीही वाढण्याची गरज आहे. याचसाठी अर्थसमितीच्या अंतर्गत तीन उपसमित्या कार्यरत आहेत. १) निधी संकलन २) वित्त व्यवस्थापन ३) खरेदी व खर्च यातील निधी संकलन समितीची जबाबदारी मोठी आहे. कामाच्या वाढीसोबतच आर्थिक शिस्त व नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यातील सहजता व सुलभता वाढवण्यासाठी आपण प्रयत्नरत राहणार आहोतच.

| | मिळालेल्या देणग्या | खर्च-मूळ उद्देश | प्रशासकीय खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १०५ लक्ष | ८४ लक्ष | १३ लक्ष | ९७ लक्ष |
| | | अंदाजपत्रकीय | | |
| | आवश्यक देणग्या | मूळ उद्देश खर्च | प्रशासकीय खर्च | एकूण खर्च |
| २०१६-१७ | १३० लक्ष | ११२ लक्ष | १८ लक्ष | १३० लक्ष |
| २०१७-१८ | १५५ लक्ष | १३६ लक्ष | २१ लक्ष | १५५ लक्ष |

### टाटा मोटर्स - विद्याधनम् योजना

टाटा मोटर्स प्रा. लि. तर्फे दरवर्षीप्रमाणे १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व इ. ८ वी ते १० वी गटातील विद्यार्थ्यांच्या तासिका घेण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळाले. याव्यतिरिक्त वर्धकांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडवणारे विविध कार्यक्रम, उपक्रम व शिक्षणपूरक भौतिक सोयीसुविधांचा विकास व्हावा यासाठीही निधीची उपलब्धता करून दिली आहे.

### Leaders of Tomorrow

पर्सिस्टंट फाऊंडेशनने संस्थेच्या इ. ५ वी ते ७ वीतील ३० वर्धकांच्या शालेय शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी घेतली असून मुलांसाठी एका पुस्तक वाचनासंदर्भात शिबिरसुद्धा घेतले आहे.

### विशेष आभार

टाटा मोटर्स, प्रबोध उद्योग, पर्सिस्टंट फाऊंडेशन, टाटा पॉवर, बजाज अलायन्ज जनरल इन्शुरन्स कं. लि. व कॉटन किंग यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) अंतर्गत केलेल्या भरीव सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

**'स्व'–रूपवर्धिनीचे संस्थापक–सदस्य रामकृष्ण परशुराम देसाई यांचे एप्रिल २०१६ मध्ये तर श्री. कृष्णाजी गोविंद उर्फ राजाभाऊ लवळेकर यांचे जून २०१६ मध्ये निधन झाले. वर्धिनीच्या विकासात आणि कार्यकर्त्यांच्या घडणीत या दोघांचा मोलाचा वाटा होता. त्यांना भावपूर्ण आदरांजली.**

## शिस्त, सेवाभाव व आपुलकी

**रामकृष्ण परशुराम देसाई –**



रा. प. या नावानं जास्त परिचित असलेले देसाई सर हे एक अतिशय वेगळं पण जाणून घ्यावं आणि अनुकरण करावं असं व्यक्तिमत्त्व. कृषी खात्यातून अधिकारी पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतलेले देसाई सर वर्धिनीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक. स्पष्टवक्ते असले तरी त्या स्पष्टपणाला आत्मियतेचा ओलावा असायचा. वर्धिनीत ते जरी निवृत्तीच्या टप्प्यावर संपर्कात आले असले तरी सामाजिक कामात ते लहान वयापासून होते. शाळेत जाताना दररोज खिशात थोडा कापूस आणि आयोडिनची छोटी बाटली घेऊन जाणारे ते एकमेव विद्यार्थी असावेत. समाजाच्या उपयोगी पडावं हा स्वभाव तेव्हापासूनच. त्यांनी अनेक वर्षे होमगार्डसमध्येही अधिकारी या नात्याने काम केले आणि दंगलींसारख्या कसोटीच्या क्षणी धोका पत्करून वाहन चालक बनून आवश्यक त्या ठिकाणी कुमक घेऊन पोहोचणारे हे व्यक्तिमत्त्व होतं.

ससून रुग्णालयात नेत्रपेढीसाठी काम करणारे, स्वतः किमान ५० वेळा रक्तदान केलेले आणि कुटुंबातून किमान १०० रक्तदान शिबिरात सहभाग देणारे देसाईंचे कुटुंब हे अगदी आदर्श वाटावे असेच होते. गुन्ह्याची शिक्षा भोगून झाल्यावर पुन्हा समाजात नीट वावरता यावं म्हणून चालणाऱ्या कैदी पुनर्वसन प्रकल्पामध्ये स्वेच्छेने वेळ देणारे देसाईंचे रुप फार वेगळं असायचं. दरोड्याची शिक्षा भोगून घरी परतण्याच्या टप्प्यावर असलेल्या कैद्याशी त्यांचा झालेला संवाद विलक्षणच होता. ते त्या कैद्याला म्हणाले, 'काय रे जेलमधून बाहेर पडल्यावर तू काय करणार ?' तो कैदीही तितकाच निगरगट्ट. तो म्हणाला, 'इथून बाहेर पडलो की एक दरोडा टाकणार आणि मिळणाऱ्या पैशातून पोराबाळांसाठी कपडेलत्ते, मिठाई घेऊन जाणार. देसाई त्याच्यापेक्षा टणक. ते म्हणाले, 'मग असं कर मी तुला माझे घर दाखवतो. बाहेर पडलास की माझ्याच घरावर दरोडा टाक.' देसाईंचं हे वाक्य ऐकलं मात्र आणि त्या कैद्याच्या डोळ्यात अश्रू तराळले. देसाईंचे पाय धरत तो म्हणाला, 'माझ्या हातून असं वंगाळ पाप होणार नाही.' गुन्हेगारातील माणूस जागा करण्यातलं त्यांचं योगदान फार मोलाचं होतं.

जीवनाच्या शेवटच्या आश्रमात देसाई पतीपत्नींनी ठरवून वृद्धाश्रमात राहणे पसंत केले. वृद्धाश्रमाच्या या वास्तव्यात जीवनाच्या या टप्प्यावर दुःखाला कुरवाळत न बसता आनंदानं कसं जगावं हे सहनिवासी वृद्धांना त्यांनी सांगण्याचं व्रत स्वीकारलं. अनेक वृद्धाश्रमात त्यांना त्यासाठी बोलावलं जायचं.

वर्धिनीचे कार्यवाह म्हणूनही त्यांनी दिलेले योगदान आणि सुरुवातीच्या काळात मुलांना लावलेलं वळण फार मोलाचं आहे. शाखा सुरू होण्याआधी किमान पाच मिनिटे देसाई सर मैदानावर उभे असायचे. त्यांना पाहून रमतगमत येणाऱ्या वर्धकांच्या पावलांना आपोआप गती यायची. मुलांच्या घरी त्यांनी केलेला संपर्क, बदलवलेल्या सवयी, एका मुलाला आपल्या घरी चार महिने ठेवून घेऊन त्याच्या वागण्यात घडवून आणलेला बदल सारं काही मंत्रमुग्ध करून सोडणारं.

**देशप्रेम, बांधवप्रेम, जन्मस्थळाचा अभिमान, भविष्याविषयी आशा आणि भारतावरील नितांत भक्ती एवढ्या गोष्टी एकत्र आल्यास वाटेल ते आश्चर्य घडवता येईल.**

समाजसमर्पित अशा या व्यक्तिमत्त्वाचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळामुळे निधन झाले. वर्धिनी परिवार त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

---

## ऐसी कळवळ्याची जाती !

**कृष्णाजी गोविंद उर्फ राजाभाऊ लवळेकर –**

संत तुकाराम महाराजांनी संतांचे वर्णन 'ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ।।' असे केले आहे. व्यावहारिक जगात जो तो आपल्या स्वार्थासाठी धडपडत असताना इतरांवर निरपेक्षपणे मायेची पाखर धरणारेही आपल्या अवतीभवती असतात. राजाभाऊ लवळेकर हे त्यातीलच एक.



पुण्यातल्या काही ध्येयवेड्या शिक्षकांनी सदतीस वर्षांपूर्वी एकत्र येऊन एक संस्था सुरू केली. तीही पूर्व भागात. आधी काम सुरू झाले आणि मग तिला नाव मिळाले 'स्व'–रूपवर्धिनी. हे नाव आणि त्याचा अर्थ ज्यांनी आमच्या मनात खोलवर रुजवला त्यात राजाभाऊ अग्रभागी होते. वर्धिनीत प्रारंभीच्या काळात ज्यांची घडण झाली, ती आम्ही सारीच मुले भाग्यवान ठरलो. आम्हाला एका नव्हे; तर दोन कृष्णांचे मार्गदर्शन मिळाले. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन उर्फ किशाभाऊ आणि दुसरे कृष्णाजी गोविंद लवळेकर उर्फ राजाभाऊ. किशाभाऊंनी आम्हाला शिक्षणाच्या वाटेवर पुढे नेताना व्यावहारिक जगाचे भान दिले, तर राजाभाऊंनी जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली.

राजाभाऊ विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. पिंपरीतल्या हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या शाळेत ते शिक्षक होते. नंतर न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेचे ते मुख्याध्यापक झाले. किशाभाऊंचा त्यांचा आधीपासूनच परिचय होता. वर्धिनीत येणारी आम्ही मुले वेगवेगळ्या शाळांमध्ये शिकणारी होतो. वर्धिनीच्या आमच्या पहिलीच तुकडीसाठी दहावीचे मार्गदर्शन शिबिर रमणबाग शाळेत झाले. तेव्हा राजाभाऊंनी घेतलेला मराठीचा तास अजूनही स्मरणात आहे. कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही कविता ते शिकवत होते. रुपकांचे–शब्दांचे अर्थ उलगडताना त्यांनी आम्हाला वेगळ्याच भावविश्वात नेले. त्यांच्याकडून आम्ही केवळ कवितेचा 'रसास्वाद' शिकलो नाही, तर जगण्यातल्या साध्यासुध्या गोष्टीही तरलतेने पहायला शिकलो.

राजाभाऊंची रसाळ वाणी त्यानंतरही अनेकदा कानी पडली. स्वच्छ उच्चार आणि शब्दांचे अलगद हात धरून येणारे तितकेच स्पष्ट विचार. संतांच्या वचनांची–विशेषतः तुकोबारायांच्या अभंगांची त्यात पखरण असायची. 'अणुरणिया थोकडा, तुका आकाशाएवढा' हे इतक्या वेळा आणि इतक्या संदर्भात त्यांच्याकडून ऐकले की, आपणही तुकोबा व्हावे ही ऊर्मी मनात दाटून यायची. गोपाळ गणेश आगरकरांचे समाजसुधारणेचे विचार पहिल्यांदा त्यांच्याकडूनच ऐकले. 'विचारकलहाला का भिता ?' हे सूत्र त्यांच्यामुळेच मनावर पक्के ठसले.

'सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार', हे वर्धिनीच्या कामाचे एक मध्यवर्ती सूत्र आहे. किशाभाऊ, राजाभाऊ व इतर जाणत्या शिक्षकांच्या सहवासातूनच वर्धिनीच्या कार्यकर्त्यांची घडण झाली. राजाभाऊंची भाषणे ऐकण्याबरोबरच त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पांचा आनंदही मोठा होता. वर्धिनीच्या स्थापनेआधीची एक गोष्ट राजाभाऊ नेहमी सांगायचे. पुण्याच्या पूर्व भागामधल्या पेठा आणि उपेक्षित वस्त्यांमधील गुणवान विद्यार्थ्यांसाठी



तीन हजार वर्षांची जुनी संस्कृती ही ! हिला मार्गदर्शन करायला काल–परवा निर्माण झालेल्या पाश्चात्त्य देशांची काय गरज आहे ?

वर्धिनी सुरू करण्यासंबंधी किशाभाऊ व त्यांचे सहकारी अनेकांशी विचारविनिमय करत होते. त्यावेळी तु. ना. माताडे हे एक शिक्षक आमदार होते. 'पूर्व भागात तुम्ही फार काळ काम करू शकणार नाही', असे माताडे त्यांना म्हणाले. तेव्हा किशाभाऊ आणि सहकाऱ्यांनी ते आव्हान म्हणून कसे स्वीकारले, हा किस्सा राजाभाऊ आवर्जून सांगत. राजाभाऊंमुळे रमणबागेतले इतरही अनेक शिक्षक वर्धिनीत शिकवायला येत. भारत हायस्कूलसारख्या इतर शाळांमधले शिक्षकही त्यात सहभागी होते. सुरुवातीच्या काळात या प्रेमळ आणि ध्येयवादी शिक्षकांचे बळ लाभल्यानेच वर्धिनीच्या कामाचे रोपटे जोम धरू शकले, हे इथे नम्रपणे नमूद करायला हवे.

'कोणत्याही संस्थेचा विकास होत असताना त्याला स्वतःची एक स्वाभाविक गती आणि दिशा असते', असे राजाभाऊ नेहमी सांगायचे. त्याला ते 'क्रमशः विकास' असे म्हणायचे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी घाई करून उपयोगाची नाही; संस्था मोठी होत जाते तसे त्या टप्प्यावर पुढचे उपक्रम दिसू लागतात, असा त्यांचा कायम सल्ला असे. त्याचबरोबर वर्धिनीसारख्या संस्थांचे काम समाजातली सज्जन शक्ती जागवण्याचे आणि संघटित करण्याचे आहे, असे ते आवर्जून सांगत. लोक अनेकदा मोठे विचार सांगतात; पण त्यांचा व्यवहार मात्र तसा नसतो. राजाभाऊ त्याला अपवाद होते. संपर्कात येणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्त्यांशी त्यांचे बोलणे अतिशय आपुलकीचे आणि सलगी देणारे असे. सार्वजनिक संस्था-संघटनांमध्ये काम करणाऱ्यांना केव्हाही भेटता येईल आणि मोकळेपणाने बोलता येईल, अशी एखादी व्यक्ती हवी असते. राजाभाऊ आमच्यासाठी असे हक्काचे स्थान होते. केव्हाही अस्वस्थ वाटायला लागले की, राजाभाऊंकडे जावे आणि पुढच्या कामासाठी नवी उभारी घेऊन बाहेर पडावे, असे अनेकदा झाले आहे. किशाभाऊंनी वयोमानामुळे कार्याध्यक्ष पदाची सूत्रे खाली ठेवली, तेव्हा वर्धिनीच्या जुन्या-नव्या कार्यकर्त्यांना नेणते मार्गदर्शन करणारे राजाभाऊच होते.

मित्र, तत्त्वज्ञ आणि वाटाड्या अशी 'मितवा'ची ही भूमिका राजाभाऊंनी केवळ वर्धिनीसाठी नव्हे; तर अनेक संस्थांसाठी बजावली. 'सार्वजनिक संस्थांचा आधारवड' असे त्यांचे वर्णन सार्थ ठरावे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगराचे कार्यवाह म्हणून हजारो स्वयंसेवकांचे ते आधार बनले. संघाच्या प्रेरणेतून 'संस्कार भारती'चे काम नव्याने सुरू झाले, तेव्हा पश्चिम क्षेत्राची जबाबदारी राजाभाऊंकडे होती. कलाक्षेत्रात नवी संस्था उभारण्याचे आणि अनेक कलाकार तिला जोडण्याचे काम राजाभाऊंनी सहजतेने केले. भारतीय दृष्टिकोनातून कलेकडे कसे पाहायचे, याची वैचारिक मांडणी त्यांनी समर्थपणे केली. पुण्यातल्या दैनिक तरुण भारतचे संपादक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. हे वृत्तपत्र केव्हाही बंद पडेल अशा स्थितीत असताना राजाभाऊंनी संघाने सांगितले म्हणून ही जबाबदारी स्वीकारली. संपादकपदाची धुरा तर त्यांनी समर्थपणे सांभाळली; पण तरुण भारत बंद झाल्यावरही नंतर अनेक वर्षे त्यासंबंधीचे दावे आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात त्यांची मोठी शक्ती खर्च झाली. शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणूनही राजाभाऊंचा एक प्रकारचा नैतिक धाक होता. कर्वेनगरमधल्या ज्ञानदा प्रशालेच्या स्थापनेत आणि विकासातही त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

बाहेर अनेकांचे असे आधार होताना, राजाभाऊंचा घरातला वावरही तितकाच कुटुंबवत्सल होता. त्यांचे संपूर्ण घरच संघाच्या कामाला-सार्वजनिक कार्याला वाहिलेले असल्यासारखी स्थिती होती आणि आजही आहे. गेल्या काही वर्षांत वयोमानाप्रमाणे राजाभाऊंचे शरीर थकले. मधुमेहामुळे हालचालींवर मर्यादा आली. ऐकणे-दिसणेही कमी झाले. शरपंजरी पडलेल्या भीष्मासारखीच जणू त्यांची स्थिती झाली होती; तरीही त्यांचे मन अर्जुनाचे सारथ्य करणाऱ्या कृष्णासारखे कार्यकर्त्यांशी बोलण्यासारखे आसुसलेले असे. त्यांच्या नजरेतून आणि स्पर्शातून

कामाविषयीची तळमळ-त्यांच्याच भाषेत सांगायचे, तर 'ये हृदयीचे ते हृदयी' झिरपत असे. राजाभाऊंची ही तळमळ आणि कार्यकर्त्यांविषयीचा अकृत्रिम जिव्हाळा आपल्या सर्वांच्या हृदयात असाच चिरकाल पाझरत रहावा आणि पुढच्या पिढ्यांकडे 'हृदयांतरित' होत रहावा, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**- श्री. संजय विष्णू तांबट**

---

## आठवणी दाटतात

साहित्य कला अकादमीच्या पुरस्काराने सन्मानित सुप्रसिद्ध मराठी लेखक आनंद यादव यांचे दुःखद निधन झाले. कथा, काव्य, कादंबरी, समीक्षा, ललित अशा विविध प्रकारचे लेखन त्यांनी केले. ग्रामीण साहित्य संमेलन, समरसता साहित्य संमेलन आदी संमेलनांचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले.

'स्व'-रूपवर्धिनीशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. संस्थेच्या मकरसंक्रमण उत्सवात अध्यक्ष या नात्याने त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले होते.

'झोंबी' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक साहित्य क्षेत्रात खूपच गाजले होते.

❖ ❖ ❖

'स्व'-रूपवर्धिनीच्या परिवारातील मार्गदर्शक, हितचिंतक, कार्यकर्ते, देणगीदार व विद्यार्थी वर्गाचे आप्तेष्ट यांचे निधन झाले. त्या सर्व कुटुंबियांच्या दुःखात वर्धिनीचा सर्व परिवार सहभागी आहे.

डॉ. रा. चिं. ढेरे

श्री. दिलीप मारुतराव नडे

श्री. अनिलराव गाडगीळ

श्री. वसंतराव कानिटकर

श्री. इरगोंडा पाटील

श्रीमती प्रभा दरोडे

श्री. बंडोपंत परचुरे

श्रीमती वासंती कुलकर्णी



श्री. सुरेशराव केतकर

श्रीमती उषाताई पटवर्धन

श्री. माधवराव मेहेंदळे

श्री. इराप्पा कुर्ले

श्रीमती विजया तांबट

श्री. अनंता शेडे

श्री. निशिकांत कुलकर्णी

प्रा. सौ. कुंदा महादेवकर

श्री. प्रकाश काळे

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक–श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२**

**शाखा विभागप्रमुख–श्री.** निलेश धायरकर ✆ : ९०२१०७४५२१

## भाग १ (शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. विजय कुर्ले ✆ : ८४८४९३४३५५**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| समर्थ रामकृष्ण शाखा | बाबुराव सणस कन्याशाळा,<br>२२/१, मंगळवार पेठ, पुणे – ११. | कु. राधेश्याम महाडीक<br>✆ : ९८२२६०६७११ |
| स्वामी योगानंद शाखा | एम. ई. एस. भावे हायस्कूल, (पेरुगेट)<br>सदाशिव पेठ, पुणे – ३० | कु. जितेंद्र काळे<br>✆ : ९७६७५८२२२८ |
| स्वामी श्रद्धानंद शाखा | म. गांधी विद्यालय<br>घोरपडे पेठ, पुणे – ४२ | कु. महेश ढवळे<br>✆ : ९१७५७६२७७४ |
| वीर अभिमन्यू बालशाखा | 'स्व'–रूपवर्धिनी वास्तू<br>२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,<br>पुणे – ११ | कु. निलेश चव्हाण<br>✆ : ८४१२०२०३२४ |

## भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. प्रसाद मोहोळ ✆ : ९६३७७९८१८१**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| स्वामी अखंडानंद शाखा | सिताराम आबाजी विद्यालय,<br>बिबवेवाडी, पुणे – ३७ | कु. शुभम शिंदे<br>✆ : ८००६२९४२५० |
| स्वामी दयानंद सरस्वती शाखा | विश्वकर्मा विद्यालय, | कु. आकाश देशमुख<br>अप्पर इंदिरानगर,पुणे ३७<br>✆ : ७७९८११६९६३ |
| स्वामी शिवानंद शाखा | कै. वि. स. खांडेकर शाळा<br>सहकारनगर, पुणे–९. | कु. सनी लोंढे<br>✆ : ९५२७५६१७२१ |
| धर्मवीर शंभू राजे शाखा | प्रेरणा माध्यमिक विद्यालय,<br>गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | श्री. अजय रायकर<br>✆ : ९०९६८५९६२४ |

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. शिवाजी खरात ✆ : ९८८१२०४०३७**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| स्वामी सुबोधानंद शाखा | पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय, एरंडवणे गावठाण, पुणे – ५२ | कु. सिद्धार्थ जांभुळकर ✆ : ८१४९४३८४३२ |
| स्वामी ब्रह्मानंद शाखा | म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे – ५१ | कु. हेमंत राजगुडे ✆ : ९६२३२०७८३९ |
| राजर्षी शाहू शाखा | सम्राट अशोक विद्यालय, कर्वेनगर, पुणे – ५२ | श्री. सतीश बिराजदार ✆ : ९१३९६०६०९८ |
| नरवीर तानाजी मालुसरे शाखा | हरिभाऊ पोकळे प्रशाला, | कु. योगेश लोणकर धायरी. पुणे ४१ ✆ : ८६९८४८४५६८ |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. विपुल शेलार ✆ : ९७६४०४७६९०**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंद शाखा | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे–१६ | कु. हनुमान मेकडे ✆ : ७५०७९३३१६७ |
| स्वामी अभेदानंद शाखा | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे – १६ | कु. राहुल इंगळे ✆ : ७७९८४७७१२३ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : कु. गौरी चन्द्रे ✆ : ९३२६२४४१०२**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख |
|---|---|---|
| भगिनी निवेदिता शाखा | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे – ११ | कु. प्रिया गोरे ✆ : ८८०५४६७३४० |
| क्रांतिज्योती सावित्री शाखा | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे – ४२ | कु. पौर्णिमा कांबळे ✆ : ७२४९०८३८४४ |
| साप्ताहिक शाखा, कर्वेनगर | शिशुविहार प्रशाला, कर्वेरोड, पुणे ४ | सौ. संगीता कुलकर्णी ✆ : ८६००१०१३०७ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार – सायं. ६ ते ८.३०, शनिवार– दु. ४.३० ते ७.३०, रविवार– स. ७.३० ते १०.३०



**ऐक्याची बलशाली कल्पना, जिवंत आणि समर्थ राष्ट्रीय भावना, एक वारसा, एक जीवन व एक झगडा यातून प्रगट होईल. सर्वांच्या आशा–आकांक्षा समान होतील.**

# शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे ✆ : ९८२२८२३७५७**

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे, सौ. मंजुषा कुलकर्णी**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. संगीता शेडगे** बचतगट समन्वयक – **सौ. उषाताई पोफळे**

## उद्योगशिक्षण वर्ग

१) सहायक परिचर्या (पुणे वर्ग) – **सौ. लता सत्तूर**

सहायक परिचर्या (माले वर्ग) – **सौ. दुर्गा केणी, सौ. साधना सातपुते**

२) शिवण वर्ग (पुणे) – **सौ. संगीता पाटील, सौ. मनिषा कुलकर्णी**

३) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

## प्रकल्पांचे पत्ते

## व

## संपर्काच्या वेळा

| स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र | अभ्यासिका केंद्र | ग्रंथालय |
|---|---|---|
| सौ. मनिषाताई नरडेकर | श्री. स्वप्निल काटकर | श्रीमती नीला कुडलिंगार |

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

## विस्तार विभाग

**शाखा उपक्रम – वर्धिनीची उपकेंद्रे**

१) लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान, सातारा २) जनभारती प्रतिष्ठान, लातूर ३) सेतू चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर

**रुग्ण सहाय्यक वर्ग**

१) योगेश्वरी हॉस्पिटल, दौंड २) भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, सांगली

३) हरिजन सेवक संघाचे गांधी छात्रालय, बार्शी

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

**सर्वसामान्य पुरुषांना स्फुर्ती देणं, त्यांची श्रद्धा बळकट करणं आणि नवीन दृष्टी देणं हे कार्य स्त्रियाच करतात.**

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२

२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४

२) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९

२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८

३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) – प्रत्येक बुधवार

२) कुटुंब सल्ला केंद्र – प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*

२) अभ्यासिका

३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी

२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण

३) साक्षरता वर्ग

४) सहाय्यक परिचर्या वर्ग

५) शिवण वर्ग

६) बचतगट

७) कुटुंब सल्ला केंद्र

८) सेवावस्ती संस्कार वर्ग

९) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**

१०) अभ्यासिका केंद्र

*हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळांमध्ये चालतात.

**कार्यालय विभाग**


सौ. मेघा नडे-नगरे, कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
श्रीमती नीला कुडलिंगार, श्री. अशोकराव चिपळूणकर
(२६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**


२२/१, मंगळवार पेठ,
पारगे चौक, पुणे – ४११०११

**संपर्क**

सोमवार ते शनिवार,
दु. ११.३० ते सायं. ५.३०




# प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची भावपूर्ती महा ॥

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
असा सर्व स्वप्नांस साफल्य यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥ १ ॥






जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या कुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥ २ ॥



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-बळे
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ॥ ३ ॥



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पथ दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥ ४ ॥

विद्यार्थी जीवनाचे जे आदर्श या देशाने निर्माण केले आहेत
तसे आदर्श इतर कुठल्याही देशाने निर्माण केलेले नाहीत.

# जनकल्याण रक्तपेढी, पुणे

**विभागीय रक्तसंक्रमण केंद्र**

१००३, शुक्रवार पेठ, स्वारगेट बस स्थानकाजवळ, पुणे ४.

दूरभाष – २४४४९५२७/२४४४४५०२




गरीब व गरजू बालकांसाठी रक्तपेढीची विशेष सवलत योजना

समाजातील गरीब व गरजू बालकांस सवलतीच्या दरात रक्तपिशवी मिळावी यासाठी जनकल्याण रक्तपेढीने 'बालसंजीवनी' ही योजना कार्यान्वित केली आहे. अशा बालकांसाठी जनता बँकेच्या कुठल्याही शाखेत खाते क्र. २२०१/८४७८६ या खात्यात किमान रु. १००० चे योगदान आपण देऊ शकता. आपले हे योगदान कुणाला तरी पुनर्जीवन देऊ शकते.

**बालसंजीवनी योजनेमध्ये अवश्य सहभागी व्हा !**

**अधिक माहितीकरिता संपर्क : ९८६०२२५४१०, ७३५०००२४६०**



CHEM-TECH **With Best Compliments From**

***M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.***

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex,
Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com



# नील इंजिनियर्स

**सिव्हील इंजिनियरींग,** *Construction*
**वॉटर ॲण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस**

**श्री पराग लकडे**

फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

751, Kasba Peth,
Sattoti Chowk,
Pune 411 011




**भूमातेने आपल्याला जन्म दिला, अन्नपाणी दिलं, मित्र दिलं, सुहृद दिले आणि तिनेच आपल्याला जीवनविषयक श्रद्धा दिल्या. ही आपली खरोखरची माता नव्हे का ?**

स्व-रूपवर्धिनीच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा!!

# संपदा सहकारी बँक लि. पुणे.

मुख्य कार्यालय : ७१७ बुधवार पेठ, डी.आय.सी. बिल्डिंग, कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११ ००२.
फोन नं. : (०२०) २४४५६०८३, २४४५९७०८, २४४५१८३० फॅक्स : २४४९३२६१
ई-मेल : sampadabank@rediffmail.com वेब साईट : www.sampadabank.com

**संपदाची साथ म्हणजे संपन्नतेकडे वाटचाल!!**

**आठवी शाखा आपल्या सेवेत लवकरच कोंढव्यात**
मानाचा **'बँको पुरस्कार'** प्राप्त बँक
ऑडिट **'अ'** वर्गातील, लाभांश देणारी बँक

* आयकर, सर्व्हिस टॅक्स व व्हॅट इ. कर ऑन-लाईन भरण्याची सुविधा
* RTGS / NEFT द्वारे त्वरित पैसे पाठविण्याची सोय
* CBS द्वारे कोणत्याही शाखेतून व्यवहार

| | | |
|---|---|---|
| **आनंद देशपांडे** | **अप्पाजी आपटे** | **सीए विवेक मठकरी** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

*With Best Compliments From*

# M/S KBC Systems

- **Cold Storage and Refrigeration Engineers**
- **Manufactures of Surface Coating Systems**
- **Authorized Distributor for TTK Healthcare Ltd.**
- **Panipuri and other Fryums product for Maharashtra**

| | |
|---|---|
| **Vijay Bane** | **Satish Chapekar** |
| 9422301700 | 9422031071 |

भूमातेला 'महा-भारत' या रूपात पुन्हा पाहायला आपल्याला आवडणार नाही का ?

निरामय योगचिकित्सा केंद्र

Programming Yogic Lifestyle!

**MULTIDIMENSIONAL HEALTH CURE & PREVENTION CENTRE**



पाठ दुखी / संधीवात / हृदयरोग / रक्तदाब / मधुमेह / दमा / स्त्रियांच्या व्याधी / पचनाचे विकार / तणाव यांसाठी

**Medical Yog व नैसर्गिक उपचार चिकित्सा**

**(१० दिवसांचा Effective Course)**

वाढते वजन - तणाव व Complications यांसाठी

**POWER YOG BATCH**

**DIET | DETOX | HERBS यांसहीत**

संपर्क : ९८८११४४६३२ । ९९२२४६५६९५ । ०२०-३२५१६८२२

Websites : www.yog4you.com, www.backpaintreatment.co.in

Like us : www.facebook.com/yogtherapy Email : niramay_yog@yahoo.com

*With Best Compliments From*

**THE POONA MOTOR GOODS TRANSPORT**

- *Fleet-Owners & Transport Contractors*
- *Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa*
- *Full truck load service for Maharashtra & Gujrath State*

❖ ❖ ❖

**Head Office :** 780, Sadashiv Peth,
Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ **Branch** ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935

❖

13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi,
Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210

❖

Ramraj Yadav Chal, Gala No. 2,
90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072,
Phone : 28513018

**हार्दिक शुभेच्छा !**

**मनकर्णिका**

**With Best Compliments From**

**PROTOTYPE ENGG. CO.**

***Govt. Approved Valuers for Plant Equipment/Machinery Consulting / Chartered Engineers***

**Tel. : 22662496, 22631214,**

**Cell : 9820302436**

**E-mail : vijayswar@hotmail.com**




## जनता बँकेच्या सहाय्याने
## बँकिंग व्यवहार एका क्लिकवर...
## केव्हाही, कोठूनही!

- अत्यंत सोपी, गतिमान आणि सुरक्षित सेवा
- कोणत्याही बँकेच्या बचत खाते, चालू खाते अशा खात्यावर रक्कम पाठविणे सहज शक्य
- आपल्या खात्यावरून इलेक्ट्रीसिटी, टेलिफोन, मोबाईल अशा सर्व घरगुती बिलांचे पेमेंट शक्य
- मुदत ठेव, आवर्त ठेव, चेकबुक विनंती अशा सर्व व्यवहारांची सुविधा
- इंटरनेट बँकिंगसाठी कोणतीही भौगोलिक मर्यादा नाही
- या व अशा अनेक अद्ययावत सुविधांसह...


*अटी लागू

**जनता बँक JANATA BANK**

I.S.O. 27001 आणि I.S.O. 9001 प्रमाणित
डेटा सेंटर असलेली सहकारी बँक

**जनता सहकारी बँक लि., पुणे** (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com


NOVEL
SEWING MACHINES
Reg. TM No. 533716
Since 1955 ®
NOVEL
Mark of a Quality Sewing Machine
FOR HOME & INDUSTRIAL USE SEWING MACHINES
Delux Model
Link Model
Designer Auto Zigzag Portable Models
TA-1 Umbrella Model
NL 1377
Chainstitch Buttonstitch with 2 type operation Machine
Designer Model (with chain & gear)
NL-737/747/757
Novel 3/4/5 Thread High Speed Machine Overlock
95 T - 10 Model
NL - 5550
Single Needle Lockstich High Speed Auto Lubrication Machine Complete Set.
NL-781
Button Hole Machine
NOVEL SEWING MACHINES
777, Raviwar Peth, Pune - 411002. | Tel : 020 - 24458207. 24458318 Fax : 24472797 Email : novelsm@gmail.com
Tel. : - 020 - 24464946 / 47, Fax : 24461895. | Email : novel.bharat@gmail.com
Pimpri : 206, Mumbai Pune Road, Pimpri Chowk, Pimpri, Pune - 18. Tel : 27426853. 27424504. email : novel.pimpri@gmail.com
Kolhapur : 464, Shahu Rd., Shahupuri, Kolhapur - 01. Tel : 0231 : 2657115 / 2653528 / 2652365.
Website : www.novelsewingmachines.com

# 2 BED ROOMS SPACIOUS FLATS IN AMBEGAON (KHURD)

## READY POSSESSION
## NO VAT / NO SERVICE TAX

# M/s. Baldota Samal & Asso.

"Krutanjali" Shangrila Restaurant Lane,
65/20, Erandavana, Law College Road,
PUNE - 411 004

**Contact**

**Tel. : 2543 3000 / 3200**

**Mobile : 99223 - 00044**


स्वातंत्र्य ही प्रत्येक देशाची न्याय्य मागणी आहे. ऑस्ट्रियापासून इटली स्वतंत्र झाला.
तुर्कस्थानापासून ग्रीस स्वतंत्र झाला. तसाच इंग्लंडपासून भारतही स्वतंत्र होऊ इच्छितो.




हातोड्याचे घाव घालून किंवा तुम्ही मूर्ख आहात वगैरे म्हणून लोकांच्या अंधश्रद्धा नाहीशा होत नाहीत.
खरा अर्थ सांगा म्हणजे खोट्या कल्पना आपोआप नाहीशा होतील.

***WITH BEST COMPLIMENTS FROM : DEODHAR GROUP***

## PRODUCT COATING

*An ISO 9001 : 2008 Certified Company*
*Manufacturing & Supply of Resin coated sand, shell cores & core assemblies*

## DECENT DECORATORS

*For Quality Coatings*
*Industrial and Decorative painting contractors Civil Engineers & Contractors*

## DECENT INTERIORS & DECORATIVE PVT. LTD.

*Interior Decorators & Furniture Contractors*

## JANSEVA BHOJANALAYA

*Maharashtrian Dining Hall*

## MEHFIL CATERING SERVICES

### HARSHAL HALL

*Two Marriage Halls with Ample Parking Space*

## RAMRAI

*Farming, Horticulture, Nursery*

**Chinchwad Office :** Plot No. 81, D-III Block, MIDC, Chinchwad, Pune 411019.
Telephone : 27473730, Web : deodhargroup.com
Email : product_coating@yahoo.com,
decentdecoratorspune@gmail.com

**Pune Office :**

759/55, B, Deccan Gymkhana, Pune 411004
Telephone : 25678217, 25679488, Fax : 25679497

With Best Compliments From

**CADMOSIL CHEMICALS PVT. LTD.**

(Mfg. of Photo Resists & Allied Chemicals)

A-58, MIDC-Latur
Latur 473531.
www.imagetechindia.com

# With Best Compliments from

autohangar
Dealer for Mercedes-Benz Passenger Cars

metromotors
Auto Hangar Division

**PRABHADEVI:**
Ground Floor, Electric Mansion, Appasaheb Marathe Marg, Mumbai - 400 025.
Tel.: (022) 6743 4360-64, Fax: (022) 6743 4365.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**HUGHES ROAD (SOUTH MUMBAI):**
Metro Motors Auto Hangar Division, Motor House, Ground Floor,
66 Hughes Road, Mumbai - 400 007. Tel.: (022) 6612 3500, Fax: (022) 6612 3535.
**Email: info@metromotors-autohangar.com • Website: www.metromotors.in**

**ANDHERI (W):**
Aston Building, Ground Floor, Suburban Diagnostic Centre, Near Lokhandwala Circle,
Shastri Nagar, Mumbai - 400 053. Tel.: (022) 6710 6660-63, Fax: (022) 6710 6664.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**CORPORATE SALES:**
Mezzanine Floor, Rajan House, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025.
Tel.: (022) 6612 3870, Fax: (022) 6612 3899.
**Email: info@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**NAGPUR:**
Plot No. C-40 B, Central MIDC Main Road, MIDC Hingna, Nagpur - 440 028.
Tel.: (07104) 238180-83.
**Email: customerconnect@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

**RAIPUR:**
P. C. No. 104, Village Dumartalab, Mohaba Bazaar, Next to Hotel Picadaly,
G. E. Road, Raipur - 492 099. Tel.: (0771) 6537801-08.
**Email: customerconnect@autohangarindia.com • Website: www.autohangar.in**

# ‘स्व’-रूपवर्धिनी म्हणजेच

* सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था
* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था
* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
* विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक ‘राष्ट्रीय प्रकल्प’
* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था
* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

---

'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PCW / 148 / 2017-2019
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at PSO Kasba Peth, Pune on 25th of every month

प्रति, ______________________________

______________________________

______________________________

हे मासिक ‘स्व’रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन,
यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे –११ येथे प्रसिद्ध केले.